पंतप्रधान

म. ग्रं. सं. ठाणें
विषय जिवेघ
सं. क्र. ३१४८













REFBK-0024848

प्रफुल्ल सागळे

किंमत ३० रुपये

संग्रहे जिल्हा राजकोय
३७४८
२७४८
२०२८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

16 MAR 1986

19 MAR 19[illegible]

1 JUN 1986

18 JUN [illegible]

12 AUG 1987

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

जिल्हा ग्रंथालय
ग्रंथ शाखा ठाणे

सप्रभे जनपद राजकोट
३७४८
३.८४८
इ.स.२८८

शतचक्र

-प्रफुल्ल कामळे

REFBK-0024848

ठाणे ग्रंथ संग्रहालय ठाणे
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

ठाणे ग्रंथ संग्रहालय ठाणे
३७४८
३.८४८
इ.स.२८८
संग्रह शाखा (स्थळ

सत्ताचक्र :
प्रफुल्ल सागळे.

कॉपी राईट सर्वाधिकार :
सौ. रेखा प्रफुल्ल सागळे.

प्रथमावृत्ती :
३१ डिसेंबर, १९८५.

प्रकाशक :
बाळासाहेब हांडे

'स्नेहसौख्य' प्रकाशन,
ग्रूप ५ ए/३९७/४६२०, टागोरनगर,
विक्रोळी (पूर्व), मुंबई–४०० ०८३.

मुद्रक :
अजंठा प्रिंटर्स,
माजिवडे, ठाणे–४०० ६०१.

मुखपृष्ठ छपाई :
विमल आर्ट प्रिंटरी,
विक्रोळी (पश्चिम), मुंबई–४०० ०८३.

मुखपृष्ठ सजावट :
रामकृष्ण नरे.

किंमत :
तीस रुपये.


सोहसौख्य
प्रकाशन

अनुक्रमणिका

१] जीभेने राज्य घालविले ४

२] कर्तृत्व व्यसनात बुडाले ! १४

३] महाराष्ट्रातील एक तुफान २६

४] महाराष्ट्राचे हसे करणारा मुख्यमंत्री ५४

५] आणि शहाण्या व्यवहारी माणसाचे राज्य आले ७७

६] मर्दानी ९१

७] राजीव नेतृत्वाचा उदय ९९

८] साहेब १०७

९] महाराष्ट्राची अस्मिता व वसंतदादांचा राजीनामा ! ११२

१०] राजकारणातील गमती–जमती १२६

प्रास्ताविक

"सत्ताचक्र" हे राजकीय स्वरुपाचे पुस्तक आहे हे उघड आहे. महाराष्ट्रातील "साहेब" शाही जाऊन महाराष्ट्राच्या राजकारणात जी उलथापालथ झाली याचे चित्रण या पुस्तकात आहे. १९७७ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी व काँग्रेसचा लोकसभा निवडणूकीत दारूण पराभव झाल्यानंतर त्यांचे "बडे" सहकारी त्यांना सोडून गेले. केंद्रात जनता पक्षाची विरोधी राजवट आलेली. दुसरीकडे इंदिराबाईच्या "मी मी" म्हणणाऱ्या सहकाऱ्यांनी पळ काढलेला. जनता सरकार सूडाच्या भावनेने पेटलेले होते. "बाईला" "आणीबाणी" ची कसून शिक्षा करण्याचा चंग जनता सरकारने बांधला होता. चोहोबाजूनी वणवा पेटलेला. अशा परिस्थितीत इंदिराबाई स्वत:च्या रक्षणासाठी पुढे सरसावल्या. दुसरा इलाजच नव्हता. बाई गप्प बसल्या असत्या, राजकीय निवृत्ती पत्करली असती तरी सूडाचा प्रवास संपला नसता. इंदिराबाई १९७७ च्या पराभवानंतर जवळ-जवळ ३ महिने गप्प होत्या, परंतु त्यामुळे जनता सरकारकडून त्यांच्यावर होणारे हल्ले थांबले नव्हते. "मागे फिरले तरी धोका व पुढे गेले तरी धोका" अशा परिस्थितीत लढण्याशिवाय दुसरा मार्गच बाईसमोर नव्हता. आणि मग बाई कंबर कसून मैदानात उतरल्या. १९७८ मध्ये महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रमध्ये विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होत्या. याचा फायदा उठविण्याचे बाईंनी ठरविले व आपली वेगळी काँग्रेस (इंदिरा) काढली. महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसची स्थापना झाल्यापासून ते तिच्या हाती सत्ता येईपर्यंतच्या राजकीय घडामोडींचा मी एक महत्त्वाचा साक्षीदार आहे. साप्ताहिक "चॅलेंज", दैनिक "नवाकाळ" व नंतर दैनिक "लोकसत्ता" चा प्रतिनिधी, पत्रकार म्हणून या घटना मी टिपल्याच, परंतु राजकारणाची जबर आवड असल्यामुळे पडद्यामागील हे सर्व राजकारण मी अगदी जवळून पाहिले आहे. इंदिरा काँग्रेसमध्ये माझे काही मित्र आहेत व आज ते या पक्षात व राज्य सरकारात उच्च स्थानावर पोचले आहेत. त्यांची मला हे पुस्तक लिहितांना खूप मदत झाली आहे.

पत्रकार म्हणून आम्ही बातम्या लिहितो, राजकीय बातम्याही लिहितो. आपण हे "राजकारण" दररोज वाचता. परंतु या बातम्यांमागे असलेल्या अनेक लहान-मोठ्या घटना मोठ्या मनोरंजक असतात. त्या काही 'डेली रिपोर्टात' देता

येत नाहीत. अशा काही घटना येथे दिल्या आहेत. त्यातील बऱ्याचशा घटनांशी माझा व्यक्तिगत संबंध आलेला आहे. स्थूल मानाने वसंतदादा पाटील–बाळासाहेब तिरपुडे यांचे संयुक्त मंत्रिमंडळ ते बाबासाहेब भोसले व पुन्हा वसंतदादा मुख्यमंत्री झाले इथपर्यंतच्या सत्तांतराच्या घटना या पुस्तकात आहेत. वृत्तपत्रातील "साहित्य" हे धबाड घाईचे असते. तसेच हे पुस्तक अत्यंत घाईगर्दीत म्हणजे साधारणतः एक महिन्यात मी लिहिले. अर्थात या घटनांची नोंद खूप दिवस मनात होती. त्या घटना येथे सादर केल्या आहेत. या एकूण घटना मला " इंटरेस्टिंग " वाटल्या, आपल्याही मनाचा त्या ठाव घेतील !

एक गोष्ट येथे नमूद केली पाहिजे. हे राजकीय पुस्तक आहे. आणि राजकारण हा गंभीर विषय आहे. येथे लालित्यपूर्ण लिखाणास फारसा वाव नाही. भाषेचा फुलोरा येथे फुलविता येत नाही. या पुस्तकात विषयाचे गांभीर्य राखण्याचा मी प्रयत्न केला आहे. तथापि, भाषा जास्तीत जास्त साधी व सोपी वापरली आहे. महाराष्ट्रातील राजकीय घटनांची उकल सर्वसामान्य माणसालाही व्हावी, असा माझा प्रयत्न आहे. महाराष्ट्रातील १९७८ ते १९८३ या काळातील सत्तांतराचे हे चित्रण करतांना वस्तुस्थिती मांडण्याचा मी कसोशीने प्रयत्न केला आहे. वस्तुस्थितीच्या जास्तीत जास्त जवळ जाण्याचा व अधिकाधिक अचूक माहिती देण्याचा माझा प्रयत्न आहे. तथापि, त्यात काही उणीवा असण्याची, त्रुटी राहण्याची शक्यता आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे.

हे पुस्तक लिहितांना राजकारणातील, विशेषतः इंदिरा काँग्रेसमधील ज्या मित्रांनी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मदत केली त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय हे पुस्तक पूर्ण झालेच नसते. तथापि, त्यांच्या नावाचा उल्लेख करून मी त्यांना अडचणीत आणणार नाही.

या पुस्तकातील काही उल्लेखांमुळे काही लोक दुखावतील याची मला कल्पना आहे. कारण या मंडळींशी माझे व्यक्तिगत संबंध आहेत व ते संबंध अतिशय जवळचे व जिव्हाळ्याचे आहेत. सदर पुस्तक म्हणजे महाराष्ट्राच्या १९७८ ते १९८३ या काळातील एक प्रकारे राजकीय इतिहास आहे. हा इतिहास लिहित असतांना मी व्यक्तिगत मैत्री, ओळख बाजूला ठेवून जशा या व्यक्ती मला जाणवल्या तशा त्या चितारल्या आहेत. अतिशय वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून त्यांचे गुण-दोष रेखाटले आहेत. नाहीतर हे पुस्तक स्तुतीपाठकाचे चोपडे झाले असते, राजकीय इतिहास झाला नसता ! या पुस्तकाच्या प्रकाशनानंतरही या मंडळींच्या

व्यक्तिगत मैत्रीत, संबंधात बाधा येणार नाही, अशी मी आशा करतो. तेवढे मोठं मन या थोर लोकांकडे आहे, असे मला वाटते.

प्रकाशक, **श्री. बाळासाहेब हांडे, "स्नेहसौख्य" प्रकाशन** यांचे आभार मानणे माझे कर्तव्य आहे. त्यांच्या बहुमोल सहकार्याशिवाय हे पुस्तक आपणापर्यंत पोचू शकले नसते.


या पुस्तकासाठी ज्यांनी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मदत केली त्या सर्वांचाही मी आभारी आहे.

१५ जानेवारी, १९८४. **– प्रफुल्ल सागळे**

सी–१७/६, बर्वेनगर,
घाटकोपर, मुंबई–४०० ०८४.

ताजा कलम – या पुस्तकात १९८३ पर्यंतच्याच घटना द्यावयाच्या ठरविले होते. परंतु पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर असतांना काही घटनाच अशा घडल्या की त्यांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. याशिवाय हे पुस्तक पूर्ण होऊच शकत नाही. या कालखंडात इंदिराजींची निर्घृण हत्या झाली, त्यानंतर यशवंतरावजी चव्हाण यांचे अचानक निधन झाले, लोकसभेच्या निवडणुका आल्या, त्यात राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील इंदिरा काँग्रेस पक्षाने अभूतपूर्व विजय मिळविला. बॅ. अंतुल्यांना लोकसभेचे तिकीट नाकारण्यात आले व त्यांनी 'भारतीय काँग्रेस' नांवाचा नवा पक्ष काढला, त्यानंतर विधानसभेच्या निवडणुका आल्या व महाराष्ट्रात झालेल्या चुरशीच्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेसला जेमतेम बहुमत मिळून पुन्हा वसंतदादा पाटील हेच मुख्यमंत्री झाले आणि अवघ्या दोन महिन्यात त्यांनी पदत्याग केला, एवढ्या महत्त्वपूर्ण घटना घडल्या आहेत. त्यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न पुस्तकाच्या अखेरीस केला आहे. पुस्तक छपाईपर्यंत अधिकाधिक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१] जीभेने राज्य घालविले




श्री. नासिकराव तिरपुडे

तिखट जीभेने व टर्रेबाज स्वभावाने राज्य घालविण्याच्या दोन घटना महाराष्ट्राच्या राजकारणात घडल्या आहेत. स्वतःबद्दल जादा आत्मविश्वास व त्यामुळे बलाढ्य इंदिरा–शक्तीशी नाहक संघर्ष घेऊन स्वतःची राजकीय हाराकिरी या व्यक्तींनी करून घेतली. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री श्री. नासिकराव तिरपुडे व माजी मुख्यमंत्री बॅ. अब्दुल रेहमान अंतुले तसे दोघेही अत्यंत तडफदार, राजकीय डावपेच खेळण्यात मातब्बर, चांगले प्रशासक, परंतु जीभ व स्वभाव यांनी सारा घोटाळा केला. तिरपुडे–अंतुले हे दोघेही शारीरिक उंचीने लहान, पण संधी मिळताच त्यांनी आपल्या कर्तृत्वाची "उंची" दाखविली. हे दोघेही गरजले, गाजले व अल्प काळात लुप्त झाले ! १९७७ च्या लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर अखिल भारतीय काँग्रेस पक्षाची सूत्रे जवळजवळ साहेबांकडे (यशवंतराव चव्हाण) गेली होती. श्रीमती इंदिरा गांधी यांच्यावर चौफेर राजकीय हल्ले होत असल्याने त्यांना स्वरक्षणार्थ लढणे भाग होते. सत्तेवर कट्टर विरोधक–जनता पक्ष–हा सत्तेवर आलेला. काँग्रेस पक्ष बाईंच्या मागे उभा रहावयास तयार नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांची उत्तम संधी साधून बाईंनी आपली नवीन इंदिरा काँग्रेस १९७८ मध्ये काढली.

साहेबांच्या सरदारकी विरुद्ध बंड

महाराष्ट्राच्या राजकारणात त्यावेळी साहेबांचा हा दरारा ! त्यात अखिल भारतीय काँग्रेसची सूत्रे साहेबांकडे आलेली. अशा परिस्थितीत खुद्द साहेबांच्या राज्यांत त्यांच्या सरदारकीविरुद्ध "बंड" कोण करणार ? पण तिरपुडे हा या सरदारकीविरुद्ध बंड करणारा पहिला "मावळा" बाईना भेटला. वसंतदादांच्या मंत्रिमंडळातून राजीनामा देऊन बाईंच्या पक्षाला ते येऊन मिळाले. पुढे येण्याची, कर्तृत्व दाखविण्याची हीच योग्य वेळ व संधी आहे हे धूर्त तिरपुडेंनी ओळखले व राज्यात अगदीच नगण्य असलेल्या इंदिरा काँग्रेसच्या स्थापनेसाठी त्यांनी स्वतःला अक्षरशः झोकून दिले. काँग्रेस पक्षातील सगळे सरदार, दरकदार यांनी पाठ फिरविली असतांना मिळेल तो तळाचा कार्यकर्ता घेऊन आपला फौजफाटा उभा करण्याचा चंग इंदिराबाईंनी बांधला होता. हाच कित्ता इकडे तिरपुडे यांनी गिरविला.

१९७८ मध्ये काँग्रेस पक्ष फुटला तेव्हा पुढारी, नेते, मातब्बर कार्यकर्ते काँग्रेस पक्षात राहिले, तर अनेक वर्ष दबलेला तळाचा कार्यकर्ता मात्र इंदिराबाईंच्या काँग्रेसला येऊन मिळाला. याचा तिरपुडेंनी मोठ्या कौशल्याने वापर करून घेतला. दादांच्या मंत्रिमंडळातून राजीनामा देऊन तडफेने बाहेर पडलेल्या तिरपुड्यांनी महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेस उभारण्यासाठी कंबर कसली. (दादांच्या मंत्रिमंडळात ते आदिवासी विकास मंत्री होते.) परिस्थितीचे आव्हान चाणाक्ष तिरपुडे यांनी स्वीकारले. यावेळी तिरपुड्यांचे संघटना– कौशल्य पणाला लागले. त्यांनी चर्चगेट येथील आपल्या "मस्कती कोर्ट" या घरीच महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसचे कार्यालय सुरू केले व मोठा थाटमाट न करता कार्याला धडाक्यात सुरूवात केली. तिरपुडे कार्यालयीन थाटमाट उभे करू शकले नसते अशातला भाग नव्हता. पण सामान्य कार्यकर्त्यांची जिद्द, जिगर त्यांना जोपासावयाची होती. इंदिरा काँग्रेस गरीबांची आहे, सर्वसामान्यांची आहे हे चित्र त्यांना बिंबवायचे होते. म्हणून त्यांनी पारंपारिक काँग्रेसी थाटमाटाला चाट दिली. तिरपुड्यांचे स्वीय सहाय्यक वासनिक यांनी निवडणुकीच्या रेकॉर्डसाठी फाईल्स विकत आणल्या व "मस्कती कोर्ट" मध्ये महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसचा कारभार सुरू झाला. येथेच तिरपुड्यांना महाराष्ट्रातून विविध कार्यकर्ते भेटावयास येत. काँग्रेसची बहुसंख्य कार्यालये पारंपारिक काँग्रेसकडे (स्वर्णसिंग काँग्रेस) होती. तर तळाचा कार्यकर्ता इंदिरा काँग्रेसकडे वळला होता. तिरपुड्यांकडे येणारे बहुसंख्य कार्यकर्ते अगदीच सामान्य व "कडकाभाई" होते. पण या कार्यकर्त्यांकडे भागाभागातील काँग्रेसी प्रस्थापित



नेतृत्वाविरुद्ध लढण्याची कमालीची जिद्द होती. ही जिद्दच महत्त्वाची होती. तिरपुडे या कार्यकर्त्यांना सांगत असत 'आपापल्या घरी, जमेल तिथे पक्षाचे कार्यालय सुरू करा, चार सतरंज्या टाका नि कामाला लागा'. तिरपुडे यांनी या जिद्दीनेच महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसची पताका लावली ! तळागाळातील कार्यकर्त्याला हाताशी धरून त्यांना विधानसभेसाठी "उमेदवार" केले. बहुसंख्य उमेदवार हे मुळीच "उमेद" नसलेले (निवडून येण्याची) होते. प्रस्थापित दृष्टीने तर ते झेड. पी. च्याही लायकीचे नव्हते. पण तिरपुडचांनी त्यांना तिकीट देऊन "उभे" केले. बरेचसे तिकीट-वाटप तर तिरपुडे यांच्या चर्चगेट येथील घरून फोनवरूनच झाले. यासाठी तिरपुडचांचे स्वीय सहाय्यक ठिकठिकाणी "ट्रंक कॉल" लावायच्या कामात गर्क असलेले मी स्वतः पाहिले आहे.

उमेदवार मिळत नव्हते !

तिरपुडे यांनी तिकीट वाटपाची कसरत करून विधानसभेसाठी कसेबसे उमेदवार उभे केले खरे, पण या सर्वच उमेदवारांची राजकीय तब्येत एवढी "तोळा मासा" होती की निवडणुकीच्या आधीच हे "काडी पैलवान" चितपट होतील असेच कुणालाही वाटले असते. अशीच सर्वसाधारण सर्वत्र चर्चा होती. इंदिरा काँग्रेसला एकतर उमेदवार मिळत नव्हते, मिळाले त्यांना धरून बांधून "गोसावी" केले होते. त्यामुळे महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसची दखल त्यावेळी कुणीही फारशी गंभीरपणे घेतांना दिसत नव्हते. वृत्तपत्रांच्या दृष्टीने तर हा पक्ष म्हणजे एक हास्याचा विषय होता. जनता पक्षाच्या लाटेचा हा काळ होता. केंद्रात जनता सरकार सत्तारूढ झाले होते व इतर नऊ राज्येही या पक्षाने काबीज केली होती. महाराष्ट्रातील यशवंतराव–वसंतदादा–नरेंद्र तिडके–शरद पवार ही मातब्बर मंडळी स्वर्णसिंग काँग्रेसमध्ये होती. महाराष्ट्रात जनता पक्षाचे सरकार येणार अशी एकूण "हवा" होती. त्या खालोखाल दुसरे स्थान स्वर्णसिंग म्हणजे यशवंतराव–दादा काँग्रेसला मिळेल असा एकूण रागरंग होता. नव्यानेच स्थापन झालेल्या इंदिरा काँग्रेसची फारसी "डाळ" शिजेल असे त्यावेळी कुणाला वाटत नव्हते.

विदर्भावर लक्ष केंद्रित

अशा एकूण राजकीय परिस्थितीत बाळासाहेब तिरपुडे यांनी विदर्भावर आपले खरे लक्ष केंद्रित केले. इंदिरा गांधी सत्तेवरून गेल्या तरी विदर्भ त्यांना अद्याप मानतो हे श्रीमती गांधींच्या सभांना होणाऱ्या गर्दीवरून दिसून येऊ लागले. आणि एकूण मिळणारा पाठिंबा पाहून इंदिराजींचा झंझावाती प्रचार

दौरा विदर्भात पुनः पुन्हा होऊ लागला. विदर्भ त्यांनी पिंजून काढला. मुंबई–पुण्याच्या वृत्तपत्रांनी बाईंच्या सभांना होणाऱ्या या प्रचंड गर्दीची फारशी दखल घेतली नाही. (मुंबईहून त्यावेळी निघणारे डॉ. शेरेकर यांचे साप्ताहिक "चॅलेंज" हे त्याला अपवाद होते.) पण विदर्भात बाईंना जोरदार पाठिंबा मिळत आहे, असे प्रत्यक्ष भेटणारे लोक सांगत असत. तथापि, महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेस सत्तेवर येईल असे कुणालाच वाटत नव्हते. तसे म्हणणाऱ्यास त्यावेळी वेडयातच काढण्यात आले असते ! तथापि, बॅ. ए. आर्. अंतुले यांना महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसला १०० जागा मिळतील असे वाटत होते. श्री. रामराव आदिक यांच्या गलबार हिलवरील शासकीय बंगल्यावर आम्ही बसलो होतो. (त्यावेळी रामरावांनी महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट जनरलपदाचा नुकताच राजीनामा दिला होता व ते इंदिरा काँग्रेसला येऊन मिळाले होते.) रामराव, आमदार डॉ. वा. रा. शेरेकर, मी व बॅ. अंतुले असे चौघेच जण होतो. वेळ रात्रीची होती. गप्पा चालल्या होत्या. त्यावेळी बोलतांना बॅ. अंतुले यांनी प्रचार दौऱ्यातील आपले अनुभव सांगतांनाच आपला हा अंदाज बोलून दाखविला.

"पंजा"चा चमत्कार

आंध्र, कर्नाटक व महाराष्ट्र या तीन राज्यातील विधानसभेच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. आंध्र, कर्नाटकमध्ये इंदिरा काँग्रेसला बहुमत मिळाले, तर बाजूच्याच विदर्भात इंदिरा काँग्रेसने चमत्कारच घडविला. आंध्र, कर्नाटकची हवा विदर्भापर्यंत आली. विदर्भातील जनतेने बाईंच्या "पंजा"ला मते दिली. उमेदवार कोण हे बघितले नाही आणि भल्याभल्यांना आडवे केले. विदर्भात स्वर्णसिंग काँग्रेस व इंदिरा काँग्रेस यांच्यातच लढाई झाली आणि इंदिरा काँग्रेसचे अगदीच नवखे उमेदवार स्वर्णसिंग काँग्रेसच्या मातब्बर उमेदवारांचा दणदणीत पराभव करून निवडून आले. स्वर्णसिंग काँग्रेसच्या अनेक उमेदवारांचे "डिपॉझिट" गेले. त्यावेळचे विधानसभेचे अध्यक्ष बॅ. शेषराव वानखेडे, मंत्री शंकरराव गेडाम यांचा नागपुरात दणदणीत पराभव झाला ! एवढेच नव्हे तर त्यांचे "डिपॉझिट"ही गेले. पश्चिम महाराष्ट्रात यशवंतराव – दादांमुळे स्वर्णसिंग काँग्रेसला चांगले यश मिळाले, तर मुंबई, कोकण, खानदेश, काही प्रमाणात मराठवाडा येथे जनता लाटेने चांगलाच प्रभाव पाडला. मुंबईत संपूर्णपणे जनता लाट विजयी ठरली, पण इंदिरा काँग्रेसच्या अगदीच नगण्य व गरीब असलेल्या उमेदवारांनी स्वर्णसिंग काँग्रेसच्या उमेदवारांच्या बरोबरीची, काही ठिकाणी तर त्यांच्यापेक्षा अधिक मते मिळविली. जगेश देसाई हे राज्यमंत्री स्वर्णसिंग काँग्रेसतर्फे सांताक्रुझहून उभे

होते, त्यांच्याविरूद्ध गोवंडी येथे राहणारे एक गरीब पत्रकार कार्यकर्ते श्री. वसंतराव पागराऊत यांना इंदिरा काँग्रेसने तिकीट दिले होते. निवडणुकीत जनता पक्षाचा उमेदवार निवडून आला, पण पागराऊत यांना जगेश देसाई यांच्यापेक्षा अधिक मते मिळाली. जगेशभाईंना सोळा हजार तर पागराऊतांना अठरा हजार मते पडली. वरळी येथे इंदिरा काँग्रेसचे तरुण उमेदवार श्री. वसंत ननावरे यांनी श्री. शरद दिघे (माजी विधानसभा अध्यक्ष) यांच्याशी जोरदार लढत दिली. ननावरेंना मिळालेली मते नजरेत भरण्यासारखी होती. या निवडणुकीत दिघे–ननावरे दोघेही पडले. दिघे यांना तीन नंबरची मते पडली. वरळीला जनता पक्षीय आघाडीचा उमेदवार विजयी झाला. इंदिरा काँग्रेसच्या नगण्य उमेदवारांनी प्रचाराची साधने नसतांनाही चांगली मते घेऊन मुंबईतही इतिहास घडविला !

जनता पक्षाने सर्वाधिक जागा पटकावल्या

महाराष्ट्राच्या राजकारणात इंदिरा काँग्रेसला अचानक घवघवीत यश मिळाले. जनता पक्षाने सर्वाधिक जागा पटकावल्या असल्या (सुमारे ९६ व शे. का. प. आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट हे मित्र पक्ष मिळून ही संख्या १०४ वर जात होती.) तरी बहुमत होऊन राज्य करण्याएवढे संख्याबळ त्यांच्याजवळ नव्हते. स्वर्णसिंग काँग्रेस (६९) व इंदिरा काँग्रेस (७२) या दोघांचे मिळून कसेबसे बहुमत होत होते. परंतु या दोन काँग्रेसचे संबंध निवडणुकीच्या काळात एवढे बिघडले होते की त्यांच्यात विस्तव न जाण्याएवढी वेळ आली होती. केंद्रात जनता पक्षाचे सरकार होते व जनता पक्षीय पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांचे मित्र श्री. सादिक अली हे महाराष्ट्राचे राज्यपाल होते. हे सादिक अली पूर्वी सिंडिकेट काँग्रेसचे अध्यक्षही होते. राज्यात निवडून आलेला सगळ्यात मोठा पक्ष म्हणून आपणास सरकार बनविण्यास पाचारण करावे अशी मागणी जनता पक्षाने राज्यपालांकडे केली. यावेळी विद्यमान मुख्यमंत्री वसंतदादा पाटील हे होते व स्वर्णसिंग काँग्रेसला बहुमत मिळाले नसतानाही 'पुन्हा आपणच मुख्यमंत्री होणार.' असे विधान दादांनी केले. यावेळी जनता पक्षाशी दादा हातमिळवणी करतील असे बोलले जात होते.

काँग्रेसवाल्यांचा सत्तेचा मोह

इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती गांधी यांनी हा धोका ओळखला असावा. काँग्रेसी राजकारणाचे बाळकडू मिळालेल्या इंदिराबाईंना काँग्रेसवाल्यांना सत्तेचा मोह कसा असतो हे चांगले ठाऊक होते. त्यामुळे स्वर्णसिंग काँग्रेसशी निवडणुकीत

अटीतटीची झुंज दिल्यावरही महाराष्ट्रात स्वर्णसिंग काँग्रेस बरोबर संयुक्त मंत्रिमंडळ स्थापन करण्यास त्यांनी झटकन् परवानगी तिरपुडयांना दिली.

तिरपुडयांचे भाषण – कौशल्य

महाराष्ट्रात नवीन सरकार कुणाचे येणार याचे "नाटच" घडत असतांनाच तिरपुडे यांनी इंदिरा काँग्रेसच्या निवडून आलेल्या नवीन आमदारांची सभा मुंबईला क्रिकेट क्लब ऑफ इंडिया (सी. सी. आय्.) च्या सभागृहात बोलाविली. या सभेला तिरपुडे थोडे उशीराच आले. इतरांची मार्गदर्शनपर भाषणे झाल्यावर या सभेचे "हिरो" असलेले बाळासाहेब तिरपुडे टाळयांच्या कडकडाटात भाषणा साठी उठले. यावेळी तिरपुडे यांनी केलेले भाषण त्यांच्या भावनात्मक वक्तृत्वाचा एक उत्तम मासला आहे. यशवंतराव हा तिरपुडेंचा "विक पॉईंट" आहे, या वेळीही तिरपुडे यशवंतरावांवर घसरले. स्वर्णसिंग काँग्रेसवाल्यांवर तुटून पडले. स्वर्णसिंग काँग्रेसवाल्यांना पाडून निवडून आलेल्या उपस्थित आमदारांचा "मूड" तिरपुडे यांना चांगला माहीत होता. स्वर्णसिंग काँग्रेसवाल्यांचा भरपूर समाचार घेतल्यावर व एकदा सभा काबीज केल्यावर तिरपुडे यांनी स्वर्णसिंग काँग्रेसबरोबर संयुक्त मंत्रिमंडळ स्थापन करण्याचा "घुटका" शेवटी आमदारांच्या गळी उतरविला. स्वर्णसिंग काँग्रेसबरोबर म्हणजे यशवंतराव, वसंतदादा यांच्याबरोबर सरकारात बसण्यास आमदारांप्रमाणेच आपणही तयार नसल्याचे त्यांनी आमदारांना सांगितले. प्रसंगी विरोधी पक्षात बसण्याची तयारी त्यांनी बैठकीचा एकूण "मूड" पाहून दर्शविली, पण तसे केल्याने जनता पक्ष सत्तेवर येईल ही भीती त्यांनी बोलून दाखविली, व वसंतदादांबरोबर सरकार स्थापन करण्यास इंदिरा काँग्रेस आमदारांची मोठ्या कौशल्याने अनुमती घेतली.

राज्यपालांचा " वेळकाढू " पणा

या घटनेनंतर मात्र राज्यात दोन्ही काँग्रेसचे संयुक्त सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीने वेगाने हालचाली सुरू झाल्या. दादा–तिरपुडे यांनी आपणास बहुमत असल्याचा दावा राज्यपालांकडे केला. राज्यपालांना खात्री पटावी म्हणून दोन्ही काँग्रेसच्या सर्व आमदारांना राजभवनावर "कडेकोट देखरेखी" खाली (जनता पक्ष आमदारांना "फोडील" या भीतीने) खास बसेसमधून नेण्यात आले. तेथे आमदारांची परेड झाली. बहुमत दाखविण्यात आले. दोन्ही काँग्रेसचे आमदार तसेच काही अपक्ष मिळून १४९ आमदारांची

यादी राज्यपालांना सादर करण्यात आली. बहुमतासाठी १४५ आमदार हवे होते. विधानसभेची सदस्य–संख्या २८८ आहे. तथापि, राज्यपाल वेळ मागत होते. केंद्राशी संपर्क साधतो, असे सांगत होते. तत्पूर्वी बाळासाहेब तिरपुडे, एन्. के. पी. साळवे, डॉ. वा. रा. शेरेकर व प्रभाराव हे राज्यपालांचे दोन दिवस मन वळवित होते. परंतु राज्यपाल काही केल्या ऐकेनात ! याच वेळी निवडून आलेला सगळ्यात मोठा पक्ष म्हणून आपणास सरकार स्थापन करण्यास परवानगी मिळावी, असा दावा जनता पक्ष करीत होता. राज्यपालांच्या "वेळकाढू" धोरणात काहीतरी "काळेबेरे" आहे, असा संशय इंदिरा काँग्रेसच्या लोकांना आला व दोन्ही काँग्रेसचे मिळून बहुमत असतांना राज्यपालांनी सरकार स्थापन करण्यास आपणास न बोलविल्यास मुंबईत व इतरत्र आंदोलन सुरू करण्याची तयारी इं. काँ. च्या नेत्यांनी सुरू केली. काँग्रेस आघाडीच्या १४९ आमदारांनी राज्यपाल सादिक अली यांना समक्ष भेटून त्यांच्यासमोर सह्या केल्या होत्या. तथापि, सादिक अली केंद्राशी विचारविनिमय करावयाचा आहे, असे सांगत होते.

जांबुवंतरावांची पेटविण्याची भाषा

राज्यपालांच्या या कृतीचा काँग्रेस आघाडीच्या आमदारांनी राजभवनातच सभा घेऊन निषेध केला व त्यांच्यावर पक्षपातीपणाचा आरोप केला. राजभवनातील "जल विहार" सभागृहात झालेल्या या बैठकीत बोलतांना विदर्भवीर श्री. जांबुवंतराव धोटे यांनी तर 'संसदीय व लोकशाही मार्गाने बहुमत सिद्ध करूनही राज्यपाल ऐकत नसतील तर महाराष्ट्र पेटवून देऊ' अशी भाषा वापरली. जोपर्यंत राज्यपाल आपला निर्णय जाहीर करीत नाहीत, तोपर्यंत राजभवनात बैठा संप, धरणे धरण्याचे काँग्रेस आमदारांनी ठरविले होते. महाराष्ट्राच्या संसदीय इतिहासात एक वेगळाच पेचप्रसंग निर्माण झाला होता. राज्यपालांच्या कसोटीचा हा दुर्मिळ प्रसंग होता. या पेचप्रसंगाचा शेवट मात्र गोड झाला. राज्यपाल सादिक अली यांनी सूज्ञपणा दाखवून अखेर वसंतदादांना सरकार स्थापन करण्यास पाचारण केले व पुढील अनर्थ टळला.

काँग्रेसचे संयुक्त मंत्रिमंडळ

वसंतदादा पुन्हा मुख्यमंत्री झाले. फरक एवढाच की स्वर्णसिंग काँग्रेस व इंदिरा काँग्रेसचे हे संयुक्त मंत्रिमंडळ होते. इंदिरा काँग्रेसचे तिरपुडे उपमुख्यमंत्री झाले. महाराष्ट्रात प्रथमच उपमुख्यमंत्रीपद निर्माण करण्यात आले. तिरपुडे उप-

मुख्यमंत्री असले तरी आपणच मुख्यमंत्री आहोत या थाटात त्यांचे वागणे व एकूण बोलणे होते. दादांच्या मंत्रिमंडळात राहून तिरपुडे यांनी आपल्या वागण्या-बोलण्याने "हैदोस" सुरू केला. त्यातच तिरपुडेंकडे गृहखाते होते. त्यांची आधीच तिखट असलेली "जीभ" सत्तेमुळे आणखीनच खमंग बनली दादा-तिरपुडे यांचे संयुक्त मंत्रिमंडळ फार काळ चालणार नाही अशी एकूण लक्षणे दिसू लागली. स्वर्णसिंग काँग्रेसबरोबर संयुक्त मंत्रिमंडळात असतानाच या काँग्रेसचे एक ज्येष्ठ नेते श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यावर तिरपुड्यांनी हमले करणे सुरूच ठेवले होते. शेवटी याचा व्हायचा तोच परिणाम झाला. यशवंतराव चव्हाणांचे "मानस पुत्र" समजले जाणारे श्री. शरद पवार हे मंत्री आपल्या तीस-बत्तीस आमदारांसह दादा, तिरपुडे यांना "रामराम" ठोकून जनता पक्षास जाऊन मिळाले. शरद पवार हा पवित्रा घेणार अशा तऱ्हेच्या अफवा मोठ्या प्रमाणावर होत्या. काही वृत्तपत्रांनी त्या छापल्याही होत्या. पण दादांनी त्यावर विश्वास ठेवला नाही व तिरपुडे यांचे वागणे शेवटपर्यंत सुधारले नाही. अशा तऱ्हेने दादा-तिरपुडे यांचे संयुक्त मंत्रिमंडळ साडेतीन महिन्यांत कोसळले !

आणि विरोधी पक्षाचे सरकार आले

महाराष्ट्रात प्रथमच विरोधी पक्षाचे सरकार श्री. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले. "पुरोगामी लोकशाही दल" या नांवाखाली स्थापन झालेल्या आघाडीत पूर्वाश्रमीच्या जनसंघाचे श्री. उत्तमराव पाटील तसेच समाजवादी श्री. जगन्नाथ जाधव, श्री. निहाल अहमद हे मंत्री झाले. गोविंदराव आदिक, सुशीलकुमार शिंदे, प्रतापराव भोसले हे काँग्रेसजन "पुलोद" मंत्रिमंडळातून मंत्री झाले.

शरद पवारांनी मंत्रीमंडळ का पाडले ?

दादा – तिरपुडे यांचे मंत्रिमंडळ श्री. शरद पवारांनी का पाडले ? 'दादा इंदिरा काँग्रेसमध्ये जाऊन राज्यातील स्वर्णसिंग काँग्रेस संपविणार होते' असे शरद पवारांचे लोक सांगतात. दादांचे संयुक्त मंत्रिमंडळ पाडण्यात पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगपती असलेल्या त्या वेळच्या एका खासदाराने तसेच मुंबईतील एका प्रख्यात मारवाडी उद्योगपतीने खास रस का घेतला ? तिरपुडे या उद्योगपतीच्या घराण्याशी असलेले जुने "वैर" यांचा संबंध या मागे असावा ! या उद्योगपतीने तसेच उद्योगपती खासदाराने दादा – तिरपुडे मंत्रिमंडळ पाडण्यासाठी भरपूर खर्च केला, असेही त्यावेळी बोलले जात होते. वसंतदादांचे जिवलग मित्र कै. डॉ.

वा. चु. श्रीश्रीमाळ यांनी या माहितीस माझ्याशी बोलतांना दुजोरा दिला आहे.

तिरपुडेच मुख्यमंत्री झाले असते

दादा – तिरपुडे मंत्रिमंडळ गेले व पुढे तिरपुडे यांना इंदिरा काँग्रेसमधून जाणे भाग पडले, अशी परिस्थिती निर्माण झाली. किंबहुना तिरपुडे यांच्या तिखट, आक्रमक स्वभावामुळे ती निर्माण झाली असे म्हणावे लागेल. इंदिरा काँग्रेसची महाराष्ट्रात स्थापना तिरपुडे यांनी केली हे खरे आहे. त्यासाठी त्यांनी भरपूर परिश्रम घेतले. हे कुणालाही नाकारता येणार नाही. इंदिरा गांधींनीही ते नाकारले नाही. महाराष्ट्र सत्ता मिळताच इंदिरा काँग्रेसतर्फे पहिला उपमुख्यमंत्री होण्याचा मान त्यांनी तिरपुड्यांना दिला. काँग्रेसमध्ये "मराठा लॉबी" अत्यंत प्रभावी असताना एका हरिजनास महाराष्ट्रात प्रथमच उपमुख्यमंत्रीपद मिळाले. तिरपुड्यांनी जरा जीभेला लगाम घातला असता व थोडे धिमेपणाने घेतले असते तर १९८० मध्ये महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळाले तेव्हा बॅ. अंतुले यांच्याऐवजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. नासिकराव तिरपुडे हेच झाले असते ! महाराष्ट्रात एक अल्पसंख्यांक मुख्यमंत्री होण्याचा इतिहास बाईंमुळे घडला, या राज्याचा पहिला हरिजन मुख्यमंत्री होण्याचा बहुमान तिरपुडे यांनी स्वभावामुळे गमावला!

शरद पवार महाराष्ट्रातील संजय गांधी

सत्ता अनेकांच्या डोक्यात चढते. तिरपुड्यांच्याही डोक्यात ती चढली होती. इंदिरा गांधींनाही ते जुमानत नसत. त्यांनी ज्यांना मंत्री केले त्यांच्याशी त्यांची वागण्याची पद्धती अशोभनीय होती, असे अनेकांकडून ऐकावयास मिळाले. 'शरद पवार हा महाराष्ट्रातील संजय गांधी आहे' असे उद्‌गार तिरपुड्यांनी पुण्याच्या एका जाहीर सभेत काढले आणि इथेच त्यांची पायली भरली असे सांगतात ! तिरपुड्यांची सर्व पूर्वपुण्याई संपली ! त्यांना इंदिरा काँग्रेसमधून घालविण्यासाठी दिल्लीश्रेष्ठींकडून फतवा निघाला. आणि एकदा फतवा निघाल्यावर इतरांनी "हाके" घालण्याचे काम केले. विदर्भातीलच खासदार जांबुवंतराव धोटे, सरोज खापर्डे त्यांच्या हात धुवून मागे लागले. धोटचांनी अनेक इंदिरा काँग्रेसच्या पुढाऱ्यांच्या मुंबईत भेटी–गाठी घेऊन तिरपुड्यांविरुद्ध त्यांना संघटित केले. सरोज खापर्डे या हरिजन असूनही तिरपुडे यांना घालविण्यात त्यांनी मोठी भूमिका बजावली. त्यासाठी त्यांनी जीवाचा आटापिटा केला.


इंदिरा काँग्रेसमधून गेले नि परत आले !

इंदिरा काँग्रेसची महाराष्ट्रात स्थापना करणाऱ्या तिरपुड्यांना अखेर

इंदिरा काँग्रेसमधून आपल्या काही अनुयायांसह बाहेर पडावे लागले. त्यांच्याबरोबर बाहेर गेलेल्यात प्रभा राव, सुधाकर गणगणे, राम लिंगाडे, ईश्वर जैन हे प्रमुख आमदार व माजी मंत्री होते. पण तिरपुडे व त्यांच्या माणसांची नंतर पूर्णपणे वाताहत झाली. शरद पवारांशी हातमिळवणी करण्याची पाळी त्यांच्यावर आली. तिरपुडयांबरोबर गेलेले काही आमदार "चुकलो" म्हणून पुन्हा इंदिरा काँग्रेसमध्ये आले. अगदी मोजके लोक व आमदार तिरपुडयांसोबत राहिले. पण तिरपुडे शरदपवारांबरोबर फारसे रमले नाहीत, एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत.... पवारांनी तिरपुडयांना अखिल भारतीय सरचिटणीस केले होते. पण या अ. भा. पदाचा "पोकळपणा" तिरपुडयांच्या लक्षात आला. संजय गांधी यांच्या मृत्युनंतर तेही "स्वगृही" परतले. पण इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश मिळण्यासाठीच त्यांना बरेच दिवस थांबावे लागले. अखेर त्यांना एकदाचा प्रवेश मिळाला. याचाच तिरपुडे यांच्या अनुयायांना कोण आनंद झाला! या मूठभर अनुयायांनी यानिमित्त तिरपुडयांचे जाहीर सत्कार समारंभ पद्धतशीरपणे घडवून आणले. हवा निर्माण करण्याचा त्यांचा हा केविलवाणा प्रयत्न होता. या राज्यातील एकेकाळच्या इंदिरा काँग्रेसच्या संस्थापक अध्यक्षावर ही पाळी यावी.... पण राजकारणात हे चालायचेच. इंदिराबाईंचे कट्टर विरोधक यशवंतराव चव्हाण मुख्य प्रवाहात पुन्हा नाही का आले....

तिरपुडे पुन्हा मुख्यमंत्रीपदाच्या रांगेत उभे आहेत.... त्यांनी त्यासाठी नंबर तर लावला आहे..... पण मधल्या काळात बरेच पाणी वाहून गेले आहे....

२] कर्तृत्व व्यसनात बुडाले !



श्री. रामराव आदिक

(रामराव आदिक हे आमचे जुने मित्र. रामरावांचे वागणे तसे उमरावी. मूळातला हा चांगला व गुणी माणूस. स्वतःच्या गुणांनी पुढे आलेला मराठा समाजातील होतकरू वकील. इंदिरा गांधींचा वरदहस्त लाभल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात झपाट्याने रामराव पुढे आले. उपमुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्रीही झाले असते. कारण इंदिराजींचा रामरावांवर खूप विश्वास होता. परंतु जे अल्पावधीत मिळाले ते रामरावांना टिकविता आले नाही. रामरावांबद्दल अनेक गोष्टी मंत्रालयात ऐकावयास मिळायच्या. अखेर 'हॅनोव्हर' प्रकरणाने कहर झाला व त्यात शेवटी रामरावांचा बळी गेला. रामरावांचे हे प्रकरण साऱ्या भारतात गाजले. एका गुणी माणसाचे 'कर्तृत्व' 'व्यसना'त बुडाले ! उपमुख्यमंत्रीपद हाच रामरावांचा राजकीय शेवट ठरला, असे मला वाटते.)

महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसच्या स्थापनेनंतर जे नवीन नेतृत्व उदयास आले त्यापैकी श्री. रामराव आदिक हे एक आहेत. श्री. आदिक हे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रीपदी होते. पण गेली १२ वर्षे त्यांचा माझा अतिशय निकटचा स्नेह आहे. श्री. आदिक यांचे नांव रामराव असले तरी ते खरे "उमराव" आहेत कारण रामरावांचे एकूण वागणे व बोलणे "उमरावा"स शोभेल असेच आहे. रामरावांचा स्वभावही तसा मोठा उमदा आहे व तसे त्यांचे व्यक्तिमत्त्वही उमदे आहे. तोंडात

पान व चेहऱ्यावरील प्रसन्न हास्य यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अधिक भरच पडली आहे.

राजकीय पिंड नाही

रामराव आज राजकारणात मोठे असले तरी राजकारण हा त्यांचा पिंड नाही. राजकारणात लागणारा "कावेबाजपणा" रामरावात नाही. म्हणून रामराव हे रूढ अर्थाने राजकारणी नाहीत.

रामराव उपमुख्यमंत्रीपदी होते तरी राजकारणी रामराव म्हणून मी जेव्हा विचार करतो तेव्हा त्यांच्यात बरेच दोष दिसून येतात. रामराव हे राजकारणात खालून वर आलेले नाहीत, त्यामुळे एकदम झालेल्या पुढाऱ्यात जी वैगुण्ये आढळतात ती रामरावांत आहेत. स्वतःचा गट त्यांना फारसा बांधता आला नाही. संघटनेच्या बाबतीतही उणीव आहे.

रामरावांनी प्रत्यक्ष राजकारणात तसे बरेच उशीरा पदार्पण केले. कदाचित त्यामुळे असेल, त्यांना माणसाची तशी अचूक पारख नाही. समोर गोड बोलणारी व्यक्ती ही त्यांना आपलीच वाटते, म्हणून त्यांची अनेक वेळा फसगत होते. सतत समोर असणाऱ्याला ते "आपलाच माणूस" समजतात, पण त्यामुळे गफलत होते.

नामवंत वकील

मुंबईच्या हायकोर्टात उत्तम वकिली प्रॅक्टीस करणारे रामराव हे मराठा समाजातील एक नामवंत वकील आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील रामरावांनी प्रतिकूल परिस्थीतीशी झुंज देत कायद्याची पदवी उत्तम गुणांनी मिळविली व मुंबईत येऊन ग्रामीण भागातील या हुशार कायद्याच्या पदवीधराने अल्पावधीतच धडाडीने बस्तान बसविले. बहुजनसमाजातील तरुण वकिलांना कोणत्या दिव्यातून जावे लागते याची चांगली प्रचिती रामरावांना असल्यामुळे त्यांनी अनेक नवोदित तरुण वकिलांना आपले सहाय्यक म्हणून मोलाचे मार्गदर्शन केले. रामरावांच्या हाताखाली तरुण वकिलांचा एक प्रचंड ताफाच उभा राहिला. त्यातील अनेकांनी आज स्वतःची वकिली प्रॅक्टीस सुरू केली आहे. या वकिलांची नामावली मोठी आहे.

यशवंतरावांचे कडवे विरोधक

वकिली क्षेत्रात उत्तमरीत्या नांवारूपास आलेल्या रामरावांनी राजकारणांत प्रवेश केला तोच मुळी यशवंतराव चव्हाणांवर जाहीर तोफा डागून ! यशवंत-

रावांची महाराष्ट्राच्या राजकारणावर भक्कम पकड असलेला हा काळ होता. त्यावेळी यशवंतरावांवर टीका करणे सोपे काम नव्हते. पण रामरावांनी यशवंतरावांच्या महाराष्ट्रातील "माँनॉपॉली" वर कडाडून सतत हल्ले चढवून सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. यशवंतरावांवर तोफ डागणारी एक मातब्बर व्यक्ती म्हणून रामरावांचे नांव झाले, पण त्याची जबर किंमतही रामरावांना मोजावी लागली. जोपर्यंत यशवंतरावांची महाराष्ट्र काँग्रेसच्या राजकारणावर घट्ट पकड होती तोपर्यंत रामरावांना त्यांनी तोंड वर काढू दिले नाही. यशवंतरावांनी रामरावांना सतत दाबण्याचाच प्रयत्न केला. १९७८ मध्ये काँग्रेस पक्ष फुटला व इंदिरा काँग्रेस स्थापन झाली तेव्हाच रामरावांना पुढे येण्याची खरी संधी मिळाली.

घातपाताने पराभव

तत्पूर्वी, १९६९ साली काँग्रेस पक्ष फुटला तेव्हा मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष बॅ. रजनी पटेल यांनी यशवंतरावांच्या विरुद्ध रामरावांना पुढे आणण्याचा प्रयत्न केला. श्री. आर्. डी. भंडारे हे बिहारचे राज्यपाल झाल्याने त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला व त्यामुळे रिकाम्या झालेल्या लोकसभेच्या जागेसाठी (मध्य मुंबई मतदार संघ) बॅ. पटेल यांनी श्री. आदिक यांना उभे केले. अतिशय अटीतटीची निवडणूक झाली. कॉम्रेड डांगे यांच्या कन्या श्रीमती रोझा देशपांडे या कम्युनिस्ट पक्षातर्फे निवडून आल्या. या निवडणुकीत रामराव पडावे म्हणून स्वपक्षीयांनीच "घातपात" केला, असा जबर संशय व्यक्त करण्यात आला आहे. रामराव निवडून आल्यास केंद्रात कायदे मंत्री होतील व कालांतराने महाराष्ट्रात मुख्यमंत्री म्हणून येतील असे त्यावेळी बोलले जात होते. ज्यांना हे व्हावे असे वाटत नव्हते अशा काँग्रेसमधीलच एका मातब्बर नेत्याचा रामरावांना पाडण्यामागे हात होता, हे रामरावही मान्य करतात. ऐन निवडणुकीच्या तोंडावरच वरळी येथे दलित व दलितेतर यांच्यात दंगल कशी उसळली, हा संशोधनाचा विषय आहे. त्यामुळे निर्माण झालेल्या दहशतीच्या व कटुतेच्या वातावरणामुळे रामरावांची दलितांची ३० हजार मते गेली. यावेळी श्री. शरद पवार हे गृहराज्यमंत्री होते !

रामरावांच्या मनाला हा पराभव चांगलाच लागला. दुसऱ्या दिवशी लालबागच्या त्यांच्या घरी मी त्यांना सकाळी भेटावयास गेलो. तेव्हा रामराव एकटेच होते. पराभवाचा हा परिणाम होता. रामरावांना गहीवरून आले. हा

प्रसंग हृद्य होता. उगवत्या सूर्याला नमस्कार करण्यासाठी गर्दी असते ... रामरावांची तशी माझी मैत्री होती, पण या निवडणुकीमुळे ती अधिक घनिष्ट झाली. या निवडणूक काळात सतत एक महिना मी त्यांच्याबरोबर होतो.

अॅडव्होकेट जनरल रामराव

या निवडणुकीचा धुरळा खाली बसताच रामरावांची महाराष्ट्राच्या अॅडव्होकेट जनरलपदी नियुक्ती झाली. रामराव पराभव विसरले व नव्या उत्साहाने त्यांनी या पदाची जबाबदारी शिरावर घेतली. या पदावर प्रथमच बहुजन–समाजाची व्यक्ती आल्याने महाराष्ट्रात आनंद व्यक्त करण्यात आला. आदिक यांचे ठिकठिकाणी सत्कार सुरू झाले. रामरावांचे पश्चिम महाराष्ट्रात बरेच सत्कार आयोजित करण्यात आले होते. सबंध आठवड्याचा हा दौरा होता. सातारा, सांगली, कोल्हापूर, गडहिंग्लज असा हा कार्यक्रम होता. या दौऱ्यावर मीही गेलो होतो. – "नवाकाळ" चा प्रतिनिधी म्हणून. आमच्याबरोबर नंतर मुख्यमंत्री झालेले बॅ. बाबासाहेब भोसले तसेच सध्या शरद पवारांबरोबर असलेले बॅ. राजा भोसले हेही दौऱ्यात होते. या दोन्ही भोसल्यांनी रामरावांच्या सत्कार सभांमध्ये भाषणे केली आहेत. बाबासाहेब भोसले व माझी प्रथम ओळख झाली ती याच दौऱ्यात !

रामराव अॅडव्होकेट जनरल झाले व या पदावर चांगलेच रमले. राजकारणात ते फारसे लक्ष देत नसत. नाही म्हणायला त्यांच्या वकिली व्यवसायातील हे मोठे पद म्हणजे त्यांचा राज्य पातळीवरील सर्वोच्च गौरव होता. तेव्हा या पदावर भरपूर काम करायचे असे रामरावांनी ठरविले होते. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असतांना रामरावांची या पदावर नेमणूक झाली. बॅ. अंतुले हे त्यावेळी कायदा खात्याचे मंत्री होते. बॅ. अंतुले यांचा रामरावांची या पदावर नेमणूक करण्यात सिंहाचा वाटा आहे. बॅ. रजनी पटेल यांचाही चांगलाच हातभार लागला होता.

योग्य वेळी राजीनामा देऊ .....

पुढे नाईक जाऊन श्री. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले. तो आणीबाणीचा काळ होता. आणीबाणी उठली व १९७७ मध्ये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. काँग्रेस पक्षाचा दणदणीत पराभव झाला. केंद्रात जनता पक्षाचे राज्य आले. आणि इकडे महाराष्ट्रात यशवंतराव – दादांनी शंकररावांविरुद्ध उठाव

केला. शंकररावांना अपमानीत होऊन मुख्यमंत्रीपदावरून जावे लागले. "राजसंन्यास" घेतलेल्या वसंतदादांनी पुन्हा राजकारणात उडी घेऊन मुख्यमंत्रीपदाची निवडणूक लढविली. वसंतदादा विरुद्ध यशवंतराव मोहिते अशी लढत होऊन दादा मोठ्या मताधिक्याने निवडून आले. वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.

यावेळी महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका सात-आठ महिन्यांवर येऊ घातल्या होत्या. ॲडव्होकेट जनरलपदी रममान झालेल्या रामरावांना मी 'याच पदावर आता कायम राहणार काय' म्हणून त्यांच्या हायकोर्टातील चेंबर-मध्येचै एकदा गप्पांच्या वेळी विचारले. रामरावांनी 'या पदाची आपणास मुळीच लालसा नसल्याचे' सांगितले. 'सरकारी नोकरी आता पुरे झाली, आता पुन्हा राजकारणात या', असे मी रामरावांना म्हणालो. रामरावांना हे मान्य होते. रामरावांनी हे पद स्वीकारले होते तेच मुळी एक सर्वोच्च मान म्हणून. 'योग्य वेळ येताच आपण या पदाचा राजीनामा देऊ' असे रामरावांनी मला सांगितले. दरम्यान, काही महिन्यांचा काळ लोटला. तथापि, रामराव ॲडव्होकेट जनरल-पदीच होते.

रामरावांची द्विधा मनःस्थिती

पुढे आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका अगदी नजीक आल्या व ही संधी साधून इंदिराबाईनी आपल्या राजकीय अस्तित्वासाठी इंदिरा काँग्रेसचा वेगळा झेंडा फडकविला. महाराष्ट्रात बहुसंख्य नेते, मातब्बर कार्यकर्ते यशवंतराव-वसंतदादांबरोबर राहिले. तळाचा कार्यकर्ता मात्र इंदिरा काँग्रेसकडे वळला. आता रामरावांनी ॲडव्होकेट जनरलपद सोडून पुन्हा एकदा सक्रीय राजकारणात उडी घ्यावी असे मी त्यांना सुचविले. महाराष्ट्रातील यशवंतरावां-सह बहुसंख्य मराठा नेतेमंडळी स्वर्णसिंग काँग्रेसमध्ये असतांना रामराव यांच्या-सारख्या शिकलेल्या व नांव झालेल्या मराठा व्यक्तीस इंदिरा काँग्रेसमध्ये भरपूर वाव मिळेल, असा माझा युक्तिवाद होता. रामरावांची मनःस्थितीही यास अगदी अनुकूल होती. सध्याचे भांडूपचे आमदार व महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसचे माजी सरचिटणीस डॉ. वा. रा. शेरेकर, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे चिटणीस श्री. मनोहर नरे आदी प्रमुख कार्यकर्त्यांसह रामरावांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करायचे ठरले. तथापि, रामरावांनी ॲडव्होकेट जनरलपदाचा राजीनामा दिला नाही व डॉ. शेरेकर, नरे आदींनी इंदिरा काँग्रेसमध्ये पुढे जावे असे रामरावांनी सांगितले. त्याप्रमाणे या लोकांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. रामराव मात्र

मागच राहिले. त्यांची अवस्था थोडी द्विधा असावी !

रामराव इंदिरा काँग्रेसमध्ये जाणार–

महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेस स्थापन झाली तरी या पक्षाची अवस्था अत्यंत केविलवाणी होती. विरोधात यशवंतराव-वसंतदादा यांच्यासारखे मातब्बर मराठा नेते होते. उलट तिरपुडे, अंतुले हे इंदिरा काँग्रेसचे महाराष्ट्रातील नेते होते. महाराष्ट्राच्या राजकारणात मराठ्यांचे वेगळे स्थान आहे व ही पोकळी अंतुले यांच्यासारख्या धूर्त राजकारण्यास सारखी जाणवत होती. म्हणून रामरावांनी इंदिरा काँग्रेसमध्ये यावे असे अंतुले यांनाही वाटत होते. परंतु दाट स्नेह असूनही अंतुले यांना रामरावांना वळविण्यात यश येत नव्हते. रामरावांनी ॲडव्होकेट जनरलपदाचा राजीनामा देऊन आधी ठरल्याप्रमाणे इंदिरा काँग्रेसमध्ये यावे असा त्यांचे एक स्नेही आमदार डॉ. शेरेकर यांचाही प्रयत्न होता. बॅ. अंतुले हे मुंबईत आले असता डॉ. शेरेकर यांनी अंतुले यांची शासकीय "अंबर गेस्ट हाऊस" वर भेट घेतली व दोघांनीही रामरावांना वळविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे रात्री डॉ. शेरेकर, बॅ. अंतुले रामरावांच्या घरी आले व तासभराच्या गप्पागोष्टीनंतर अखेर रामरावांनी ॲडव्होकेट जनरलपदाचा राजीनामा देऊन इंदिरा काँग्रेसमध्ये येण्याचे मान्य केले. यावेळी मीही तेथे उपस्थित होतो.

त्यानंतर बॅ. अंतुले, डॉ. शेरेकर व मी "अंबर गेस्ट हाऊस" वर गेलो. रामराव ॲडव्होकेट जनरलपदाचा राजीनामा देऊन इंदिरा काँग्रेस पक्षाला जाऊन मिळणार अशी बातमी वृत्तपत्रांना द्यावी व एक सनसनाटी निर्माण करावी, असे अंतुले यांच्या डोक्यात आले. आणि वृत्तपत्रांशी माझा संबंध असल्याने मी ती द्यावी असे अंतुले मला म्हणाले. 'मी तशी बातमी देतो, मात्र कन्फर्मेशनसाठी अंबर गेस्ट हाऊसवर अंतुले यांच्याशी संपर्क साधा,' असे मी सांगेन असे अंतुले यांना मी म्हणालो. अंतुलेंनी ते मान्य केले. त्याप्रमाणे मी वृत्तपत्रांना ही बातमी दिली व दुसऱ्या दिवशी बहुतेक सर्वच वृत्तपत्रात ती पहिल्या पानावर ठळकपणे प्रसिद्ध झाली.

अंतुल्यांना तोंडघशी पाडले

या बातमीमुळे स्वर्णसिंग काँग्रेसमध्ये खळबळ माजली. बॅ. रजनी पटेल हे देखील रामरावांचे अतिशय जवळचे मित्र होते. रामरावांनी इंदिरा काँग्रेसमध्ये जावे असे त्यांना मुळीच वाटत नव्हते. त्यांनाही हा "मराठा" भावी राजकारणासाठी हवा होता. बॅ. पटेल यांनी या वृत्तानंतर रामरावांना बोलावून घेऊन त्यांनी ॲडव्होकेट जनरलपदाचा राजीनामा देऊ नये म्हणून खास प्रयत्न केले. बॅ. अंतुले

व बॅ. पटेल या दोन बॅरिस्टरांच्या तावडीत सापडलेले रामराव गोंधळले ! त्यांनी राजीनामा न देण्याचे ठरविले व संध्याकाळच्या वृत्तपत्रांना सकाळी प्रसिद्ध झालेले वृत्त बरोबर नसल्याचे कळविले. रामरावांच्या या "घुमजाव"मुळे बॅ. अंतुले तोंडघशी पडले. कारण मी वृत्तपत्रांना रामरावांच्या राजीनाम्याची बातमी दिल्यावर त्यांच्या वार्ताहरांनी अंतुले यांना "अंबर" वर फोन करून ही बातमी "कन्फर्म" करून घेतली होती. रात्री डॉ. शेरेकर व मी "अंबर" वर अंतुले यांच्याकडे गेलो तेव्हा ते रामरावांवर जाम उखडले. तथापि, डॉ. शेरेकर, अंतुले यांनी रामरावांची प्रत्यक्ष भेट घेण्याचे ठरविले. रात्री आम्ही रामरावांकडे आलो. वातावरण थोडे तंग होते. पुढे ते निवळले व अखेर रामरावांनी ॲडव्होकेट जनरलपदाचा राजीनामा देऊन इंदिरा काँग्रेस मध्ये येण्याचे मान्य केले. रामरावांनी आताच त्वरित राजीनामा देऊन तो सरकारकडे पाठवून द्यावा असा आग्रह अंतुले यांनी यावेळी धरला. यावेळी रात्रीचे १० वाजले होते. तेव्हा उद्या ते करू असे रामरावांचे म्हणणे होते. रामराव पुन्हा फिरतील, अशी भीती अंतुले यांना वाटत असावी. पण रामराव आपल्या म्हणण्यास चिकटून राहिले व अखेर अंतुले "अंबर" वर निघून गेले.

ॲडव्होकेट जनरलशी युक्तिवाद

अंतुले गेल्यावर मी व डॉक्टर शेरेकर रामरावांकडे बसून होतो. आतापर्यंत मी चर्चेत फारसा भाग घेतला नव्हता. अंतुले गेल्यावर मी मात्र काही गोष्टी रामरावांशी स्पष्टपणे बोललो. या दिवशी मी "ॲडव्होकेट जनरल"शी जबरदस्त युक्तिवाद केला व हा युक्तिवाद यशस्वी ठरला. सुमारे एक तास आमचे बोलणे चालले होते. एकेका मुद्यावर आमचे बोलणे झाले. रामरावांना मी म्हणालो, 'सर्वत्र जनता राजवट आली आहे व उद्या महाराष्ट्रातही ती येण्याची शक्यता आहे. ज्या पक्षाचे सरकार असेल त्या सरकारच्या मतांशी ॲडव्होकेट जनरलची मते जुळणारी असावीत असे आपले म्हणणे आहे. ते सरकार गेल्यावर ॲडव्होकेट जनरलनी राजीनामा दिला पाहिजे असे आपण अनेक वेळा जाहीरपणे सांगितले आहे. उद्या जनता पक्ष सत्तेवर आला तर आपणास एकतर राजीनामा द्यावा लागेल किंवा तेच तुम्हाला काढून टाकतील.'

रामरावांना एक पटत होते. 'त्यापेक्षा तुम्ही आता सन्मानाने राजीनामा द्या, राजकारणात पुन्हा येण्याची हीच योग्य वेळ आहे' असा माझा युक्तिवाद सुरू होता. 'उद्या समजा इंदिरा काँग्रेस सत्तेवर आली तर मातब्बर मराठा म्हणून

आपले भवितव्य उत्तम आहे, असेही मी रामरावांना सांगितले. रामरावांना हे सर्व एकूण म्हणणे पटलेले दिसले. रामराव खुशीत उठले व उद्या सकाळी राजीनामा देतो असे ते हसत हसत म्हणाले. आमची बैठक संपली. यावेळी रात्रीचे ११ वाजले होते.

आणि खरोखरच राजीनामा दिला

दुसऱ्या दिवशी रामरावांनी सांगितल्याप्रमाणेच केले. रामरावांच्या राजीनाम्याच्या बातम्या पुन्हा झळकल्या. रामरावांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तिरपुडचांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. त्यांची प्रदेश इंदिरा काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी नेमणूक केली, तसेच राज्य निवडणूक प्रचार समितीचे अध्यक्षपद त्यांना दिले. यावेळी विधानसभेच्या निवडणुकासाठी तिकीट–वाटप सुरू होते. मुंबईचे तिकीट–वाटप मुंबईचे अध्यक्ष डॉ. एम्. आर्. व्यास यांच्या घरीच सुरू होते. गेटवे ऑफ इंडियाजवळ डॉ. व्यास यांचे निवासस्थान आहे. रामराव या तिकीट–वाटपात लगेच सहभागी झाले.

इंदिरा काँग्रेसचा हा अत्यंत प्रतिकूल काळ. यशवंतरावांच्या भाषेत इंदिरा काँग्रेस हा "बाजार बुणग्यांचा" पक्ष. अशा परिस्थितीत ॲडव्होकेट जनरलपदाचा राजीनामा देऊन इंदिरा काँग्रेसला मिळालेला रामराव हा एकमेव मातब्बर मराठा होता. त्यामुळे रामरावांची थेट इंदिरा गांधींपर्यंत "वट" होती. याचा फायदा रामरावांना पुढे सतत मिळालेला आहे. रामरावांना हे "भांडवल" भरपूर उपयोगी पडले आहे.

रामराव थेट मंत्रीच झाले

पुढे विधानसभेचे निवडणूक निकाल लागले व महाराष्ट्रात दोन काँग्रेसचे संयुक्त मंत्रिमंडळ आले. दादा–तिरपुडे मंत्रिमंडळात रामराव मंत्री झाले. प्रथम आमदार वगैरे न होता रामराव थेट मंत्रीच झाले. दिल्लीत त्यावेळी बॅ. अंतुले यांचे चांगले प्रस्थ होते व रामरावांना मंत्रीपद मिळण्यात अंतुलेंची मदत मोलाची ठरली. अशा तऱ्हेने रामरावांचा प्रशासनात प्रवेश झाला. अंतुले–आदिक मैत्री अधिक दृढ झाली. यावेळी रामरावांनी आपल्या खात्यासाठी कार्यालयीन कर्मचारी घेतले ते अंतुले मंत्री असतांनाचे. रामरावांचे बहुतेक पी. ए. अंतुले काळातीलच होते.

साडेतीन महिन्यांच्या कालावधीनंतर दादा–तिरपुडे मंत्रिमंडळ कोसळले. दरम्यानच्या काळात रामराव विधानसभेतून विधान परिषदेवर निवडून गेले होते.

रामरावांचे मंत्रीपद गेले तरी ते विधान परिषदेचे सदस्य होते. तथापि, विधान परिषदेत विरोधी पक्षात वसल्यावर त्यांना आपला फारसा प्रभाव पाडता आला नाही. तिरपुडेंचीही तीच अवस्था होती. सत्तेत असलेल्या अनेकांना विरोधी पक्षात प्रभावी कार्य करता येत नाही असा अनुभव आहे, त्यातलाच हा प्रकार !

प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष

महाराष्ट्रात काँग्रेसचे संयुक्त मंत्रिमंडळ कोसळले. तरी राज्य इंदिरा काँग्रेसवर तिरपुडे यांचाच प्रभाव होता. यावेळी प्रेमलाकाकी चव्हाण या प्रदेश इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षा होत्या. काकींची "इंदिरानिष्ठा" जबर होती. पण त्या राजकारणी नव्हत्या व संघटन-कौशल्यही त्यांच्यात नव्हते. तिरपुडेंसारख्या धूर्त राजकारण्यासमोर त्यांचा निभाव लागणे शक्यच नव्हते. तिरपुडे यांनी काकींना प्रदेश काँग्रेस चालविणे जास्तीत जास्त अशक्य केले. आझाद मैदानातील एका लहानशा बॅरॅकमध्ये महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसचे कार्यालय स्थापून काकी कशातरी महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसचा कारभार निष्ठेने चालवित होत्या. सुमारे वर्षभर त्यांनी हे कार्य चालविले. पण पुढे प्रदेश काँग्रेसच्या नेतृत्वात बदल होऊन काकींच्या ऐवजी रामराव अध्यक्षपदी आले.

तिरपुडे गेले, पण रामराव बचावले

दरम्यान, इंदिरा काँग्रेसमध्ये तिरपुडेंचे दिवस फिरले होते. त्यांच्याविरुद्ध पक्षांतर्गत मोहीम जोरदारपणे सुरू होती. तथापि, प्रदेशाध्यक्ष रामरावांना तिरपुडे आपल्या बाजूने ठेऊन होते. तिरपुडे इंदिरा काँग्रेसमधून बाहेर पडणार अशी लक्षणें असतांना रामरावही त्यांच्याबरोबर जातील, अशी परिस्थिती तिरपुडचांनी निर्माण केली होती. पण तिरपुडे इंदिरा काँग्रेसमधून बाहेर पडले तेव्हा रामराव त्यांच्याबरोबर गेले नाहीत. पुढे तिरपुडचांचे काय झाले हे जगजाहीर आहे. रामरावांनी वेळीच योग्य ते राजकीय शहाणपण दाखविल्याने ते वाचले !

दुसरा पराभव

दरम्यान, जानेवारी १९८० मध्ये लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका आल्या. मुंबईतून अॅड. राम जेठमलानी यांच्याविरुद्ध उभे राहण्याचा आदेश पक्षाने रामरावांना दिला. जेठमलानी यांच्याशी रामरावांनी जोरदार लढत दिली, पण त्यांचा पराभव झाला. लोकसभेच्या निकडणुकीतील रामरावांचा हा दुसरा पराभव !

विधानसभा बरखास्त

लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीत देशामध्ये मात्र इंदिरा काँग्रेसने घवघवीत यश मिळवून हा पक्ष केंद्रात सत्तेवर आला. श्रीमती इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान झाल्या. या लाटेचा फायदा घेण्याचे त्यांनी ठरविले व जनता पक्षाने ज्याप्रमाणे केंद्रात सत्तेवर येताच काँग्रेस सत्तेवर असलेल्या बहुसंख्य विधानसभा बरखास्त केल्या, त्याच धर्तीवर जनता पक्षाची सरकारे असलेल्या विधानसभा बरखास्त करून त्यांनी नऊ राज्यात नव्याने विधानसभेच्या निवडणुका जाहीर केल्या ! त्यात महाराष्ट्राचाही समावेश होता !

इंदिरा काँग्रेसचे सरकार

मे १९८० मध्ये झालेल्या विधानसभेच्या नऊही राज्यातील निवडणुकांमध्ये इंदिरा काँग्रेसने बाजी मारली. महाराष्ट्रातही इंदिरा काँग्रेसने दणदणीत यश मिळविले. मुख्यमंत्रीपदाचे "नाटच" घडले व बॅ. अब्दुल रेहमान अंतुले हे महाराष्ट्रातील इंदिरा काँग्रेसचे पहिले मुख्यमंत्री झाले. रामराव त्यांचे उजवे हात होते. अंतुले यांच्या मंत्रिमंडळात रामरावांचे स्थान दुसऱ्या क्रमांकाचे होते ! अंतुले-आदिक जोडी एकदिलाने सरकार चालवित होती. साधारणतः सहा महिने ही अवस्था होती व पुढे राम-अब्दुल रेहमान या दोघा "जानी दोस्तां"चे संबंध एवढे बिघडले की अंतुले रामरावांना मंत्रिमंडळातून वगळणार होते ! एकदा अंतुले खाजगीत म्हणाले होते की, 'शिकलेला मराठा हा यशवंतरावांच्या दृष्टीने विष आहे !' आता संदर्भ बदलला होता ! रामराव अंतुलेंना डोकेदुखी होऊ पहात होती. अर्थात, रामरावांना दिल्लीचा आशीर्वाद होता !

मुख्यमंत्री व्हायचे आहे, पण .....

रामराव आदिक यांना मुख्यमत्री व्हायचे आहे व ते त्यांनी लपवूनही ठेवलेले नाही. पण हे मुख्यमंत्रीपद मिळविण्यासाठी व हिसकावून घेण्यासाठी लागणारे डावपेच रामरावांना जमत नाही. सत्तेत राहूनही त्यांना आपला गट बांधता आला नाही. रामरावांना खरे मित्र कोण व धोकेबाज कोण हे अद्यापही कळत नाही. सत्ता हाती आली की त्या व्यक्तीपुढे नाचणाऱ्यांचा एक वर्ग असतो. हा वर्ग त्या व्यक्तीस आपल्याच कोंडाळ्यात ठेवतो. ज्याला पुढचे मोठे राजकारण करायचे आहे, त्याने अशा खूषमस्कऱ्यांपासून नेहमीच सावध राहिले पाहिजे. रामराव सत्तेवर नसतांना मित्रांशी चांगले असतात. पण सत्तेवर आल्यावर त्यांच्या

जुन्या–जिवलग मित्रांना त्यांच्यापर्यंत पोचणें कठीण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. "नवाकाळ" चे संपादक निळूभाऊ खाडिलकर रामरावांचे जुने दोस्त, हितचिंतक. त्यांचाही अनुभव वेगळा नाही !

स्वत:चा नाश करून घेतला

ताजा कलम : १९८३ पर्यंतच्याच घटना या पुस्तकात देण्याचे ठरविले होते. दरम्यान, हे पुस्तक छपाईच्या मार्गावर असतांना महाराष्ट्राच्या राजकारणात एक प्रचंड वादळ उठले. 'रामराव आदिक प्रकरण' म्हणून हे प्रकरण गाजले व अखेर उपमुख्यमंत्रीपदी असलेल्या रामराव आदिकांना आपल्या पदाचा राजीनामा देणे भाग पडले ! १८ एप्रिल १९८४ ची घटना ! अखेर दारूने रामरावांचा बळी घेतला ! रामरावांच्या मद्यप्राशनाच्या व त्यानंतर घडलेल्या घटनांच्या कथांचा बराच बोलबाला आधी झालाच होता. या कथांचा त्यांच्या राजकीय हितशत्रूंनी कौशल्याने उपयोगही करून घेतला आहे. रामरावांच्या या व्यसनी–कथाच त्यांना नडल्या, नाहीतर बाबासाहेब भोसल्यांनंतर वसंतदादाऐवजी तेच मुख्यमंत्री झाले असते. (याचा उल्लेख मी प्रकरण ५ मध्ये वसंतदादांची मुख्यमंत्रीपदी निवड कशी झाली यात केलाच आहे.) तरीही रामरावांना इंदिराजींनी उपमुख्यमंत्रीपद दिले. व पुढेमागे मुख्यमंत्रीपदही त्यांना दिले असते. परंतु एवढ्या महत्त्वाच्या जागेवर बसल्यावरही रामरावांच्या व्यसनी–कथा कमी ऐकू येण्याऐवजी वाढतच गेल्या आणि पश्चिम जर्मनीतील हॅनोव्हरच्या मार्गावर असतांना विमानात घडलेल्या कथित गैरकृत्याच्या घटना या साऱ्या कथांचा कळस होता.

रामरावांनी मद्यप्राशन करून विमानात केलेल्या गैरवर्तनाचे वृत्त खरे वा खोटे असेल. पण बरेच दिवस रामरावांबद्दल ज्या कथा ऐकू येत होत्या त्यामुळे वृत्तपत्रांतील वृत्त सर्वांनाच खरे वाटले. रामरावांनी भलेही आपण तसे केले नाही असे पुन्हा पुन्हा जगाला ओरडून सांगितले तरी त्यावर कुणी विश्वास ठेवला नाही. याला कारण रामरावांची ही कथा–पार्श्वभूमी आहे. रामराव हे वृत्तपत्रीय प्रचाराचा बळी आहेत, असे अनेकांना वाटले. पण स्वत:च्या नाशास रामरावच जबाबदार आहेत. त्यांनी स्वत:च्या पायावर स्वत:च धोंडा पाडून घेतला.

विनाश काले . . . . .

विनाश काले विपरीत बुद्धी म्हणतात. रामराव हे विधान परिषदेच्या निवडणुकीला उभे असतांना व यांचे राजकीय भविष्य त्यावर अवलंबून असतांना

त्यांना हॅनोव्हरच्या आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शनास जाण्याची आवश्यकता काय होती ? विदेश दौरा काय त्यांना नवीन होता ? की तो नंतर करता आला नसता ? १७ एप्रिलला विधान परिषदेची निवडणूक असतांना रामराव विदेश दौऱ्यावर गेले. १५ एप्रिलला ते दौऱ्यावरून परतणार होते. रामरावांचा विधान-परिषदेच्या निवडणुकीत पराभव करून त्यांचे राजकीय जीवन संपुष्टात आण-ण्याचे जोरात प्रयत्न सुरू असतांना विदेश दौऱ्यावर जाण्याचा हा बदसल्ला त्यांना कुणी दिला व त्यांनी तो का मानला ?

रामरावांचे मुख्यमंत्रीपद त्यांच्याबद्दलच्या अशा कथित कथांमुळेच एकदा गेले असे वर म्हटलेच आहे. त्यांचे उपमुख्यमंत्रीपद व्यसनापायी गेले. रामराव मुख्यमंत्रीपदाच्या अगदी नजीक आले होते ..... रामराव सत्तेतून (तूर्त) फेकले गेले आहेत... त्यांनी दारू सोडल्याची घोषणा केली आहे. पण त्याला आता फार उशीर झाला..... उपमुख्यमंत्रीपद हाच रामरावांच्या राजकीय जीवना-तील सर्वोच्च मान ठरावा. यापलिकडे ते आता जाऊ शकतील असे वाटत नाही...

स्वकर्तृत्वाने पुढे आलेला मुळातील एक सज्जन माणूस व्यसनापायी बुडाला, असे माझे मत आहे. मित्र म्हणून याचे जरूर दुःख आहे.....

महाराष्ट्रातील एक तुफान



बॅ. ए. आर्. अंतुले

महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसचे राज्य आल्यानंतर जे अनेक राजकीय बदल घडले त्यातील मोठा बदल म्हणजे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी बॅ. अब्दुल रेहमान अंतुले हे विराजमान झाले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी बसलेला हा पहिला मुसलमान मुख्यमंत्री होता. अब्दुल रेहमान अंतुले हे मुख्यमंत्री झाले याचे अनेकांना आश्चर्य वाटले. राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्या व्यक्तींनाही आश्चर्य वाटले. कारण दिल्लीचा मागोवा घेता अंतुले यांचे नांव अपेक्षीत नव्हते. तथापि, बॅ. अंतुले हे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची निवड करण्यासाठी इंदिरा काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी श्री. सीताराम केसरी यांना निरीक्षक म्हणून पाठविले होते. त्यानंतर उशीरा केसरी यांच्यासोबतीला श्री. ए. पी. शर्मा (केसरी व शर्मा हे दोघेही नंतर केंद्रीय मंत्री झाले) यांना निरीक्षक म्हणून पाठविण्याची घोषणा पक्षश्रेष्ठींना केली. श्री. केसरी हे "सह्याद्री" अतिथीगृहावर आमदारांच्या भेटीगाठी घेऊन त्यांचे नेतेपदासाठी मत अजमावित होते, तर दुसरे निरीक्षक श्री. शर्मा हे दिल्लीहून मुंबईस येण्यास निघाले, पण वाईट हवामानामुळे त्यांचे विमान मुंबईवर घिरट्याच घालीत राहून दुसरीकडे वळवावे लागले. आणि जेव्हा श्री. शर्मा मुंबईत दाखल होऊन "सह्याद्री" वर आले तोपर्यंत श्री. केसरी यांनी मूळ कार्यभाग जवळजवळ उरकलाच होता.....

श्री. अब्दुल रेहमान अंतुले हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक "तुफान" आहे, कुणाला पटो अगर न पटो ! या "तुफाना"ची जाणीव महाराष्ट्राला ते मुख्यमंत्री झाल्यावरच झाली. सुमारे दीड वर्ष ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी या "तुफाना"चा वेग सध्या मंदावला असला तरी महाराष्ट्राच्या राजकारणातील हे "तुफान" कायम आहे. त्याचा वेग केव्हा वाढेल हे सांगता येणार नाही.

"मराठा शुगर लॉबी"वर मात

अंतुले ही महाराष्ट्राच्या राजकारणातील एक "महावस्ताद" व्यक्ती आहे. बॅरिस्टर असलेल्या या माणसास राजकारणाचे जबरदस्त व्यसन आहे. या व्यसनापायी या बॅरिस्टराचा अत्यंत हुशार मेंदू राजकीय उचापतीत सतत व्यग्र असतो. समाजात बुद्धिमान व्यक्तींची काही कमतरता नाही. पण "अर्थकारणात" ते मार खातात. अंतुलेंजवळ मात्र बुद्धी व पैसा या दोन्ही गोष्टी आहेत. आणि म्हणूनच महाराष्ट्राच्या राजकारणातील बलाढ्य अशा "मराठा शुगर लॉबी"शी हा बॅरिस्टर दोन हात करू शकला. किंबहुना त्यांनी प्रचंड आर्थिक ताकद असलेल्या या शक्तीवर मात करून दाखविली. अंतुले मुख्यमंत्री असतांना मराठा शुगर लॉबीची मात्रा फारशी चालली नाही. ही सर्व मंडळी अत्यंत हतबल झाली होती. शेवटी इंदिरा गांधी यांनाच हा मुख्यमंत्री एवढा डोईजड झाला की त्यांनी अंतुलेंना सत्तेवरून खाली खेचले .....

तिरपुडे गेल्याने मार्ग मोकळा झाला

१९७८ मध्ये काँग्रेस पक्ष फुटला, इंदिरा काँग्रेसची वेगळी स्थापना झाली. तेव्हा अंतुले हे रेड्डी–चव्हाण काँग्रेसबरोबर न राहता इंदिरा काँग्रेसला मिळाले. त्यावेळी ते या पक्षाच्या कार्यकारिणीचे सदस्य होते. पुढे त्यांची इंदिरा गांधींनी पक्षाचे सरचिटणीस म्हणून नेमणूक केली. अंतुले हे राज्यसभेचे सदस्य होते. त्यांचा मुक्काम दिल्लीतच असायचा. पक्षाचे सरचिटणीस झाल्यावर त्यांचे इंदिरा काँग्रेसमधील महत्त्व वाढले. महाराष्ट्रातही त्यांच्या वारंवार फेऱ्या होऊ लागल्या. पण त्यावेळी तिरपुडे हे महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसवर आपली पकड घट्ट ठेवून होते. तिरपुडे हे अंतुलेंना मुळीच जुमानत नसत. 'अंतुलेंचे काय असेल ते तिकडे दिल्लीत, महाराष्ट्रात आपण म्हणू तेच झाले पाहिजे ...' असे तिरपुडेंचे वागणे होते. त्यामुळे तिरपुडे जोपर्यंत इंदिरा काँग्रेसमध्ये होते तोपर्यंत अंतुले यांची महाराष्ट्रात फारशी डाळ शिजली नाही. रामराव आदिकांना हाताशी धरून ते थोडेबहुत

आपले राजकारण करीत होते. पुढे इंदिरा गांधी व संजय गांधी यांची खप्पा मर्जी झाल्याने तिरपुडे यांना इंदिरा काँग्रेसमधून जाणे भाग पडले व मग अंतुलेंचा मार्ग मोकळा झाला. महाराष्ट्रात अंतुले यांचा संचार सर्वत्र वाढला. तिरपुडे इंदिरा काँग्रेसमधून बाहेर पडल्यावर जुन्या कौन्सिल हॉलवर इंदिरा काँग्रेसचे राज्यातील आमदार, खासदार, जिल्हाध्यक्ष व इतर पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीची सुत्रे अंतुले व आदिक यांच्याकडे होती. यावेळी अंतुले यांनी आपल्या नेहमीच्या दिलीपकुमार स्टाईलने नाटचमय भाषण केले. अर्थातच तिरपुडचांवर त्यांनी तोफ डागली. महाराष्ट्राच्या भागाभागात आपण जाऊ व कार्यकर्त्यांना वस्तुस्थिती समजाऊन सांगू, असे अंतुलेंनी यावेळी आवेशपूर्णरित्या टाळचांच्या गजरात सांगितले आणि यापुढे अंतुले यांचा महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसच्या राजकारणात मुक्तपणे संचार सुरू झाला. प्रदेशाध्यक्ष व "जानी" दोस्त आदिक हे साथीला होते. येथून महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसच्या राजकारणात खऱ्या अर्थाने बॅ. अंतुले व ॲड. आदिक यांची जोडगोळी जमली.

बॅ. अंतुले हे महाराष्ट्राच्या राजकारणाला तसे चांगले परिचित होते. कै. वसंतराव नाईकांच्या काळात ते प्रथम मंत्री झाले. नाईकांच्या मंत्रीमंडळात ते बरेच वर्षे मंत्री होते. पुढे श्री. शंकरराव चव्हाण यांच्याही मंत्रीमंडळात ते होते. महाराष्ट्राच्या राजकारणातील "मराठचां"चे स्थान त्यांना चांगले माहित होते. यशवंतराव चव्हाण या "मराठा" नेत्याची महाराष्ट्राच्या राजकारणावर असलेल्या घट्ट पकडीची त्यांना उत्तम जाणीव होती. अनायसे, इंदिराबाईंनी वेगळी काँग्रेस काढल्याने यशवंतरावांच्या महाराष्ट्रातील तख्ताला धडक देण्याची उत्तम संधी अंतुलेंना चालून आली. आणि दिल्लीत बसून त्या दृष्टीने अंतुले सत्ताचक्र फिरवू लागले.

रामरावांना हाताशी धरले

महाराष्ट्रात राजकारण करायचे तर एखादा नावाजलेला "मराठा" आपल्याजवळ असावा हे धूर्त व अनुभवी अंतुलेंनी हेरले व त्या दृष्टीने त्यांनी रामराव आदिकांना जवळ केले. अंतुले पक्षाचे सरचिटणीस असल्याने दिल्लीत बसून इंदिरा काँग्रेसचे राजकारण करीत होते, तर महाराष्ट्रात त्यांनी आदिकांना हाताशी धरले होते. महाराष्ट्रात रामराव–अब्दुल रेहमान यांचा संचार सुरू झाला. हातात हात घालून हे "मित्र" महाराष्ट्राचे राजकारण करू लागले. रामरावजींशिवाय अंतुलेंचे पान हलत नव्हते, तर अंतुलेंशिवाय रामरावांचे काही काम होत नव्हते.

प्रेमलाकाकी चव्हाण

या काळात महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षपदी प्रेमलाकाकी चव्हाण या होत्या. तिरपुडे यांच्यानंतर काकींनी सुमारे वर्ष-सव्वा वर्ष अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कसेबसे हे पद सांभाळले होते. काकी या काही राजकारणी नव्हत्या. पण या बाईकडे आईचे मन आहे. या ममतेनेच त्यांनी प्रदेश इंदिरा काँग्रेसचा कार्यभार सांभाळला. त्यांनी राजकारण केले नाही, ते त्यांना करणेही शक्य नव्हते. कारण तो त्यांचा पिंडच नव्हता. त्यांचे पती कै. आनंदराव चव्हाण हे खरे राजकारणी होते व त्यांनी यशवंतरावांच्या सातारा जिल्ह्यातच त्यांच्या विरोधात राजकारण केले. काकींनी माणसे तोडण्याचे काम मात्र केले नाही. आझाद मैदानातील मुंबई इंदिरा काँग्रेसच्या कार्यालयासमोर असलेल्या एका लहानशा बराकीतून त्यांनी प्रदेश काँग्रेसचा कारभार चालविला. अर्थातच त्यात बऱ्याच उणीवा होत्या.

परिणामी त्यांना अध्यक्षपदावरून जावे लागले. त्यांच्या जागी श्री. रामराव आदिक हे अध्यक्षपदी आले. अर्थातच अंतुलेंनी हे करवून घेतले. त्यांना इंदिरा काँग्रेसचे महाराष्ट्रातील राजकारण आंदिकांतर्फे आपल्या ताब्यात ठेवायचे होते. काकी जाऊन रामराव प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदी आले, परंतु प्रदेश काँग्रेसच्या कारभारात फारसा फरक पडला नाही.

वसंतदादा–शंकरराव इंदिरा काँग्रेसमध्ये आले

पुढे केंद्रातील जनता पक्षाचे सरकार आपसातील भांडणांमुळे कोसळले. जनता पक्षांच्या अपयशामुळे इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे महत्त्व वाढले व इंदिरा काँग्रेसला अनुकूल असे वारे वाहू लागले. लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका लक्षात घेऊन अर्स काँग्रेसमधील अनेक पुढाऱ्यांनी, प्रमुख कार्यकर्त्यांनी इंदिरा काँग्रेसकडे आपला मोर्चा वळविला. महाराष्ट्रात वसंतदादा पाटील, नरेंद्र तिडके यांच्या नेतृत्वाखाली अर्स काँग्रेसमधील एक प्रभावी गट इंदिरा काँग्रेसमध्ये आला, तर दादांचे राजकीय विरोधक शंकरराव चव्हाण हे शरद पवारांच्या पुरोगामी लोकशाही दलाला रामराम ठोकून याचवेळी इंदिरा काँग्रेसमध्ये आले. विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री. शिवराज पाटील हेही इंदिरा काँग्रेसला येऊन मिळाले. शरद पवारांच्या "समांतर काँग्रेस"चे अध्यक्ष श्री. दा. ता. रूपवते यांनीही आपला फड गुंडाळला. अशा तऱ्हेने महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेस-

मध्ये अर्स-स्वर्णसिंग काँग्रेसमधून नेते, मातब्बर कार्यकर्त्यांचे लोंढे आल्याने आतापर्यंत रोडावलेल्या अवस्थेत असलेली महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेस बरीच "भारदस्त" झाली. महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसचे आझाद मैदानातील लहानसे कार्यालय (खरे तर खोपटे !) बडचा नेत्यांनी फुलू लागले. एकदा तर वसंतदादा व शंकरराव हे दोघेही माजी मुख्यमंत्री एकाच वेळी या खोपटचात येऊन बसले होते. काळाचा हा महिमा...यशवंतराव चव्हाण-शरद पवार यांच्या सूडाने दादा पेटले होते. तर दादांचा पिच्छा शंकररावांनी सोडला नव्हता. त्यासाठी दोघांनाही इंदिरा गांधींची मदत हवी होती.

जुने इंदिरानिष्ठ अस्वस्थ

वसतदादांसारखा मातब्बर नेता इंदिरा काँग्रेसमध्ये आल्याने प्रदेश इंदिरा काँग्रेसच्या राजकारणाला वेगळे वळण लागेल हे दिसत होते. याचवेळी लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका जाहीर झालेल्या होत्या. दादांचा प्रभाव पडून आपला निभाव लागणार नाही या भीतीने जुने इंदिरानिष्ठ धास्तावलेले होते. दादा आणि मंडळींचा इं. काँ. प्रवेश या लोकांना फारसा आवडला नव्हता. पण इंदिरा गांधींनीच त्यांना प्रवेश दिल्याने त्यांना गप्प राहणे भाग होते. यशवंतराव चव्हाण–शरद पवार यांना महाराष्ट्रात शह देण्यासाठी श्रीमती गांधींनी दादा शंकरराव यांना इं. काँ. मध्ये घेतले होते. दादा-तिडके आदींच्या प्रवेशामुळे अस्वस्थ झालेली इं. काँ. मधील जुनी मंडळी साहजिकच अंतुले–आदिक, काकी यांच्या भोवती जमली. तथापि, जुन्यांच्या नेत्यांमध्ये एकी नव्हती. अंतुले–काकी यांच्यामध्ये सख्य नव्हते. याचा फायदा इं. काँ. मध्ये नव्याने आलेल्या अनुभवी व मुरब्बी वसंतदादांनी उठविला. यशवंतराव–शरद पवार यांच्याशी महाराष्ट्रात टक्कर द्यायची आहे हे श्रेष्ठींच्या मनावर योग्य पद्धतीने बिंबवून दादांनी लोकसभेच्या अठ्ठेचाळीसपैकी अठ्ठावीस जागा पदरी पाडून घेतल्या. अंतुले यांच्या डी. एन्. चौलकर (ईशान्य मुंबई), उमर काझी, एस्. एन्. देसाई (रत्नागिरी), प्रभाकर हेगडे (ठाणे) या चौघांना तिकिटे मिळाली. तथापि, त्यांच्या रायगड जिल्ह्यातून मात्र त्यांचे विरोधक असलेल्या ए. टी. पाटील यांना तिकीट मिळाले. दादांनी ए. टीं. ना हे तिकीट मिळवून दिले. काकींच्या मात्र एकाही माणसाला तिकीट मिळाले नाही. खुद्द त्यांच्या सातारा मतदार संघातून काकीऐवजी यशवंतराव मोहित्यांना दादांनी तिकीट मिळवून दिले ! काकींचा निभाव लागणार नाही असे दादांचे म्हणणे होते व ते अखेर पक्ष श्रेष्ठींनी मान्य केले. प्रदेशाध्यक्षा असूनही काकींना स्वतःकरिता तिकीट मिळविता आले नाही !

काकींचा बाबुराव काळेंसाठी प्रयत्न

दरम्यान, मुंबईतून श्री. राम जेठमलानी (जनता पक्षाचे उमेदवार, यावेळी भाजप वेगळा झालेला नव्हता.) यांच्या विरुद्ध श्री. रामराव आदिक यांना उभे करण्याचा निर्णय पक्षश्रेष्ठींनी घेतला. एका नामवंत वकिलाविरुद्ध दुसरा नामवंत वकील उभा करावा, असा विचार पक्षश्रेष्ठींनी केला असावा. लोकसभेची निवडणूक लढवायची असल्यामुळे श्री. आदिक यांनी प्रदेश अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आणि या पदावर पुन्हा विराजमान होण्याचा मान काकींनी मिळविला ! सहसा एकदा अध्यक्षपदावरून गेलेली व्यक्ती पुन्हा त्या जागेवर येत नाही. पण इंदिरा गांधींचा काकींवर जबरदस्त विश्वास असल्याने त्यांना हा मान पुन्हा मिळाला. काकी या राजकारणी नाहीत, हेच खरे ! या बाईनी जरा धूर्तपणाने पावले उचलली असती तर इंदिराबाईंचा पूर्ण वरदहस्त असल्यामुळे काकी या अंतुले–ऐवजी मुख्यमंत्री होऊ शकल्या असत्या ! पण राजकीय डावपेच खेळणे त्यांच्या रक्तातच नव्हते. बाबुराव काळे, प्रभाकर कुंटे आदी त्यांच्या अगदी जवळच्या मंडळींचा तसा प्रयत्न होता. पण स्वत: काकी मात्र त्या दृष्टीने कोणत्याही हालचाली करावयास तयार नव्हत्या. परंतु बाबुराव काळे यांना ही संधी मिळावी, असे त्यांना वाटत होते.

"साहेबां"चे पश्चिम महाराष्ट्रात "पानिपत"

लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीत इंदिरा काँग्रेस पक्षाला दणदणीत विजय मिळाला. (जानेवारी १९८०) महाराष्ट्रात स्वर्णसिंग काँग्रेसचे यशवंतराव चव्हाण हेच एकमेव उमेदवार सातारा मतदार संघातून निवडून आले. यशवंत–रावांशी वसंतदादांच्या पत्नी शालिनीताई पाटील यांनी चांगलेच दोन हात केले. ही निवडणूक फारच अटीतटीची झाली. "साहेब" निवडून येणार की पडणार इथपर्यंत चर्चा होत होती. साहेबांच्या इभ्रतीचा हा प्रश्न होता. व दादाही इरेस पडले होते. यशवंतराव विरुद्ध शालिनीताई या सामन्यात दोन्ही बाजूंनी अत्यंत खालच्या पातळीवरून प्रचार करण्यात आला. यशवंतराव फक्त ५५ हजार मतांनी निवडून आले. पण बाकी पश्चिम महाराष्ट्रात वसंतदादा हे साहेबांच्या विरोधात उभे ठाकल्याने साहेबांना प. महाराष्ट्रात खरेखुरे आव्हान प्रथमच मिळाले होते. दादांनी पश्चिम महाराष्ट्रात घुसून ही "हाणाहाणी" केली व साहेबांचे पश्चिम महाराष्ट्रात "पानपत"च केले. १९७८ मध्ये दादांचे सरकार शरद पवारांनी साहेबांच्या आशीर्वादाने पाडले, त्या सूडाने पेटलेल्या दादांनी यशवंतरावांचा असा सूड उगविला.

स्वत: शालिनीताई यशवंतरावांविरुद्ध उभ्या राहण्यास तेवढ्याशा उत्सुक नव्हत्या. त्यांना मुंबईतून ईशान्य मुंबईमधून उभे रहायचे होते. (कुर्ला ते मुलुंड मतदारसंघ) त्यासाठी त्यांनी प्रयत्नही केले. पक्षश्रेष्ठींनी त्यांना यशवंतरावांविरुद्ध उभे केले. यशवंतरावांविरुद्ध सातारच्या राणी सुमित्राराजे भोसले यांना उभे करण्याचे प्रयत्न झाले. इंदिरा काँग्रेसचे जुने निष्ठावंत कार्यकर्ते किसनराव साबळे पाटील व जगदाळे या दोघांच्या डोक्यांतून प्रथम ही कल्पना बाहेर आली. व त्यांनी राज्यपातळीवर यासाठी खूप प्रयत्नही केले. पण सुमित्राराजे भोसल्यांनी उभें राहण्यास नकार दिला. यशवंतरावांविरुद्ध शालिनीताई याऐवजी सुमित्राराजे भोसले उभ्या राहिल्या असत्या तर चित्र वेगळेच दिसले असते. साहेबांना " याची देही, याची डोळा " आपला पराभव पहावा लागला असता.

लोकसभा निवडणुकीत मुंबई व कोकण येथे जनता पक्ष टिकला, बाकी महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेस घवघवीत निवडून आली. वसंतदादा, शंकरराव, शिवराज पाटील, यशवंतराव मोहिते लोकसभेवर निवडून गेले.

इच्छुकांची झुंबड

लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीत इंदिरा काँग्रेसला नेत्रदीपक यश मिळाल्याने नऊ राज्यांतील विरोधी पक्षीय सरकारे बरखास्त करून तेथे राष्ट्रपतींची राजवट पुन्हा पंतप्रधान झालेल्या श्रीमती इंदिरा गांधी यांनी आणली. महाराष्ट्रातील श्री. शरद पवार यांचे "पुलोद" सरकारही बरखास्त होऊन महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट आली. पुढे मे महिन्यात (१९८० साल) विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. साहजिकच यावेळी इंदिरा काँग्रेसकडे तिकिटांसाठी इच्छुक उमेदवारांची झुंबड उडाली. एकेका जागेसाठी पंचवीस-तीस इच्छुकांचे अर्ज आले. इंदिरा काँग्रेस केंद्रात सत्तेवर आल्याने एकदम चित्र पालटले होते. "जनता लाट" जाऊन "इंदिरा लाट" आली होती. त्यातच प्रत्येक इच्छुक उमेदवाराकडून अर्जासोबत २५०रु. घ्यावेत अशी शक्कल महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसचे त्यावेळचे सरचिटणीस डॉ. वा. रा. शेरेकर यांनी काढली व त्यास पक्षश्रेष्ठींनी अनुमतीही दिली, या अर्जांच्या रकमेपोटीच सुमारे ७ लाख रुपये प्रदेश काँग्रेसच्या तिजोरीत पडले, असे डॉ. शेरेकर यांनी सांगितले. सुमारे वर्षापूर्वी महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेस कशी चालवावी एवढी या पक्षाची आर्थिक अवस्था वाईट होती. पण आता परिस्थिती पालटली होती .....

"काँग्रेस हाऊस"चा वापर

विधानसभेच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले व इकडे प्रदेश इंदिरा काँग्रेसच्या कार्यालयात तिकीट वाटपासाठी राज्य निवडणूक समितीच्या बैठकी होऊ लागल्या. पुष्कळ वेळा या बैठकी स. का. पाटलांच्या गिरगावातील "काँग्रेस हाऊस"-मध्ये व्हायच्या. आझाद मैदानातील पक्ष कार्यालयाची जागा अपुरी होती व तेथे फारशी गुप्तताही नव्हती म्हणून या बैठकी "काँग्रेस हाऊस" मधील प्रशस्त जागेत घेण्याचे काकींनी मान्य केले. स. का. पाटलांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने आपल्या "काँग्रेस हाऊस"चा वापर व्हावा असा त्यांचाही फार आग्रह होता.

सत्पाल मित्तल निरीक्षक

निवडणूक समितीच्या या बैठकींना केंद्रीय निरीक्षक म्हणून खासदार सत्पाल मित्तल हे उपस्थित रहात होते. आतापर्यंत महाराष्ट्रात केंद्रीय निरीक्षक म्हणून श्री. सीताराम केसरी यांना पाठविण्यात आले होते. महाराष्ट्रात जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या वेळी तसेच लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीच्या वेळी श्री. केसरी हे निरीक्षक होते. दोन्ही वेळी तिकीट वाटपात त्यांचा मोठा वाटा होता. वारंवार निरीक्षक म्हणून आल्याने त्यांना महाराष्ट्राच्या राजकारणाची चांगली माहिती झाली होती. तथापि, यावेळी केसरींऐवजी मित्तल यांना निरीक्षक म्हणून पाठविण्यात आले होते ! मित्तल हे राजकारणात मुरलेले, पण महाराष्ट्राच्या राजकारणाची तशी फारशी माहिती नसलेले होते. परिणामी, निरीक्षक म्हणून त्यांचा फारसा प्रभाव पडत नव्हता.

अंतुले–दादा यांच्यात खटके

इकडे निवडणूक समितीत एका बाजूला वसंतदादा व दुसऱ्या बाजूला अंतुले असे दोन मातब्बर विरोधक होते. निवडणूक समितीच्या बैठकीत अंतुले-दादा यांच्यात अनेक वेळा खटके उडाले आहेत. यावेळी अंतुले हे अ. भा. इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस होते. त्यामुळे ते या समितीच्या बैठकीत आपला प्रभाव गाजवित असत. शेवटी तर "ते पक्षाचे सरचिटणीस असले तरी ते येथे एक सभासद म्हणून आहेत" इथपर्यंत सांगण्याची वेळ इतर सदस्यांवर आली. तथापि, जात्याच हुशार असलेल्या अंतुलेंचा प्रभाव पडतच राहिला. काकी या प्रदेशाध्यक्षा होत्या, पण अंतुलेंसमोर त्यांची स्थिती मोठी केविलवाणी झाली. अंतुले धूर्तपणे

डावपेच खेळत होते. दादा व काकी या दोघांनाही अंतुले डावपेचात भारी गेले. काकींचे एक सोडून द्या. पण वसंतदादांनाही उमेदवारांची यादी तयार करतांना आपला भक्कम प्रभाव पाडता आला नाही. कारण एकतर दादा इंदिरा काँग्रेस-मध्ये येऊन सहा-सात महिनेच झाले होते. एकूण वातावरण "इंदिरानिष्ठां"चे होते. १९७८ च्या इंदिरानिष्ठात दादा मोडत नव्हते. त्यामुळे अंतुलेंचे पारडे जड होते. त्यात ते पुन्हा पक्षाचे सरचिटणीस व दिल्लीश्रेष्ठींशी घनिष्ट संबंध ठेऊन होते. त्यावेळी संजय गांधी हे महत्त्वाची भूमिका बजावित होते. इंदिरा काँग्रेसच्या वाईट काळात संजय गांधी तावूनसुलाखून निघाल्याने १९७८ च्या निष्ठावंतांना तिकिटे द्यावीत, असा त्यांचा आग्रह होता व पक्षश्रेष्ठींनीही तशाच स्वरूपाची "गाईड लाईन" राज्य-नेत्यांना दिली होती. त्यामुळे दादांची "शुगर लॉबी" प्रभावी असूनही तिकीट वाटपाबाबत फारसा प्रभाव पाडू शकत नव्हती.

अंतुलेंची हुशारी

१९७८ च्या इंदिरानिष्ठांना तिकिटे देण्याच्या श्रेष्ठींच्या "गाईड लाईन"-चा वापर अंतुलेंनी खुबीने करून घेतला. त्यांनी राज्य पातळीवरील निवडणूक समितीच्या बैठकीतच इतर काही सभासदांशी संगनमत करून आपल्या खास माणसांची तिकिटे एकमताने भराभर काढून घेतली व इतरांच्या बाबतीत वाद उपस्थित करून दिल्लीश्रेष्ठींवर निर्णय सोपविण्यास राज्य निवडणूक समितीला भाग पाडले. अंतुलेंनी आपल्या खास माणसांची तिकिटे पहिल्याच झटक्यात काढली. त्यात बाबासाहेब भोसले, युसूफ हाफीज, राम महाडिक, रवींद्र राऊत आदींचा समावेश होता. काकी प्रदेश–अध्यक्षा असूनही त्यांच्या अगदी निवडक माणसांना तिकिटे मिळाली व तिही दिल्लीश्रेष्ठींनी हस्तक्षेप केल्यामुळेच मिळू शकली ! अंतुलेंची हुशारी येथेच दिसून येते ! मुख्यमंत्रीपदाचे आपले संभाव्य स्पर्धक होऊ शकणारे वसंतदादा व काकी यांना तिकीट वाटपातच जास्तीतजास्त रोखण्याचा प्रयत्न अंतुलेंनी केला. एवढेच नव्हे तर काकी उद्या बाबुराव काळे यांचे नांव मुख्यमंत्रीपदासाठी पुढे करतील हे ओळखून बाबुराव काळे यांची इच्छा नसतांना त्यांना सिल्लोढ (मराठवाडा) येथून तिकीट देऊन निवडणूक लढविण्यास भाग पाडले. वास्तविक, बाबुराव हे विधान परिषदेचे सदस्य असतांना याची काही जरूरी नव्हती. स्वत: अंतुलेंनी मात्र विधानसभेची निवडणूक लढविली नाही, पण त्यांची पावले मुख्यमंत्री होण्याच्या दृष्टीने हुशारीने पडत होती, हेच यावरून दिसून येते. स्वत: अंतुले विधानसभेला उभे राहिले असते तर त्यांची ही इच्छा

उघड झाली असती ! पण निवडणुकीचे निकाल हाती येऊन एकूण चित्र स्पष्ट झाल्याशिवाय आपली "कार्डस" अंतुलेंना "ओपन" करायची नव्हती.

इंदिरा काँग्रेसचे पीक आले

विधानसभा निवडणुकीत अंतुलेंनी महाराष्ट्राचा प्रचार दौरा केला. आपल्या खास उमेदवारांच्या प्रचारासाठी ते आवर्जून गेले. तथापि, अंतुले हे त्यावेळी लोकांचे आकर्षण असलेली व्यक्ती नव्हती. या प्रचार दौऱ्यानंतर मुंबईत अंतुलेंनी मुंबई मराठी पत्रकार संघात एक पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्रात इं. काँ.ला दोनशे जागा मिळतील, असे भाकीत आपल्या नेहमीच्या दणकेबाज पद्धतीने केले ! निवडणुकीचे निकाल जाहीर झाले व महाराष्ट्रात इं. काँ. चे पीक आले! इंदिरा काँग्रेसचे अनेक नवखे चेहरे दणदणीतपणे निवडून आले. इंदिरा काँग्रेसला १८० हून अधिक जागा मिळाल्या. एकटचा मुंबई शहरात या पक्षाचे कधी नव्हे एवढे २६ उमेदवार निवडून आलेत ! तथापि, काकींचे उमेदवार श्री. प्रभाकर कुंटे यांचा माहीमहून जनताचे श्री. एफ्. एम्. पिंटो यांनी सरळ लढतीत पराभव केला. कुंटेंना नेहरुनगर, कुर्ला येथून तिकीट हवे होते. पूर्वी ते या मतदारसंघातून निवडून आले होते. परंतु अंतुले कृपेने बाबासाहेब भोसलेंना तेथून तिकीट मिळाले व ते निवडूनही आले ! इकडे सिल्लोढहून बाबुराव काळे हे ही पराजित झाले !

आणि मग महाराष्ट्र विधिमंडळ इंदिरा काँग्रेसच्या नेतेपदासाठी म्हणजे भावी मुख्यमंत्रीपदासाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या. काकी प्रदेशाध्यक्षा असल्यामुळे त्यांनी कौन्सिल हॉल (जुना) येथे निवडून आलेल्या नवीन आमदारांची बैठक बोलाविली.

पुन्हा सीताराम केसरी

एक गोष्ट येथे नमूद केली पाहिजे. विधानसभेच्या तिकीट वाटपासाठी खासदार सत्पाल मित्तल हे महाराष्ट्रासाठी केंद्रीय निरीक्षक होते. याचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. पुढे पुढे सत्पाल मित्तल यांच्या सोबतीला पुन्हा सीताराम केसरी यांची नियुक्ती झाली ! श्री. केसरी यांच्या दिल्ली–मुंबई वाऱ्या सुरू झाल्या. मित्तल यांचा निरीक्षक म्हणून फारसा प्रभाव पडला नव्हताच ! मित्तल यांच्या सोबतीला निरीक्षक म्हणून आलेल्या केसरींनीच पुढे परिस्थितीचा पूर्ण ताबा घेतला ! निरीक्षक म्हणून केसरीच वावरत होते. अशा तऱ्हेने केसरी यांनी महाराष्ट्रासाठी निरीक्षक म्हणून येण्याची "हॅट ट्रिक" साधली ! या केसरींबद्दल येथेच थोडी माहिती देतो. हे केसरी बिहारचे असून श्री. जयप्रकाश नारायण

यांनी बिहारमध्ये छेडलेल्या आंदोलनाच्या काळात ते बिहार काँग्रेसचे अध्यक्ष होते. या गृहस्थाचे चालणे व वागणे विचित्र आहे. बोलतांना हे गृहस्थ 'हा-हा, हू-हू ... ' करून बोलतील, पण राजकीय व्यवहारात हा म्हातारा "अर्क" आहे. इंदिरा गांधी व संजय गांधी यांच्या अतिशय विश्वासातील गृहस्थ होते. अ. भा. इंदिरा काँग्रेसचे खजिनदार होते ! खजिनदार असले तरी राजकीय उचापतीत त्यांचा हातखंडा होता. दिल्लीत पंधारा रोड येथे ते रहात. खासदार म्हणून त्यांना येथे बंगला मिळालेला होता. त्यांच्या बाजूच्याच बंगल्यात अंतुले रहात. दोघांच्या बंगल्यांच्यामध्ये एक कंपाऊंडची भितच आडवी होती. अंतुले हेही त्यावेळी राज्यसभेचे सदस्य होते. पण या केसरींचे व अंतुलेंचे पूर्वी मुळीच जमत नसे. केसरी यांनीच एकदा ही माहिती मला बोलतांना दिली. पुढे त्या दोघांचे सख्य कसे काय झाले हे एक गूढच आहे !

अंतुल्यांची धावपळ

तर विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाचा नेता निवडीसाठी काकींनी नवीन आमदारांची बैठक बोलाविली, परंतु या बैठकीला अखेरपर्यंत निरीक्षक श्री. केसरी आलेच नाहीत. सुमारे १०० आमदार या बैठकीला उपस्थित होते. "विधिमंडळ नेत्यांची निवड करण्याचा अधिकार आम्ही पक्षाध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी यांना देत आहोत", "अशा आशयाचा प्रस्ताव या बैठकीत कै. बाळासाहेब देसाई यांनी मांडला व तो मंजूरही झाला. पण ही बैठकच निरीक्षक केसरी यांनी अयोग्य ठरविली व आमदारांना "सह्याद्री" अतिथीगृहावर भेटावयास बोलाविले ! त्या दिवशी संध्याकाळी "सह्याद्री"वर जोरदार हालचाली सुरू झाल्या. श्री. केसरी हे "सह्याद्री"च्या पहिल्या माळचावरील एका सूटमध्ये बसून आमदारांच्या गटांना किंवा व्यक्तिगत सभासदाला भेटत होते. बाहेर खासदार, आमदार, पत्रकार, कार्यकर्ते यांची तुफान गर्दी उसळली होती. यावेळी मुख्यमंत्र्याच्या स्पर्धेत बॅ. अंतुले हे उघड उघड उतरले होते. तसेच श्री. वसंतदादा पाटील, श्रीमती प्रतिभा पाटील व श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण हे तीन उमेदवार या स्पर्धेत होते. हे चारही उमेदवार यावेळी "सह्याद्री"वर उपस्थित होते. काकी व दादा निरीक्षकांच्या सूटबाहेरील लॉबीत बसून होते. अंतुलेंची मात्र सतत धावपळ चाललेली दिसत होती. त्यांचे तळमजल्यावरून निरीक्षकांच्या पहिल्या मजल्यावर सारखे येणेजाणे सुरू होते. मध्येच ते आमदार, पत्रकार, कार्यकर्ते यांच्याशी बोलत. अंतुले यावेळी थकलेले दिसत होते. धावपळीमुळे त्यांचा झब्बाही चुरगळला होता.

अंतुले की दादा ?

"लोकसत्ते"चा प्रतिनिधी म्हणून वृत्त मिळविण्यासाठी मी यावेळी "सह्याद्री"-वर उपस्थित होतो व या सर्व राजकीय जोरदार हालचाली मी टिपत होतो. लॉबीत अनेक आमदार भेटले. 'त्यांना कोण होणार ?' असे विचारता त्यांच्याकडून 'अंतुले' हे उत्तर आले ! नंतर चारही बाजूने अंतुले यांचे नांव ऐकू येऊ लागले, तेव्हा अंतुलेंचे नांव दिल्लीने नक्की केल्याची खात्री पटली ! तथापि, वसंतदादा, काकी, प्रतिभा पाटील यांच्यासाठी काही आमदारांचे गट प्रयत्नशील होतेच व निरीक्षक केसरी यांना भेटून तसे सांगतही होते. आपणास महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावरून अपमानास्पद रीतीने जावे लागले असल्याने (शरद पवारांनी विरोधी पक्षाशी हातमिळवणी करून आपले सरकार पाडल्याने) एक दिवसाकरिता का असेना आपणास पुन्हा मुख्यमंत्री करावे, अशी दादांची मागणी व विनंती होती. त्यावर शंकररावांना तर दादांनी याहीपेक्षा अपमानीत करून मुख्यमंत्रीपदावरून घालविले असल्याने शंकररावांचाच पुन्हा मुख्यमंत्री होण्याचा अधिकार आहे, असे शंकरराव चव्हाणांच्या समर्थकांचे म्हणणे होते. पण स्वतः शंकरराव खासदारकीत रमले होते. मुंबईला येण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यावेळी ते केंद्रीय मंत्री व्हायचे होते. तथापि, दादा १९७८ च्या इंदिरानिष्ठात येत नव्हते व स्वतःच्या आमदारांच्या ताकदीवर मुख्यमंत्रीपद हिसकावून घ्यावे एवढी आमदारांची संख्या त्यांच्या जवळ नव्हती. आणि अंतुले की दादा या दोघांपुरतेच वर्तुळ मर्यादित झाल्यानंतर काकी–प्रतिभाताई या आपोआपच बाद झाल्या होत्या.

अखेर अंतुल्यांची निवड

आमदारांची मते अजमावून निरीक्षक श्री. सीताराम केसरी व श्री. ए. पी. शर्मा (शर्मा यांचे विमान मुंबईला न उतरता आकाशात कसे घिरट्या घालीत राहिले व तोपर्यंत केसरींनी कसा कार्यभाग उरकला हे सुरूवातीला दिलेच आहे) हे दिल्लीला रवाना झाले. दिल्लीहून निर्णय जाहीर होणार होता. तमाम महाराष्ट्राचे डोळे या निर्णयाकडे लागले होते. कारण इंदिरा काँग्रेसचा महाराष्ट्रातील पहिला मुख्यमंत्री कोण याची उत्सुकता सर्वांना लागली होती. या अवस्थेत जवळजवळ तीन-चार दिवस गेले व रात्री सात–साडेसातच्या सुमारास एकदम टेलिप्रिंटरवर बातमी थडथडली– 'महाराष्ट्र विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाच्या नेतेपदी बॅ. ए. आर्. अंतुले यांची निवड झाली आहे' एवढाच फ्लॅश आला होता !

तथापि, एका इंग्रजी न्यूज एजन्सीने श्रीमती प्रतिभा पाटील यांची निवड झाल्याचे वृत्त देऊन गोंधळच उडवून दिला. नंतर लगेच या एजन्सीने आपली चूक दुरूस्त केली. इंदिरा काँग्रेसतर्फे महाराष्ट्राचा पहिला मुस्लीम मुख्यमंत्री होण्याचा मान बॅ. अंतुले यांना मिळाला. एका गोष्टीचा येथे उल्लेख करणे जरूरीचे आहे अंतुले यांना संजय गांधी यांचा पाठिंबा मिळणार नाही असा दादा–काकी गटाचा होरा होता. आणि त्यावेळी संजय गांधी ठरविल तोच मुख्यमंत्री होईल, अशी परिस्थिती होती. अंतुले–संजय यांचे संबंध चांगले नव्हते असे अनेक विश्वसनीय लोकांनी सांगितले. परंतु महावस्ताद राजकारणी असलेल्या अंतुलेंनी आपसातील मतभेद मिटवून संजय गांधी यांचा पाठिंबा मिळविला व त्यांच्याच भक्कम पाठिंब्यामुळे बॅ. अंतुले हे मुख्यमंत्री होऊ शकले. या कामी सीताराम केसरी यांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. एकेकाळी या बिहारी केसरींची व अंतुलेंची कुंडली जुळत नव्हती. पण पुढे त्यांची घनिष्ट मैत्री कशी झाली हा एक संशोधनाचा विषय आहे ! बॅ. अंतुले यांच्या निवडीने दादा मात्र नाराज झाले. बरेच महिने ते दिल्लीहून महाराष्ट्रात आलेच नाहीत. काकी–प्रतिभाताई हा "कमजोर घटक" असल्याने त्यांची राजी–नाराजी फारशी महत्त्वपूर्ण व दखलपात्र नव्हती.

नव्या चेहऱ्यामोहऱ्याचे मंत्रिमंडळ

बॅ. अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले व त्यांनी नव्या चेहऱ्यामोहऱ्याचे आपले मंत्रिमंडळ जाहीर केले. आपल्या खास मित्रांचा त्यांनी मंत्रिमंडळात समावेश केला व महत्त्वाची खाती त्यांनी आपल्या मित्रांकडे देऊन आपली मंत्रिमंडळावरील पकड घट्ट केली. रामराव आदिक या आपल्या जिवलग मराठा मित्राचा त्यांनी मंत्रिमंडळात समावेश करून त्यांच्याकडे अर्थखाते दिले. जुन्या इंदिरानिष्ठांपैकी "लोकमत" चे संपादक श्री. जवाहरलाल दर्डा यांना मंत्रिमंडळात घेऊन त्यांच्याकडे उद्योग हे महत्त्वाचे खाते सोपविले. मुंबईतून कुणाला घ्यायचे असा प्रश्न निर्माण झाला तेव्हा त्यांनी आपले एक वकील–मित्र बाबासाहेब भोसले यांना कॅबिनेट मंत्री करून टाकले. अंतुले कृपेमुळे बाबासाहेब आमदार व लगेच थेट कॅबिनेट मंत्रीच झाले. लो. टिळक व छत्रपती शिवाजीमहाराज ही मराठी माणसांची दैवते आहेत. हे ओळखून या चलत्या नाण्यांचा युक्तीने वापर करण्याचे अंतुले यांनी ठरविले. लो. टिळकांचे नातू जयंतराव टिळक यांना त्यांनी मंत्रिमंडळात घेतले. तसेच छत्रपतींचे वारस अभयसिंहराजे भोसले यांचाही मंत्रिमंडळात समावेश केला. अभयसिंहराजे हे जनता पक्षातून इंदिरा काँग्रेसमध्ये

आले होते, तर जयंतराव टिळक इंदिरा काँग्रेसमध्ये नक्की केव्हा आले हे माहीत नाही. जयंतरावांची अंतुलेंशी मैत्री होती एवढे खरे. रायगड जिल्ह्यात अंतुलें-बरोबर त्यांनी थोडा फार प्रचार दौरा केला होता. ते काही असो. छत्रपती व लो. टिळक यांच्या वलयाचा उपयोग आपल्या मंत्रिमंडळासाठी करून घ्यायचा हे अंतुलेंनी ठरवून या दोघा वारसांना आपल्या मंत्रिमंडळात स्थान दिले. छत्रपतींच्या वारसाकडे, अभयसिंहराजे यांच्याकडे त्यांनी राज्याचे रक्षण म्हणजे गृहखाते सोपविले ! अतुलेंच्या या हुशारीचे कौतुक करायला हवे !

प्रतिभा पाटलांना अखेरपर्यंत घेतले नाही

बाकी मंत्रिमंडळातील इतरांना विविध गट व जिल्हा विभागानुसार स्थान देण्यात आले. काकींच्या आग्रहावरून त्यांचा एक माणूस मंत्रिमंडळात घेण्यात आला. बाबुराव काळे विधानसभेची निवडणूक हरूनही त्यांचा समावेश केवळ काकींमुळे मंत्रिमंडळात झाला. दादा गटाच्या म्हणून शालिनीताई पाटलांना त्यांनी मंत्रिमंडळात घेतले. शंकरराव चव्हाणांमुळे भिकाजीराव खताळ – पाटील व दीनानाथ कमळे गुरुजी मंत्रिमंडळात आले. जांबुवंतराव धोटे गटाचे म्हणून नानाभाऊ एंबडवार व भगवंतराव गायकवाड यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला. युवकांचे प्रतिनिधी म्हणून सतीश चतुर्वेदी व चंद्रकांत त्रिपाठी राज्यमंत्री झाले. अंतुले मित्र एस्. एन्. देसाई यांचीही मंत्रिमंडळात वर्णी लागली. पुढे आणखी तीन–चार मंत्री अंतुलेंनी घेतले. नरेंद्र तिडके अखेर अंतुलेंच्या मंत्रिमंडळात आलेच. मुख्यमंत्री कुणीही होवो, पण तिडके मंत्रिमंडळात असतात असे त्यांच्याबाबत विनोदाने म्हटले जाते. अंतुलेंच्या मंत्रिमंडळात बहुतेक थोर मंत्री (कॅबिनेट दर्जाचे) हे वरच्या सभागृहाचे, विधान परिषदेचे सदस्य होते. लोकांनी थेट निवडून दिलेले विधानसभेचे सदस्य नव्हते. रामराव आदिक, नरेंद्र तिडके, जवाहरलाल दर्डा, जयंतराव टिळक, बाबुराव काळे, प्रमिलाबेन याज्ञिक (प्रमिलाबेनना सर्वजण विनोदाने "चोकशीबाई" असे म्हणत. कारण विधानसभेत बोलतांना त्या "चौकशी" ऐवजी "चोकशी" असा शब्द वापरीत असत) हे सर्व विधान परिषद सदस्य होते. यावर पुढे टीकाही झाली. अनेक विधानसभा सदस्यांचे चान्सेस या थोर मंत्र्यांमुळे गेल्याने अनेक आमदारांना वरच्या सभागृहाची ही मिरासदारी मान्य नव्हती ! अंतुलेंनी श्रीमती प्रतिभा पाटील यांना मात्र शेवटपर्यंत आपल्या मंत्रिमंडळात घेतले नाही. इंदिरा काँग्रेसचा महाराष्ट्रातील पहिला मुख्यमंत्री हा बिगरमराठा असावा यादृष्टीने श्रेष्ठींचा विचार सुरू झाला. तेव्हा अंतुलेंबरोबर प्रतिभाताईंचेही नांव ऐकू येत

होते. त्या रजपूत समाजातील असून बरेच वर्षे मंत्री राहिल्याने त्यांना प्रशासनाचाही अनुभव होता. मुख्यमंत्रीपदासाठी त्या एक इच्छुक उमेदवारही होत्या. अंतुले हे विसरले नाहीत ! महाराष्ट्र विधानसभेत (१९८४ पूर्वीच्या) इंदिरा काँग्रेसचे सुमारे २३४ सदस्य असून त्यापैकी १५३ हे बिगरमराठा होते. तिकीट वाटप करतांना इंदिरा गांधींनी याकडे विशेष लक्ष दिले. अंतुलेंनी त्यासाठी पद्धतशीर प्रयत्न केले. मराठा सभासदांची बहुसंख्या होणार नाही हे कटाक्षाने पाहिले गेले. महाराष्ट्रातील "मराठा" राजकारणास त्यांना शह द्यावयाचा होता. प्रतिभा पाटील या बिगरमराठा असल्या तरी त्या १९७८ च्या निष्ठावंतांपैकी नाहीत असा प्रचार मोठ्या प्रमाणात त्यांच्याविरुद्ध करण्यात आला. १९७८ मध्ये त्या स्वर्णसिंग काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आल्या व दादांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात घेतले नाही, तेव्हा त्यांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.

रामरावांचे दुसऱ्या क्रमांकाचे स्थान

अंतुलेंच्या मंत्रिमंडळात एकूण २४ मंत्री होते. पण रामराव आदिक हेच त्यांचे उजवे हात होते.अब्दुल रेहमान-रामराव ही जोडीच त्यावेळी राज्य करीत होती. विधानसभेत अंतुले–आदिक हेच बहुतेक प्रश्नांना उत्तरे देत असत. अंतुलेंच्या मंत्रिमंडळात शालिनीताई पाटील यांच्याकडे महसूल खाते होते. व 'महसूल म्हणजे सरकार' असे त्या नेहमी सांगत असत. अंतुले मंत्रिमंडळात आपले स्थान क्रमांक दोनचे आहे असे त्या भासवित ! पण अंतुले मंत्रिमंडळात खऱ्या अर्थाने रामराव आदिकांचे स्थान क्रमांक दोनचे होते. शालिनीताई व बाबुराव काळे यांना तडजोड म्हणून अंतुलेंनी मंत्रिमंडळात घेतले, पण त्यांच्याशी कधीच तडजोड केली नाही. त्यांना कधी विश्वासात घेतले नाही. या दोघांबद्दल त्यांच्या मनात संशय होता. अखेर अंतुलेंनी शालिनीताई व बाबुराव यांना मंत्रिमंडळातून काढून टाकलेच !

अंतुले-शरद पवार यांच्यातील चकमकी

बॅ. अंतुलेंसारखा वृत्तीने आक्रमक व कुशाग्र बुद्धीचा बॅरिस्टर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी आला होता. पण त्यांना मैदान मारणे इतके सोपे नव्हते. त्यांच्या विरोधात माजी मुख्यमंत्री श्री. शरद पवार हे शंभर विरोधी सदस्य घेऊन विधानसभेत बसले होते. शरद पवार यांच्या पक्षाचेच (काँग्रेस-स) पन्नास सदस्य होते. या सदस्यांत नव्या-जुन्यांचा संगम होता. गोविंदराव आदिक, प्रतापराव

भोसले, पद्मसिंह पाटील असे जुने अनुभवी लोक होते. तसेच चिमणराव कदम, सूर्यकांत पलांडे, रायभान जाधव, संभाजी कुंजीर, कमलकिशोर कदम यांच्या-सारखे तरुण आक्रमक सदस्यही होते. आपल्या पन्नास सदस्यांची भक्कम फौज घेऊन शरद पवार हे तरुण माजी मुख्यमंत्री विरोधी पक्षनेतेपदी बसले होते. त्यांच्या सोबतीला दि. बा. पाटील, दत्ता पाटील, किसनराव पाटील, गुलाबराव-पाटील, हशू अडवानी, फ्रे. मा. पिंटो, गणपतराव देशमुख, सुदाम देशमुख आदी पन्नास विरोधी सदस्य होते. विधानसभेत शरद पवार व अंतुले हे आमनेसामने बसत व त्यांच्यात जी खणाखणी होई ती चकमक पाहण्यासारखी होती. दोन कसलेल्या योद्धचांची ही लढाई नेत्रदीपक होती. अंतुलेंना विरोधकांना अंगावर ओढून घेण्याची सवयच आहे. विधानसभेत त्यांनी कैक वेळा विरोधकांना नाहक अंगावर ओढून घेतले. यावेळी अंतुलेंची आक्रमक वृत्ती दिसून येई. त्यांचे भाषणही आक्रमक, आवेशपूर्ण व बॅरिस्टरी ढंगाचे असे. शरद पवारांचे भाषण शांत, पण एकेक मुद्दा खोडून काढणारे. त्यांच्या भाषणात अभ्यासूवृत्ती दिसून येई. प्रशासकीय अनुभवाची सुंदर झलक त्यांच्या भाषणात पाहायला मिळे. सरकारी आकडेवारीतील फोलपणा ते प्रभावीपणे दाखवून देत. यशवंतरावांची आठवण करून देणारी शैली शरदरावांनी उचलली आहे ! सुमारे वर्षभर नव्या विधान-सभेत असे वातावरण होते.

पुढे यशवंतराव चव्हाणांनी मुख्य प्रवाहात यावयाचे ठरविले व त्यांच्या-सोबत शरद पवारांचे सहा-सात अनुयायी आमदार सोडता बाकीचे आमदार इंदिरा काँग्रेसमध्ये आले. (यशवंतराव-शरद पवार यांच्या डावपेचाचा हा एक भाग आहे असा संशय यावेळी व्यक्त करण्यात आला) यशवंतरावांना इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यास व संसदीय इंदिरा काँग्रेस पक्षात प्रवेश मिळण्यासाठी बरेच ताटकळत रहावे लागले. पण अंतुलेंनी त्यांच्यासोबत आलेल्या चाळीस, बेचाळीस आमदारांचा विधिमंडळ इंदिरा काँग्रेस प्रवेश उरकूनही घेतला. विधान-सभेतील आपले प्रमुख विरोधक असलेले शरद पवार यांचे बळ खच्ची करण्याचा उद्देश या घाई-गर्दी मागे अंतुलेंचा असावा. त्याचे हे डावपेच मात्र यशस्वी ठरले. पन्नास आमदार घेऊन विरोधी बाकावर बसणाऱ्या शरद पवारांचा लचकाच अंतुलेंनी तोडल्यामुळे पुढे ते विधानसभेत प्रभावशून्य झाले. पूर्वीचा जोश व खणखणाट शरद पवारांमध्ये नंतर दिसला नाही. एखाद्या वाघाचे दात पडावे अशी गत शरद पवारांची झाली ! ते केवळ सहा-सात आमदार घेऊन बसले. पुढे तर त्यांचे विरोधीनेतेपदही गेले. नंतर शरद पवार हे पूर्वीएवढे विधानसभा

कामकाजात रस घेतांना आढळले नाही. यावरून अंतुलेंचे डावपेच यशस्वी झाले हेच दिसून येते. शरद पवारांचे एकेकाळी बिनींचे सरदार असलेले गोविंदराव आदिक, प्रतापराव भोसले, आक्रमक चढाई करणारे चिमणराव कदम, सूर्यकांत पलांडे, संभाजी कुंजीर, रायभान जाधव आदि तरुण सहकारी अंतुलेंच्या बाजूला जाऊन बसले होते.

अंतुलेंची बेफाम गाडी .....

मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांचा "तुफानी" कारभार महाराष्ट्रात सुरू झाला. मुख्यमंत्री अंतुले हे एक "तुफान" होते व या तुफानाचा वेग एवढा प्रचंड होता की अनेकांना तो सहन झाला नाही. झटपट निर्णय घेणारे व बेलगाम बाता करणारे अंतुलेंचे तुफानी व्यक्तिमत्त्व अनेकांना आवडले, तर हे "तुफान" न मानवणारेही असंख्य होते. अंतुले दीड वर्ष मुख्यमंत्री होते. पण अंतुलेंच्या गाडीचा वेग कधी शंभराच्या खाली आला नाही. ताशी शंभरच्या वेगाने जाणाऱ्या गाडीला अपघात होणार, हे उघड होते. अंतुलेंच्या बाबतीतही तेच झाले. अंतुलेंनी धोक्याच्या वळणावरही शंभरच्या वेगानेच गाडी हाणली. परिणामी त्यांच्या गाडीला अखेर अपघात झालाच ! न्या. लेन्टिन यांचे निकालपत्र हे एक निमित्त झाले, तरी अंतुलेंना मुख्यमंत्री पदावरून काढण्याचा निर्णय पक्षश्रेष्ठींनी केव्हाच घेतला होता. न्या. लेन्टिन यांच्या निकालाने पक्षश्रेष्ठींना एक उत्तम संधी मिळाली एवढेच !

अंतुलेंच्या ऱ्हासास ते स्वतःही काही कमी जबाबदार नाहीत. त्यांचा स्वभावच त्यांना नडला. तिरपुडच्यांनी आपल्या जीभेने शत्रू वाढविले, तसाच प्रकार अंतुलेंच्या बाबतही घडला ! पुष्कळ लोकांच्या बाबतीत सत्ता त्यांच्या डोक्यात चढते व हातून सत्ता गेल्यावरच त्यांचे डोळे उघडतात. अंतुलेंची केस अशाच स्वरूपाची आहे. पक्षश्रेष्ठींचा वरदहस्त आहे म्हणजे वाट्टेल तसे बेताल वागले तरी खपून जाते असे होत नाही. शेवटी तुमच्याविरुद्ध निर्माण होणाऱ्या जबरदस्त वातावरणाची दखल लोकशाहीत राज्य करणाऱ्याला घ्यावीच लागते. पक्षश्रेष्ठींचा आशीर्वाद असला तरी आपल्या वागण्याने प्रचंड विरोधी वातावरण निर्माण होणार नाही याची दखल त्या त्या व्यक्तीने घ्यायची असते. नाहीतर माकडीणीची कथा सर्वश्रुतच आहे. गळ्यापर्यंत आल्यावर माकडीणही आपल्या पिल्लाला पाया-खाली तुडविते. या साऱ्याचे भान सत्तामस्त झालेल्या महत्त्वाकांक्षी अंतुलेंना राहिले नाही !

टर्रेबाज स्वभाव

आपल्या टर्रेबाज स्वभावाने त्यांनी अनेकांना दुखविले. "आपणच शहाणे" ही भूमिका या बॅरिस्टराने घेतली. सरकारी प्रशासनाची चौकट ज्या आय्. ए. एस्. सचिवांच्या खांद्यावर उभी आहे त्यांना त्यांनी सळोकापळो करून सोडले. अनेकांना अपमानास्पद वागणूक दिली. (अर्थात हे अधिकारी देखील "साधे" आहेत असे समजण्याचे काही कारण नाही. अनेक मंत्र्यांना व नागरिकांनाही याचा चांगलाच अनुभव आहे) साहित्यिक, पत्रकार यांच्याबद्दल त्यांनी तुच्छतेचे उद्‌गार काढले. काही पत्रकारांना त्यांनी विंचू म्हटले. म्हणजे प्रचाराचे प्रभावी माध्यम दुखवून ठेवले. विरोधी पक्षाशी त्यांना सतत दोन हात करण्यात मजा वाटत होती. विरोधी पक्ष सदस्यांना विविध समित्यांवर स्थान देण्याची प्रथा त्यांनी झिडकारली. संजय गांधी स्वावलंबन व निराधार योजना यांच्यासाठी तालुका पातळीवर असलेल्या समित्यांवर त्यांनी विरोधकांना प्रतिनिधीत्व दिले नाही. विरोधकांची धार बोथट करण्याऐवजी ती अधिक धारदार कशी होईल अशीच कृती अंतुले करीत होते. स्वपक्षातील विरोधकांशी, विरोधी गटातील आमदारांशी ते धड वागत नसत. त्यांना न भेटता ताटकळत ठेवीत. अशा तऱ्हेने अंतुलेंनी स्वतःच्या विरुद्ध जबरदस्त विरोधी वातावरण निर्माण करून घेतले. यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक या दोन मुख्यमंत्र्यांनी आपल्या गोड स्वभावाने विरोधकांना जिंकले व सुस्थिर राज्य केले. त्यांच्या नेमके उलटे वागणे अंतुलेंचे होते.

अंतुलेंचा "पराक्रम"

शरद पवार यांनी नागपूर अधिवेशनाच्यावेळी (१९८० साली) शेतकरी दिंडी काढली. पण ही दिंडी नागपूरला येऊच द्यायची नाही असा चंग मुख्यमंत्री अंतुलेंनी बांधला. ही दिंडी म्हणजे त्यांनी भलताच प्रतिष्ठेचा विषय केला होता. ही दिंडी बारगळावी म्हणून त्यांनी पवारांच्या काँग्रेस (स) च्या आमदार–खासदारांना अटक केली. शरद पवार यांना अटक तर केलीच, पण महाराष्ट्रात आदराचे स्थान असलेल्या यशवंतराव चव्हाणांनाही त्यांनी पकडले. यशवंतराव चव्हाणांना अटक करून अंतुलेंनी आपला जुना राजकीय हिशेब चुकता केला असेल, पण महाराष्ट्राला अंतुलेंचा हा "पराक्रम" आवडला नाही. केंद्रात जनता पक्षाची राजवट आल्यावर त्यावेळचे गृहमंत्री चौधरी चरणसिंग यांनी इंदिराजींना अटक करण्याचा असाच "पराक्रम" केला होता. पण लोकांना ही सूड भावना

आवडली नव्हती. पुढे तर पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यात 'यशवंतराव हा महाराष्ट्रावर कलंक आहे, अशी गरळ अंतुल्यांनी ओकली. यशवंतरावांना अंतुलेंनी केलेली अटक व त्यांच्याबद्दल काढलेले उद्‌गार महाराष्ट्राला पसंत पडले नाहीत. सत्ता चढलेल्या माणसाचे हे "कर्तृत्व" होते !

आपण गोरगरीबांचे कैवारी आहोत अशी आपली एक "इमेज" उभी करण्याचा मुख्यमंत्री अंतुलेंचा सतत प्रयत्न होता. त्यांची ठिकठिकाणी होणारी भाषणे या कैवाराची असत. आपण गोरगरीबांचा कैवारी व सर्वधर्म–समभावाचे (धर्मनिरपेक्षतसाठी अंतुलेंनी वापरलेला शब्द) कट्टर उपासक आहोत, असे त्यांच्या भाषणाचे सूत्र आहे. शिवछत्रपतींचा जयघोष त्यांच्या भाषणात सतत ऐकावयास मिळे. पुढे पुढे तर गरीबांच्या उद्धारासाठीच आपण आहोत व हे ऐतिहासिक कार्य करतांना आपणास इतरांच्या टिकेची पर्वा नाही, असा आवेश त्यांच्या भाषणात येऊ लागला. महाराष्ट्राचा हा मुख्यमंत्री गरीब–उद्धारासाठी ठिकठिकाणी हातात चेक–बुक घेऊन जाऊ लागला. या चेकचा फायदा अनेकांना झाला. पण हे पैसे कुठून येतात अशा संशयाचे जबरदस्त वातावरणही अंतुलेंच्या अतिरेकामुळे निर्माण झाले.

सिमेंट प्रकरण – अतिरेकाचा कहर !

सिमेंट प्रकरणी तर अंतुलेंनी अतिरेकाचा कहरच केला. यावेळी सिमेंटची तीव्र टंचाई होती. प्रतिभा प्रतिष्ठान व इतर ट्रस्ट मुख्यमंत्री अंतुले यांनी स्थापन केले होते. या ट्रस्टसाठी बडे उद्योगपती, बिल्डर यांच्याकडून बडया रकमा मिळत होत्या. यावर 'इतर लोक टेबलाखालून व्यवहार करतात, आपण खुल्लमखुल्ला चेकने पैसे घेतो' असे रोखठोक समर्थन अंतुले यांचे होते. गरीबांच्या उद्धारासाठी आपण हा पैसा वापरणार आहोत, असाही त्यांचा युक्तिवाद असे. हा युक्तिवाद व समर्थन कितीही चांगले वाटत असले तरी मुख्यमंत्र्याला शोभणारा हा प्रकार नव्हता. टरेंबाज स्वभावाच्या श्री. अंतुले या व्यक्तीला हे खुल्लमखुल्ला समर्थन शोभणारे होते. मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांचा हा खुल्लमखुल्ला युक्तिवाद कुणालाच न पटणारा होता आणि म्हणूनच त्यांच्यावर चौफेर कठोर टीका झाली ! आणि अखेर या सिमेंटप्रकरणीच अंतुले "जाम" होऊन त्यांना जावे लागले !

महत्त्वाकांक्षा नडली

आता प्रश्न पडतो तो अंतुलेंचे हे सिमेंटप्रकरण व विविध प्रतिष्ठाने यांनी

घातलेल्या धुमाकूळाची माहिती दिल्लीश्वरांना नव्हती काय? वर्तमानपत्रे साप्ताहिके, पाक्षिके यात हे सर्व येत होते. विविध प्रतिष्ठानांसाठी मुख्यमंत्र्यांना देण्यात आलेल्या बड्या देणग्यांच्या वेळेची छायाचित्रे दूरदर्शनवर सतत झळकतच होती. मग दिल्लीश्रेष्ठींनी हे सर्व कसे खपवून घेतले? अंतुलेंना हा सारा प्रकार थांबविण्यास का सांगितले नाही? पंतप्रधान इंदिराजींनी सांगितल्यावर त्यांचे न ऐकण्याची हिंमत अंतुले यांच्यात थोडीच होती? की अंतुलेंचा एकेक पाय मुद्दामच खोलात जाऊ देण्याचे धोरण पक्षश्रेष्ठींनी अनुसरले व न्या. लेन्टिन यांचे निकालपत्र येताच अंतुलेंची गठडी वळली?

अंतुलेंचा स्वभाव, सिमेंटप्रकरण, प्रतिष्ठाने हे सर्व त्यांना नडले तरी खरी ग्यानबाची मेख वेगळीच आहे, असे माझे ठाम मत आहे. अंतुले हे पंतप्रधानकीची महत्त्वाकांक्षा बाळगून होते व त्यांची ही महत्त्वाकांक्षा लपून न राहिल्याने त्यांना सत्ताभ्रष्ट करण्यात आले अशी "अंदरकी बात" आहे.

"भवानी तलवार" आणावयास निघाले

शिवाजीमहाराजांची राजधानी असलेल्या "रायगड" भागातील अंतुले व "मराठा शुगर लॉबीला" डावलून आपण राज्य करीत आहोत, याची त्यांना जाणीव होती. परिणामी मराठ्यांचे व मराठी जनतेचे दैवत असलेल्या शिवाजीमहाराजांच्या "पॉप्युलर एलिमेंट"चा वापर करायचे त्यांनी ठरविले. त्यांच्या भाषणात महाराजांचा उल्लेख हटकून असायचाच. त्यातच महाराजांची भवानी तलवार इंग्लंडहून आणायचे त्यांनी मनावर घेतले. आपली शिवभक्ती त्यांना अधिक प्रखरपणे दाखवून महाराष्ट्राच्या मराठी मनात त्यांना आपले स्थान प्राप्त करायचे होते. "भवानी तलवार" आणण्याचा सल्ला त्यांना कोणी दिला, याबद्दल नाना कथा असल्या तरी ही तलवार आणण्याचे त्यांनी अगदी मनावरच घेतले होते. याची "चौघडे"वाजवून भरपूर जाहिरातही करण्यात आली!

ही तलवार आणण्यासाठी जनाब अंतुले इंग्लंडला निघाले. आठ दिवसांचा त्यांचा हा दौरा होता. तलवार आणण्यासाठी इंग्लंडला गेलेल्या अंतुलेंनी या दौऱ्यात काही अरब देशांना भेटी दिल्या. आणि येथेच माशी शिंकली! भारताचा

भावी मुस्लीम पंतप्रधान अशी दवंडी तेथे पिटण्यात आली व त्या पद्धतीने त्यांचे स्वागत झाले. या संदर्भात अंतुलेंच्या कर्तबगारीचे एक पुस्तकही तेथे वाटण्यात आले, असेही सांगण्यात येते. या बातम्या काही लपून राहिल्या नाहीत. अरबी-समुद्रातून त्या भारताच्या किनाऱ्यावर येऊन थडकल्या. भवानी तलवार आणावयास गेलेल्या अंतुलेंच्या मनातील खरा हेतू वेगळाच होता ....

इंदिराजींकडे तक्रारी

याच काळात अंतुलेंच्या अनुपस्थित पंतप्रधान व पक्षाध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी या मुंबईत काही कार्यक्रमासाठी आल्या होत्या. यावेळी अंतुलेंविरुद्ध पक्षांतर्गत लोकांच्या काही शिष्टमंडळांनी त्यांना निवेदने सादर केली. याच दरम्यान, अर्थमंत्री श्री. रामराव आदिक व इंदिराजी यांची भेट झाली. इंदिराजींना रामराव दोन वेळा भेटले. अंतुले सरकारविरुद्ध असलेल्या काही तक्रारींबद्दल पंतप्रधानांनी रामरावांकडे यावेळी विचारणा केली, असे निश्चितपणे कळले. खासकरून स्वपक्षाच्या कार्यकर्त्यांपेक्षा शिवसेनेशी अंतुले यांची असलेल्या जवळकीबद्दल पंतप्रधानांनी विचारले, तसेच इतरही तक्रारींबद्दल वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. (अंतुलेंच्या काळातच शिवसेनेचे श्री. प्रमोद नवलकर व श्री. वामनराव महाडिक हे दोघेजण विधानसभेतून इंदिरा काँग्रेसच्या आमदारांच्या मतांवर विधान परिषदेत निवडून गेले. त्यामुळे आतापर्यंत विधान परिषदेत एकच सदस्य असणाऱ्या शिवसेनेची सभासदसंख्या तीन झाली. शिवसेनेचे आमदार नवलकर यांना बरोबर घेऊन मुख्यमंत्री श्री. अंतुले यांनी मुंबईतील जुगारी अड्डे, हातभट्ट्या यांना रात्री अचानक भेट दिली. अंतुलेंच्या या अचानक भेटीचा बराच गाजावाजाही झाला होता) दुसऱ्या दिवशी हे वृत्त वृत्तपत्रांत ठळकपणे छापून आले. पंतप्रधानांनी मुख्यमंत्र्यांविरुद्धच्या तक्रारींबद्दल त्यांच्याच मंत्रिमंडळातील राजकीय दृष्ट्या दुसऱ्या क्रमांकाच्या नेत्याकडे विचारणा करणे याचा अर्थ वेगळा होता. साहजिकच त्यामुळे खळबळ माजली. (यासंबंधी रामरावांना विचारले असता पंतप्रधानांनी आपणास बोलावून घेतले होते व अशी विचारणा केल्याचे त्यांनी मान्य केले.)

रामरावांनी आपल्या या भेटीबाबत आलेल्या वृत्तांचा इन्कार केला नाही. त्यामुळे तर आणखीनच गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. अंतुलेंच्या कारभाराबद्दलची नाराजी पंतप्रधानांनीच अंतुलेंच्याच एक प्रबळ सहकार्याद्वारे जाहीर

केली होती. अंतुले पंतप्रधानांच्या मनातून उतरल्याची ही सुरूवात होती. आणि त्याचबरोबर अंतुलेंविरुद्धच्या तक्रारींबाबत पंतप्रधानांनी रामरावांशी चर्चा केली हे ही मोठे सूचक होते.

रिकाम्या हाताने परतले

त्यानंतर बॅ. अंतुले भवानी तलवार न आणताच मुंबईला रिकाम्या हाताने परत आले, यावेळी त्यांच्या स्वागतासाठी मुंबईच्या विमानतळावर त्यांचे मंत्री-मंडळातील सहकारी, आमदार उपस्थित होते. पण रामराव आदिक मात्र अनुपस्थित होते. अरब देश महाराष्ट्रातील उद्योगांसाठी व काही पूल प्रकल्पासाठी आर्थिक मदत देऊ शकतात काय याची चांचपणी करण्यासाठी अर्थमंत्री रामराव आदिकांच्या नेतृत्वाखाली त्याच दिवशी एक शिष्टमंडळ अरब देशात रवाना झाले होते. अंतुले-आदिक यांची काही तासांनी चुकामूक झाली होती.

अंतुले-आदिक बेबनाव

इंदिराजी व रामराव यांच्या भेटीने अतिशय अस्वस्थ झालेल्या संतप्त अंतुलेंनी नंतर रामरावांकडे विचारणा केली. रामरावांनी नेहमीप्रमाणे बोटचेपी भूमिका स्वीकारली, पण खवळलेल्या अंतुलेंचे त्यामुळे मुळीच समाधान झाले नाही. अंतुले आदिक मैत्री येथे संपली !

रामरावांनी खूप उशीरा इंदिराजी व आपल्या भेटीसंबंधी आलेल्या बृता-संबंधी गोलमाल खुलासा केला आणि अंतुले व आपण यांच्यात वृत्तपत्रांमुळे गैरसमज निर्माण झाले असे सांगितले, तरी ते खरे नव्हते. आदिकांचे खूप उशीरा आलेले खुलासे अंतुलेंनी खरे मानले नाहीत व त्यांच्यातील मतभेद वाढतच गेले. रामरावांबद्दल अंतुलेंच्या मनात संशय निर्माण झाला होता व आदिक आपणास दगा देणार या भीतीने ते पछाडले होते. इथपर्यंत की रामरावांना मंत्रिमंडळातून वगळण्यासाठी ते सतत प्रयत्नशील होते. रामराव व इतर मिळून सहा मंत्र्यांना वगळ-ण्याचा अंतुलेंचा विचार असल्याचे वृत्तही काही वृत्तपत्रांनी त्यावेळी दिले होते. परंतु दिल्लीश्रेष्ठींने अंतुलेंचे मनसुबे विफल ठरविले. आपल्या मंत्रिमंडळाची पुनर्रचना व विस्तार करण्याचा किमान दोनवेळा प्रयत्न त्यांनी केला. पण दिल्लीपतींचे भक्कम संरक्षण लाभल्यामुळेच रामरावांवर वार करणे अंतुलेंना शक्य झाले नाही. नाहीतर खुनशी अंतुलेंनी शालिनीताई व बाबुराव काळे यांच्याप्रमाणे रामरावांवरही वार करण्यास मुळीच मागे पुढे पाहिले नसते ! आणि रामरावां-नीही स्वभावानुसार मुळीच प्रतिकार केला नसता !

भावी पंतप्रधान प्रचार नडला

अंतुलेंनी अरब देशात भावी पंतप्रधान म्हणून जो गवगवा केला तोच त्यांना भोवला असे निश्चित दिसते. इंदिरा काँग्रेसचे नऊ राज्यात मुख्यमंत्री असले तरी मुख्यमंत्री अंतुलेंचा कामाचा झपाटा काही औरच होता. बरेच दिवस दिल्लीत मुक्काम ठोकून असलेले अंतुले यांनी इंदिराजींची कार्य–पद्धती जवळून न्याहाळली होती व मुख्यमंत्री झाल्यावर मुंबईत ते त्याच पद्धतीने व झपाट्याने काम करीत होते. पंतप्रधानांप्रमाणे अंतुले यांचाही काम करण्याचा "स्टॅमिना" जबर होता. सकाळी आठपासून ते रात्री दोन वाजेपर्यंत हा राजकारणाचे जबर व्यसन असलेला हुशार बॅरिस्टर काम करीत असे. साहजिकच एक अत्यंत तडफदार मुख्यमंत्री म्हणून त्याचे नांव झाले. इंदिरा गांधी यांच्या खालोखाल नांव असलेला इंदिरा काँग्रेसमधील अंतुले हा दुसरा नेता होता. याचवेळी राजीव गांधी यांचा राजकीय क्षितीजावर उदय होत होता. भावी पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांची वाटचाल आईच्या आशीर्वादाने सुरू झाली होती. इंदिराजीनंतर पंतप्रधानपदासाठी भविष्यात जी पक्षांतर्गत लढाई होणार होती त्यात राजीव गांधी यांना जबरदस्त आव्हान देण्याची ताकद अंतुलेंमध्ये होती. याकामी अरब राष्ट्रांची अंतुलेंना मोठी मदत लाभली असती. भारताचा पहिला मुस्लीम पंतप्रधान होण्याची महत्त्वाकांक्षा अंतुले बाळगून होते. 'अंतुले देशाचे उपपंतप्रधान होतील,' असे भाकीतही अंतुलेमित्र शिवसेनाप्रमुख श्री. बाळ ठाकरे यांनी एकदा केले. इंदिराजींच्या हयातीतच हे होणार, ठाकरेंच्या या विधानात गृहीत धरले आहे. ठाकरे हे जाहीरपणे बोलून गेले ! आता उपपंतप्रधान, नंतर पंतप्रधान असा तो संदर्भ होता.

संधी मिळताच अंतुलेंची गठडी वळली

आपल्या नंतर आपल्या वारसास अंतुले हे त्रास देतील, हे महाचाणक्ष इंदिराजींनी ओळखून वेळीच अंतुलेंचा बंदोबस्त करण्याचे ठरविलेले दिसते, याबाबत माझ्या मनात तरी मुळीच शंका नाही. त्यानंतर अंतुलेंचे "पतन" पध्दतशीरपणे झाले आहे. अंतुलेंना खाली खेचण्यासाठी पध्दतशीर पावले पडली आहेत. त्यानंतर अंतुलेंची शिकार करण्यासाठी इंदिराजी योग्य संधीची वाट पहात थांबल्या. अंतुलेंचे सिमेंट प्रकरण, इंदिरा गांधींचे प्रथम नांव देऊन नंतर ते काढून टाकलेले प्रतिभा प्रतिष्ठान, तसेच इतर प्रतिष्ठाने या साऱ्या प्रकरणांची व प्रकारांची संपूर्ण कल्पना पंतप्रधानांना नव्हती असे कसे म्हणता येईल ? अंतुले

मुख्यमंत्रीपदावरून जाण्यापूर्वी किमान सहा महिने या प्रकरणांबद्दल महाराष्ट्रात वादळ उभे राहिले होते व यासंबंधीच्या बातम्या सतत वृत्तपत्रांत येत होत्या. मग इंदिराजी सहा महिने का थांबल्या ? न्यायमूर्ती लेन्टिन यांनी अंतुलेंविरुद्ध निकाल देताच त्यांनी त्याच दिवशी (१२ जानेवारी १९८२ रोजी) अंतुलेंना राजीनामा देण्यास भाग पाडले. याचा अर्थ अंतुलेंची गठडी वळण्यासाठी याच संधीची त्या वाट पहात होत्या. अंतुलेंविरुद्ध सिमेंटप्रकरणी सहा महिन्यांपूर्वीच काहूर उठले असतांना त्यांना राजीनामा देण्यास इंदिराजींना सांगता आले असते. पण त्यांनी तसे केले नाही. या सहा महिन्यांच्या काळात अंतुलेंना भरपूर बदनाम होऊ दिले व स्वतः काही कृती न करिता न्यायालयाच्या निकालामुळे ही कृती करावी लागली, असे सांगण्यास त्या मोकळ्या झाल्या. आधी हे केले असते तर इंदिरा काँग्रेसच्या एकमेव मुस्लीम मुख्यमंत्र्याला काढण्यात आले असा प्रचार झाला असता व तो अंतुलेंना फायद्याचा ठरला असता. न्या. लेन्टिन यांच्या निकालपत्रामुळे अंतुलेंना राजीनामा देण्यास सांगितल्याने न्यायालयाचा आदर राखल्यासारखेही झाले ! त्यामुळे तमाम बुद्धीजीवी लोक प्रभावीत झाले ! या साऱ्या प्रकारात इंदिराजी या सव्वाशेर आहेत, हेच सिद्ध झाले ! "ऑपरेशन अंतुले" त्यांनी बेमालूम केले !

अरुण शौरींचा दणका

अंतुले सिमेंटप्रकरण व प्रतिभा प्रतिष्ठानसाठी घेण्यात येणाऱ्या देणग्या याबाबत वृत्तपत्रांमध्ये बरेच दिवस टीका येतच होती. "महाराष्ट्र टाइम्स" व "मुंबई सकाळ" ही मुंबईची वृत्तपत्रे यासंबंधीच्या बातम्या अधूनमधून प्रसिद्ध करीत होती. तथापि, महाराष्ट्रातील विरोधी पक्ष संख्येने एवढा दुबळा होता की या परिस्थितीचा फायदा त्यांना उठविता आला नाही. विधानसभेचे पावसाळी अधिवेशन (१९८२) सुरू असतांना विरोधी पक्षाला चेव यावा व त्यांच्यात लढण्याची ताकद यावी अशी एक घटना घडली. श्री. अरुण शौरी यांनी "इंडियन एक्सप्रेस" व "लोकसत्ता" या वृत्तपत्रांत अंतुले सिमेंटप्रकरणी एक दणकेबाज वृत्त दिले. "इंदिरा नामाचा बाजार मांडणारा मुंबईचा सुलतान अंतुले" अशी हेडलाईन असलेले वृत्त दैनिक "लोकसत्ता" ने प्रसिद्ध केले. या वृत्ताने प्रचंड खळबळ माजली. आचार्य अत्रे यांच्या दैनिक "मराठ्या"ची आठवण व्हावी असा हा "लोकसत्ता" अंक होता. प्रतिष्ठानला मिळालेल्या काही देणग्यांची संगतवार माहिती या वृत्तात सविस्तरपणे दिली होती. शौरींची ही स्टोरी अंतुलेंना दणकाच देणारी होती. तशी या वृत्तातील माहिती फारशी नवीन नव्हती. पूर्वी ही माहिती विखुरलेल्या स्वरूपात

इतर वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केलेली होती. पण हीच माहिती सविस्तरपणे शौरींनी दणकेबाज पद्धतीने एकत्रित प्रसिद्ध केली. शौरींची ही स्टोरी गाजली ती त्यांच्या आक्रमक दणकेबाज पद्धतीमुळे ! अरुण शौरी हे पंजाबी गृहस्थ असून इंग्रजी पत्रसृष्टीत त्यांचे नांव झाले असले तरी "लोकसत्ता"तील या दणदणीत स्टोरी-मुळे शौरी हे नांव मराठी वाचकांपर्यंत पोचले. शौरी हे मराठीच आहेत इथपर्यंत मराठी वाचकांचा समज झाला. या संबंधीचा एक किस्सा सांगतो. या दरम्यान मी जळगांवला दौऱ्यावर गेलो होतो, तेव्हा काहीजणांनी मला विचारले, 'शौरी हे लोकसत्तेत काम करतात काय ?' यावेळी नुकतीच शौरींची ही स्टोरी प्रसिद्ध झाली होती.

शौरींच्या या स्टोरीमुळे प्रचंड खळबळ निर्माण होऊन विधानसभेतील विरोधी पक्ष खडबडून जागा झाला. मरगळलेल्या विरोधी पक्षाला शौरींच्या स्टोरीने खाद्य पुरविले व तो आक्रमणाच्या पवित्र्यात उभा ठाकला. यावेळी अर्ध्याहून अधिक अधिवेशन पार पडले होते. यानंतर विधानसभेच्या लॉबीत याच विषयावर चर्चा ऐकू येत असे. 'अंतुले जाणार की राहणार' अशीही चर्चा लोकांत सुरू झाली.

यानंतर शौरींनी आणखी याच विषयावर दोन-तीन रिपोर्ट लिहिले. शौरींनी "लोकसत्ता" व "इंडियन एक्सप्रेस" मधून अंतुलेंविरुद्ध मोहिमच सुरू केली.

शौरींनी दिलेल्या सविस्तर माहितीमुळे त्यांना मंत्रालयातील कोणीतरी बडा अधिकारी अथवा अंतुले मंत्रिमंडळातील एखादा विरोधी मंत्री ही माहिती पुरवित आहे, असा समज पसरला होता. अंतुले–मित्रांचा संशय महसूलमंत्री शालिनीताई पाटील यांच्यावर होता. पुढे शालिनीताईंच्या एका जाहीर वक्तव्याचा आधार घेऊन शालिनीताईना अंतुलेंनी मंत्रिमंडळातून काढून टाकलेच !

पंजाबी लॉबी

पण यातील खरी गंमत अशी की अरुण शौरी हे दिल्लीत त्यावेळी "इंडियन एक्सप्रेस"चे कार्यकारी संपादक असतांना त्यांनी मुंबईत तळ ठोकून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांविरुद्ध प्रचंड मोहीम का उघडली ? दिल्लीतील राजकीय सूत्राने मला दिलेल्या माहितीनुसार अरुण शौरी यांना मिळालेली बरीच माहिती दिल्लीतूनच मिळाली असावी व त्यांना अंतुलेंना चितपट करण्याच्या प्रेरणेचे केंद्रही दिल्लीतच असावे ! शौरी हे पंजाबी असून दिल्लीतील पंजाबी लॉबीने

त्यांना ही माहिती पुरविली, असे कळले. पण ते काही असो. या वृत्ताने अरुण शौरी हे पत्रकार म्हणून मान्यता पावले. त्यांच्या नांवाचा बोलबाला झाला !

आणि विरोधी पक्ष जागा झाला

"लोकसत्ता", "इंडियन एक्सप्रेस"मधील अंतुलेंविरोधी या प्रचंड मोहिमेमुळे विधिमंडळातील विरोधी पक्ष खडबडून जागा झाला आणि त्याने हे प्रकरण मग चांगलेच लावून धरले. विधानसभा लॉबीत 'अंतुले जाणार की राहणार' याच विषयावर चर्चा ऐकू येऊ लागली. विधिमंडळाचे उर्वरित अधिवेशन याच प्रकरणाने गाजले. अखेर अधिवेशनाच्या शेवटी शेवटी या विषयावर चर्चा झाली. विधानसभा व विधान परिषदेच्या दोन्ही सभागृहात मुख्यमंत्री अंतुले यांनी आपल्या नेहमीच्या आक्रमक शैलीने विरोधकांच्या टीकेला उत्तर दिले. यावेळचे विधान परिषदेतील अंतुले यांचे भाषण मी स्वत: ऐकले आहे. अंतुले यांचे सदर भाषण आक्रमक असले तरी ते चिडखोर स्वरात झाले. विरोधकांनी आपणास बदनाम करण्याचा कसा पद्धतशीर प्रयत्न चालविला आहे हे सांगतांना आपण विधान परिषदेच्या सभागृहात बोलतो आहोत याचे भान अंतुले यांना राहिले नाही. अंतुलेंचे हे भाषण बरेचसे भावनावशही होते. अंतुलेंचे हे भाषण विधिमंडळात शोभण्यापेक्षा विधिमंडळाबाहेर शोभणारे होते. मुख्यमंत्र्यांची पातळी, दर्जा सोडून केलेले हे भाषण होते ! सिमेंटप्रकरणाशी संबंधित असलेल्या सर्व फाईल्स आपण विधान परिषदेचे त्यावेळचे अध्यक्ष श्री. रा. सु. गवई यांच्याकडे सुपूर्द करण्यास तयार असून त्यांनी या प्रकरणी चौकशी करावी अशी नाटचपूर्ण आव्हानात्मक घोषणाही अंतुले यांनी यावेळी केली. चर्चेच्या ओघात आपण मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा आपल्या प्रिय नेत्याकडे (इंदिराजींकडे) आधीच दिल्याचेही त्यांनी जाहीर करून टाकले. त्या दिवशी रात्री उशीरापर्यंत विधिमंडळाच्या लॉबीत हीच चर्चा जोरात होती व दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांनी हीच बातमी ठळकपणे प्रसिद्ध केली. "अंतुले जाणार" या चर्चेस यामुळे जोर आला. सर्वत्रच ही चर्चा ऐकू येत होती.

पण लोकांच्या अपेक्षेप्रमाणे अंतुले काही लगेच गेले नाहीत. जसजसा काळ जाऊ लागला तसा या चर्चेचा धुरळा कमी होऊ लागला. तथापि, 'आज अंतुले जाणार उद्या जाणार' असे सतत बोलले जात होते व अधूनमधून काही वृत्तेही त्याच्या जोडीला येत होती.

मंत्रिमंडळ विस्तारास परवानगी नाकारली

अशा अस्थिरतेच्या वातावरणात अंतुलेंचे तीन-चार महिने काढले.

मराठी ग्रंथालय संघ

दरम्यानच्या काळात नागपूरचे हिवाळी अधिवेशन आले. तेही अंतुलेंनी पार केले. या अधिवेशनापूर्वी व नंतरही अंतुले यांनी आपल्या मंत्रिमंडळाची पुनर्रचना व विस्तार करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. आपल्याबद्दलचे अस्थिरतेचे वातावरण दूर करावे व आपली पकड पुन्हा घट्ट बसवावी हा यामागे अंतुलेंचा उद्देश होता. परंतु पक्षश्रेष्ठींनी म्हणजेच इंदिराजींनी अंतुले यांना तसे करण्यास परवानगी दिली नाही. त्यामुळे अंतुले यांना प्रत्येक वेळी या कामासाठी दिल्लीस गेल्यावर हात चोळीत परत यावे लागले ! अंतुले यांचे दिल्लीतील वजन पार गेल्याचेच हे लक्षण होते ! काहीना काही बहाणा करून अंतुलेंनी वेळ मारून नेली, पण संबंधितांच्या लक्षात ही बाब केव्हाच आली होती. एकदा तर प्रांताध्यक्ष गुलाबराव पाटील यांना दिल्लीत घाईगर्दीने बोलावून घेऊन त्यांच्याशी मंत्रिमंडळाच्या विस्ताराबाबत जिल्हानिहाय चर्चा करायची असल्याने तूर्त आपण मंत्रिमंडळाचा विस्तार लांबणीवर टाकला अशी लोणकढी थाप अंतुलेंनी मारली होती. ज्या गुलाबरावांना बाबासाहेब भोसले यांच्यासारखे गृहस्थही अकार्यक्षम ठरवितात त्यांच्याशी अंतुले मंत्रिमंडळाबाबत कसली चर्चा करणार होते ? गुलाबराव हे अंतुले यांनी प्रांताध्यक्षपदी बसविलेले बाहुले होते, हे जगजाहीर आहे ! वसंतदादांच्या सांगली जिल्ह्यातील हे गुलाबराव, दादांचे विरोधक असल्यानेच अंतुलेंनी त्यांना प्रांताध्यक्षपदी आणून बसविले होते.

अंतुलेंवर "संक्रांत" आली !

अशा एकूण संशयाच्या वातावरणात अंतुलेंनी १९८१ साल कसेबसे काढले. उजाडलेले १९८२ साल त्यांना वाईट निघाले. १२ जानेवारी १९८२ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती लेन्टिन यांनी आपला "गाजलेला निकाल" दिला. जनता पक्षाच्या माजी खासदार मृणाल गोरे आणि साथींनी भरलेल्या या खटल्याचा हा निकाल होता. सिमेंटप्रकरणी अंतुले यांच्याविरुद्ध न्या. लेन्टिन यांनी काही शेरे निकालात मारले होते. या खटल्याच्या निकालाकडे असंख्य लोकांचे डोळे लागले होते. अंतुलेविरुद्ध निकाल जाणार असे सांगणारा एक मोठा वर्ग होता. अंतुलेंवर "संक्रांत" येणार असा माझा एक मित्र गंमतीने म्हणाला होता. आणि खरोखरच अंतुलेंवर "संक्रांत" आली ! (१४ जानेवारी रोजी "संक्रांत" होती)

अंतुलेंविरुद्ध खटल्याचा निकाल जाताच महाराष्ट्राच्या राजकारणात प्रचंड खळबळ माजली. पंतप्रधान व इंदिरा काँग्रेस पक्षाध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी

कोणता निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले. आणि ज्या दिवशी निकाल लागला त्या दिवशी भराभर अतिशय वेगाने राजकीय हालचाली व घटना घडल्या. तीन महिने जाणार जाणार म्हणून ज्या सतत वार्ता येत होत्या त्या अंतुलेंना अखेर मुख्यमंत्रीपदावरून खाली उतरण्यास इंदिराजींनी आदेश दिला ! योग्य वेळ साधणे (प्रॉपर टायमिंग) हे इंदिरा गांधी यांच्या राजकारणाचे एक वैशिष्टच आहे. याचे हे उत्तम उदाहरण आहे ! त्यांनी आपल्या या मशहूर अस्त्राचा अचूक वापर केला !

झपाटचाने निर्णय घेणारा मुख्यमंत्री

अंतुले मुख्यमंत्रीपदावरून गेले. मनात आले व मनाला पटले की झटपट निर्णय घेणारा हा मुख्यमंत्री होता. अंतुलेंच्या या झपाटचाने निर्णय घेण्याच्या पद्धतीचे काही निश्चित चांगले परिणाम दिसले आहेत. अनेकांना त्यामुळे दिलासा मिळाला. प्रशासकीय पातळीवर सचिवांची (आय्. ए. एस्. अधिकारी) एक पोलादी चौकट आहे. येऱ्यागबाळचा मंत्र्याला हे सचिव तर बोटावर खेळवतात. आपण म्हणजेच सरकार या थाटात हे लोक वागत असतात. पण "मी म्हणजे सरकार" असे ठणकावून सांगणारा हा मुख्यमंत्री त्यांना भेटला. "पूर्वीच्या सरकारने एखादा कायदा केला असेल, पण आता मी सरकार आहे. त्या कायद्यात बदल करण्यास मी सांगतो" अशी कणखर व सुस्पष्ट भूमिका घेण्याची हिंमत मुख्यमंत्री अंतुले यांच्यात होती. नोकरशाहीला वठणीवर आणण्याची शामत या मुख्यमंत्र्यात होती. अंतुलेंनी या सचिवांना घाम फोडला. नोकरशाही अंतुलेंना चळचळा कापत असे. हे योग्य की अयोग्य हा वादाचा विषय होऊ शकेल. पण नोकरशाहीच्या नाठाळ घोडचावर या मुख्यमंत्र्याची भक्कम मांड होती. हा घोडा अंतुल्यांनी आपल्या काबूत ठेवला होता. त्यास उधळू दिले नाही ! संजय गांधी निराधार व स्वावलंबन योजना या राज्यात अंतुलेंनी सुरू केली. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या नावावर रोजगार हमी योजनेची कायम नोंद आहे, तशी अंतुलेंच्या नांवावर या योजनांची कायमची नोंद झाली आहे. या योजनांत काही दोष असतील तर ते दूर करता येतील. पण मुळात कल्याणकारी अशा या योजना आहेत. याचे श्रेय अंतुलेंना द्यायलाच हवे ! विशेषत: निराधार व्यक्तीला ५० रुपये घरपोच पाठविण्याची योजना अभिनंदनीयच आहे!

४] महाराष्ट्राचे हसे करणारा मुख्यमंत्री



बॅ. बाबासाहेब भोसले

अब्दुल रेहमान अंतुले जाऊन महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी कुणाच्या ध्यानी, मनी नसलेले बाबासाहेब भोसले हे विराजमान झाले. सुमारे एक वर्षाच्या कारकीर्दीत या भोसल्यांनी महाराष्ट्राला हसविण्याचे कार्य केले. आमचा एक मित्र म्हणतो, 'हसविण्याचे नव्हे, त्यांनी महाराष्ट्राचे हसे केले ! ' त्याचेच म्हणणे अधिक योग्य आहे. होय, बाबासाहेबांनी एक वर्षात महाराष्ट्राचे हसेच केले ! असा हा हास्यास्पद मुख्यमंत्री शिवछत्रपतींच्या या राज्याला दिला कोणी ? महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावरून गेलेल्या जनाब अंतुले यांचीच ही राजकीय निर्मिती होती. कुर्ल्याच्या या 'बालिस्टरा'ची राजकीय जडणघडणच मुळी अंतुलेंनी केली आहे.

बॅरिस्टर बाबासाहेब भोसले यांची मुख्यमंत्रीपदी निवड होण्यापूर्वी अंतुले यांच्या बंगल्यावर ("वर्षा" या सरकारी निवासस्थानावर) जे विलक्षण राजकीय नाट्य घडले ते आधी येथे देतो. १२ जानेवारी १९८२ रोजी दुपारी त्या. लेन्टिन यांचा निकाल जाहीर होताच एकच खळबळ माजली नि लगेच

गतिमान राजकीय हालचाली सुरू झाल्या. अंतुलेंच्या बंगल्यावर इंदिरा काँग्रेसच्या आमदारांचे, कार्यकर्त्यांचे जथ्येच्या जथ्ये येऊ लागले. जवळजवळ सर्वच इंदिरा काँग्रेस आमदार, अंतुले मंत्रिमंडळातील मंत्री "वर्षा" वर जमा झाले. एकूण वातावरण गंभीर होते. 'आता पुढे काय', हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात होता. 'अंतुलेसाहेबांनीच मुख्यमंत्री रहावे', असे उघडउघड म्हणणारा आमदारांचा एक गट होता. काही मंत्रीही या मताचा उघड पुरस्कार करणारे होते. पण काही धोरणी आमदार नि मंत्री सावधपणे पावले टाकतांना दिसत होते. दिल्लीचा रागरंग काय, याचा शोध ही मंडळी घेत होती. आपल्या बंगल्यावर जमलेली ही आमदारांची – मंत्र्यांची गर्दी पाहून अंतुलेंचा उत्साह द्विगुणीत झाला होता. आत्मविश्वास वाढला होता. सर्वांना ते भेटत होते, त्यांच्याशी बोलून, विचार-विनीमय करून पुढील सूचना देत होते. "वर्षा"वर जबरदस्त राजकीय डावपेच चालले होते.

अंतुल्यांना दिल्लीचा आदेश

न्या. लेन्टिन यांचा निकाल विरुद्ध गेला असला तरी तेवढ्यावर मुख्यमंत्री-पदाचा राजीनामा देण्याची अंतुले यांची तयारी नव्हती. पण अंतुलेंनी लगेच राजीनामा द्यावा, असे फर्मान दिल्लीहून सुटले. "पंतप्रधानांच्या हाऊस"मधून त्याच दिवशी (१२ जानेवारी) अंतुलेंना तसा आदेश देण्यात आला. "आपणास थोडा अवधी द्यावा, किमान दोन दिवस द्यावे." अशी विनवणी अंतुलेंनी त्यावर केली. अंतुलेंना नवीन डाव खेळण्यासाठी हा अवधी हवा होता. पण अंतुलेंचा स्वभाव व डावपेच ओळखून असलेल्या दिल्लीने (पक्षश्रेष्ठींनी) ती फेटाळली व लगेच राजीनामा देण्यास सांगितले. (अंतुलेंनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊ नये, अशी मागणी आमदारांतर्फे अंतुले करणार होते) त्यावर आपण तीन महिन्यांपूर्वीच पंतप्रधानांकडे दिलेला राजीनामा राज्यपालांकडे पाठवून देण्यात यावा, असे अंतुलेंनी सांगितल्याचे विश्वसनीय व्यक्तीने सांगितले. पण दिल्ली-श्वरांनी नवीन राजीनामापत्र राज्यपालांकडे सादर करण्याचा सल्ला अंतुलेंना दिला. अखेर नाईलाजच झाल्याने अंतुले यांनी "राजभवना"वर जाऊन मुख्यमंत्री-पदाचा राजीनामा राज्यपालांना सादर केला. आणि राज्यपाल श्री. इद्रिस हसन लतिफ यांनी तो त्वरित स्वीकारला ! त्या दिवशी दूरदर्शनवर साडेसातच्या मराठी बातम्यात अंतुले यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्याचे व तो राज्य-पालांनी स्वीकारल्याचे वृत्त देण्यात आले. खऱ्या अर्थाने मुख्यमंत्रीपदावरून अंतुले गेले होते.

"वर्षा"वरील ही गर्दी

दिल्लीने अंतुलेंचे डावपेच अशा तऱ्हेने विफल ठरविले, तरी दिल्लीच्याच पठडीत वाढलेले अंतुले एवढ्याने हार मानणारे नव्हते. अंतुलेंनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला तरी त्यांच्या बंगल्यावर आमदार, खासदार व मंत्र्यांची तुफान गर्दी होतच होती. "वर्षा"वर मोटारगाड्या पार्क करण्यास जागा नव्हती. महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसमध्ये अंतुलेंशिवाय दुसरा नेता नाही, हेच हे दृश्य सांगत होते. सहसा मुख्यमंत्रीपद गेल्यावर लोक त्या व्यक्तीकडे पाठ फिरवितात, येथे मात्र परिस्थिती उलट होती ! वसंतराव नाईक यांचे मुख्यमंत्रीपद गेल्यावर "वर्षा"-वर असलेला शुकशुकाट मी पाहिलेला आहे. मुख्यमंत्रीपद गेले तरी महाराष्ट्राचे राजकारण अंतुलेच घडवीत होते !

पुन्हा अंतुलेच हवेत !

पक्षश्रेष्ठींनी राजीनामा देण्यासच सांगितल्याने नाईलाज झालेले अंतुले दुसरी चाल खेळले. डावपेच खेळण्यासाठी अंतुलेंना वेळ हवा होता, म्हणून अंतुलेंनी राजीनामा देण्यास दोन दिवस मागितले होते. परंतु पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या-वर "कृपा" केली नाही. तेव्हा "पुन्हा अंतुलेच हवेत", "पक्षनेतेपदी त्यांचीच निवड करण्यात यावी" अशी मागणी इंदिरा काँग्रेसचे बहुसंख्य आमदार करू लागले. अंतुलेंचा हा नवीन डाव होता. कोर्टाचा निकाल काहीही असो, विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाचे बहुसंख्य सदस्य जवळजवळ एकमुखाने एखाद्या व्यक्तीची मागणी करतात याचा आदर तुम्ही लोकशाहीत करणार की नाही, असा पक्ष-श्रेष्ठींना अंतुलेंचा पेच होता. विधिमंडळ पक्षनेतेपदासाठी पुन्हा अंतुले नाहीत, असा सांगावा दिल्लीहून पाठवून पक्षश्रेष्ठींनी अंतुलेंचा हादेखील डाव उधळून लावला ! तथापि, अंतुलेंच्या मागेच राज्यातील बहुसंख्य आमदार आहेत हे पक्ष-श्रेष्ठींना दाखवून देण्यात अंतुले यशस्वी झाले. अंतुले यांचा वारस निवडतांना अंतुलेंना डावलून चालणार नाही, अशी परिस्थिती अंतुलेंनी निर्माण केली. अंतुलेंच्या बंगल्यावरील गर्दी कायमच होती. दरम्यान, केंद्रातून एखादा मंत्री मुख्य-मंत्री म्हणून पाठविण्यात येणार अशी जोरदार बातमी "वर्षा"वर येऊन थडकली. आणि अंतुले सावध झाले.

शंकररावांना रोखले

शंकरराव चव्हाण किंवा शिवराज पाटील या दोन केंद्रीय मंत्र्यांची नांवे ऐकू येत होती. त्यातही शंकररावांचे नांव जोरात होते. पण अंतुलेंना शंकरराव

परवडणारे नव्हते. शंकरराव स्वभावाने भलतेच कडक आहेत. "वरून आलेली (केंद्रातून) व्यक्ती चालणार नाही" असा सूर अंतुलेंनी आमदारांना लावायला लावला. आमदारातूनच नेत्याची निवड व्हावी, अशी आग्रही मागणीही या आमदारांनी अंतुले प्रेरणेने केली. शंकररावांना रोखणे हाच यामागे अंतुलेंचा हेतू होता. अंतुलेंचा हा डाव यशस्वी झाला. आमदारांच्या कडव्या विरोधामुळे केंद्रातून मुख्यमंत्री पाठविण्याची कल्पना त्यावेळी पक्षश्रेष्ठींना सोडावी लागली. अंतुलेंच्या जागेवर नवीन नेता–निवडीसाठी केंद्रीय निरीक्षक म्हणून केंद्रीय मंत्री श्री. नरसिंहराव व सरचिटणीस श्री. जी. के. मूपनार यांना पाठविण्याचे पक्षश्रेष्ठींनी जाहीर केले. आणि अंतुले "वर्षा"वर नवीन डावपेच आखू लागले. आमदारांशी त्यांनी व्यक्तिगत नि गटागटाने चर्चा केली. केंद्रीय निरीक्षकांना रामराव आदिक, गुलाबराव पाटील यांची नांवे सांगावीत असे एकूण ठरले. नरेंद्र तिडके यांचेही नांव काही अंतुलेंच्या जवळचे आमदार घेत होते. म्हणजे आदिक, पाटील व तिडके यांची नांवे निरीक्षकांना सांगावीत असे मार्गदर्शन अंतुलेंनी केले असे अनेक आमदारांच्या सांगण्यावरून दिसून येते.

निरीक्षकांच्या भेटीगाठी

ठरल्याप्रमाणे केंद्रीय निरीक्षक नरसिंहराव व मूपनार मुंबईत येऊन दाखल झाले व "सह्याद्री" मुक्कामी त्यांनी आमदारांच्या भेटीगाठी सुरू केल्या. बहुतेक आमदारांशी नरसिंहरावच बोलले. कारण त्यांना मराठी व तसेच हिंदीही चांगली अवगत आहे. मूपनार यांच्याशी बोलायचे म्हणजे इंग्रजीतच. भाषेच्या अडचणीमुळे मूपनार व आमदार एकमेकांशी सुसंवाद साधू शकले नाहीत. मूपनार यांनी "सायलंट ऑब्झरवर"चे काम केले ! गटागटाने आमदार निरीक्षकांना भेटले. काही आमदारांनी व्यक्तिगत भेटून आपले मनोगत त्यांना सांगितले. यावेळी "सह्याद्री"वर प्रचंड गर्दी उसळली होती. "सह्याद्री"वर आमदारांशी चर्चा केली असता बहुसंख्य आमदारांनी रामराव आदिक यांचे नांव निरीक्षकांना सांगितल्याचे आढळून आले. त्यानंतर गुलाबराव पाटील यांचे नांव बऱ्याच आमदारांच्या तोंडून ऐकू आले. "सह्याद्री"वर यावेळी या दोनच नांवांची चर्चा ऐकू आली. त्यातही रामरावांचे नांव अधिक होते.

केंद्रबिंदू दिल्लीत

त्यानंतर "विधानभवनात" विधिमंडळ इंदिरा काँग्रेसची बैठक होऊन "नवीन नेता निवडण्याचा अधिकार पक्षाध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधींकडे देण्याचा"

प्रस्ताव एकमुखाने टाळ्यांच्या कडकडाटात आमदारांनी मंजूर केला. मुंबईतील दोन-तीन दिवस चाललेल्या नाटचपूर्ण राजकीय हालचाली अशा तऱ्हेने थंडावल्या. दोघे केंद्रीय निरीक्षक दिल्लीला रवाना झाले. मुंबईतील राजकीय नाटचाचा केंद्रबिंदू दिल्लीत गेला होता.

सारा महाराष्ट्र हादरला

दिल्लीच्या घोषणेची सर्वजण वाट पहात होते. लोकांची उत्सुकता कमालीची ताणली गेली होती. तर राजकारण्यांचे प्राण कंठाशी आले होते. या उत्कंठावर्धक स्थितीत तीन-चार दिवस गेले. १९ जानेवारी रोजी विरोधी पक्षांनी "भारत बंद" पुकारला होता. व हा बंद पार पडल्याशिवाय नव्या मुख्यमंत्र्याची घोषणा होईल असे वाटत नव्हते. नाहीतर नव्या मुख्यमंत्र्याला आल्या आल्या "भारत बंद" ला सामोरे जावे लागले असते. १९ जानेवारीचा "भारत बंद" पार पडला. आणि त्याच रात्री आकाशवाणीवरून मराठी बातम्यात मुख्यमंत्रीपदासाठी श्री. बाबासाहेब भोसले यांची निवड इं. काँ. पक्षश्रेष्ठींनी केल्याची घोषणा झाली. या "भारत बंद" च्या रात्री सारा महाराष्ट्र हादरला ! सगळ्यांचे अंदाज खोटे ठरले व अनपेक्षीतपणे बाबासाहेब भोसले यांचे नांव झळकले ! बाबासाहेबांच्या नांवाने सर्वचजण चक्रावले ! महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदासाठी "डोंगर पोखरून उंदिर" काढण्यात आला, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली गेली !

बाबासाहेबांना कल्पना होती ?

आपली निवड मुख्यमंत्रीपदी होणार याची कल्पना खुद्द बाबासाहेब भोसले यांना तरी होती काय ? १९ जानेवारीच्या सकाळी म्हणजे "भारत बंद"च्या दिवशी आमदार डॉ. वा. रा. शेरेकर यांनी बाबासाहेबांना सहज गप्पा मारण्यासाठी फोन केला होता. मुख्यमंत्री कोण होणार यावर साहजिकच बोलणे निघाले. त्यावर बाबासाहेब म्हणाले, 'काही सांगता येत नाही. आपण मात्र सर्व देवाला (भावी मुख्यमंत्र्याला) सध्या फुले वाहत आहोत'. यावर नेहमीच्या पद्धतीने बाबासाहेब मोठ्याने हसलेही. वसंतदादांच्या मंत्रिमंडळात अतिशय महत्त्वाच्या जागेवर असलेल्या एका मंत्र्यानेही बाबासाहेबांना याची कल्पना नव्हती, असे सांगितले. 'अंतुले यांच्यानंतर आता आपला कोणी वाली नाही, तेव्हा आपले मंत्रीपद गेल्याने सरकारी बंगला खाली करावा लागेल या धास्तीने त्यांना ग्रासले होते व अंतुलेंनी काळजीवाहू मुख्यमंत्री असतांना आपल्या राहण्याच्या जागेसाठी सोय करावी म्हणून बाबासाहेब धडपडत होते," अशी माहितीही या मंत्र्याने मला दिली.

"मुख्यमंत्री म्हणून आपल्या नावाची घोषणा झाली" याची कल्पना बाबासाहेबांना शेवटपर्यंत नव्हती. दिल्लीहून जेव्हा १९ जानेवारीच्या रात्री टेलिप्रिंटर फ्लॅश आला तेव्हा एका भाषिक वृत्तसंस्थेच्या प्रतिनिधीने बाबासाहेबांची प्रतिक्रिया घेण्यासाठी त्यांना फोन लावला, तेव्हा असे काही झाले आहे, याची त्यांना पूर्व-कल्पना नव्हती असे दिसून आले. तथापि, बाबासाहेबांचा दावा वेगळा आहे. अंतुलेंनी "वर्षा"वर एकदा बोलता बोलता आपणास याची "अप्रत्यक्ष कल्पना दिली होती" असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, "याची आपण कुठेही वाच्यता केली नाही," असेही त्यांनी सांगितले !

मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले

बाबासाहेब भोसले व माझी जुनी ओळख व मैत्री आहे. मी घाटकोपरला राहतो व ते कुर्ल्याला नेहरूनगरमध्ये रहात असत. (मंत्री होईपर्यंत) बाबासाहेबांची प्रथम माझी ओळख रामराव आदिक हे ॲडव्होकेट जनरल झाल्यावर (१९७४ साल) त्यांनी पश्चिम महाराष्ट्राचा दौरा काढला तेव्हा झाली. यावेळी रामरावांच्या वकिली ताफ्यात बाबासाहेबही होते. पुढे महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसच्या आझाद मैदानातील कार्यालयात त्यांच्या वारंवार भेटीगाठी होत असत. अनेकवेळा आम्ही घरी परत जातांना एकत्रित आलो आहोत. महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसचे माजी सरचिटणीस व भांडूपचे आमदार डॉ. वा. रा. शेरेकर यांच्या फियाट मोटारीतून आम्ही गप्पा मारीत आलेलो आहे. डॉ. शेरेकर यांनी बाबासाहेबांना अनेकवेळा आझाद मैदान ते नेहरूनगर अशी लिफ्ट दिलेली आहे. त्यांना सोडून पुढे आम्ही घाटकोपरला जायचो. तर सांगण्याचा मुद्दा असा की, बाबासाहेब ही काय चीज आहे हे मला चांगले ठाऊक आहे. ते वकील असल्यापासून ते महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसचे संयुक्त चिटणीस होईपर्यंत. बाबासाहेब कोर्ट संपल्यानंतर संध्याकाळी साडेपाचनंतर महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसच्या आझाद मैदानातील कार्यालयात अर्धा एक तास येऊन बसत असत. असो. हा व्यक्तिगत मैत्रीचा भाग बाबासाहेबांचे मुख्यमंत्री म्हणून मूल्यमापन करतांना येऊ न देण्याचा माझा कटाक्ष आहे. बाबासाहेबांच्या मुख्यमंत्रीपदाचा आढावा घेतांना व्यक्तिगत मैत्री, ओळख बाजूला ठेवणे अधिक उचित होईल. नाहीतर "मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले" यांचे योग्य ते मूल्यमापन होणार नाही.

सर्वच गोष्टी हसण्यावारी नेल्या

तर बाबासाहेब हे मुख्यमंत्री झाले, हे ऐकून मलाही आश्चर्य वाटले. मुळात

बाबासाहेबांना कुर्ला, नेहरूनगर मतदारसंघातून विधानसभेसाठी तिकीट मिळाले हे एक आश्चर्य आहे. त्यानंतर अगदी थोड्या फरकाने म्हणजे हजार-दीड हजार मतांनी ते निवडून आले हे दुसरे आश्चर्य. लगेच बाबासाहेब कॅबिनेट मंत्री झाले हे तिसरे आश्चर्य. आणि ते दीड वर्षात चक्क या राज्याचे मुख्यमंत्रीच झाले हा म्हणजे आश्चर्याचा धक्काच होता ! बाबासाहेबांसारखा असा पराक्रम कुणीही केला नसेल ! महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याचा मुख्यमंत्री होण्याचा मान बाबासाहेब भोसल्यांना अगदी सहजासहजी मिळाला ! अनेक धुरंधर राजकारण्यांना त्यासाठी आयुष्य वेचावे लागले, कडवा संघर्ष करावा लागला, मोठी तपस्या करावी लागली. तरीही त्यांना हा बहुमान मिळालाच नाही ! कै. बाळासाहेब देसाई मुख्यमंत्री होऊ शकले नाहीत. श्री. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले, पण त्यासाठी त्यांना कडवा संघर्ष व मोठी तपस्या करावी लागली. बाबासाहेबांना सोन्यासारखी संधी सहज चालून आली होती. पण थोडा जरी "कॉमन सेन्स" या मुख्यमंत्र्याकडे असता तर उरलेली पूर्ण टर्म (साडेतीन वर्षे) या मुख्यमंत्र्याने काढली असती, एवढा जबर वरदहस्त बाबासाहेबांना इंदिरा गांधी-राजीव गांधी यांचा लाभला होता. पण बाबासाहेबांनी सर्वच गोष्टी हसण्यावारी नेल्या. हा गृहस्थ कधीच "सिरियसली" वागला नाही. मुख्यमंत्री झाल्यावरही या सद्गृहस्थाने कुठलीही गोष्ट गंभीरपणे घेतली नाही. बाबासाहेब प्रत्येक गोष्टीत "इनोद" करीत राहिले व त्यांनी मुख्यमंत्रीपदच "इनोदी" करून टाकले ! दैवाने दिले, पण या कर्मदरिद्री माणसाने आपल्या "अचाट" कर्तृत्वाने मुख्यमंत्रीपद बदनाम केले !

अंतुल्यांची निर्मिती

बाबासाहेब भोसले यांची निवड मुख्यमंत्रीपदासाठी कोणी केली ? इंदिराजींनी केली हे उघड आहे. तथापि, अंतुले यांच्या दबावामुळे व शिफारशीमुळेच बॅ. बाबासाहेब भोसले हे मुख्यमंत्री झाले. बाबासाहेबांची राजकीय निर्मितीच मुळी अंतुलेंची आहे. विधानसभेसाठी त्यांना तिकीट मिळाले तेच अंतुलेंमुळे. नाहीतर नेहरूनगरच्या जागेवर प्रभाकर कुंटे हा प्रभावी उमेदवार दावा करीत होता. प्रभाकर कुंटे पूर्वी एकदा या मतदारसंघातून निवडून आले होते, राज्यमंत्री होते व विधानसभेच्या निवडणुकीच्यावेळी महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस होते. प्रदेशाध्यक्षा श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांच्या अतिशय विश्वासातील होते. आणि त्यावेळी बाबासाहेब हे कुणीच नव्हते. कुंटेंचे पारडे भलतेच जड होते. "आपणास तिकीट मिळणार नाही" अशी धास्ती

बाबासाहेब भोसल्यांना सतत वाटायची. अनेकवेळा फोनवरून त्यांनी आपली ही धास्ती माझ्याजवळ व्यक्त केली आहे. "काय करावे" असा त्यांचा प्रश्न असायचा. तथापि, 'आपण दिल्लीत सरचिटणीस बॅ. अंतुले यांच्यावर हा प्रश्न सोपवा" असे मी त्यांना नेहमी सांगत आलो. बाबासाहेबांनी हाच मार्ग चोखाळला. अंतुलेंशी ते सतत दिल्लीत संपर्क ठेवून होते. राज्यपातळीवर त्यांना कुणाची साथ नव्हती. बॅ. भोसल्यांचे नशीब मात्र बलवत्तर. वजनदार कुंटेऐवजी अंतुलेंमुळे त्यांना नेहरूनगरची तिकीट मिळाली. राज्यपातळीवर त्यांचे कुणी वाली नव्हते. अंतुलेंनी आपले वजन खर्ची केले नसते तर प्रभाकर कुटेच नेहरूनगरची तिकीट घेऊन गेले असते.

रामरावांना दगाफटका


बॅ. अंतुले मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी बाबासाहेबांना आपल्या मंत्रिमंडळात घेऊन त्यांना कॅबिनेट दर्जाच दिला. (तसे अंतुले व तिरपुडे हे दोस्ती निभावणारे आहेत. अंतुलेंनी बाबासाहेबांना एकदम मंत्रीच केले, तसे तिरपुडे यांनी उपमुख्यमंत्री झाल्यावर त्यांचे निष्ठावंत "पान-चेले" राम लिंगाडे यांना ते आमदार नसतांनाही राज्यमंत्री करून त्यांच्याकडे गृह हे महत्त्वाचे खाते सोपविले होते) पुढे अंतुले यांचे मुख्यमंत्रीपद जाऊन आपला वारस निवडण्याची वेळ आली तेव्हा अंतुलेंनी सर्वशक्तिनिशी बाबासाहेब भोसल्यांच्या बाजूने आपला कौल दिला. कोर्टाच्या निर्णयाचा आधार घेऊन पक्षश्रेष्ठींनी अंतुलेंना बाद केले तेव्हा आपण नाही तर आपला "प्रॉक्सी" मुख्यमंत्रीपदी आणायचा व त्याद्वारे महाराष्ट्राचा कारभार हाकायचा असा डाव अंतुले खेळले. बाबासाहेबांचा एकंदर वकूब, अक्कल हुशारी, कुवत अंतुले चांगले जाणून होते. आपण म्हणू तेव्हा खाली उतरेल, असा "डमी मुख्यमंत्री" अंतुलेंना हवा होता. व यासाठी बाबासाहेबांसारखा दुसरा "लायक" मराठा मंत्री त्यांना सापडणे कठीण होते. (यावेळी दिल्लीला "मराठा" मुख्यमंत्री हवा होता) आपले "कोर्ट-किटाळ" गेले की मुख्यमंत्री भोसले यांना खाली उतरवून त्यांना पाय उतार व्हायला लावायचे व मुख्यमंत्रीपदाच्या गद्दीवर आपण पुन्हा विराजमान व्हायचे असा अंतुलेंचा हिशोब होता. म्हणून त्यांनी "बॅबाभो" (बॅरिस्टर बाबासाहेब भोसले) यांच्या बाजूने आपले सारे वजन खर्ची केले. बिच्चारे रामराव ! रामरावांना त्यांनी दगाफटका केला ! निरीक्षकाजवळ रामरावांचे नांव सुचविण्यास अंतुलेंनीच आमदारांना सांगितले व दुसऱ्या बाजूला बाबासाहेबांची पक्षश्रेष्ठींकडे शिफारस केली. रामराव "उद्यान" बंगल्यावर मुख्यमंत्रीपदाची वाटच पहात राहिले. रामरावांनी अंतुले मुख्यमंत्री असतांना

बंड करण्याचा प्रयत्न केला होता, त्याचा सूड अंतुलेंनी यावेळी दयामाया न दाखविता उगविला ! अंतुले-रामराव यांची जिगरी मैत्री येथे पार संपुष्टात आली !

आमदारांतर्फे निरीक्षकांकडे रामरावांचे नांव सुचविण्याचा देखावा अंतुलेंनी केला. " आपण मुख्यमंत्री होणार" या गोड स्वप्नात रामराव राहिले. प्रत्यक्षात अंतुलेंनी रामरावांना " कात्रजचा घाट " दाखविला. रामरावांनी अंतुलेंच्या हातात शांतपणे आपली मान न देता मुख्यमंत्रीपदासाठी ठामपणे आपली उमेदवारी जाहीर केली असती तर इतिहास वेगळा घडला असता. महाराष्ट्र विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्ष आपल्या ताब्यात आहे असा आभास अंतुलेंनी निर्माण केला होता. रामराव तर त्यास बळी पडलेच, पण पक्षश्रेष्ठीही त्यावेळी अंतुले–सापळ्यात अडकले. पक्षश्रेष्ठींना अंतुलेंचे म्हणणे ऐकावे लागले व बाबासाहेब भोसले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. अंतुलेंचे ऐकले नाही तर महाराष्ट्र विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षात मोठी फूट पडेल, अशी भीतीयुक्त परिस्थिती अंतुले यांनी पक्षश्रेष्ठींसमोर उभी केली होती.

' तुम्हाला कोणते खाते हवे ? '

२० जानेवारी १९८२ रोजी बॅ. बाबासाहेब भोसले यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेऊन सूत्रे हाती घेतली आणि मुख्यमंत्री बॅ. भोसले यांचा अचाट कारभार सुरू झाला. आपल्या नवीन मंत्रिमंडळाच्या निर्मितीसंबंधी विचारविनिमय करण्यासाठी त्यांनी तमाम इं. काँ. आमदारांच्या "सह्याद्री"वर भेटीगाठी सुरू केल्या. अनेक अधिक परिचयाच्या आमदारांना त्यांनी अगदी बाजूला हात धरून नेले, त्यांच्याशी कानगोष्टी केल्या. एवढेच नव्हे तर त्या आमदारास 'तुला कुठले खाते हवे' अशी विचारणा केली. त्यामुळे त्या आमदाराचे व या कानगोष्टीचे दृश्य पाहणाऱ्यांचेही हा आमदार आता नक्कीच मंत्री झाला असे मत बनले. आणि जेव्हा मंत्रिमंडळाची यादी जाहीर झाली तेव्हा बाबासाहेबांचा फुगा फुटला. बाबासाहेबांनी आपणास 'कोणते खाते हवे असे बाजूला नेऊन विचारले' असे सांगणारे किमान डझनभर तरी आमदार मला भेटले आहेत. बाबासाहेबांनी आपले मित्र दुखविण्यात येथून सुरूवात केली. तुम्ही एखाद्याला फसवू शकाल, सर्वांना नाही ! फसविले गेलेले सर्वच मित्र जेव्हा एकत्र आले तेव्हा ते भोसल्यांचे कट्टर शत्रू बनले ! बाबासाहेबांना मुख्यमंत्रीपदावरून हुसकावून लावण्यासाठी पुढे जी शेवटची लढाई झाली तेव्हा बाबासाहेबांचे हे एकेकाळचे मित्रच अत्यंत कडवटपणे लढले !



बाबासाहेबांची "वानरसेना"

बाबासाहेबांनी आपल्या मंत्रिमंडळाची निवड केली ती त्यांना साजेशीच! अनुभवी, जुन्या तसेच लायक लोकांना त्यांनी पद्धतशीर डावलले. आपल्यापेक्षा कुणी "वरचढ" होणार नाही ना अशी भीती त्यांना सारखी होती. जुन्या अनुभवी तसेच तडफदार लोकांना घेण्याचे त्यांनी कटाक्षाने टाळले. आत्मविश्वास नसलेली माणसे नेहमी अशीच वागतात. पुढे बाबासाहेबांच्या पोरकट "वानरसेने"ची विधानसभेत-विधान परिषदेत कशी त्रेधातिरपीट उडाली हे सर्वांना ठाऊकच आहे. खुद्द बाबासाहेबही सभागृहात असले तरी सारा "विनोद"च व्हायचा. श्रीकांत जिचकारवर बाबासाहेबांचा खास लोभ होता. अर्थ, गृह, प्रसिद्धी आदी महत्त्वाची खाती या अतिविद्वान, पोरकट पोराकडे बाबासाहेबांनी देऊन ठेवली होती. बाबासाहेबांना या पोराचे एवढे प्रेम का होते हे माहीत नाही. पण कुठलीही गोष्ट गंभीरपणे घ्यायची नाही असला खाक्या असलेल्या मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखालील या 'मिनी-चीफ मिनिस्टरने"ही कुठलीही गोष्ट गंभीरपणे घेतली नाही. विधानसभेतील गृहमंत्र्याचा प्रत्येक शब्द महत्त्वाचा असतो. त्याचा परिणाम बाहेर पोलीस खात्यावर होतो, राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेवर होत असतो. एकेकाळी श्री. बाळासाहेब देसाई, श्री. पी. के. सावंत, श्री. शरद पवार यांच्यासारख्यांकडे गृहखाते होते. या खात्याचा एक दरारा होता. तो जिचकारनी आपल्या पोरकटपणाने पार धुळीस मिळविला. जिचकार अनेक डिग्रीवाला व म्हणून विद्वान अशा अनेकांच्या समजुती होत्या. जिचकार विद्वान असेलही, असे विद्वान खंडीभर आहेत. त्यांनी प्राध्यापकी करावी. पोपटपंची करणाऱ्या व अवांतर भाषणबाजी करणाऱ्या पुस्तकी पंडितांची एखाद्या विद्यापीठाला आवश्यकता असू शकेल, पण मंत्रीपदासाठी असले विद्वान निरूपयोगी ठरतात. जिचकारचे तसेच झाले. आपण काय बोलतो आहोत, या प्रश्नाची व्यावहारिक बाजू काय आहे, याची जाणीव या "कौटिल्य प्रेमी" विद्वानाने ठेवली नाही. दूरदर्शन संचावरील कर या विद्वानाच्या डोक्यातूनच निघाला व कौटल्याने करमणूक कराचे समर्थन केलेले आहे असा युक्तिवाद या विद्वान जिचकारनी केला होता. मुद्याला उत्तर न देता उगाच वारेमाप अवांतर बोलत रहायचे काम जिचकार विधासभेत करायचे. बाबासाहेबांचे दुसरे विश्वासू म्हणजे उद्योग राज्यमंत्री एस्. एन्. देसाई. पुढे पुढे तर बाबासाहेब एस्. एन्.च्या पूर्ण आहारी गेले होते. एस्. एन्. बाबासाहेबांची पाठच सोडत नसत. माणिकराव भांबळे नांवाचे एक राज्यमंत्री भोसल्यांच्या मंत्रिमंडळात होते. बाबासाहेबांच्या ते विश्वासातील

होते. हे भांबळे नेहमी भांबावलेले असत. विधानसभेत त्यांचा उडणारा गोंधळ केविलवाणा असायचा !

बेफाम मुक्ताफळे

खुद्द बाबासाहेबांबद्दल बोलायचे म्हणजे मुख्यमंत्री झाल्यावर आपण किती मोठे आहोत याचा साक्षात्कार त्यांना होऊ लागला. एकेक अफाट किस्से ते सुनावू लागले. बेफाम मुक्ताफळे त्यांच्या तोंडून बाहेर पडू लागली. मुख्यमंत्री असल्याने त्यांच्या एकेका वक्तव्याला मोठी प्रसिद्धी मिळू लागल्याने बाबासाहेब आणखीनच चेकाळले. त्यावेळी मुंबईतील गिरणी कामगारांचा संप सुरू होता. या संपाचा तेरावा दिवस होता. तेव्हा "संपाचे तेरावे घालू" अशी अचाट कोटी या मुख्यमंत्र्याने केली. यशवंतराव, वसंतदादावरही ते घसरले. वसंतदादांना त्यांनी "वधूवर सूचक मंडळ" काढण्याचा सल्ला दिला. दादांना त्यांनी "लंबक" काय म्हटले ! यशवंतरावांनी आपणास राजकीय दृष्टचा पुढे येऊ दिले नाही, याचा साक्षात्कारही त्यांना झाला.

बाबासाहेबांना तसे विनोदाचे अंग आहे. पण त्यात आचरटपणाच अधिक आहे. (प्राचार्य शिवाजीराव भोसले हे बाबासाहेबांचे बंधू होत. एक विद्वान वक्ता म्हणून उभ्या महाराष्ट्राला ते माहित आहेत) मुख्यमंत्री झाल्यावर त्यांच्या विनोदी वक्तव्याला प्रसिद्धी मिळू लागल्याने आपण "विनोदाचार्य" आहोत, असा साक्षात्कार बाबासाहेबांना झाला. "तमाशा प्रधान विनोद" हा मुख्यमंत्री जागोजागी करीत सुटला. बाबासाहेबांचा कुठलाही विनोद शेवटी स्त्रीवर येऊन ठेपायचा ! पत्रकारांसमोर त्यांनी हे चाळे केले आहेत. शालिनीताईही यातून सुटल्या नाहीत. स्त्रीपत्रकारांनाही बाबासाहेबांनी सोडले नाही. "आपली पाळी गेल्यावर सत्ता हाती आली," हा विनोद तर त्यांनी कैक वेळा सुनावला आहे !

बाबासाहेबांचा "घुमजाव"

अंतुलेकृपेने बाबासाहेब मुख्यमंत्री झाले होते. बाबासाहेबांतर्फे अंतुलेंना राज्य आपल्या ताब्यात ठेवायचे होते. अंतुले डाव यशस्वीपणे खेळले होते. पण दिल्लीश्रेष्ठी इंदिराजी या काही कच्च्या गुरूच्या चेल्या नव्हत्या. अंतुलेंचा डाव उलटविण्यासाठी प्रतिडाव त्यांनी आधीच तयार ठेवला होता. अंतुलेंचा माणूस मुख्यमंत्री म्हणून स्वीकारला तरी त्याच माणसाला अंतुलेंवर उलटावयाचे हा त्यांचा प्रतिडाव होता.

बाबासाहेब मुख्यमंत्री झाल्यावर १५ दिवस अंतुले–छत्राखाली होते. अंतुले व आपण एकच आहोत असे ते जाहीरपणे सांगत असत. पण दिल्लीहून कळ फिरली व बाबासाहेबांनी ही भाषा बंद केली. काही दिवस ते अंतुलेंचे नांव घेत नसत. पण नंतर तर त्यांनी अंतुलेंवर टीकाही सुरू केली. बाबासाहेबांनी " घुमजाव " केला. अंतुलेंचा डाव पुन्हा एकदा दिल्लीने हाणून पाडला !

अंतुल्यांच्या कारवाया सुरू झाल्या

बाबासाहेबांनी आपले मुख्यमंत्रीपद टिकविण्यासाठी अंतुलेंशी " फारकत " घेतली, तशा अंतुलेंच्या बाबासाहेबांविरुद्ध कारवाया सुरू झाल्या. अंतुलेंचे बाबासाहेबांच्या मंत्रिमंडळात पाच मंत्री होतेच. रवींद्र राऊत, वकार मोमीन, प्रा. असीर, सुरूपसिंग नाईक व एस्. एन्. देसाई हे ते पाच मंत्री. यापैकी मोमीन, असीर, राऊत हे अंतुलेंच्या बाजूने अधिक सक्रिय होते.

मार्चमध्ये विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आले होते व बाबासाहेब भोसले मंत्रिमंडळात प्रथमच विधिमंडळाला सामोरे जाणार होते. अशावेळी भोसले मंत्रिमंडळाविरुद्ध जोरदार अफवा सुरू झाल्या. "हे कमजोर मंत्रिमंडळ विधानसभेला तोंड देऊ शकणार नाही," "अधिवेशन पुढे ढकलले जाणार" वगैरे अफवांचे पीकच आले.

'ना धड घोडा, ना धड गाढव'

या सर्व प्रकारांमुळे अननुभवी बाबासाहेब भांबावले. मी व आमदार डॉ. शेरेकर त्यांना "वर्षा"वर भेटलो तेव्हा बाबासाहेब हादरलेले दिसले. अंतुलेंविरुद्ध बरेच काही बोलले. तथापि, दिल्लीचा भक्कम पाठिंबा त्यांना असल्याचे दिसून आले. 'अंतुले जेवढे जेवढे तुमच्याविरुद्ध कारवाया करतील, तेवढे त्यांचे नुकसान होईल' असे इंदिराजींनी त्यांना सांगितले होते. दरम्यान, काही मित्रांच्या सल्ल्यावरून बाबासाहेबांनी विधानसभेत तोंड देण्यासाठी आपल्या बाजूने अधिकाधिक आमदार जमविण्यास सुरूवात केली होती. त्यासाठी विविध महामंडळाचे अध्यक्ष–उपाध्यक्ष, संचालक म्हणून आमदारांची नियुक्ती करण्यास त्यांनी प्रारंभ केला. अखेर अर्थसंकल्पीय अधिवेशन पुढे न ढकलता वेळेवर सुरू झाले व त्या मानाने फारशी गडबड न होता पार पडले. सत्तारूढ पक्षातूनच काही प्रमाणात गडबड झाली. आमदार श्रीमती विजया जांबुवंतराव धोटे यांनी भोसले मंत्रिमंडळाच्या अर्थसंकल्पावर कडाडून हल्ला चढविला. डॉ. सुब्रम्हण्यम् हे दक्षिण भारतीय निवृत्त

आय्. ए. एस्. सचिव हे त्यावेळी अर्थमंत्री होते. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात दक्षिण भारतीय घेण्याची प्रथा बाबासाहेबांनी प्रथम पाडली. त्याचे असे झाले, अर्थसंकल्पीय अधिवेशन जवळ आले होते. या विषयातला जाणकार कुणी नव्हता. डॉ. सुब्रम्हण्यम् पूर्वी या खात्याचे सचिव होते. डोक्यावरचे ओझे कमी करण्यासाठी बाबासाहेबांनी त्यांना अर्थमंत्री करून टाकले. पूर्वाश्रमीचे सनदी नोकर असलेल्या डॉ. सुब्रम्हण्यम् यांनी हा अर्थसंकल्प मांडला होता. हा अर्थसंकल्प "धड घोडाही नाही, धड गाढवही नाही" अशी टीका श्रीमती विजया धोटे यांनी विधानसभेत केली व या अर्थसंकल्पाला "श्रद्धांजली"ही अर्पण केली. इतरही काही सत्तारूढ सदस्यांनी अर्थसंकल्पावर हल्ला चढविला. तथापि, हे अधिवेशन कसे तरी निभावले. बाबासाहेबांनी सुटकेचा निश्वास सोडला !

शरद पवारांनी फायदा उठविला

दरम्यान, अंतुले गटाच्या कारवाया सुरूच होत्या. त्यातच राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुका आल्या. आणि यावेळी काहीतरी गडबड होणार अशा वावडया होत्याच. बाबासाहेबांना धडा शिकविण्याची संधी इंदिरा काँग्रेसमधील असंतुष्ट गट शोधत होताच. यानिमित्ताने ही संधी चालून आली होती इंदिरा काँग्रेसमधील या असंतोषाचा फायदा शरद पवार यांच्यासारख्या अतिशय धूर्त राजकारण्याने घेतला नसता तरच नवल ! त्यांनी आपल्या पक्षाचे युवक काँग्रेसचे सुरेश कलमाडी यांना विरोधी पक्षातर्फे उभे केले. खरे म्हणजे विरोधी पक्षाचा उमेदवार निवडून येईल अशी परिस्थिती नव्हती. पण शरद पवारांनी फोडाफोडी करून सुरेश कलमाडींना निवडून आणले. (इंदिरा काँग्रेसच्या इतर जागा आल्या, पण इंदिरा काँग्रेस पुरस्कृत उमेदवार श्री. बानी देशपांडे यांचा पराभव झाला) इंदिरा काँग्रेसची सात–आठ मते यावेळी फुटली ! मुख्यमंत्री भोसले यांना हा पहिला हादरा होता !

सचिवांचे राज्य

राज्यसभेच्या निवडणुकीच्या वेळी विधिमंडळ इंदिरा काँग्रेसमधील व्यक्त झालेला असंतोष पुढे वाढतच गेला. दरम्यान, भोसले मंत्रिमंडळ अकार्यक्षमतेमुळे बदनाम होतच होते. कुठल्याही प्रश्नावर निर्णय न घेणे हे या मंत्रिमंडळाचे वैशिष्टच होते. या परिस्थितीचा फायदा नोकरशाही घेत होती. सचिवालयात (मंत्रालय नव्हेच !) सचिवांचेच राज्य होते. मंत्री हे टिंगलटवाळीचा विषय

बनले होते व त्यातच हे मंत्रिमडळ आज जाणार की उद्या जाणार अशा सतत अफवा होत्याच.

गटबाजीला ऊत

मध्यंतरी, विधान परिषदेच्या निवडणुका आल्या. विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षातील गटबाजीला ऊत आला. बाबासाहेबांविरुद्ध अंतुले गटच नव्हे, तर दादा, यशवंतराव, धोटे-आदिक आदी सर्वच गट विरोधात गेले होते. विधान परिषदेच्या निवडणुकीत विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षात मोठ्या प्रमाणात फाटाफूट होणार, अशा बातम्या सर्वच वृत्तपत्रात झळकल्या होत्या. मुख्यमंत्री भोसले यांनी "आपल्या वागण्या"मुळे व "शब्द न पाळण्याच्या कले"मुळे सर्वांनाच दुखवून ठेवले होते. सर्वांना घेऊन चालण्याची कुवतच त्यांच्यात नव्हती. त्यातच मुख्यमंत्रीपद त्यांच्या डोक्यात चढले होते. "आपण मुख्यमंत्री आहोत" याचा अहंकार त्यांना झाला होता. मतभेद मिटविण्याऐवजी ते कसे वाढतील, असेच त्यांचे वागणे असे. आपण या राज्याचे प्रमुख आहोत व हे राज्य आपल्याला चालवायचे आहे, याची जाणीव व इच्छाच त्यांच्याजवळ नव्हती. त्यांनी शिवसेनेची मैत्री गमाविली. रा. सु. गवई यांचा रिपब्लिकन पक्ष इंदिरा काँग्रेसपासून दूर गेला ! बाबासाहेबांविरुद्ध एवढे रान पेटले तरी बाबासाहेबांचे म्हणणे एकच– 'मला दिल्लीचा पाठिंबा आहे, तोपर्यंत मी मुख्यमंत्री राहीन. मला आमदारांचा पाठिंबा मिळविणे, गटबाजी करणे काही करायचे नाही. माझे मुख्यमंत्रीपद गेले तर गेले, माझे माजी मुख्यमंत्री-पद तर कुणी हिरावून घेणार नाही !' अर्थात, आपले मुख्यमंत्रीपद गेलेले कुणाला आवडेल ? कुठलीही गोष्ट गंभीरपणे घ्यायची नाही, याचा बाबासाहेबांचे हे वक्तव्य म्हणजे एक उत्तम नमुना आहे. ते सदैव विनोदच करायचे ! बाबासाहेब अनेक वेळा उलटसुलटही बोलत असत ! (एकदा त्यांना "वर्षा"वर भेटायला गेलो, तेव्हा ते आपणहून भारतातील मुस्लीमांच्या समस्येवर बोलत होते) बाबा-साहेबांनी गटबाजीचे राजकारण केले नाही अथवा मुख्यमंत्रीपद टिकावे म्हणून धडपड केली नाही, असे समजण्याचे काही कारण नाही. बाबासाहेबांचे मुख्यमंत्री-पद जायची वेळ आली तेव्हा "अंबर" गेस्ट हाऊसवर केंद्रीय निरीक्षकांसमोर श्रीकांत जिचकार, एस् एन्. देसाई, टी. जी. देशमुख, भांबळे यांनी केलेली केविलवाणी धडपड सगळ्यांनी पाहिलेली आहे. दिल्लीचा पाठिंबा असल्याशिवाय कोणताही मुख्यमंत्री राज्य करू शकत नाही, हे उघड गुपित आहे. पण एखाद्या नाकर्त्या मुख्यमंत्र्याला दिल्लीने तरी किती वाचवावे ? केवळ दिल्लीचा पाठिंबा आहे म्हणून काहीच करायचे नाही, उलट सर्वांनाच दुखवत राहायचे अशी

नकारात्मक भूमिका घेणाऱ्या व्यक्तीला दिल्लीतरी किती दिवस पाठीशी घालील ? बाबासाहेबांच्या बाबतीत हेच झाले. "सहा महिनेही मुख्यमंत्री टिकला नाही," अशी अस्थिरतेची भावना निर्माण होऊ नये व "अंतुले-कारवायांमुळे मुख्यमंत्र्याला जावे लागले" असे वाटू नये यासाठीच पक्षश्रेष्ठी बाबासाहेबांच्या बाजूने खंबीरपणे उभे राहिले. नाहीतर साताऱ्याचे हे बॅरिस्टर केव्हाच "माजी मुख्यमंत्री" हा किताब घेऊन घरी बसले असते !

प्रीति–भोजने

तर विधान परिषदेच्या अकरा जागांसाठी होणारी निवडणूक महाराष्ट्राच्या राजकारणाच्या दृष्टीने फारच चुरशीची ठरणार होती. विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्ष गटबाजीने पार पोखरला होता. मुख्यमंत्र्याचे या पक्षावर मुळीच नियंत्रण उरले नव्हते. "प्रीति–भोजनां"ना ऊत आला होता. सचिवालय जिमखाना व सी. सी. आय्. येथे परस्पर विरोधी गटांनी आमदारांसाठी "भोजन प्रबंध" केला होता. या निमित्ताने किती आमदार जमतात याची चाचपणी सुरू होती. यावेळी काही गमतीही झाल्या. अनेक आमदार मुख्यमंत्र्यांच्या तसेच मुख्यमंत्र्यांविरुद्धच्या जेवणासही हजर राहिले. हे आमदार वडे व्यवहारी होते. या सगळ्या साठमारीचे चमचमीत रिपोर्ट "बढा-चढाके" वृत्तपत्रांत येत होते. लोकांची करमणूक होत होती, तसेच या प्रीति-भोजनांच्या उधळपट्टीवर टीकाही झाली. मुख्यमंत्र्यांनीही ही निवडणूक प्रतिष्ठेची (विनाकारण) केली. नऊही जागी (सत्तारूढ पक्षाला अकरापैकी नऊ जागा मिळणार होत्या, तर दोन जागा विरोधी पक्षाला जाणार होत्या) "आपले" उमेदवार असावेत असा मुख्यमंत्र्यांचा आग्रही प्रयत्न होता. सर्वसाधारण परिस्थितीत तो योग्यच होता. पण यावेळची परिस्थितीच अभूतपूर्ण होती. मुख्यमंत्र्यांविरुद्ध पक्षांतर्गत कमालीची बंडाळी माजली होती. एकूण परिस्थिती मुख्यमंत्र्यांच्या संपूर्णपणे हातावाहेर गेली होती. मुख्यमंत्री भोसले आपली यादी घेऊन दिल्लीला गेले. पक्षश्रेष्ठींनी एकूण परिस्थितीचा अदमास घेऊन असंतुष्टांचे एक नेते श्री. रामराव आदिक यांनाही दिल्लीला बोलावून घेतले. केंद्रीय मंत्री व इंदिराजींचे विश्वासू श्री. प्रणबकुमार मुखर्जी यांनी तिकीट वाटपात महत्त्वाची भूमिका बजावली. आणि उमेदवारीअर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सकाळी उमेदवारांची नांवे जाहीर करण्यात आली. आश्चर्य म्हणजे यात मुख्यमंत्री भोसले यांनी सुचविलेले एकही नांव नव्हते ! यापूर्वी असे कधी घडले नाही. सर्व गटांना प्रतिनिधीत्व देण्याचे धोरण पक्षश्रेष्ठींनी अंगिकारले. तथापि, अंतुले गटाला प्रतिनिधीत्व मिळाले नाही.

या खेचाखेचीत लहान गटही मोठा वाटा घेऊन गेले. काकी, वसंतराव साठे, सरोज खापर्डे यांची माणसे तिकीट घेऊन गेलीत. काकींचे भास्कर शिंदे व सरोज खापर्डे यांची कांताबेन राव या "हाताखाल"च्या लोकांना तिकिटे मिळाल्याबद्दल त्यावेळी बरेच बोलले गेले. बाजीराव शिंदे व अब्दुल रझाक या दोघाही मराठवाड्यातील उमेदवारांना रामराव आदिकांमुळे तिकिटे मिळालीत. हेच बाजीराव पुढे राम- रावांच्या आशीर्वादाने राज्यमंत्रीही झाले. विविध गटांना तिकिटे देण्यात बंडखोरांना शांत करण्याचा उद्देश पक्षश्रेष्ठींचा होता हे उघड आहे.

रा. सु. गवईंचा हादरा

"बाबासाहेबांनी शब्द फिरविला" म्हणून इकडे विधान परिषदेचे माजी सभापती व रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष श्री. रा. सु. गवई यांनी शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज भरून निवडणूक रिंगणात उडी घेतली. त्यांच्या सोबतीस समाजवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्री. शरद पवार हे उतरले. गवईंनी उमेदवारी जाहीर करून व सोबत मुख्यमंत्र्यांवर विश्वासघाताचा आरोप करणारे एक पत्रक काढून धमाल उडवून दिली. आधीच्या असंतोषाच्या वातावरणात गवईंच्या उमेदवारीने तेल ओतले गेले. 'आपणास राज्यसभेवर जाण्याची इच्छा होती, पण त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी विधान परिषदेसाठी शब्द दिल्याने आपण थांबलो. आता मुख्यमंत्र्यांनी शब्द फिरविल्याने आत्मसन्मानासाठी आपण ही निवडणूक लढवित आहोत,' असे श्री. गवई यांचे म्हणणे होते. इंदिरा काँग्रेसमधील विविध गटांना तिकीट-वाटप केले असले तरी अंतुले-धोटे हे गट नाराज होतेच. असंतुष्टांना शांत करण्याचा पक्षश्रेष्ठींचा उद्देश काही सफल झाला नाही ! इंदिरा काँग्रेसमधील या धगधगत्या असंतोषाचा लाभ उठविण्याचा चंग गवई-पवार या मुरब्बी जोडीने बांधला. गवई-पवार हे प्रचारासाठी "आमदार निवासा"त तळ ठोकून बसले. मुख्यमंत्री भोसले हेही "वर्षा" सोडून आमदार-निवासात पायउतार झाले. रामराव आदिक हेही पक्षश्रेष्ठींच्या सांगण्यावरून भोसल्यांच्या मदतीला "आमदार निवासा"त धावले. अशा तऱ्हेने दोन राहुटचा (कँप) पडल्याने आपोआपच मोठी चुरस निर्माण झाली. विरोधी पक्षांनी आपल्या ताकदीवर दोन उमेदवार तर उभे केले होतेच, पण इंदिरा काँग्रेसमधील मते फोडून गवईंना विजयी करण्याचा चंग शरदराव पवार यांनी बांधला होता. विरोधी पक्षांतर्फे एक जागा शेकापला तर दुसरी भाजपला देण्यात आली होती. "गवई येणार की पडणार" यावर पैजा लागल्या. 'इंदिरा काँग्रेसची मते फुटणार नाहीत व गवई-पवार यांचे मनसुबे धुळीस मिळतील,' असे बाबासाहेब भोसले सांगत होते. प्रत्यक्षात निवडणुकीचे

निकाल लागले, तेव्हा मुख्यमंत्री भोसले यांना जबर हादरा बसला. रा. सु. गवईना २० मते पडून ते विजयी झाले व इंदिरा काँग्रेसचे उमेदवार श्री. रझाक हे पराभूत झाले. इतर जागा इंदिरा काँग्रेसला मिळाल्या. पण उमेदवारांना अपेक्षेपेक्षा कमीच मते मिळाली. एन्. एम्. कांबळे, बाबुराव काळे आदी निवडून आले. अपक्ष उमेदवार माजी आमदार श्री. कृष्णराव मुंढे यांना आठ मते पडली. इंदिरा काँग्रेसची ही मते होती. सर्व तऱ्हेची खबरदारी घेऊनही इंदिरा काँग्रेसची मते मोठ्या प्रमाणावर फुटली. किमान ३० ते ३२ मते यावेळी फुटली होती ! मुख्यमंत्र्यांविरुद्धचा इंदिरा काँग्रेसमधील असंतोष यावेळी अगदी स्पष्ट झाला. तरीही पक्षश्रेष्ठी बाबासाहेबांच्या मागे उभे राहिले. त्यामुळे बाबासाहेबांचे आसन वाचले, पण ते एकसारखे डळमळत होते. पुढे रामभाऊ म्हाळगी वारल्यामुळे ठाणे लोकसभा मतदारसंघात चुरशीची पोटनिवडणूक झाली. ही निवडणूक जिंकण्यासाठी मुख्यमंत्री बाबासाहेबांनी खूप प्रयत्न केले. अनेक प्रचारसभा घेतल्या. पण इंदिरा काँग्रेसचे उमेदवार श्री. प्रभाकर हेगडे यांचा अखेर पराभव झाला. श्री. हेगडे यांची पराजित होण्याची ही "हॅट ट्रिक" होती.

"जिवंत गोळचा" पोटात घेतल्या !

सतत बसणाऱ्या पराभवांच्या धक्क्यांमुळे बाबासाहेबांचे आसन पार खिळखिळे झाले. या परिस्थितीचा फायदा त्यांचे पक्षांतर्गत विरोधक मोठ्या प्रमाणावर उठवित होते. बाबासाहेबांविरुद्धच्या असंतुष्टांच्या हालचाली यावेळी फारच वाढल्या होत्या. बाबासाहेबांच्या कारकीर्दीला धड एक वर्षही पूर्ण झाले नव्हते. अशावेळी मुख्यमंत्री बदलणे पक्षश्रेष्ठींना परवडणारे नव्हते. त्यांनी बाबासाहेबांनाच ताकीद देण्याचे ठरविले. विधान परिषदेच्या निवडणुकीच्यावेळी विविध गटांना प्रतिनिधीत्व देण्याचा "फॉर्म्युला" पक्षश्रेष्ठींनी पुन्हा वापरला ! १९७८च्या "निष्ठावंत" बंडखोरांचे नेतृत्व करणारे रामराव आदिक, दादांच्या पत्नी शालिनीताई पाटील, प्रतिभा पाटील आदी जुन्या–जाणत्या मंडळींचा समावेश पक्षश्रेष्ठींनी बाबासाहेबांना मंत्रिमंडळात करावयास लावला. रामराव, शालिनीताई यांना मंत्रिमंडळात घेण्यास बाबासाहेब मुळीच तयार नव्हते. ' रामराव व शालिनीताई यांना मंत्रिमंडळात घेणे म्हणजे पोटात बंदुकीच्या जिवंत गोळचा घेण्यासारखे आहे' असे बाबासाहेबांचे म्हणणे होते. पण पक्षश्रेष्ठींना बाबासाहेबांच्या मंत्रिमंडळाचा पाया अधिक मजबूत करायचा होता. बाबासाहेबांनी रामराव, ताई यांना घेण्यास विरोध करून पाहिले, पण अखेर त्यांना या दोन्ही "जिवंत गोळचा"पोटात घ्याव्याच लागल्या ! या दोघांना मंत्रिमंडळात घेण्यापेक्षा आपण राजीनामा देऊ असे आधी ते बोलत होते.

पण कणा नसलेल्या मुख्यमंत्र्याचे हे काम नव्हे !

रामराव – शालिनीताईंची लाचारी

बंडखोरांचे नेतृत्व करणाऱ्या रामराव – ताईंनी बाबासाहेबांच्या मंत्रिमंडळात जावे, हे त्यांच्या अनुयायांना मुळीच आवडले नाही. 'या दोघांनी फक्त आपली सोय बघितली,' अशी कडवट प्रतिक्रिया अनुयायी–आमदारांनी यावेळी व्यक्त केली. 'पक्षश्रेष्ठींच्या सल्ल्यावरून आपण बाबासाहेबांच्या मंत्रिमंडळात गेलो, असे या दोघांचेही म्हणणे. रामराव–ताई मंत्रिमंडळात राहून व काही लोक बाहेर राहून मुख्यमंत्री भोसल्यांविरुद्ध लढा देतील, असेही सांगितले जात होते. डावपेचाचा भाग काय असेल ते असो, पण या दोघांनी बाबासाहेब भोसल्यांच्या मंत्रिमंडळात जाऊन स्वतःचे हसे मात्र करून घेतले एवढे निश्चित ! जे बाबासाहेब, ताई व रामराव यांच्याबद्दल वाट्टेल ते बोलत त्यांच्या मंत्रिमंडळात यांनी मंत्रीपद स्वीकारावे ही लाचारीच होती. पक्षश्रेष्ठींना या दोघांना नम्र नकार देता आला असता ! रामरावांबद्दल तर बाबासाहेब खाजगीत भयंकरच बोलत. रामरावांचा उल्लेख ते "रामू", "राम्या" असा करीत. रामरावांच्या दृष्टीने बाबासाहेब हा एक "मूर्ख माणूस" आहे ! अशा दोन ध्रूवावर असणाऱ्या व्यक्तींनी एकत्र न येणे हेच चांगले झाले असते. या दोघात पूर्वीपासूनच व्यावसायीक चुरस होती. दोघेही वकिली पेशातले. रामरावांनी वकिली पेशात नांव कमाविले. तर बाबासाहेबांची प्रॅक्टीस बेताचीच. वकील म्हणून त्यांचे नांव फारसे कुणाला माहीत नव्हते. उलट रामरावांच्या वकिली गोटात ते वावरत असत. 'आपण "इन्कम टॅक्स" भरला नाही, अशी आपली प्रॅक्टीस होती', असे बाबासाहेबांनीच मुख्यमंत्री झाल्यावर अनेक वेळा जाहीरपणे "प्रौढीने" सांगितले आहे. वकिली व्यवसायात रामरावांपेक्षा खूपच मागे असलेल्या बाबासाहेबांना मुख्यमंत्रीपदाची "लॉटरी" लागली, तेव्हा त्यांचा अहंकार फुलला. रामरावांवर आपण मात केली असे त्यांना वाटू लागले. पण त्यांनी ते दाखवायला नको होते. पण एखाद्याच्या स्वभावाला औषध नसते. रामराव-बाबासाहेबांमधील व्यावसायीक चुरशीची पूर्वपीठिका ही अशी आहे !

तरुण आमदार खवळले

रामराव–शालिनीताई आदींच्या मंत्रिमंडळातील समावेशामुळे बंडखोरांच्या कारवाया थांबतील, हा पक्षश्रेष्ठींचा अंदाज खोटा ठरला. उलट रामराव–शालिनीताई यांनी मंत्रीपद स्वीकारल्याने बंडखोर तरुण आमदार आणखीनच

खवळले. महाराष्ट्राच्या हितासाठी "अकार्यक्षम मुख्यमंत्री बदला" अशी बंडखोरांची मागणी होती. आणि त्याच मुख्यमंत्र्याच्या मंत्रिमंडळात बंडखोराचे नेतृत्व करणारे रामराव–ताई गेल्याने तोच मुख्यमंत्री कार्यक्षम ठरत नाही, हे बंडखोरांना दाखवायचे होते. "अकार्यक्षम मुख्यमंत्र्याविरुद्ध"चा आपला लढा या मंडळींनी जारीच ठेवला होता. अशोक पाटील, भाऊराव पाटील, सूर्यकांता पाटील, राम पडांगळे, सतीश चतुर्वेदी आदी तरुण आमदारांचा याकामी पुढाकार होता.

नागपूरला हातघाईची लढाई

दरम्यान, नागपूरचे हिवाळी अधिवेशन आले. आणि अधिवेशन म्हटले की राजकीय हालचालींना नेहमीच वेग येतो. यावेळी सर्व आमदार एकत्र येत असतात. त्यातही नागपूरचे अधिवेशन नेहमीच गाजत आले आहे. नागपूर अधिवेशनाच्या वेळी बंडखोर आमदारांनी आपल्या हालचाली अधिक तीव्र केल्या. बाबासाहेब भोसल्यांविरुद्ध सह्यांची मोहीम काढण्याची योजना आखण्यात आली. नागपूर अधिवेशनातच बाबासाहेबांना उखडण्याचे मनसुबे रचले गेले. बाबासाहेबांना याची कुणकुण लागली असावी. विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाची बैठक बोलाविण्यात यावी, अशी मागणी बंडखोर करीत होते. मुंबईतील गिरणी कामगारांचा प्रश्न आदी महाराष्ट्राच्या महत्वाच्या प्रश्नांवर आम्हाला चर्चा करायची आहे, असे त्यांचे म्हणणे होते. पण बाबासाहेब बैठक बोलविण्यासच तयार नव्हते. ही बैठक घ्यावी म्हणून बंडखोरांकडून सतत दबाव वाढत होता. अखेर एक दिवस बाबासाहेबांनी घाईगर्दीने विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाची बैठक बोलाविली. विधानसभेचे काजकाज संध्याकाळी उरकताच त्यांनी या बैठकीला प्रारंभ केला. विधान परिषदेचे कामकाज संपायचेच होते. त्या आधीच बैठकीला सुरूवात झाली. काही आमदारांनी यास आक्षेप घेतला. तथापि, बैठक पुढे रेटण्यात आली. या बैठकीच्या कार्यक्रम पत्रिकेवर खास कोणताही विषय नव्हता. घाईगर्दीने मुख्यमंत्र्यावर विश्वासदर्शक प्रस्ताव मंजूर करून घेण्याची योजना असल्याची कुणकुण भोसले विरोधकांना लागली होती. आणि तेही हे होऊ द्यायचे नाही या पक्क्या निर्धाराने आले होते. एकूण बैठकीचे वातावरण पाहून विश्वासदर्शक प्रस्ताव रेटायचा नाही असा शहाणपणाचा विचार बाबासाहेबांचे विश्वासू नागपूरचे श्री. टी. जी. देशमुख आदींनी केला असावा. माजी शिक्षणमंत्री कै. शरदचंद्रिका पाटील यांना श्रध्दांजली वाहण्याचा ठराव बैठकीत मांडण्यात आला. आणि अवघ्या पाचदहा मिनिटात बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले. मुख्यमंत्री बाबासाहेब बैठकीतून निघण्याच्या तयारीत होते. इतक्यात तरुण बंडखोर आमदारांनी आमचे

काही राज्याचे महत्त्वाचे प्रश्न आहेत असे सांगून त्यावर बैठकीत चर्चा झाली पाहिजे, अशी मागणी केली. तेव्हा मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले पुढे सरसावले. ते काहीतरी मार्गदर्शन करणार इतक्यात बाबासाहेबांच्या नेहरूनगरमध्येच रहाणारे माजी राज्यमंत्री व आमदार प्रेमानंद आवळे 'अरे, तू काय आम्हाला मार्गदर्शन करणार, असे शिवीगाळ करत मुख्यमंत्र्यांच्या अंगावर चाल करून पुढे जाऊ लागले. वरळीचे आमदार भाऊराव पाटील यांनी आवळ्यांना साथ दिली. सूर्यकांता पाटील, राम पंडागळे, सतीश चतुर्वेदी, अशोक पाटील हेही उभे राहिले. प्रतापराव भोसले, भाई सावंत हेदेखील उभे राहून राज्याच्या प्रश्नांवर चर्चा झालीच पाहिजे असे ोरजोरात सांगत होते. बैठकीत एकच गोंधळ माजला. इतक्यात मुख्यमंत्री भोसले यांचे "लेफ्टनंट" टी. जी. देशमुख उद्‌गारले 'साले, अंतुलेंचे भडवे, दारूचे दुकानांच्या पैशावर माजले ..... "

आणि आगीत तेल ओतले गेले. भाऊराव पाटील व टी. जी. त जुंपली. तू तू, मी मी झाले. बैठकीत "राडा"च झाला !

" साला, भाग गया...."

मुख्यमंत्री भोसले बैठकीतून अक्षरशः पळतच बाहेर गेले. या पळापळीत ते चपलाही विसरले. सिक्युरिटी पोलिसांनी त्यांना या गदारोळात कसेबसे मोटारीपर्यंत पोचविले. त्यांच्यामागे मालाडचे आमदार राम पंडागळे जिण्यावरून धावत खाली शिव्या देतच आले. 'साला भाग गया, भाग गया ...' असे ते ओरडत होते. पण तोपर्यंत मुख्यमंत्री मोटारीत बसून निघून गेले होते. हा सारा प्रकार शेकडो लोकांनी पाहिला. मुख्यमंत्र्यांचे एवढे धिंडवडे कधी निघाले नसतील. अभूतपूर्व असाच हा प्रसंग घडला ! हे जे "सहा वीर" लढले त्यांना मुख्यमंत्र्यांवरील विश्वासदर्शक प्रस्ताव मंजूर होऊ द्यायचा नव्हता. त्यांनी बैठकच उधळून लावली. हे सहाही वीर अंतुलेंचे कट्टर समर्थक होते. यावरून भोसले–अंतुले संबंध किती ताणले गेले होते याची कल्पना येते. भोसल्यांना हटविण्याची अंतुलेंना आता फारच घाई झाली होती. या सहाही लढाऊ विरांना मुख्यमंत्री भोसले यांनी गैरवर्तनाबद्दल विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षातून नंतर निलंबित केले !

भोसले हटाव मोहीम

एकूण नागपूरात रणधुमाळी पेटली. बंडखोरीने वेगळेच वळण घेतले होते. भोसले हटाव मोहिमेचे एक सूत्रधार व वसंतदादांचे विश्वासू खासदार बाळासाहेब पवार हे नागपूरात येऊन दाखल झाले. भोसले हटाव मोहिमेने संघटित स्वरूप

धारण केले. दादा, धोटे, अंतुले, यशवंतराव, आदिक आदी सर्वच गटाचे आमदार "भोसले हटाव" या प्रश्नावर एकत्र आले. "मुख्यमंत्री कोण होणार हे नंतर ठरवू, पण आधी भोसले यांना हटवा" इतकी कडवट भावना त्यांच्यात बाबासाहेबांनी निर्माण केली होती. या सर्वच गटाच्या आमदारांनी एकत्र येऊन बाबासाहेबांविरुद्ध सह्यांची मोहिमच काढली. आमदार प्रतापराव भोसले, आमदार नानाभाऊ एंबडवार, आमदार सुशीलकुमार शिंदे, खासदार बाळासाहेब पवार, आमदार भाऊराव पाटील हे या मोहिमेत आघाडीवर होते. त्यावर कुठल्याही गटात नसणाऱ्या, पण संख्येने मोठ्या असणाऱ्या अनेक आमदारांनीही सह्या केल्या. कारण या आमदारांना खोटी आश्वासने देऊन बाबासाहेबांनी बनविले होते. अनेकांना मंत्री करतो असे सांगून "टोपी घातली होती." शे-सव्वाशे आमदारांच्या सह्या भोसल्यांविरुद्ध गोळा झाल्या. पक्षश्रेष्ठींनाही या गोष्टीची अखेर दखल घ्यावी लागली. नाहीतर विधानसभेत मुख्यमंत्री भोसले यांच्यविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याची योजना आखली गेली होती. विरोधी पक्ष अविश्वासाचा ठराव आणणार होते व इंदिरा काँग्रेसचे बंडखोर आमदार तो मंजूर कसा होईल हे पहाणार होते. त्या दृष्टीने काही डावपेच आखण्यात आलेही होते. परंतु या स्तरापर्यंत गोष्टी गेल्या नाहीत. अधिवेशन संपल्यानंतर मुंबईत निरीक्षक पाठविण्याचे निश्चित आश्वासन बंडखोरांना पक्षश्रेष्ठींनी दिले. बंडखोरांचे नेते खासदार बाळासाहेब पवार यांनी हे आश्वासन मिळविले. याकामी दादा गटाच्या दिल्लीतील खासदारांची पवारांना मोठी मदत झाली.

'भाषा बंडाची, वृत्ती गुंडाची....'

मध्यंतरी बंडखोर आमदारांबद्दल " भाषा बंडाची, वृत्ती गुंडाची व कृती षंढाची " हे काव्य बाबासाहेब भोसले प्रसवले आणि स्वपक्षाच्याच आमदारांनी विधानसभेत त्यांना फैलावर घेतले. नानाभाऊ एंबडवार यांनी मुख्यमंत्र्याच्या या बदनामीकारक काव्य-पंक्तीबद्दल त्यांच्याविरुद्ध हक्कभंगाचा प्रस्ताव आणला. इं. काँ.च्या ३०-३५ सदस्यांनी त्यास पाठिंबा दिला. सुशीलकुमार शिंदे यांनी या प्रस्तावास अनुमोदन दिले. यावेळी नानाभाऊंनी केलेले भाषण बाबासाहेबांवर घणाघाती हल्ला चढविणारे होते. स्वपक्षाच्या आमदारांनी आपल्याच मुख्यमंत्र्यांविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव आणण्याचा अनोखा प्रसंगही बाबासाहेबांच्या कारकीर्दीतच घडला. नागपूर अधिवेशन ठरलेल्या वेळापत्रकापेक्षा एक आठवडा आधीच उरकले.

अखेर बाबासाहेबांचा राजीनामा

पुन्हा " रंगमंच" मुंबईला आला. पक्षश्रेष्ठींनी आश्वासन दिल्याप्रमाणे

परिस्थितीची पाहणी करण्यासाठी श्री. बुटासिंग व श्री. पी. शिवशंकर हे केंद्रीय मंत्री निरीक्षक म्हणून मुंबईत दाखल झाले. राज्याच्या नेतृत्वात बदल करण्याचा प्रश्न तूर्त त्यांच्यासमोर नव्हता. एकूण परिस्थितीची वस्तुनिष्ठ पाहणी त्यांना करायची होती. "अंबर गेस्ट" हाऊसवर हे दोघे निरीक्षक उतरले होते. ज्या लोकांना त्यांना भेटावयाचे होते वा निवेदन द्यावयाचे होते त्याचा त्यांनी स्वीकार केला. अनेक आमदार त्यांना भेटले. 'राज्याच्या नेतृत्वात बदल हवा काय? हवा असेल तर का? आणि नेतेपदासाठी आपण कुणाचे नांव सुचविता' असे प्रश्न या निरीक्षकांनी आमदारांना विचारले व ती माहिती लिहून घेतली. "भोसले हटाव" मोहिमेतर्फे या निरीक्षकांना सुमारे ११० आमदारांच्या सह्यांचे निवेदनच सादर करण्यात आले. बंडखोर आमदारांच्या दोन बसगाड्या भरूनच "अंबर"–वर गेल्या होत्या. सर्व गटाचे आमदार त्यात होते. वसंतदादा, अंतुले, यशवंतराव, धोटे, आदिक हे सर्वच गट बाबासाहेबांविरुद्ध एकवटले होते. खासदार बाळासाहेब पवार व खासदार जांबुवंतराव धोटे यांनी या आमदारांचे नेतृत्व केले. तेव्हाच बाबासाहेब भोसले यांचे भवितव्य निश्चित झाले! हे निरीक्षक दिल्लीला गेल्यावर त्यांनी योग्य तोच अहवाल सादर केला. महाराष्ट्रात नेतृत्व-बदल आवश्यकच झाला होता. ११० आमदार उघड उघड विरुद्ध गेल्यावर त्या मुख्यमंत्र्याला वाचविण्याचा आत्मघातकीपणा पक्षश्रेष्ठी कसे करतील? नाहीतर पक्षाचाच घात झाला असता. अखेर बाबासाहेब भोसले यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. आणि ३१ जानेवारी १९८३ ही तारीख नव्या नेत्याच्या निवडीसाठी जाहीर झाली....

असा मुख्यमंत्री होणे नाही

या बाबासाहेबांसारखा मुख्यमंत्री होणे नाही. महाराष्ट्रात तीनशे वर्षानंतर "भोसला राज" अवतरले हे खरे. (बाबासाहेबांनी स्वत:ची करून घेतलेली ही जाहीरात आहे) पण कुठे तो भोसला व कुठे हा भोसला. कहा राजा भोज और कहा गंग्या तेली?

बाबासाहेब भोसले एकदम मुख्यमंत्री झाल्याने प्रत्येक आमदारास "आपण काय कमी आहोत" असे वाटू लागले व प्रत्येक आमदार मुख्यमंत्रीपदाचीच स्वप्ने पाहू लागला .....

टीप : या बाबासाहेबांच्या काळातच महाराष्ट्रात "पोलीस बंड" झाले. (१८ ऑगस्ट १९८२) मुंबई शहर दोन दिवस पोलिसाविना होते. अनेक समाज-

धारण केले. दादा, धोटे, अंतुले, यशवंतराव, आदिक आदी सर्वच गटाचे आमदार "भोसले हटाव" या प्रश्नावर एकत्र आले. "मुख्यमंत्री कोण होणार हे नंतर ठरवू, पण आधी भोसले यांना हटवा" इतकी कडवट भावना त्यांच्यात बाबासाहेबांनी निर्माण केली होती. या सर्वच गटाच्या आमदारांनी एकत्र येऊन बाबासाहेबांविरुद्ध सह्यांची मोहिमच काढली. आमदार प्रतापराव भोसले, आमदार नानाभाऊ एंबडवार, आमदार सुशीलकुमार शिंदे, खासदार बाळासाहेब पवार, आमदार भाऊराव पाटील हे या मोहिमेत आघाडीवर होते. त्यावर कुठल्याही गटात नसणाऱ्या, पण संख्येने मोठ्या असणाऱ्या अनेक आमदारांनीही सह्या केल्या. कारण या आमदारांना खोटी आश्वासने देऊन बाबासाहेबांनी बनविले होते. अनेकांना मंत्री करतो असे सांगून "टोपी घातली होती." शे-सव्वाशे आमदारांच्या सह्या भोसल्यांविरुद्ध गोळा झाल्या. पक्षश्रेष्ठींनाही या गोष्टीची अखेर दखल घ्यावी लागली. नाहीतर विधानसभेत मुख्यमंत्री भोसले यांच्यविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याची योजना आखली गेली होती. विरोधी पक्ष अविश्वासाचा ठराव आणणार होते व इंदिरा काँग्रेसचे बंडखोर आमदार तो मंजूर कसा होईल हे पहाणार होते. त्या दृष्टीने काही डावपेच आखण्यात आलेही होते. परंतु या स्तरापर्यंत गोष्टी गेल्या नाहीत. अधिवेशन संपल्यानंतर मुंबईत निरीक्षक पाठविण्याचे निश्चित आश्वासन बंडखोरांना पक्षश्रेष्ठींनी दिले. बंडखोरांचे नेते खासदार बाळासाहेब पवार यांनी हे आश्वासन मिळविले. याकामी दादा गटाच्या दिल्लीतील खासदारांची पवारांना मोठी मदत झाली.

'भाषा बंडाची, वृत्ती गुंडाची....'

मध्यंतरी बंडखोर आमदारांबद्दल "भाषा बंडाची, वृत्ती गुंडाची व कृती षंढाची" हे काव्य बाबासाहेब भोसले प्रसवले आणि स्वपक्षाच्याच आमदारांनी विधानसभेत त्यांना फैलावर घेतले. नानाभाऊ एंबडवार यांनी मुख्यमंत्र्याच्या या बदनामीकारक काव्य-पंक्तीबद्दल त्यांच्याविरुद्ध हक्कभंगाचा प्रस्ताव आणला. इं. काँ.च्या ३०-३५ सदस्यांनी त्यास पाठिंबा दिला. सुशीलकुमार शिंदे यांनी या प्रस्तावास अनुमोदन दिले. यावेळी नानाभाऊंनी केलेले भाषण बाबासाहेबांवर घणाघाती हल्ला चढविणारे होते. स्वपक्षाच्या आमदारांनी आपल्याच मुख्यमंत्र्यांविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव आणण्याचा अनोखा प्रसंगही बाबासाहेबांच्या कारकीर्दीतच घडला. नागपूर अधिवेशन ठरलेल्या वेळापत्रकापेक्षा एक आठवडा आधीच उरकले.

अखेर बाबासाहेबांचा राजीनामा

पुन्हा "रंगमंच" मुंबईला आला. पक्षश्रेष्ठींनी आश्वासन दिल्याप्रमाणे

परिस्थितीची पाहणी करण्यासाठी श्री. बुटासिंग व श्री. पी. शिवशंकर हे केंद्रीय मंत्री निरीक्षक म्हणून मुंबईत दाखल झाले. राज्याच्या नेतृत्वात बदल करण्याचा प्रश्न तूर्त त्यांच्यासमोर नव्हता. एकूण परिस्थितीची वस्तुनिष्ठ पाहणी त्यांना करायची होती. "अंबर गेस्ट" हाऊसवर हे दोघे निरीक्षक उतरले होते. ज्या लोकांना त्यांना भेटावयाचे होते वा निवेदन द्यावयाचे होते त्याचा त्यांनी स्वीकार केला. अनेक आमदार त्यांना भेटले. 'राज्याच्या नेतृत्वात बदल हवा काय? हवा असेल तर का? आणि नेतेपदासाठी आपण कुणाचे नांव सुचविता' असे प्रश्न या निरीक्षकांनी आमदारांना विचारले व ती माहिती लिहून घेतली. "भोसले हटाव" मोहिमेतर्फे या निरीक्षकांना सुमारे ११० आमदारांच्या सह्यांचे निवेदनच सादर करण्यात आले. बंडखोर आमदारांच्या दोन बसगाड्या भरूनच "अंबर"-वर गेल्या होत्या. सर्व गटाचे आमदार त्यात होते. वसंतदादा, अंतुले, यशवंतराव, धोटे, आदिक हे सर्वच गट बाबासाहेबांविरुद्ध एकवटले होते. खासदार बाळासाहेब पवार व खासदार जांबुवंतराव धोटे यांनी या आमदारांचे नेतृत्व केले. तेव्हाच बाबासाहेब भोसले यांचे भवितव्य निश्चित झाले! हे निरीक्षक दिल्लीला गेल्यावर त्यांनी योग्य तोच अहवाल सादर केला. महाराष्ट्रात नेतृत्व-बदल आवश्यकच झाला होता. ११० आमदार उघड उघड विरुद्ध गेल्यावर त्या मुख्यमंत्र्याला वाचविण्याचा आत्मघातकीपणा पक्षश्रेष्ठी कसे करतील? नाहीतर पक्षाचाच घात झाला असता. अखेर बाबासाहेब भोसले यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. आणि ३१ जानेवारी १९८३ ही तारीख नव्या नेत्याच्या निवडीसाठी जाहीर झाली....

असा मुख्यमंत्री होणे नाही

या बाबासाहेबांसारखा मुख्यमंत्री होणे नाही. महाराष्ट्रात तीनशे वर्षानंतर "भोसला राज" अवतरले हे खरे. (बाबासाहेबांनी स्वतःची करून घेतलेली ही जाहीरात आहे) पण कुठे तो भोसला व कुठे हा भोसला. कहा राजा भोज और कहा गंग्या तेली?

बाबासाहेब भोसले एकदम मुख्यमंत्री झाल्याने प्रत्येक आमदारास "आपण काय कमी आहोत" असे वाटू लागले व प्रत्येक आमदार मुख्यमंत्रीपदाचीच स्वप्ने पाहू लागला .....

टीप : या बाबासाहेबांच्या काळातच महाराष्ट्रात "पोलीस बंड" झाले. (१८ ऑगस्ट १९८२) मुंबई शहर दोन दिवस पोलिसाविना होते. अनेक समाज-

कंटकांनी या परिस्थितीचा फायदा घेतला. यावेळी माजी मंत्री वसंतराव होशिंग, आमदार भाई भोसले व आमदार भाऊराव पाटील यांची घरे लुटली गेली. या मंडळींच्या कुटुंबियांवर ओढवलेले प्रसंग अंगावर शहारे आणणारे आहेत. पोलीसच नसल्यामुळे गुंडांना रान मोकळे मिळाले होते. अखेर लष्कराला पाचारण करण्यात आले. या काळात मुंबईतील कायदा व सुव्यवस्था एवढी ढासळली होती की खुद्द मुख्यमंत्री बाबासाहेबांना विमान तळावरून हेलिकॉप्टरने "वर्षा"वर जावे लागले. आणि आश्चर्य म्हणजे ज्या सरकारी कारवाईतून हे बंड झाले, त्या कारवाईची व बंडाची कल्पना मुख्यमंत्री भोसले यांना नव्हती. मुंबई पोलिसी बंडाने पेटली तेव्हा बाबासाहेब दिल्लीत होते. मॅडमना (इंदिराजींना) सकाळी भेटण्यास ते " पी. एम्. हाऊस"वर गेले तेव्हा पंतप्रधानाच्या एका पी. ए. ने "मुंबई पेटली असल्याची माहिती दिली व आधी मुंबईला पळा" असे सांगितले. त्यावेळी मुंबईला येण्यास विमान नव्हते. तेव्हा "बॉर्डर सिक्युरिटी फोर्स"च्या विमानाने त्यांना मुंबईत धाडण्यात आले. मुंबई जळत होती, तेव्हा बाबासाहेब दिल्लीत होते..... गृहराज्यमंत्री श्रीकांत जिचकार हे "बंड" हाताळीत होते. बाबासाहेबांवर दादरच्या बालमोहन हायस्कूलमधील एका समारंभात ते गाडीत बसत असतांना एका तरुणाने पिस्तुलातून गोळी झाडल्याचे प्रकरणही या जिचकारांनीच हाताळले. या प्रकरणाचे पुढे काय झाले हे एका जिचकारांनाच माहीत ... ...

५] आणि शहाण्या व्यवहारी माणसाचे राज्य आले



श्री. वसंतदादा पाटील

३१ जानेवारी १९८३ रोजी मुंबई राजधानीत अतिशय महत्त्वाच्या राजकीय हालचाली घडत होत्या. महाराष्ट्राचा नवीन मुख्यमंत्री कोण? याचा निर्णय लागणार होता. वसंतदादा, अंतुले व रामराव आदिक यांच्यापैकी कोण मुख्यमंत्री होणार याबाबत सर्वत्र चर्चा होती. वृत्तपत्रात उलटसुलट बातम्या होत्या. अखेर मुख्यमंत्रीपदासाठी निवडणूक होऊन रात्री १ वाजता मुख्यमंत्रीपदी वसंतदादा पाटील यांची निवड झाल्याचे जाहीर करण्यांत आले. वसंतदादांच्या चाहत्यांनी विधान भवनात व भवनाबाहेर झिंदाबादच्या घोषणा देऊन आसमंत दुमदुमून टाकला. बाहेर फटाक्यांची आतषबाजी झाली. बाबासाहेबांनंतर महाराष्ट्रात "शहाण्या व्यवहारी" माणसाचे राज्य सुरू झाले. (श्री. यशवंतराव चव्हाण यांनी अशी प्रतिक्रिया व्यक्त केली)

केंद्रीय निरीक्षक बुटासिंग व पी. शिवशंकर यांनी दिल्लीत श्रेष्ठींकडे आपला अहवाल सादर केल्यावर महाराष्ट्राच्या नेतृत्वात बदल करण्याचे पक्षश्रेष्ठींनी निश्चित केले व दिल्लीत नव्या मुख्यमंत्र्याचा शोध सुरू झाला. एव्हाना

महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू दिल्लीत गेला होता. असंख्य आमदार दिल्लीत मुक्काम ठोकून होते. "महाराष्ट्र सदन"मध्ये तर जागा नव्हती. महाराष्ट्र सदनमधील खोल्या इंदिरा काँग्रेसचे आमदार व कार्यकर्त्यांनी खच्चून भरल्या होत्या. संभाव्य मुख्यमंत्री आपला असावा म्हणून आमदार–खासदार धावपळ करीत होते. अनेक आमदार व खासदार पक्षश्रेष्ठींच्या भेटीगाठी घेऊन आपल्या उमेदवारासाठी "लॉबींग" करीत होते.

शंकरराव चव्हाणांचे नांव पुढे आले

दिल्लीच्या राजकीय वर्तुळात प्रामुख्याने तीन नांवे होती. शंकरराव चव्हाण, रामराव आदिक व वसंतदादा पाटील. पक्षश्रेष्ठींसमोर प्रथम शंकरराव व रामराव अशी दोनच नांवे होती. बाबासाहेब भोसल्यांनी महाराष्ट्रात निर्माण केलेला गोंधळ, बजबजपुरी निस्तरणारी व्यक्ती कोण या दृष्टीने एकेका नांवाचा विचार होत होता. पक्षश्रेष्ठींनी सगळ्यात प्रथम शंकररावांच्या नांवाचा विचार केला. श्री. राजीव गांधी यांनी शंकररावांची भेट घेतली. त्यानंतर शंकरराव राजीवना त्यांच्या कार्यालयात जाऊन भेटले. सुमारे चाळीस मिनिटे दोघात चर्चा झाली. महाराष्ट्रात विघडलेली प्रशासकीय घडी ठीक करण्यासाठी शंकररावांसारखा उत्तम प्रशासक पाठविणेच योग्य होईल, असे राजीव आदींचे मत होते. त्या दृष्टीनेच ही चर्चा झाली, अशी माहिती एका विश्वासू माहितगाराने दिली. तथापि' शंकररावांनी महाराष्ट्रात परत जाण्यास आपली असमर्थता व्यक्त केली. बाबा-साहेबांनी केलेला "मेस" आपण दूर करू, पण बहुसंख्य आमदार आपणास माहीत नसल्याने राज्य करणे आपणास अवघड जाईल अशी भीती शंकररावांना होती व ती त्यांनी बोलून दाखविली. शंकररावांची ही धास्ती रास्तच होती. शंकरराव महाराष्ट्रात आले असते तर आमदार तर त्यांच्या परिचयाचे नव्हते हे खरेच, याशिवाय दादा–अंतुले या प्रबळ गटांनी त्यांना राज्य करणे कठीण करून परत दिल्लीस जाण्यास भाग पाडले असते. वसंतदादा व शंकररावांचा तर विचित्र पाठलाग चालला आहे.

शंकरराव व दादा यांचे मुळीच जमत नाही. १९७५ मध्ये शंकरराव महा-राष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आणि नंतर त्यांनी वसंतदादांना आपल्या मंत्रिमंडळातून काढून टाकले. "आणीबाणी"चा तो काळ होता. दादांनी हा अपमान सहन केला. त्यांनी " राजसंन्यास"च घेतला. १९७७ मध्ये आणीबाणी उठून लोकसभेच्या निवडणुका झाल्या. आणि काँग्रेसचा दारूण पराभव होऊन केंद्रात जनता पक्षाचे

राज्य आले. दरम्यान काँग्रेसची सूत्रे इंदिरा गांधींकडून यशवंतरावांकडे आली होती. वसंतदादांनी (यशवंतरावांच्या प्रेरणेने) "आपले घर पेटले" असे सांगून "राजसंन्यास सोडला" (वसंतराव नाईक यांचे हे मत होते) व शंकररावांना मुख्यमंत्रीपदावरून अगदी वाईट परिस्थितीत हुसकावून लावले. वसंतदादा मुख्यमंत्री झाले. शंकररावांनी "महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस" काढून विरोधी पक्षात बसणे पसंत केले. १९७८ मध्ये विधानसभेच्या निवडणुका होऊन दादा पुन्हा मुख्यमंत्री झाले. पण साडेतीन महिन्यांतच शरद पवारांनी दादांचे सरकार पाडले व विरोधी पक्षांचे "पुरोगामी लोकशाही दल" स्थापन करून राज्यात "पुलोद"चे सरकार सत्तारूढ झाले. आश्चर्य म्हणजे दादांच्या विरोधात शंकररावांनी शरदरावांशी हातमिळवणी केली. एके काळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविणाऱ्या शंकररावांनी शरद पवारांच्या नेतृत्वाखाली मंत्री होणेही पसंत केले. पुढे "पुलोद"चे राज्य गेले व इंदिरा गांधींच्या इंदिरा काँगेसची लाट येताच शंकरराव पुन्हा इंदिरा गांधींना येऊन मिळाले. दादाही इंदिरा गांधींकडे आले. शंकररावांना वसंतदादांविरुद्धच राजकारण पुढेही करायचे होते. तर दादांना यशवंतरावांचा सूड उगवायचा होता. तो त्यांनी लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी उगवला. पश्चिम महाराष्ट्र दादांनी काबीज केला. दादा खासदार झाले, पण बरेच वर्षे खासदारच राहिले. शंकरराव केंद्रात मंत्री झाले. दादांना पुन्हा मुख्यमंत्री व्हायचे होते. पण ते स्वप्न साकार होत नव्हते. पुन्हा वसंतदादा–यशवंतराव "कृष्णे"काठी एकत्र आले. दोघांनाही आपली चूक उमगली होती. दादा–यशवंतराव या बलाढ्य युतीमुळे शंकररावांचा पुन्हा महाराष्ट्रात येण्याचा मार्ग अवघड झाला.

रामराव आदिकांच्या नांवाचाही विचार

तर महाराष्ट्रात येण्यास शंकरराव तयार नसल्यामुळे त्यांचे नांव मग मागे पडले. नंतर रामरावांच्या नांवाचा विचार पक्षश्रेष्ठींनी केला. रामराव १९७८च्या निष्ठावंतांपैकी होते. पण त्यांच्या "काही आवडीनिवडींबद्दल बराच बोलवा असल्याचे" संबंधित विरोधकांनी पक्षश्रेष्ठींच्या लक्षात आणून दिले. रामरावांसाठी त्यांचे बंधू गोविंदराव आदिक, प्रभा राव, दादासाहेब रूपवते आदी मंडळी दिल्लीत बरीच लॉबींग करीत होती. अखेर "कमजोर उमेदवार" म्हणून रामरावांचे नांवही मागे पडले. त्यानंतर वसंतदादा पाटील यांच्या नांवाचा विचार झाला. दादांसाठी त्यांचे खासदार पद्धतशीर लॉबींग करीत होते. दिल्लीत दादागटाचे तीस तरी खासदार होते. दिल्लीतील इंदिरा काँग्रेसच्या महत्त्वाच्या नेत्यांना भेटून सध्याच्या परिस्थितीतून महाराष्ट्राला दादाच वाचवू शकतात

हे त्यांच्या मनावर ते ठसवित होते. दादा हे देखील स्वतः खासदार व अ. भा. इंदिरा काँग्रेस समितीचे सरचिटणीस होते. त्यामुळे त्यांचा दिल्लीतील महत्त्वाच्या इंदिरा काँग्रेस नेत्यांशी संबंध आला होता. दादांनी आपल्या गोड स्वभावामुळे जी "गुडवील" निर्माण केली होती त्याचाही त्यांना फायदा मिळाला.

वसंतदादांचे नांव निश्चित झाले

महाराष्ट्रात शरद पवारांचे वाढते आव्हान लक्षात घेऊन त्यास तोंड देणारी व्यक्ती कोण याचा विचार प्रामुख्याने पक्षश्रेष्ठी करीत होते. तसेच अंतुलेंचे आव्हानही नवीन मुख्यमंत्र्याला स्वीकारावे लागेल हाही प्रश्न त्यांच्यासमोर होता. महाराष्ट्रात पवार–अंतुले या दोघांचेही आव्हान स्वीकारणारा नेता म्हणून दादांचे नांव "ओ. के." करण्यात आले. या दोन्ही आव्हानांची जाणीव दादांना देण्यात आली व त्यांच्याकडून "ओ. के." मिळताच दादांच्या नांवाचा निर्णय दिल्लीत पक्का झाला. यात अतिशय महत्त्वाचा "रोल" राजीव गांधी यांचा आहे !

मुख्यमंत्रीपदासाठी दादांचे नांव नक्की झाल्याचे वृत दिल्लीत मराठी लॉबीत पसरले. दादांना राजीव गांधींचा पाठिंबा आहे हे पण लपून राहिले नाही. त्यामुळे दादा गटाच्या आमदारात आनंदाचे वातावरण पसरले. दादा गटाचे जे आमदार "महाराष्ट्र सदना"त भेटले ते "दादांचे काम झाल्याचे" खात्रीपूर्वक सांगत होते. खुद्द वसंतदादाही आमदारांना आपल्या घरी भेटत होते. आमदारांशी त्यांच्या भेटीगाठी जोरात सुरू होत्या. त्यावेळी त्यांना जे आमदार भेटले त्यांचेही हेच इंप्रेशन झाले. " दादांचे काम झाले असल्याने आता त्यांच्या नांवाला पाठिंबा देऊन टाका" असे दादा गटाचे आमदार इतर आसदारांना उघडपणे दिल्लीत सांगत होते.

रामरावांचा दावा

दिल्लीत या घडामोडी चालल्या होत्या. इकडे मुंबईत रामराव आदिक मुख्यमंत्रीपदावर हक्क सांगत होते व 'वेळ पडल्यास आपण निवडणूक लढवू' असेही त्यांनी जाहीर केले. दिल्लीत दादांचे नांव निश्चित झाल्याचे पसरताच रामरावांचे दिल्लीत बसलेले म्होरके आमदार हादरले. दरम्यान, आणखीन एक घटना घडली. 'रामराव आदिकांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्यास कबुली दिली' असे दादांचे लोक दिल्लीत सांगत होते. त्यामुळे रामरावांचे दिल्लीत मुक्काम ठोकून बसलेले सूत्रधार आणखीनच चक्रावले. त्यांनी दिल्लीहून रामरावांना

मुंबईतील "उद्यान" बंगल्यावर फोन लावला. तेव्हा 'आपण असे काहीही कबूल केले नसल्याचे व मुख्यमंत्रीपदाची निवडणूक आपण लढविणार असल्याचे' रामरावांनी स्पष्ट केले.

बिनधास्त वसंतदादा

दादांचे नांव पक्षश्रेष्ठींनी तसे "ओ. के." केले असले तरी दादांची निवड एकमताने, निवडणूक न होता व्हावी असे दादा गटाच्या लोकांना वाटत होते, म्हणून रामरावांशी ही मंडळी संपर्क साधून होती. रामरावांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे असे त्यांचे म्हणणे होते. खुद्द वसंतदादांचीच ही "ऑफर" होती. पण रामरावांनी शेवटपर्यंत ऐकले नाही. या सगळ्या प्रकारात ३१ जानेवारी उजाडली. पुन्हा रंगमंच मुंबईला आला. दिल्लीत मुक्काम केलेले सगळे पुढारी, आमदार, खासदार मुंबईला धावले. वसंतदादा ३० जानेवारीला रात्री मुंबईला आले. मुख्यमंत्रीपदाचा हा उमेदवार अगदी बिनधास्त होता. वसंतदादांची पावले अगदी खात्रीपूर्वक पडत होती. आपण मुख्यमंत्री होणार या आत्मविश्वासाने ते वागत होते. दादांनी स्वत:साठी फारसे कॅनव्हॉसिंग केलेच नाही. निवडणुकीच्या आदल्या रात्री ते मुंबईत आले यावरून काय ते समजा.

केंद्रीय निरीक्षक बुटासिंग-शिवशंकर हेही नेतानिवडीसाठी मुंबईत येऊन दाखल झाले. पेडर रोडवरील पेट्रोलियम विभागाच्या "गेस्ट हाऊस"वर त्यांचा मुक्काम होता. सकाळी या दोघांची अनेक आमदारांनी भेट घेतली. "तुम्हाला हवे ते नांव तुम्ही सुचवा" असे हे निरीक्षक आमदारांना सांगत होते.

दादा–रामराव भेट

रामरावांच्या "उद्यान" बंगल्यावरही जोरदार राजकीय हालचाली चालल्या होत्या. कुठलीही तडजोड न स्वीकारता मुख्यमंत्रीपदाची निवडणूक लढवायचीच असा रामरावांचा निर्धार दिसला. रामरावांनी माघार घ्यावी म्हणून दादा गटाने खूप प्रयत्न केले, पण रामराव माघार घेण्याच्या मूडमध्येच नव्हते. खुद्द दादांनी रामरावांशी फोनवरून संपर्क साधून "सगळे काही दिल्लीत ठरले आहे" असे सांगून रामरावांना निवडणुकीतून परावृत्त होण्याचे आवाहन केले. या संदर्भात दादा–आदिक यांची आमदार ओ. पी. बहल यांच्या कफ परेड येथील निवासस्थानी दुपारी भेटही झाली, असे विश्वसनीयरीत्या सांगण्यात आले. पण रामराव अटल राहिले ! दुपारी काही आमदार रामरावांना भेटले. मीही रामरावांना भेटलो. तेव्हा 'निवडणूक लढविण्याचा आपला निर्धार' रामरावांनी ठामपणे व्यक्त केला.

यावेळचा "रामराव" काही औरच होता !

बॅ. अंतुलेही रिंगणात उतरले

दरम्यान, आणखी एक महत्त्वपूर्ण घटना घडली. माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर्. अंतुले यांनी निवडणूक रिंगणात ऐन आयत्यावेळी उडी घेतली. मुख्यमंत्री-पदाची निवडणूक आपण लढविणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. आणि अंतुले यांनी भराभर हालचाली सुरू केल्या. आमदार निवासात अंतुले आले व त्यांनी आमदारांच्या भेटीगाठी सुरू केल्या. आमदार निवासात अंतुले यांच्या लोकांनी दोन खोल्या आधीच राखून ठेवल्या होत्या. निवडणुकीत भलताच रंग भरला. अंतुलेंभोवती भराभर माणसे जमतात, किंबहुना त्यांनी हे तंत्र आत्मसात केले आहे. आमदार निवासातही हेच दृष्य दिसले. माणसांच्या घोळक्यात तरातरा अंतुले चालत होते व "झिंदाबाद"च्या घोषणा सुरू होत्या.

दर्डांच्या निवासस्थानी हालचाली

अंतुलेंनी निवडणुकीत उडी घेतल्याने सगळी परिस्थितीच पालटली. विशेषत: "जुन्या निष्ठावंतां"च्या गटात खळबळ माजली. आदिक–अंतुले हे दोघेही रिंगणात असल्याने "निष्ठावंत" आमदारांत फूट पडून त्याचा फायदा दादांना मिळणार म्हणून निष्ठावंत मंडळी बेचैन झाली. बऱ्याच निष्ठावंतांची आदिक की अंतुले अशी द्विधा अवस्था झाली. निष्ठावंत आमदारांपैकी काही क्रियाशील व जाणते आमदार निष्ठावंतांची मते फुटू नयेत म्हणून धावपळ करू लागले. या आमदारांचे केंद्र श्री. जवाहरलाल दर्डा यांचे "लिली कोर्ट" हे होते. आमदार निवासाच्या बाजूलाच दर्डांचा हा फ्लॅट असल्याने दर्डांच्या घरी अंतुले व आदिक यांच्यात दिलजमाई व्हावी म्हणून काही "कॉमन मित्रां"नी खूप प्रयत्न केले. प्रत्यक्ष भेटून वा फोनवरून या आमदारांची मध्यस्थी चालली होती. पण कुणीच ऐकायला तयार नव्हते. या धावपळीत नानाभाऊ एंबडवार, जवाहरलाल दर्डा, असीर, बी. जे. खताळ-पाटील हे आमदार होते. खासदार जांबुवंतराव धोटे हे देखील दर्डांच्या घरी तळ ठोकून होते. अंतुलेंनी आपल्यासाठी माघार घ्यावी असे आदिकांना वाटत होते व तसा निरोप घेऊन त्यांच्या कन्या आमदार विजयाताई धोटे या अंतुले यांना आमदार निवासात येऊन भेटल्या. विजयाताईंनी अंतुलेंना माघार घेण्याची विनवणी केली. पण त्यांनी त्यास ठाम नकार दिला. 'रामरावांबद्दल आपल्या मनात काही नाही, पण आपणास आमदारांचा अधिक पाठिंबा आहे,' असे अंतुले यांनी विजयाताईंना सांगितले. या सर्व धावपळीत दुपारचे तीन होत

आले व आता काही शक्य नाही असा विचार करून "लिली कोर्ट" वरील निष्ठावंत आमदार मंडळी पांगली. विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाची बैठक दुपारी ३ वाजता "विधान भवना"त सुरू होणार होती.

संतप्त अंतुले

मध्यंतरी आणखी एक कलाटणी देणारी घटना घडली. अंतुलेंनी नेतेपदाची निवडणूक लढविण्याची नाटचपूर्ण घोषणा करताच निरीक्षक बुटासिंग यांनी अंतुलेंना बोलावून घेऊन 'आपणास निवडणूक लढविण्याची परवानगी मॅडमनी (इंदिरा गांधी) दिलेली नाही' असे सांगितले. आपला सगळाच डाव उलटविण्याचा हा बेत आहे हे लक्षात येताच अंतुले रागाने लालबुंद झाले. 'मॅडमनी आपणास तसे सांगितलेले नाही (नुकत्याच झालेल्या दिल्ली भेटीत) व आपण ही निवडणूक लढविणारच' असे अंतुले बुटासिंगना ठणकाऊन आले.

इकडे "विधान भवना"त आमदार मंडळी जमा होऊ लागली. आमदारांबरोबर बरेच कार्यकर्तेही होते. महाराष्ट्राचा नवीन मुख्यमंत्री कोण हे निश्चित होणार असल्यामुळे या बैठकीबद्दल सर्वांना कमालीची उत्सुकता लागलेली होती. विधान भवनात कडक पोलीस बंदोबस्त होता. दुपारी ३ वाजता सुरू होणारी बैठक चार-साडेचारला सुरू झाली. निरीक्षकद्वय बुटासिंग–शिवशंकर बैठकस्थानी आले. आणि या बैठकीत पहिलीच ठिणगी पडली.

'क्या करोगे, कतलही तो करोगे . . . .'

'विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षातून निलंबित केलेल्या सहा आमदारांना बैठकीत बसता येणार नाही,' असा आक्षेप विधानकार्यमंत्री श्री. नरेंद्र तिडके यांनी यावेळी घेतला. अर्थात, मुख्यमंत्री श्री. बाबासाहेब भोसले यांच्या सांगण्यावरूनच त्यांनी हे केले होते, हे उघड आहे. भाऊराव पाटील, प्रेमानंद आवळे, सतीश चतुर्वेदी, राम पंडागळे, अशोक पाटील व श्रीमती सूर्यकांता पाटील हे सहाही निलंबित आमदार या बैठकीला उपस्थित होते. हे सहाही आमदार अंतुले यांचे कट्टर समर्थक होते. या आमदारांना बैठकीमध्ये बसण्यासच आधी मज्जाव करण्यात आला होता. तथापि, अंतुले आल्यावर ते या आमदारांना आपल्यासोबत आत घेऊन गेले. बुटासिंग व अंतुले यांचे आधीच चांगले वाजलेले होते. आणि तापलेले अंतुले "या आमदारांना कोण रोखतो हे मी पाहतो" या पवित्र्यात बैठकीत तरातरा घेऊन आले. श्री. तिडके यांच्या आक्षेपास प्रेमानंद आवळे हे उत्तर देण्यास उभे राहिले. श्री. बुटासिंग यांनीही 'निलंबित आमदारांनी बाहेर

जावे' असे आवाहन केले. 'पण नागपूरला आपण महाराष्ट्राच्या हितासाठी भोसल्यांविरुद्ध तसे वागलो .....' असे आवळे सांगू लागले. पुन्हा बुटासिंग यांनी 'या सहा आमदारांनी बैठकीतून बाहेर जावे, नाहीतर परिणाम चांगले होणार नाहीत' असे बजावले. आणि मग एकदम वातावरण तापले. सहाही निलंबित आमदार उभे राहून जोरजोरात बोलू लागले. भाऊराव पाटील यांनी तर बुटासिंग यांच्यावर कडाडून हल्ला चढविला. 'बुटासिंग-झुटासिंग' असे ते म्हणाले व धमकीची भाषाही भाऊरावांनी वापरली असे म्हणतात. त्यावर बुटासिंग यांनीही 'क्या करोगे, कतलही तो करोगे. मैं तो एक हरिजन का बेटा हूँ, मरनेसे नही डरता,' असे उत्तर दिले.

अंतुलेंनी माईक हिसकावून घेतला

दरम्यान, आपला सर्व डाव उधळला जातो आहे हे पाहून खवळलेल्या अंतुलेंनी पी. शिवशंकर यांच्या हातातील माईक अक्षरश: खेचून घेतला. बऱ्याच वेळेपासून ते बोलण्याचा प्रयत्न करीत होते. पण शिवशंकर त्यांना बोलण्यास परवानगी देत नव्हते. शिवशंकरना अंतुले वाट्टेल तसे बोलले. 'आपण अ. भा. इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस होतो, तेव्हा तुम्ही मला नियम शिकवू नका' असे अंतुलेंनी शिवशंकरना ठणकावले. 'इंदिरा काँग्रेस स्थापन झाली, तेव्हा शिवशंकर तुम्ही कोठे होतात ? पक्षाचा सरचिटणीस या नात्याने मी तुम्हाला या पक्षात दाखल करून घेतले,' असे संताप झालेले अंतुले बोलत होते. या सर्व चिडाचिडीनंतर सहा निलंबित आमदार घोषणा देत बैठकीतून निघून गेले. अंतुले मात्र थांबले.

नेता–निवडीसाठी मतदान

त्यानंतर मात्र बैठक शांततापूर्ण सुरू झाली. नवीन नेता कोणत्या पद्धतीने निवडावा यावर बैठकीत चर्चा झाली. हात वर करून नेता निवडावा की पेटीत मत टाकून निवडावा यावर खल झाला. 'बैठकीत हात वर करून नेता निवडला तर त्याचे वाईट परिणाम पक्षावर होतील, कमालीची कटुता वाढेल' असे कोकणातील जुने-जाणते आमदार शामराव पेजे यांनी सांगितले. अखेर आपली निवड सदस्यांनी एका कागदावर लिहून निरीक्षकांकडे तो कागद द्यावा, अशी पद्धती ठरली. सदस्यांनी 'त्यांना हवे ते नांव सुचवावे, पण एकच नांव लिहावे' असेही निरीक्षकांनी सांगितले. अशा तऱ्हेने सदस्यांना पर्याय ठेवण्यात आला नाही. साधारणत: दोन तासात ही बैठक संपली व सायंकाळी सहाच्या सुमारास मतदानास प्रारंभ झाला.

चार–पाच उमेदवार

साधारणत: या निवडणुकीत चार–पाच उमेदवार होते. त्यापैकी वसंतदादा, रामराव, अंतुले हे प्रमुख; तर डॉ. बळीराम हिरे, प्रतिभा पाटील हे किरकोळ. मावळते मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांनी आयत्या वेळी शंकरराव चव्हाणांचे नांव पुढे करून आपल्या लोकांनी शंकररावांना मतदान करावे, असे सांगितले.

दादा–रामराव यांच्यातच खरी लढत

मतदानास प्रारंभ झाला. सदस्य आपली निवड कागदावर लिहून निरीक्षकांना देत होते. दुसऱ्या मजल्यावर हे चालले होते. इकडे लोकांची उत्सुकता शिगेला पोचली. आमदार, खासदार, इंदिरा काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते लॉबीत गर्दी करून होते. वार्ताहरांची संख्याही मोठी होती. वार्ताहर ओळखीच्या आमदारांशी चर्चा करून मतदानाचा "कल" कुठे आहे हे अजमावून पहात होते. विधान भवनाबाहेर राजकीय कार्यकर्त्यांची तुफान गर्दी जमली होती. जस जसा वेळ जाऊ लागला तशी दोनच नांवे आमदारांकडून ऐकू येऊ लागली–वसंतदादा व रामराव! बाकी नांवे केव्हाच मागे पडली होती. अंतुले रिंगणात होते, पण त्यांना निवडणूक लढविण्यास मॅडमची परवानगी नाही, हे वृत्त आमदारांमध्ये वाऱ्यासारखे पसरल्याने अनेक निष्ठावंत आमदारांनी आपला मोर्चा आदिकांकडे वळविला. या आमदारांनी रामरावांना मते दिली. मतदानाच्या वेळी पूर्ण वेळ एकटे रामराव हेच उमेदवार बसून होते व आमदारांशी बोलत होते. वसंतदादा विधान भवनात आलेच नाहीत. ते विधान भवनाजवळील शालिनीताईंच्या बी–४ या बंगल्यात बसून होते.

रात्री १२ वाजेपर्यंत मतदान चालले. वृत्तपत्रांचे वार्ताहर कंटाळून गेले होते. आता निरीक्षकांनी उद्या आपला निर्णय जाहीर करावा, असे अनेक वार्ताहर बोललेही. निरीक्षकांना तसे सांगावे, असेही ठरले. पण या सर्व गडबडीत निरीक्षकांना गाठणे अवघड असल्याने सर्व वार्ताहरांना निर्णयाची वाट पहात थांबणे भाग होते.

निरीक्षकांचा बंद खोलीत खल !

मध्यरात्र उलटल्यावर निरीक्षकद्वयांनी स्वत:ला एका खोलीत कोंडून घेतले व आपसात खल केला. त्यानंतर त्यांनी फोन करून वसंतदादांना घरून बोलावून घेतले. रामराव शेवटपर्यंत विधान भवनातच होते. त्यांनाही बोलावून घेण्यात

आले. अंतुले यांच्याही घरी फोन करून त्यांनीही यावे असे सांगण्यात आले. 'पण आपण पहिले असू तरच येऊ' असे अंतुले यांनी बुटासिंगना सांगितले.

'आपण पहिले नाहीत, तरी पण यावे' –बुटासिंग !

अंतुले– 'मलाच सगळ्यात जास्त मते मिळाली आहेत. आणि तसे जाहीर करणार असाल तरच मी येईन !'

पक्षश्रेष्ठींशी संपर्क साधला

अंतुले आले नाहीत! सगळ्या उमेदवारांना एकत्र बोलावून त्यांना समजाऊन एकोप्याच्या वातावरणात नव्या नेत्याची निवड जाहीर करण्याचा निरीक्षकांचा हा प्रयत्न होता. म्हणून सर्व उमेदवारांना त्यांनी एकत्र बोलाविण्याचे धोरण अवलंबिले होते. दरम्यानच्या काळात बुटासिंग–शिवशंकर यांनी अत्यंत गुप्तता पाळून पक्षश्रेष्ठींशी फोनवरून संपर्क साधला होता !

रामराव सुन्न झाले !

निरीक्षकांनी रामरावांना बोलावून घेतले. आणि 'वसंतदादांना सगळ्यात जास्त मते पडली आहेत.' असे सांगून 'आपण विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत त्यांचे नांव पक्षनेता म्हणून सुचवावे' असे सांगितले. दिवसभर धावपळ करणाऱ्या व शेवटपर्यंत म्हणजे मध्यरात्रीपर्यंत विधान भवनातच ठिय्या मारून बसलेल्या रामरावांची यावेळी काय प्रतिक्रिया झाली असेल, हे आपण समजलेलेच बरे ! निरीक्षकांनी सांगितलेल्या निर्णयाने सुन्न झालेले रामराव 'आपणास पक्षश्रेष्ठींशी म्हणजे इंदिराजींशी व राजीवजींशी बोलायचे आहे,' असे निरीक्षकांना म्हणाले. त्यानुसार इंदिराजी व राजीवजी यांच्याशी फोनवर संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला. पण दोघेही घरी नसल्याचे उत्तर मिळाले. रामरावांसमोर आता काहीच पर्याय उरला नाही. निरीक्षकांचे म्हणणे त्यांनी मान्य केले.

मध्यरात्र उलटून गेली . . . .

दरम्यान, विधान भवनाच्या लॉबीत चर्चेला, अंदाजाला एकच ऊत आला होता. मध्यरात्र उलटून गेली होती. पण महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण हे ठरणार असल्याने असंख्य लोक एवढ्या रात्रीही डोळ्यात तेल घालून जागत होते. दादा–रामराव या दोघांनाही निरीक्षकांनी बोलावून घेतल्याने या दोघांपैकी कोण मुख्यमंत्री होतो, यावरच लॉबीत चर्चा चालली होती. काहींचे म्हणणे 'दादा होणार;' तर 'रामरावांना अंतुलेंची मते मिळाल्याने निष्ठावंतांच्या मतांवर रामराव निवडून येणार,' असे आग्रहाने सांगणारे लोकही होते.

रात्री एक वाजता बैठक

रात्री साडेबारा–पाऊणच्या सुमारास विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाची बैठक बोलाविण्यात आल्याची वार्ता सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली व वृत्तपत्रांचे प्रतिनिधी, आमदार, कार्यकर्ते या बैठकीसाठी त्वरेने निघाले.

वृत्तपत्र–प्रतिनिधींना ही बैठक खुली नव्हती. रात्रीचा एक वाजला होता. तरी या अत्यंत महत्त्वाच्या बातमीसाठी सर्व वृत्तपत्रांनी पहिल्या पानावर जागा राखून ठेवली होती. वसंतदादा किंवा रामराव या दोघांपैकीच मुख्यमंत्री होणार असल्याचे स्पष्ट झाल्यावर वार्ताहरांनी आपापल्या वृत्तपत्रांना, वृत्तसंस्थांना या दोघांचेही परिचय तयार ठेवण्यास आधीच फोन करून सांगितले होते. वृत्तपत्रांनी तर या दोघांचेही फोटो तयार ठेवले होते. फक्त आपापल्या वार्ताहरांच्या फोनचीच वाट वृत्तपत्र कचेऱ्यांमध्ये होती. हा किंवा तो एवढेच कळण्याचे बाकी होते. तेवढे आपल्या वार्ताहराकडून कळले की वृत्तपत्राची उद्याची "हेडलाईन" तयार होणार होती.

रामराव की वसंतदादा ?

बैठकस्थानी आमदार हजर झाले. त्यानंतर रामराव आले. दादा आले. दोघे निरीक्षक येऊन उपस्थित झाले. आणि हॉलचे दरवाजे बंद झाले. हॉलबाहेर निवडक कार्यकर्त्यांची खच्चून गर्दी जमली होती. बाहेर काही ऐकू येत नव्हते. पण तेथे असलेल्या टेबलावर उभे राहून वृत्तपत्रांचे प्रतिनिधी व काही उत्साही कार्यकर्ते खिडकीच्या काचेतून दिसणाऱ्या आतील घटनांचा मागोवा घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. दादा–रामराव शेजारी शेजारी गादीवर बसले होते. शिवशंकर यांनी प्रथम भाषण केले. त्यानंतर रामराव बोलायला उठले ! हे पाहताच रामराव आदिकांच्या चाहत्यांनी "रामराव आदिक झिंदाबाद"च्या घोषणा दिल्या. त्यामुळे रामरावांची निवड झाल्याचे सर्वांना वाटले. पण दुसऱ्याच क्षणाला वसंतदादांच्या बाजूने प्रचंड घोषणा झाल्या. आणि हॉलचे दरवाजे धाडकन् उघडले गेले ! पी. शिवशंकर यांनी 'आपले लाडके नेते वसंतदादांना सगळ्यात जास्त मते पडल्याचे' बैठकीत प्रथम जाहीर केले व त्यानंतर रामरावांनी दादांचे नांव उभे राहून नेतेपदासाठी सुचविले होते...दिवसभर चाललेले नेतानिवडीचे नाट्य अखेर रात्री दीड वाजता संपले ! दादांच्या चाहत्यांनी विधान भवनाच्या आवारात "वसंतदादा पाटील झिंदाबाद"चे प्रचंड नारे लावून आसमंत दुमदुमून टाकला. विधान भवनाबाहेर फटाक्यांची आतषबाजी झाली.

वसंतदादा महाराष्ट्राचे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले होते. 'एक दिवसाकरिता का होईना महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद पुन्हा मिळावे' अशी दादांची खूप दिवसांची इच्छा होती ती पूर्ण झाली.....

निवडणुकीबद्दल संशय

या निवडणुकीनंतर काही प्रश्न मात्र संशयाच्याभोवती फिरत राहिले. दादांविरोधी अनेक आमदारांनी हे संशय व्यक्त केले आहेत. या निवडणुकीस बॅ. ए. आर्. अंतुले यांनी उघडउघड "बनावट" म्हटले. निवडणुकीनंतर दुसऱ्या दिवशीच त्यांनी इंदिरा काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष पं. कमलापती त्रिपाठी यांना दिल्लीत प्रदीर्घ तार पाठवून नेतानिवडीची झालेली निवडणूक ही फसवेगिरी असल्याचे स्पष्टपणे म्हटले होते. ही तार नंतर वृत्तपत्रांना प्रसिद्धीसाठी देण्यात आली. रामराव आदिक यांच्या अगदी जवळच्या लोकांनीही या निवडणुकीबद्दल संशय व्यक्त केला आहे. 'रामरावांनाच सर्वात अधिक मते मिळाली,' असे या लोकांचे ठामपणे सांगणे आहे. १९७७ साली श्री. शंकरराव चव्हाणांना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावरून हुसकावून लावल्यानंतर नेतेपदासाठी त्याहीवेळी अत्यंत चुरशीची निवडणूक झाली होती. वसंतदादांविरुद्ध यशवंतराव मोहिते उभे राहिले होते. मोहित्यांचा पराभव करून दादा दणदणीत मतांनी निवडून आले. पण त्यावेळी या दोघांना पडलेली मते निरीक्षकांनी जाहीर केली होती. त्यामुळे संशयाला जागा नव्हती व त्या निवडणुकीबद्दल कुणीही संशय व्यक्त केला नाही. यावेळी झालेल्या निवडणुकीत दादा, रामराव, अंतुले यांना निश्चित किती मते पडली हे निरीक्षकांनी जाहीरच केले नाही. त्यामुळेच या निवडणुकीबद्दल संशय व्यक्त करण्यात आले. 'दादांना सर्वाधिक मते मिळाली' एवढेच निरीक्षकांनी विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाच्या बैठकीत जाहीर केले, तसेच अंतुले व रामरावांना सांगितले. "आपणास किती मते मिळाली " हे रामरावांना निरीक्षकांनी सांगितलेले नाही ! निवडणुकीतील मतांबाबत एवढी गुप्तता पाळण्याचे निरीक्षकांना काय कारण होते ? त्यांच्या या गुप्ततेमुळेच संशयाला भरपूर वाव मिळाला. मतांचे आकडे जाहीर झाल्याने कुणाची ताकद तरी किती आहे हे कळून चुकले असते. 'मतांचे आकडे जाहीर झाल्याने कटुता वाढली असती,' असा एक युक्तिवाद त्यावेळी काही इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी केला. पण हा युक्तिवाद तकलादू आहे. असो.

दादा–आदिकांचे मंत्रिमंडळ

एका बाजूला शरद पवार व दुसऱ्या बाजूला अंतुले यांच्याशी टक्कर देणारा

समर्थ माणूस म्हणून दिल्लीश्रेष्ठींनी, खासकरून राजीव गांधी यांनी वसंतदादांना पुन्हा महाराष्ट्रात पाठविले, हे आता एक उघड गुपित आहे. इंदिरा काँग्रेसमध्ये १९७८चे निष्ठावंत व त्यानंतर आलेले नवीन असा जुना–नवा वाद आहे. दादा हे १९७८ नंतर इंदिरा काँग्रेसमध्ये आलेले. तथापि, जुन्यांची नाराजी होईल हे गृहित धरूनच दादांना मुंबईला पाठविले गेले. परंतु राज्यातील जुन्यांना फार नाराज करून श्रेष्ठींना चालणारे नव्हते. त्यांनी १९७८ नंतरच्या दादांना मुख्यमंत्रीपद दिले, त्याचबरोबर "चेक ॲन्ड बॅलन्स" थिअरीचा अवलंब केला. १९७८ च्या निष्ठावंतांपैकी जुने असलेले रामराव आदिक यांना दादांच्या सोबतीला उपमुख्यमंत्री म्हणून दिले. १९७८ नंतर पुन्हा महाराष्ट्रात उपमुख्यमंत्रीपद निर्माण करण्यात आले. पक्षश्रेष्ठींनी रामरावांना उपमुख्यमंत्रीच केले नाही तर मंत्रिमंडळाची यादी करतांना रामरावांच्या म्हणण्याला जास्त महत्त्व दिले. दादा मंत्रिमंडळातील निम्मे मंत्री हे रामरावांच्या यादीतून आलेले होते. खुद्द दादांचे म्हणता येतील असे सहाच मंत्री मंत्रिमंडळात बसू शकले. मुख्यमंत्री नवा, पण झुकते माप जुन्या निष्ठावंतांना अशी मंत्रिमंडळाची रचना करण्यात आली. आणि विशेष म्हणजे मुख्यमंत्री वसंतदादांनी हे मान्य केले. वसंतदादांना आपले मंत्रिमंडळ मनाप्रमाणे बनविता आले नाही. त्यांना खूप तडजोडी कराव्या लागल्या.

हळू चालणारे सरकार

या मंत्रिमंडळाबद्दल मी फारसे लिहिणार नाही. वसंतदादांच्या राजवटीला २ फेब्रुवारी १९८४ रोजी एक वर्ष पूर्ण झाले. वसंतदादा मुख्यमंत्री झाल्यामुळे एकच झाले– या राज्यात सरकार नावाची चीज अस्तित्वात आहे, असे जाणवू लागले. बाबासाहेबांच्या कारकीर्दीत सरकारचे अस्तित्वच जाणवत नव्हते. पण "दादांचे सरकार फार हळू चालले आहे," असा एक आक्षेप आहे आणि तो खरा आहे. पण दादांचे ६७ वर्षांचे वय व त्यांची ठीक नसलेली प्रकृती लक्षात घेता, हा साहजिकच होणारा परिणाम आहे. याला नागपूर येथील विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाच्या बैठकीत (डिसेंबर १९८३) दादांनी दिलेले उत्तर अगदी स्पष्ट आहे. या बैठकीत बोलतांना आमदार टी. जी. देशमुख म्हणाले, ' हे सरकार काठी टेकीत चालले आहे.' दादांच्या काठीवर टी. जी. नी केलेली ही भेदक टीका होती. त्यास दादांनीही सडेतोड उत्तर दिले. दादा म्हणाले, 'मी काठी टेकीत चालतो हे खरे आहे. मला इतरांसारखे पळता येत नाही. दिल्लीला हे माहीत आहे. मला येथे येण्याची (महाराष्ट्रात) हौस नव्हती. पक्षश्रेष्ठींनी सांगितले म्हणून मी आलो. ते म्हणतील त्यावेळी मी या जबाबदारीतून मोकळा होईन ! '

दादांची एकूण टीम मात्र चांगली नव्हती. जुन्या–नव्याच्या वादात दादांना मंत्रिमंडळ स्थापन करतांना खूप तडजोडी कराव्या लागल्या. पण या नव्या–जुन्याच्या भांडणाचा प्रशासनावर, सरकारच्या कामगिरीवर परिणाम झाला. निष्ठावंतांच्या नांवाखाली मंत्रिमंडळात घेतले गेलेले बरेच मंत्री म्हणजे चक्क "खोगीर भरती" होती. आमदार म्हणून ज्यांनी कधी विधान सभेत तोंड उघडले नाही ते विरोधकांच्या मान्याला मंत्री म्हणून काय उत्तर देणार ? त्यामुळे त्यांची विधान सभेत, विधान परिषदेत फजिती झाली !

६] मर्दानी



श्रीमती इंदिरा गांधी

(७ नोव्हेंबर १९८४ रोजी लिहिलेला लेख)

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी महाभयंकर घटना घडली. अंगाचा थरकाप उडविणारी नि मन सुन्न करणारी ही प्रचंड धक्कादायक घटना होती. भारताच्या सामर्थ्यशाली पंतप्रधान इंदिराजी यांची त्यांच्याच सुरक्षा रक्षकांनी त्यांच्याच निवासस्थानी दगाबाजीने निर्घृण हत्या केली. भारताच्या या अत्यंत सामर्थ्यवान महिला पंतप्रधानावर दोघा सुरक्षा रक्षकांनी २२ गोळ्या झाडून त्यांच्या शरीराची चाळण केली व इंदिराजींची ती हसरी मूर्ती कायमची खामोश झाली. भारतीयांची देशभक्ती कमी पडली.

देशभक्ती कमी पडली

भारत बलवान व्हावा म्हणून अविरत झटणाऱ्या व जगातील बड्या शक्तींना आव्हान देऊ पाहणाऱ्या इंदिराजी या शक्तींच्या डोळ्यात सलत होत्या. अलिप्त राष्ट्रांचे समर्थ नेतृत्व करणाऱ्या या मर्दानीचा काटा दोघा भारतीयांकडूनच काढण्यात आला. या मर्दानीचा पराभव निवडणुकीत किंवा युद्धात करणे अवघड होते. म्हणून घरातच दगाबाजी, फंदफितुरी करण्याचे कारस्थान रचण्यात आले. आणि भारताच्या दुर्दैवाने बड्या शक्तींचे हे कारस्थान यशस्वी ठरले. आमची देशभक्ती

कमी पडली. नाहीतर हे कारस्थान यशस्वी ठरले नसते. भारताच्या लाडक्या प्रियदर्शिनीची हत्या दगलबाजीने करण्याचे पाप बियांतसिंग व सतवंतसिंग या दोघा शीख सुरक्षा रक्षकांनी केले नसते. भारताची सर्वश्रेष्ठ राजकीय महत्त्वाची व्यक्ती असलेल्या पंतप्रधानांची सुरक्षा करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर होती त्यांच्या बंदुका उलटच्या चालल्या नसत्या.

जीवनाचे सोने झाले

घरातच दगाबाजी घडवून यापूर्वीही राजकीय हत्या झालेल्या आहेत. परंतु आधुनिक काळातील ही पहिलीच घटना असावी. बांगला देशाचे संस्थापक, पंतप्रधान शेख मुजीबूर रेहमान यांचा वध त्यांच्याच लष्करी अधिकाऱ्यांकडून घडवून आणण्यात आला. बांगला देशात लष्करी उठाव केला गेला. इजिप्तचे अध्यक्ष अन्वर सादत यांचा लष्करी संचलनाच्या वेळी लष्करातील जवानांनी गोळ्या घालून खून केला. पंतप्रधान इंदिराजींच्या दोघा सुरक्षा रक्षकांनी त्यांच्या निवासस्थानीच दगाबाजीने हत्या केली. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाचा पंतप्रधान आपले कर्तव्य पार पाडतांना धारातीर्थी पडला ! इंदिराजींना वीर-मरण आले. इंदिरा गांधींना मारणारे 'मेले', इंदिरा गांधी अमर झाल्या. इंदिरा ही विद्युल्लता होती. ते एक वादळ होते. आणि त्यांचा व्यक्तिमत्वाला साजेसेच वीर–मरण त्यांना आले. पंतप्रधान म्हणून या थोर देशाची सेवा करीत असतांना त्यांना मृत्यु यावा यापेक्षा आणखी काय पाहिजे ? जेव्हा एखादी व्यक्ती हवी हवीशी वाटते, त्याच वेळी तिला मृत्यु यावा, यापेक्षा दुसरे सुंदर मरण असू शकते काय ? लाखो, कोटी देशबांधवांना 'इंदिरा हवी' असे वाटत असतांना इंदिराजी अचानक आपल्यातून निघून गेल्या. इंदिराजींचा मृत्यु अत्यंत धक्कादायक असला, तरी त्यातून सावरल्यावर वाटते इंदिराजींच्या जीवनाचे सोने झाले ! मृत्यु हा अटळ आहे, पण या विरांगनेसाठी सबंध भारत रडला, सबंध विश्व शोकसागरात बुडाले, यातच सर्व काही आले !

कोणताही पंतप्रधान सुरक्षित नाही

एक खंत मात्र आहे. भारताच्या सर्वश्रेष्ठ राजकीय प्रशासकपदी असलेल्या, पंतप्रधानाचे आम्हाला रक्षण करता आले नाही. इंदिराजींशी कितीही मतभेद असलेल्या व्यक्तीस हे मानावे लागेल की यापुढे या देशाचा कोणताही पंतप्रधान सुरक्षित नाही. पंतप्रधानांची सुरक्षा-व्यवस्था किती कडक असते या संबंधी आता-पर्यंत वाचले होते, ऐकले होते. पण ते सर्व फोल असल्याचे आढळून आले आहे.

पंतप्रधानांच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी इंटिलिजन्स, रॉ, स्पेशल ब्रँच, खाजगी संरक्षक आदी विविध हेरयंत्रणा असतात. पण या प्रचंड ताफ्यातील कुणालाही या दोघा मारेकऱ्यांचा, घरभेद्यांचा पत्ता नसावा ? मग या हेरयंत्रणांचे काय करायचे आहे?

सुरक्षा–ताफ्यातील लोक काय करीत होते ?

इंदिराजींनी पाकिस्तान तोडून बांगला देश निर्माण केला, त्याचा बदला म्हणून काही शिखांना हाती धरून शिखीस्तान–खलिस्तान निर्माण करू पाहणाऱ्या देशद्रोही शक्तींविरुद्ध व त्यांच्या विदेशी बगलबच्यांविरुद्ध इंदिराजींनी कठोर पावले उचलली, तेव्हा या भारतविरोधी शक्ती इंदिरा गांधींच्या जीवावर उठणार हे अपेक्षीतच होते. इंदिराजींनी सुवर्ण मंदिरात लपून बसलेल्या अतिरेकी नि दहशतवादी खलिस्तानवाद्यांविरुद्ध लष्करी कारवाई केली तेव्हा धर्मांध शिखांमध्ये जी "प्रतिक्रिया" उमटली ती पाहता इंदिराजींचे सार्वजनिक ठिकाणी फिरणे अतिशय धोक्याचे आहे, हे सांगण्यास हेरखात्याची आवश्यकता नव्हती. एखाद्या सार्वजनिक सभेत किंवा या कारवाईनंतर इंदिराजींनी विविध ठिकाणी लष्करासमोर केलेल्या भाषणांच्या वेळी काहीही होऊ शकले असते. पण तसे न होता त्यांची घरातच दोघा सुरक्षा रक्षकांनी अत्यंत निर्घृणपणे हत्या केली. त्यावेळी पंतप्रधानांच्या प्रचंड सुरक्षा ताफ्यातील सारेजण काय करीत होते ?

शोकांतिका टाळता आली असती

बियांतसिंगने पंतप्रधानांवर पहिली गोळी झाडलीच कशी ? त्याचवेळी एखाद्या दुसऱ्या सुरक्षा रक्षकाने त्यास कसे जायबंदी केले नाही ? पंतप्रधानांवर गोळीबार सुरू झाला तेव्हा त्यांच्याबरोबर असलेल्या सुरक्षा रक्षकाने पंतप्रधानांना थोडे ढकलले असते तरी मारेकऱ्यांच्या बऱ्याच गोळ्या चुकल्या असत्या व जखमी पंतप्रधानांचे प्राण वाचविता आले असते. ६५ कोटी जनतेच्या पंतप्रधानांचे प्राण वाचविण्यासाठी पंतप्रधानांच्या ताफ्यातील एकही सुरक्षा रक्षक-अधिकारी स्वतःच्या "छातीचा कोट" करण्यास पुढे येऊ शकला नाही ! अमेरिकेचे प्रेसिडेंट जॉन एफ्. केनेडी यांच्यावर गोळ्या झाडण्यास सुरूवात होताच त्यांच्या सुरक्षा अधिकाऱ्याने त्यांच्या भरधाव मोटार गाडीत अक्षरशः उडी घेऊन आपल्या छातीचा कोट केला होता, त्यामुळे श्री. केनेडी यांना एकच गोळी लागली. अर्थात ती वर्मी लागल्याने दीर्घकाळ शस्त्रक्रिया करूनही ते वाचू शकले नाहीत हा भाग वेगळा. पण आमच्या पंतप्रधानांचे प्राण सुरक्षा रक्षकांना वाचविता आले नाहीत, याचा खेद वाटतो. ही शोकांतिका टाळता येण्यासारखी होती. निदान बेईमान

सुरक्षा रक्षकांशी इमानदार सुरक्षा रक्षकांनी त्याचवेळी दोन हात केले असते तर भारतवासीयांना समाधान तरी लाभले असते. पण ते होणे नव्हते. अखेर व्हायचे तेच झाले. मला सारखे वाटते–सुरक्षा पथकातील जवान-अधिकारी यांची देश-भक्ती कमी पडली .....

अत्यंत धक्कादायक बातमी

इंदिराजींवर गोळ्या झाडल्याची बातमी प्रथम मला सकाळी ११ वाजल्याच्या सुमारास कळली. (बुधवार, ३१ ऑक्टोबर १९८४). आमदार डॉ. वा. रा. शेरेकर यांचा मला फोन आला व इंदिराजींवर गोळ्या झाडल्याचे एका कार्यकर्त्याने आपणास कळविल्याचे त्यांनी सांगितले. अफवा असण्याची शक्यता असून वृत्ताची खातरजमा करण्यास त्यांनी मला सांगितले. अत्यंत धक्कादायक बातमी होती. वाईट बातम्या नेहमी खऱ्या ठरतात, पण ही बातमी खोटी ठरावी असे मला वाटत होते. मी लगेच माझ्या दैनिक 'लोकसत्ता' कार्यालयाला फोन लावला. फोनवर दत्ता पंचवाघ हे उपसंपादक भेटले. त्यांना 'काही बातमी आहे काय ?' असे विचारले. तेव्हा त्यांनी 'इंदिराजींवर सोळा गोळ्या झाडल्याचे' वृत्त सांगितले. गोळ्या झाडणारे इंदिराजींचे सुरक्षा रक्षकच असल्याचे व इंदिराजींना जखमी अवस्थेत रुग्णालयात नेल्याचीही माहिती त्यांनी दिली. तरीही मी विचारले 'वृत्त कुठल्या वृत्तसंस्थेने दिले आहे ?' त्यावर 'यु. एन्. आय्.' असे श्री. पंचवाघ यांनी सांगितले. थरकाप उडविणारी ही घटना होती. मन सुन्न झाले. सोळा गोळ्या म्हणजे बाई वाचणे कठीण आहे..... मनात येऊन गेलेली शंका. पण वाचतील, वाचाव्यात असे वाटत होते. काहीतरी चमत्कार घडावा, आणि बाई वाचाव्यात असे मन सांगत होते. त्यानंतर मिळेल त्यास, भेटेल त्यास मी ही भयानक घटना सांगत सुटलो – 'इंदिरा गांधींवर गोळ्या झाडल्या.....' बहुसंख्य लोकांना ही बातमी नव्हती. त्यांना हे ऐकून धक्काच बसत होता. माझ्या एक-दोन जवळच्या नातेवाईकांनाही फोन करून मी ही बातमी दिली.

त्यानंतर मी ऑफिसला जाण्यास निघालो. आमदार डॉ. वा. रा. शेरेकर यांची मोटार होती. आईने जेवण वाढले होते. पण जेवण गेले नाही. एक घास घेतला व आईला सांगितले, घशाखाली घास उतरत नाही .....

रेडिओवरील वृत्त

डॉ. शेरेकरांच्या मोटारीत रेडिओ होता. आम्ही रेडिओ लावून बातम्या

घेण्याचा सतत प्रयत्न करीत होतो. एव्हाना रेडिओने वृत्त देण्यास सुरूवात केली होती. 'पंतप्रधान इंदिरा गांधींवर गोळ्या झाडण्यात आल्या व त्यांना जखमी अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आले आहे' असे रेडिओ सांगत होता. पुढे 'रुग्णालयात इंदिराजींवर शस्त्रक्रिया सुरू असल्याचे' वृत्त वारंवार रेडिओवर देण्यात येत होते. आम्ही मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' या निवासस्थानी गेलो. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील हे पुण्याला होते. त्यांना हे वृत्त कळताच ते दिल्लीला धावले."वर्षा"वर शोककळा पसरली होती.

सगळे सुन्न झाले....

डॉ. शेरेकर बंगल्यात गेले व आम्ही तीन–चार जण बाहेर थांबलो. थोड्या-वेळाने डॉ. शेरेकर बाहेर आले व त्यांनी टेलिप्रिंटरवरची बातमी मला दाखविली. इंदिराजी मरण पावल्याचे एका जबाबदार इंग्रजी वृत्तसंस्थेचे ते वृत्त होते. मी बातमी देण्याची वेळ बघितली. दुपारचे १–३० असे त्यावर लिहिले होते. सगळा खेळ आटोपला होता. त्यावेळी सगळे सुन्न झाल्यासारखे वाटले... आम्ही कुणीही एकमेकांशी बोलू शकलो नाही...

लोक ऐकावयास तयार नव्हते

थोड्या वेळाने मी 'वर्षा'हून माझ्या नरीमन पॉईंट येथील कार्यालयात जाण्यास निघालो. बस स्टॉपवर उभा होतो. तेथे लोकांना इंदिराजी गेल्याचे सांगितले. पण त्यांना ते खरे वाटेना. बसमध्ये चढलो. इंदिराजींवर गोळ्या झाडण्याबाबत लोक चर्चा करतांना दिसले. पण इंदिराजी गेल्याचे वृत्त त्यांना नव्हते. मी तसे त्यांना सांगितले तर लोक विश्वास ठेवावयास तयार नव्हते. मी वृत्तपत्रात काम करतो असे सांगितल्यावरही लोक हे ऐकावयास तयार नव्हते. रेडिओ 'इंदिराजींवर शस्त्रक्रिया सुरू असल्याचे' सांगत होता, इंदिराजी जगतील असेच लोकांना वाटत होते.....

फेरीवाल्यांनी दुकाने बंद केली

दुपारी साडेतीनच्या सुमारास ऑफिसमध्ये पोचलो, तेव्हा इतर सहकाऱ्यांनी इंदिराजींवर लेख लिहिण्याची तयारी चालविली होती. मला तर काही सूचत नव्हते. तथापि, आपले कर्तव्य हे केलेच पाहिजे.....मी मंत्रालयात एकूण प्रतिक्रिया घेण्यासाठी कार्यालयातून बाहेर पडलो. वाटेतील नरीमन पॉईंट भागातील फेरीवाल्यांनी आपापली खोकी, बिडी–काडीची, चहाची, पानाची खोकी–स्टॉल्स

बंद केल्याचे दिसले. तेथे एक बोर्ड लावला होता – 'इंदिराजींवरील भ्याड-हल्ल्याच्या निषेधार्थ फेरीवाल्यांनी दुकाने बंद केली आहेत.'

निधनाची बातमी वाऱ्यासारखी पसरली

मंत्रालयात आलो. एव्हाना इंदिराजींच्या निधनाची बातमी वाऱ्यासारखी पसरली होती. मंत्रालयावर शोककळा आली. सायंकाळी सहाच्या सुमारास प्रथम रेडिओ व नंतर टी. व्ही. ने इंदिराजींच्या निधनाचे वृत्त प्रसारित केले.

साक्षात चैतन्य

इंदिराजी म्हणजे साक्षात चैतन्य होते. बाईचा कार्याचा झपाटा काही औरच होता. त्या ६७ वर्षांच्या होत्या. पण एखाद्या तरुण–तरुणीला लाजवील असा त्यांचा उत्साह व एकूण कार्याचा झपाटा होता. दिवसात बारा–चौदा जाहीर सभा त्याच घेऊ शकत होत्या. काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतचा भारत आपल्या तडाखेबंद प्रचार दौऱ्यांनी पिंजून काढण्याची क्षमता त्यांच्यातच होती. पंतप्रधानकीसाठी प्रयत्नशील असलेले चरणसिंग, मोरारजी, जगजीवनराम, यशवंतराव हे प्रचारदौऱ्यांबाबत इंदिराजींची बरोबरी कधीच करू शकले नाहीत. म्हणूनच ही झंझावाती बाई या सर्व नेत्यांना मागे सारून केव्हाच पुढे गेली. ती खरी राष्ट्रीय नेता होती. इंदिराजींचे शिखर या नेत्यांना कधीच गाठता आले नाही. इंदिराजींसमोर हे सारे नेते खुजे ठरले. ते प्रादेशिक नेते वाटत. पंधरा वर्षे भारताचे पंतप्रधानपद सांभाळणारी ही महिला असामान्य होती. पंधरा वर्षे भारतीय राजकारणात तळपणारी ही 'मर्दानी' होती. आधुनिक 'झांशीची राणी' होती. इंदिराजींचा पंधरा वर्षांचा कालखंड राजकीय चढ–उतारांनी भरला आहे. इंदिराजींनी चुका केल्या नाहीत असे नाही. पण राज्य करतांना जी हिंमत लागते, धडाडी लागते ती हिंमत या महिलेत होती. खऱ्या अर्थाने बाई हिंमतवाली होती. म्हणूनच 'मी, मी' म्हणणाऱ्या इंदिरा काँग्रेसमधील व विरोधी पक्षातील नेत्यांना इंदिरा गांधी पाणी पाजू शकल्या. 'खट–नट' असलेला, विविध गटबाजींनी पोखरलेला "इंदिरा काँग्रेस पक्ष" इंदिराजीच सांभाळू शकल्या. "इंदिरा काँग्रेस"ची सर्कस सांभाळणे सोपे नव्हते. १९७७ च्या पराभवानंतर पाला–पाचोळा कार्यकर्त्यांना घेऊन त्यांनी राखेतून इंदिरा काँग्रेस उभी केली व पाच वर्षे सत्ता राबवून दाखविली. नाहीतर इंदिरा काँग्रेसचा केव्हाच "जनता पक्ष" झाला असता.

राजकीय जीवनातील अत्युच्च बिंदू

१९७१ साली पाकिस्तान तोडून बांगला देशाची केलेली निर्मिती हा

इंदिरा गांधींच्या राजकीय जीवनातील अत्युच्च बिंदु आहे, तर १९७५ ते १९७७ हा आणीबाणीचा कालखंड इंदिराजींच्या राजकीय जीवनातील व भारतीय राजकारणातील दुर्दैवी कालखंड आहे. खुर्चीची लालसा नसलेल्या, पितृतुल्य जयप्रकाशजींना तुरुंगात टाकून इंदिराजींनी फार मोठी चूक केली व १९७७ मध्ये त्याची फार मोठी किंमतही मोजली. १९७७ मध्ये आयुष्यभर खुर्चीचा मोह नसणाऱ्या, सत्तरी ओलांडलेल्या, तपस्वी जे. पीं. कडे पाहून, लोकांनी मते दिली व जनता पक्ष सत्तेवर आला. १९७७ मध्ये जयप्रकाश विरुद्ध इंदिरा असाच सामना भारतखंडात झाला व लोकांनी जयप्रकाशबाबूंच्या बाजूने कौल देऊन इंदिराजींना सत्तेपासून दूर नेले. मोरारजींना पाहून लोकांनी जनता पक्षाला मते दिली नाही व दिलीही नसती.

पुन्हा सत्तेवर येण्याचा विक्रम

पण जयप्रकाशजी गेल्यावर आपसातील भांडणांनी जनता पक्षाचे सरकार कोसळले तेव्हा देशाचे नेतृत्व कुणाकडे असावे असा सवाल निर्माण झाला, त्यावेळी भारतीय जनतेने इंदिराजींच्या बाजूने कौल दिला व चरणसिंग, मोरारजी, वाजपेयी, जगजीवनराम यांचे नेतृत्व बाजूला सारले. एकदा सत्तेवरून फेकले गेल्यावर पुन्हा सत्तेवर येण्याचा पराक्रम इंदिराजींनी करून दाखविला. जगात सहसा असे घडल्याचा दाखला नाही! इंदिरा गांधींच्या राजकीय जीवनातील हा अत्यानंदाचा क्षण होता !

राजीव गांधींची योग्य निवड

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर त्याच दिवशी त्यांचे पुत्र श्री. राजीव गांधी यांची पंतप्रधान म्हणून निवड झाली. इंदिरा गांधींच्या भीषण हत्येनंतर पंतप्रधानपदी राजीव येणे हे अपरिहार्य होते. एक तर इंदिरा काँग्रेसकडे इंदिराजींच्या तोलामोलाचा नेता नव्हता व राजीवशिवाय दुसऱ्याकडे नेतृत्व दिले असते तर इंदिरा गांधींच्या भीषण हत्येनंतर देशात निर्माण झालेली अस्थिरतेची परिस्थिती त्याला आटोक्यात आणणे कठीण गेले असते. देशाच्या एकात्मतेसाठी बलिदान देणाऱ्या व इंदिरा काँग्रेसच्या जनक असलेल्या इंदिराजींचा पुत्र राजीव याची पंतप्रधानपदी निवड करण्याशिवाय इंदिरा काँग्रेस पक्षापुढे दुसरा पर्याय नव्हता. देशातील तप्त भावना व पेटलेल्या दंगली, देशात लोकशाही राहणार की लष्करशाही येणार अशी संभ्रमावस्था असतांना या परिस्थितीत इंदिरा काँग्रेसने राजीव गांधी यांची पंतप्रधानपदासाठी केलेली निवड योग्य व शहाणपणाची होती.

आता यात फार घाई झाली वगैरे शंका काढणारे शंका काढतच रहाणार. पण या शंकासूरांच्या शंका फजूल होत्या. देश कोणत्या परिस्थितीत उभा होता याचे यांना भान नव्हते. " इंदिराजींसारखे प्रभावी राजकीय नेतृत्व भीषण हत्येने नाहीसे झालेले आहे, त्यामुळे देशाला प्रचंड धक्का बसलेला आहे , देशात व इंदिरा काँग्रेसमध्येही या अचानक भीषण आपत्तीमुळे समर्थ नेतृत्वाची प्रचंड पोकळी निर्माण झालेली आहे ", अशा अवस्थेत इंदिरा काँग्रेसने झटपट पावले न उचलता नेतेपदी कुणाला आणावे याचा घोळ घातला असता तर देशातील नेतृत्वहीन परिस्थितीचा फायदा लोकशाहीविरोधी शक्तींनी घेऊन सर्वांवर हात चोळीत बसण्याची वेळ आली असती. या असाधारण परिस्थितीत नेहमीची औपचारिक पद्धती न पाळता आधी इंदिरा काँग्रेस संसदीय मंडळाने (Parliamentary Board) राजीव गांधींची निवड केली व इंदिराजींच्या हत्येनंतर काही तासांच्या आत देशातील "नेतृत्वहीन अवस्था" संपविली. त्यानंतर इंदिरा काँग्रेस संसदीय पक्षाने राजीव गांधींच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले. असाधारण परिस्थितीत साधारण परिस्थितीतील उपचारांना इंदिरा काँग्रेसने फाटा देणे हे या विशेष परिस्थितीत क्रमप्राप्त होते.

काही विद्वानांचे तर्कट

आता राजीव गांधी हे पंतप्रधान झाले याचा अनेकांना धक्का बसला असून त्यातून ते अद्याप सावरलेले नाहीत. राजीव गांधी हे पंतप्रधान झाले हे अनेकांना आवडलेले देखील नाही. त्यात विरोधी पक्षाचे पंतप्रधानपदासाठी इच्छुक उमेदवार काही तर्कट–विद्वान नि काही अविवेकी पत्रकार आहेत. इंदिरा गांधींच्या निर्घृण हत्येमुळे निर्माण झालेल्या असामान्य परिस्थितीमुळे राजीव गांधी झटकन पंतप्रधान झाले व आपला "घराणेशाही"चा लोकसभा निवडणुकीतील हमखास मुद्दा कुठल्या कुठे फेकला गेला, हा या मंडळींचा खरा राग आहे. पण प्राप्त परिस्थितीत हे बोलण्याची हिंमत या मंडळींमध्ये नाही. त्यामुळे 'राजीव गांधींना अनुभव नाही,' 'त्यांची राजकीय कारकीर्द तीन वर्षांचीच आहे,' 'राजीवना पंत-प्रधानपद सांभाळता येईल की नाही' अशा शंका त्यांनी लगेच घेण्यास सुरूवात केली. राजीव गांधी पंतप्रधानपदासाठी पात्र की अपात्र हे इतक्या लौकर कसे ठरविणार ? निदान वर्षभर त्यांची कारकीर्द पाहून त्यानंतर काय ते मतप्रदर्शन करण्याचे औचित्य या मंडळींनी दाखवायला हवे. पण औचित्याचे 'डोस' इतरांसाठी असतात असा गोड गैरसमज अनेक विद्वानांचा आहे त्याला काय करणार ?

७] राजीव नेतृत्वाचा उदय



पंतप्रधान श्री. राजीव गांधी

१९८४ च्या अखेरीस भारताला, महाराष्ट्राला हादरून सोडणाऱ्या दोन घटना घडल्या. पंतप्रधान इंदिराजींची खलिस्तानवादी अतिरेक्यांनी निर्घृण हत्या केली व महाराष्ट्राचे लाडके नेते यशवंतरावजी चव्हाण यांचे अचानक निधन झाले. या पार्श्वभूमीवर १९८४ डिसेंबर अखेरीस लोकसभेच्या निवडणुका झाल्या. इंदिराजींचे उत्तुंग नेतृत्व नाहीसे झाले असतांना व देश अत्यंत बिकट अवस्थेतून जात असतांना इंदिरापुत्र राजीव गांधी यांच्या अगदीच नवीन नेतृत्वाखाली इंदिरा काँग्रेस पक्ष लोकसभेच्या या निवडणुकीत उतरला.

विरोधी पक्षांची पार वाताहत

आणि राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील इंदिरा काँग्रेस पक्षाने दणदणीत विजय प्राप्त करून विरोधी पक्षांची पार वाताहत केली. लोकसभेच्या ४०० हून अधिक जागा जिंकून या पक्षाने एक विक्रमच केला. राष्ट्रीय विरोधी पक्षांची कधी नव्हे एवढी दयनीय अवस्था या निवडणुकीत झाली. विरोधी पक्षांचे बडे नेते या निवडणुकीत पार जमीनदोस्त झाले. भाजपचे अटलबिहारी वाजपेयी, जनता पक्षाचे चंद्रशेखर, दलित मजदूर किसान पार्टीचे हेमवतीनंदन बहुगुणा,

जनता पक्षाचे जॉर्ज फर्नांडिस आदी पराभूत झाले. स्वतःला राष्ट्रीय पर्यायी पक्ष म्हणवून घेणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे केवळ दोनच खासदार लोकसभेत जाऊ शकले यावरून विरोधी पक्षाची झालेली पडझड स्पष्ट होते.

परिपक्व मतदार

राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली इंदिरा काँग्रेसला हे अभूतपूर्व यश मिळाले यामागे इंदिराजींच्या निर्घृण हत्येमुळे लोकांमध्ये निर्माण झालेली सहानुभूतीची लाट हे एक कारण तर निश्चितपणे आहेच, पण याशिवाय विरोधी पक्षही याला जबाबदार आहेत. विरोधी पक्ष जागावाटप व नेतृत्वाच्या प्रश्नावरून आपसात भांडत बसले, त्यांना राजीव नेतृत्वाला पर्याय देता आला नाही. याचा विपरित परिणाम मतदारांवर झाला. देश संकटात असतांना आपसात भांडत बसलेल्या चरणसिंग, जगजीवनराम, मोरारजीभाई यासारख्या खुर्चीची हाव न सुटलेल्या अतिवृध्दांच्या विरोधी पक्षांना लोकांनी कुठल्या कुठे फेकून दिले व आपल्या आईच्या हत्येनंतर हिंमतीने उभ्या राहिलेल्या राजीव गांधींच्या तरुण नेतृत्वाकडे विश्वासाने देशाचा कारभार सोपविला. भारतातील लोकशाही परिपक्क होत असल्याचेच हे लक्षण आहे. भारतातील मतदारराजा खऱ्या अर्थाने शहाणा आहे. देशात हिंसाचाराचे राजकारण थैमान घालीत असतांना व देशाच्या सुरक्षिततेचाच प्रश्न निर्माण झाला असतांना इंदिरा काँग्रेसला चारशेहून अधिक जागा देऊन भारतीय मतदारांनी राजकीय शहाणपणच दाखविलेले आहे. कारण थोडेबहुत बहुमत या पक्षाला मिळाले असते तर पुन्हा "आयाराम–गयाराम" होऊन केंद्रात सत्ता-बदल झाला असता व केंद्रात एक कमजोर व अस्थिर सरकार अस्तित्वात आले असते ! हा मोठा धोका सुजाण मतदारांनीच टाळला ! इंदिराजींचे उत्तुंग नेतृत्व खतम करून भारतात राजकीय गोंधळाची परिस्थिती निर्माण करू पाहणाऱ्या हितशत्रूंना, राजीव गांधींचे हात भक्कम करून या देशातील परिपक्व मतदारांनी चोख उत्तर दिले !

पर्यायी नेता देता आला नाही

विरोधी पक्ष लोकसभा निवडणुकीत पार भुईसपाट झाले याचे आणखी एक कारण म्हणजे इंदिरा काँग्रेसने आपला पंतप्रधान कोण हे लोकसभा निवडणुकीच्या आधीच जाहीर केले होते, परंतु विरोधी पक्षाला आपसातील भांडणांमुळे आपला भावी पंतप्रधान कोण हे जनतेपुढे ठेवता आले नाही. त्यांनी केंद्रात विरोधकांचे संयुक्त सरकार येणार, या प्रचारावर सारा भर दिला व निवडणुकीनंतर आम्ही

पंतप्रधानाची निवड करू, असे जनतेला सांगितले. पण लोकांनी यावर विश्वास ठेवला नाही. याही निवडणुकीत विरोधी पक्षांनी नेहमीची 'नकारात्मक' भूमिका घेतली. 'इंदिरा हटाव' सारखीच 'राजीव हटाव'ची भूमिका त्यांनी स्वीकारली व एका व्यक्तीविरुध्द सर्व प्रचार केंद्रीत केला. पर्यायी नेता, पर्यायी कार्यक्रम विरोधी पक्ष देऊ शकले नाहीत. नेहमीचीच चूक त्यांनी पुन्हा केली व परिणामी जनतेने त्यांना कुठल्या कुठे फेकून दिले. विरोधी पक्ष लोकसभेत संयुक्त सरकार नव्हे तर संयुक्त विरोधी पक्षही देऊ शकला नाही, एवढी त्यांची वाईट स्थिती झाली !

बॅ. अंतुल्यांचा बंडाचा झेंडा

लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान महाराष्ट्राच्या राजकारणाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण घटना घडली. ती म्हणजे माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर्. अंतुले यांना राजीव गांधी यांनी लोकसभेच्या निवडणुकीचे तिकीट नाकारले व अपेक्षेप्रमाणेच अंतुल्यांनी याविरुद्ध बंड करून "महाराष्ट्र इंदिरावादी काँग्रेस" नंतर ("भारतीय काँग्रेस") स्थापन केली. अंतुले व इंदिरा काँग्रेसचे पक्षश्रेष्ठी यांच्यात बरेच दिवस 'शीतयुध्द' चालले होते. इंदिरा गांधी हयात असतांनाही अंतुले हे वारंवार धमक्या देत असत. त्यांच्याकडे काही 'गुपित' असावे. त्या आधारे ते धमकावणीची भाषा वापरीत. इंदिरा गांधी हयात असेपर्यंत पक्षश्रेष्ठींचे धोरण अंतुल्यांबाबत नरमायीचे राहिले ! परंतु त्यांच्यानंतर पक्षाध्यक्ष व पंतप्रधानपदी आलेल्या राजीव गांधींनी अंतुल्यांचे आव्हान स्वीकारून त्यांना लोकसभेसाठी तिकीट नाकारण्याचे धाडस दाखविले. आतापर्यंत 'मागे मागे हटत आलेल्या' अंतुल्यांना आता दोन हात करण्याशिवाय पर्यायच नव्हता . त्यांच्या राजकीय जीवन–मरणाचा प्रश्न होता. साहजिकच त्यांनी बंडाचा झेंडा रोवला.

पण त्यांचे हे बंड यशस्वी होण्याची शक्यता कमीच होती. कारण 'तिकीट नाकारले' म्हणून केलेले बंड, असे त्यास स्वरूप आले. एखाद्या तात्त्विक मुद्यावर झालेले हे बंड नव्हते. आणि अंतुले मुख्यमंत्रीपदावरून उतरून बराच काळही लोटला होता. या काळात बरेच पाणी वाहून गेले व अंतुल्यांची राजकीय शक्ती खच्ची करण्यात पक्षश्रेष्ठी यशस्वी झाले होते. आणि म्हणूनच अंतुल्यांनी पक्षश्रेष्ठींना जेव्हा आव्हान दिले ते खरे आव्हान नव्हतेच. दोन वर्षांपूर्वी ही घटना घडली असती तर महाराष्ट्राचे राजकीय चित्र वेगळे दिसले असते. त्यामुळेच अंतुलेंचे आव्हान जाणवले ते फक्त त्यांच्या रायगड (कुलाबा) मतदार संघापुरतेच ! रायगड

लोकसभा मतदारसंघात अटीतटीचा व चुरशीचा सामना झाला, पण तो एकतर्फीच होता ! अंतुले विरुद्ध इतर सर्व असा हा असमान सामना होता. सर्व विरोधी पक्ष व वृत्तपत्रे एका बाजूला आणि अंतुले दुसऱ्या बाजूला असा हा सामना झाला. पुढे पुढे तर सत्तारूढ पक्षही विरोधी पक्षाला जाऊन मिळाला. बहुसंख्य वृत्तपत्रांनी अंतुलेंना "गुन्हेगार ठरवून" प्रचाराची नुसती राळ उडवून दिली. अशा एकाकी परिस्थितीत अंतुलेंचा पराभव झाला नसता तरच नवल ! अखेर अंतुल्यांचा पराभव झाला ! शेकापचे श्री. दि. बा. पाटील हे लोकसभेवर निवडून गेले. इंदिरा काँग्रेसचे उमेदवार व विद्यमान खासदार श्री. ए. टी. पाटील यांचा मात्र दणदणीत पराभव झाला. ए. टी. पाटील यांची अनामत रक्कम या निवडणुकीत गेली. महाराष्ट्रात हा "विक्रम" करणारे ए. टी. पाटील हे एकमेव इंदिरा काँग्रेसचे उमेदवार ठरले !

अंतुल्यांच्या धाडसाचे कौतुक

अंतुल्यांचा या निवडणुकीत पराभव झाला तरी अंतुल्यांच्या धाडसाचे मला कौतुक वाटते. अंतुल्यांच्या व्यक्तिमत्वातील एका गोष्टीचे मला आकर्षण वाटत आले आहे. 'अंतुलेंविरुद्ध भ्रष्टाचाराचा खटला' सुरू आहे. न्यायदेवता न्यायदानाचे आपले काम करीलच. पण त्याआधीच अंतुल्यांना "गुन्हेगार" ठरवून त्यांच्याविरुद्ध प्रचाराची मोहीम काढणाऱ्या (काही) पत्रकारांच्या प्रचंड बदनामी प्रचारात, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही हा राजकारणी हिमतीने उभा आहे. याला हिंमत लागते ! या ठिकाणी दुसरा कुणी असता तर त्याने आत्महत्याच केली असती !

"पुलोद"चे नेते शरद पवार

लोकसभेच्या निवडणुकीत राजीव गांधींच्या काँग्रेसला घवघवीत यश मिळाल्याने या परिस्थितीचा राजकीय फायदा ते उठवतील व मे १९८५ मध्ये होऊ घातलेल्या नऊ राज्यातील विधानसभेच्या निवडणुका आधीच तडकाफडकी घेतील, हे अपेक्षीतच होते ! आणि तसेच झाले ! लोकसभा निवडणुकीतील प्रचंड अपयशाने खचलेल्या विरोधी पक्षांसमोर विधानसभा निवडणुकीचे आव्हान राजीव गांधींनी उभे केले. अचानकपणे तर नव्हे, पण अतिशय अल्पावधीत उभ्या करण्यात आलेल्या या आव्हानाने विरोधी पक्ष कदाचित एकत्र येऊन या आव्हानाचा मुकाबला करतील, असे वाटत होते. पण ते घडले नाही ! लोकसभेच्या निवडणुकीपासून विरोधी पक्ष काहीही बोध शिकला नाही. विधानसभा निवडणुकीसाठी

उमेदवारी अर्ज भरण्याची वेळ आली तरी विरोधी पक्षात जागा वाटपाबाबत एकमत होऊ शकले नाही. याला महाराष्ट्र मात्र अपवाद ठरला !



ठाणे
3948
विधान

श्री. शरद पवार

महाराष्ट्रात श्री. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली "पुरोगामी लोकशाही दला"चे पुनरूज्जीवन करण्यात आले आणि यावेळी तीन पक्षांच्या या आघाडीत मित्रपक्ष म्हणून भारतीय जनता पक्षालाही सामील करण्यात आले. समाजवादी काँग्रेस, जनता पक्ष, शेतकरी कामकरी पक्ष व भारतीय जनता पक्ष या चार पक्षांच्या आघाडीने माजी मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांचे नेतृत्व एकमुखाने मान्य केले व इतर प्रांतात जमले नाही ते राजकीय शहाणपण व सामंजस्य विरोधी पक्षांनी महाराष्ट्रात दाखविले. लोकसभेच्या निवडणुकातील धक्कादायक निकालांपासून विरोधी पक्षांनी महाराष्ट्रात तरी बोध घेतला !

शरद पवारांनी आव्हान उभे केले

महाराष्ट्रात ज्या दिवशी 'पुलोद'ची पुन्हा नव्याने स्थापना झाली व शरद पवारांचे नेतृत्व त्यांनी एकमुखाने मान्य केले त्याच दिवशी महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेस पक्ष मुख्यमंत्री वसंतदादांच्याच नेतृत्वाखाली विधानसभेच्या निवडणुकांना सामोरा जाईल, हेही निश्चित झाले, ही माझी त्या दिवशीची उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती. "पुलोद"ने भावी मुख्यमंत्री म्हणून श्री. शरद पवार यांना पुढे करताच महाराष्ट्राच्या राजकारणात एक जबर आव्हान उभे राहिले व शरद पवारांना

तोंड देण्यासाठी इंदिरा काँग्रेस पक्षात राज्य पातळीवर दादांशिवाय दुसरा नेताच नव्हता. महाराष्ट्राच्या राजकारणाची, जिल्ह्या-जिल्ह्याच्या राजकारणाची खडा न् खडा माहिती असलेले दोनच नेते आहेत. एक शरद पवार व दुसरे वसंतदादा पाटील ! दोघांचेही नेतृत्व ग्रामीण भागातील असून त्यांची पाळेमुळे खोलवर रूजलेली आहेत. स्वातंत्र्यसैनिक असलेल्या, सहकार-महर्षि वसंतदादांची राजकीय पाळेमुळे तर अधिकच खोलवर गेलेली आहेत. शरद पवारांना "पुलोद"ने भावी मुख्यमंत्री म्हणून पुढे केल्यावर इंदिरा काँग्रेसमधील मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेतील इतर नांवे कुठल्या कुठे गेली व वयोवृद्ध वसंतदादांच्या काठीचाच आधार अखेर पक्ष-श्रेष्ठींना घ्यावा लागला. विधानसभेच्या निवडणुकीपर्यंत दादा मुख्यमंत्री आहेत, त्यानंतर प्रकृतीचे कारणास्तव त्यांना मुख्यमंत्री करण्यात येणार नाही, असा सर्वत्र बोलवा व चर्चा होती. आणि त्यात तथ्यही होते. परंतु शरद पवारांचे नेतृत्व "पुलोद"ने स्वीकारल्यामुळे महाराष्ट्रात परिस्थितीच अशी निर्माण झाली की इंदिरा काँग्रेस पक्षश्रेष्ठींना भावी मुख्यमंत्री कोण हा वाद संपुष्टात आणून वसंतदादांना पुन्हा विधानसभेच्या निवडणुकीसाठी सांगलीहून उमेदवारी द्यावी लागली.

दादांना हवे ते गवसले

वसंतदादा निवडणुकीला उभे राहणार की नाही हे शेवटपर्यंत पक्षश्रेष्ठींनी गुलदस्तात ठेवले होते व दादाही आपण उभे राहणार, असे ठामपणे पत्रकारांनी पुनः पुन्हा विचारूनही सांगत नव्हते. 'पक्षश्रेष्ठींनी सांगितले तरच आपण उभे राहू' ही भूमिका दादांची होती. आणि अखेर पक्षश्रेष्ठींनी अस्पष्टता दूर केली व दादांच्या उमेदवारीला "हिरवा कंदिल" दाखविला. याच वेळी विधानसभेच्या निवडणुकीनंतरही आपणच मुख्यमंत्री राहणार हे दादांनी जाहीर करून टाकले. आतापर्यंत दादांनी हा विषय कौशल्याने टाळला होता. पत्रकारांनी त्यांना यासंबंधी अनेक वेळा छेडले होते. परंतु दादांनी फारशी दाद लागू दिली नव्हती. पण पक्षश्रेष्ठींनी दादांची सांगलीची उमेदवारी जाहीर करणे व त्यानंतर 'पुढेही आपणच मुख्यमंत्री' हे दादांनी ठामपणे सांगणे याचा अर्थ दादांना 'हवे ते गवसले होते' हे स्पष्ट आहे.

"पॉवरफूल" वसंतदादा

महाराष्ट्राच्या इंदिरा काँग्रेसच्या राजकारणात दादा कधी नव्हे एवढे शक्तिमान बनले होते. रामराव आदिकांची बाजू घेवून ज्या मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यां-

विरुद्ध उघड "बंड" केले होते त्यातील तिघेजण वगळता ११ जणांचे "तिकीट" दादांनीकापले. विधानसभेच्या निवडणुकीसाठी या मंत्र्यांना उमेदवारीच दादांनी मिळू दिली नाही. त्यात चंद्रकांत त्रिपाठी, सतीश पेडणेकर हे रामरावांच्या खास जवळचे राज्यमंत्री होते. याशिवाय मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेतील डॉ. बळीराम हिरे, श्रीमती प्रतिभा पाटील या ज्येष्ठ मंत्र्यांना तिकीट नाकारून दादांनी महाराष्ट्राला धक्काच दिला ! मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेतील आणखी एक ज्येष्ठ मंत्री श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना केंद्रीय मंत्री श्री. शंकरराव चव्हाण व श्री. शिवराज पाटील यांच्या विरोधामुळे का असेना तिकीट मिळाले नाही, पण तेही दादांच्या पथ्यावरच पडले ! अशा तऱ्हेने दादांनी आपल्या प्रमुख स्पर्धकांना निवडणुकीआधीच चारीमुंड्या चीत केले ! दादांना आव्हान देणारे अंतुले हे पक्षाबाहेर गेले होते, तर रामराव आदिक 'हॅनोव्हर' प्रकरणामुळे पूर्ण बदनाम झाले होते ! (श्री. शिवाजीराव निलंगेकर हे विधानसभा किंवा विधान परिषद या दोन्ही सभागृहाचे सदस्य नसतांना पुढे दादांच्याच कृपेने मुख्यमंत्री झाले)

महाराष्ट्रातील इंदिरा काँग्रेसच्या उमेदवारांची जी यादी तयार झाली त्यात दादांचीच "माणसे" अधिक होती. या यादीवर दादांचा वरचष्मा होता. दादा फारच 'पॉवरफूल' बनले. अंतुले व शरद पवार यांचा "छाप" असलेल्या बहुसंख्य आमदारांची तिकिटे सरळ कापण्यात आली !

कांबळे–तिरपुड्यांची वक्तव्ये

आणि विधानसभेच्या निवडणुकीला तोंड लागले असतांना अचानकपणे प्रदेशाध्यक्ष श्री. नरेंद्र कांबळे व माजी उपमुख्यमंत्री श्री. नासिकराव तिरपुडे यांनी जाहीरपणे मुख्यमंत्रीपदाचा वाद उकरून काढला ! 'मुख्यमंत्रीपदाबाबत आता कुणीही चर्चा–वाद करू नये' असे या दोघांनीही इतरांबरोबरच वसंतदादांनाही सुनावले ! ऐन निवडणुकीच्या तोंडावर कांबळे व तिरपुडे यांनी अशी जाहीर वक्तवे करावीत हे काय "उगाच" होते ? की यामागे कुणाची "प्रेरणा" होती ?

"पुलोद"ची धडक

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होऊ लागले व महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसला २८८ पैकी २०० ते २२५ जागा मिळतील, हे बहुसंख्य जाणकारांनी व्यक्त केलेले अंदाज कोसळू लागले. शरद पवारांच्या नेतृत्वाखालील

"पुलोद"ने भलतीच धडक मारली व इंदिरा काँग्रेसचे बालेकिल्ले समजले जाणारे विदर्भ–मराठवाडा पार हादरून सोडले. मराठवाडा तर या आघाडीने जवळ-जवळ सरच केला. मुंबई व कोकण या सागरी भागाने हात दिला म्हणूनच १६२ जागा मिळून केवळ १७ जणांच्या बहुमताने इंदिरा काँग्रेसचे सरकार महाराष्ट्रात येऊ शकले ! आणि तेही राजीव गांधी यांनी "पक्षांतर विरोधी विधेयक" मंजूर करण्याची चतुराई केली म्हणूनच ! नाहीतर १७ आमदार फोडून "पुलोद" चे सरकार या राज्यात आणणे शरद पवारांना मुळीच कठीण गेले नसते ! १७ आमदार फोडणे हा त्यांच्या हातचा मळ आहे !

अल्प बहुमत म्हणूनच दादा मुख्यमंत्री

शरद पवार हे विधानसभेत प्रचंड ताकदीचा विरोधी पक्ष घेऊन आल्याने आधीच पार हादरून गेलेल्या इंदिरा काँग्रेस पक्षाला मुख्यमंत्रीपदाचा वाद घालण्यास वेळच मिळाला नाही. येथेही शरद पवार हे दादांच्या मदतीला धावले ! परिस्थितीचा रेटाच असा आला की पक्षश्रेष्ठींना दादांनाच पुन्हा मुख्यमंत्री करावे लागले. विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाने वसंतदादांची १० मार्च १९८५ रोजी सकाळी एकमताने नेतेपदी निवड केली व त्याच दिवशी सकाळी ११–१५ वाजता वसंतदादांचा मुख्यमंत्री म्हणून राजभवनावर शपथविधी झाला. वसंतदादा चौथ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले! मनात प्रश्न आला, जर महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळाले असते तर दादा चौथ्यांदा मुख्यमंत्री झाले असते ?

८] साहेब



कै. यशवंतराव चव्हाण

"साहेब" म्हणजे यशवंतराव चव्हाण हे साऱ्या महाराष्ट्राला माहीत आहे. १९८४ च्या अखेरीस दोन उत्तुंग राजकीय व्यक्तिमत्त्व आपल्यातून नाहीशी झाली. पंतप्रधान इंदिराजींची हत्या झाली, तर त्या जावून एक महिनाही होत नाही तो यशवंतरावजी अचानकपणे आपल्यातून निघून गेले. लोकसभा निवडणुकीची धामधुम सुरू झाली असतांना, उमेदवारी अर्ज भरण्यास सुरूवात झाली असतांना २५ नोव्हेंबर १९८४ रोजी यशवंतरावजींचे थोड्याशा आजाराने निधन झाले! यशवंतरावांच्या अचानक निधन–वृत्ताने भारतावर शोककळा पसरली, तर महाराष्ट्र शोकसागरात बुडाला!

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार

यशवंतरावांच्या जीवनक्रमाचा व अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा आढावा येथे मी घेणार नाही. कारण यशवंतरावांच्या जीवनाचा हा सारा भाग मराठी मातीतील मऱ्हाठी जनतेला ज्ञात आहे. यशवंतरावांबद्दल कुणाचे कितीही मतभेद असोत, यशवंतरावजी हे या आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते यात शंका नाही. गेल्या २५ वर्षातील महाराष्ट्राचे राजकारण यशवंतराव चव्हाणांपासून वेगळे काढताच

येणार नाही. महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांची अखेरपर्यंत छाप होती.

शेतकऱ्याचा मुलगा उपपंतप्रधान

यशवंतरावजी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री होते, नंतर पंडित नेहरूंच्या बोलविण्यावरून चिनी आक्रमणानंतर कठीण प्रसंगी केंद्र सरकारमध्ये संरक्षणमंत्री झाले. गृहमंत्रीपद व परराष्ट्र खाते ही दोन महत्त्वाची मंत्रीपदेही त्यांनी केंद्रात यशस्वीपणे सांभाळली. केंद्रात काँग्रेसची सत्ता जाऊन १९७७ मध्ये जनता पक्षाचे राज्य आले. तेव्हा ते लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेतेही होते. अशा विविध जबाबदारींनी त्यांचे राजकीय व्यक्तिमत्व तेजाळले आहे. आणि या सर्वांवर कळस म्हणजे चरणसिंगांच्या मंत्रिमंडळात यशवंतरावजी उपपंतप्रधान झाले ! चरणसिंग ज्या पद्धतीने पंतप्रधान झाले त्याबद्दल कुणाची पसंती–नापसंती, मतभेद असू शकतील. पण यशवंतराव या भारताचे उपपंतप्रधान झाल्याचे ऐकून खूप आनंद झाला. कराडच्या मऱ्हाठी मातीत जन्माला आलेला, एका शेतकऱ्याचा मुलगा प्रजासत्ताक भारताचा उपपंतप्रधान झाला त्याचा हा आनंद होता. लोकशाहीत हा चमत्कार होऊ शकतो हे पाहून मन आनंदी झाले, प्रफुल्लीत झाले. लोकशाहीबद्दलचा आदर द्विगुणीत झाला.

आपला देश हा विभूतीपूजक आहे. येथे पुढे येण्याकरिता "ग्लॅमर" (वलय) लागतं. मोठ्या माणसाच्या पोटी जन्माला यावं लागतं ! या पार्श्वभूमीवर कराडच्या मातीत अत्यंत गरीब घरात जन्माला आलेला, गरीब शेतकऱ्याचा मुलगा, घरात शिक्षणाची परंपरा नसतांना प्रतिकूल परिस्थितीत शिकून मोठा होतो व घरात कुठलीही राजकीय परंपरा नसतांना स्वकर्तृत्वावर वीस वर्षे सत्तेचे यशस्वी राजकारण करून या लोकशाही देशाचा उपपंतप्रधान होतो, ही गोष्ट माझ्या दृष्टीने प्रत्येक लोकशाहीप्रेमी भारतीयाचे हृदय आनंदाने भरून यावे अशी आहे. यशवंतरावजींचे उपपंतप्रधानपद या दृष्टीकोनातून मला महत्त्वाचे वाटत आले.

स्वगृही परतले

यशवंतरावजी ज्या दिवशी उपपंतप्रधान झाले त्या क्षणी माझ्या मनात विचार येऊन गेला. उपपंतप्रधानपद हेच त्यांच्या राजकीय जीवनातील सर्वोच्च स्थान असावे ! आणि पुढे झालेही तसेच ! चरणसिंग–यशवंतराव यांचे केंद्रातील संयुक्त सरकार कोसळल्यावर १९८० मध्ये झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत इंदिरा काँग्रेस दणदणीत निवडून आली व पुन्हा इंदिरा गांधी या पंतप्रधान झाल्या. त्यावेळी समाजवादी काँग्रेसचे महाराष्ट्रातून निवडून आलेले

यशवंतरावजी हे एकमेव खासदार होते. पुढे तेही इंदिरा काँग्रेसमध्ये गेले ! १९७७ ते १९८० या काळात इंदिरा गांधींविरुद्ध उघड राजकारण करणारे यशवंतराव जेव्हा विरोधी पक्षाची साथ सोडून "स्वगृही" या नांवाखाली पुन्हा इंदिरा गांधींकडे गेले याचा अर्थ त्यांचे "राजकारण" संपले होते ! सतत सत्तेत राहणारे यशवंतराव अखेरपर्यंत इंदिरा काँग्रेसचे एक खासदार म्हणूनच लोकसभेत बसले !

महाराष्ट्र काँग्रेसवर भक्कम पकड

काँग्रेस पक्ष केंद्रातून सत्तेमधून जाईपर्यंत म्हणजे १९७७ पर्यंत यशवंतरावजी हे महाराष्ट्र काँग्रेसचे अनभिषिक्त राजे होते. महाराष्ट्र काँग्रेसवर त्यांची भक्कम पकड होती. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात काँग्रेसची संघटना वाढली, फोफावली व भक्कम झाली हे कुणालाच नाकारता येणार नाही. यशवंतरावजींची महाराष्ट्र काँग्रेसवर जोपर्यंत भक्कम पकड होती तोपर्यंत महाराष्ट्रातील काँग्रेस उमेदवारांची यादी, मग लोकसभा असो वा विधानसभा निवडणूक असो, प्रदेश काँग्रेसचे संसदीय मंडळ निश्चित करीत असे. केंद्रात पक्षश्रेष्ठी फारसा बदल न करता ती यादी जशीच्या तशी मंजूर करीत. पण १९८० नंतर ही परिस्थिती पार बदलली. त्याचे बरेवाईट परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागले आहेत. यशवंतरावांच्या नेतृत्वानंतर महाराष्ट्रात उदयास आलेल्या इंदिरा काँग्रेसच्या नेतृत्वाने प्रत्येक बाबतीत दिल्लीतील पक्षश्रेष्ठींना अधिकार दिल्याने महाराष्ट्रातील राजकीय घडी विस्कटली व महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न निर्माण झाला आणि शरद पवारांसारख्या नेत्याने तो १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत प्रकर्षाने महाराष्ट्रासमोर मांडला !

यापेक्षा अधिक काही मी यशवंतरावजींवर लिहिणार नाही. यशवंतरावजींचे एकूण व्यक्तिमत्त्व कसे होते याचा परामर्ष महाराष्ट्राच्या विधानसभेने उत्तम रीतीने घेतला आहे. १८ मार्च १९८५ रोजी सुरू झालेल्या महाराष्ट्राच्या सातव्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात महाराष्ट्राच्या या पहिल्या मुख्यमंत्र्यास भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. ही आदरांजली म्हणजे "साहेबां"च्या अष्टपैलू व चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाचा थोडक्यात आढावाच आहे. त्यातही विरोधी पक्षाचे नेते व माजी मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांचे भाषण व्यक्तिगत स्पर्शाने ओथंबलेले होते. शरदराव हे यशवंतरावजींचे मानस पुत्र मानले जातात. आणि त्यांनीही आदरांजली वाहतांना काही लपवून ठेवले नाही. 'आपण आज जे काही आहोत ते यशवंतरावजींमुळेच' हे त्यांनी स्पष्टपणे कबुल केले.

मराठी मातीतील लोकोत्तर पुरूष

'मराठी मातीत जन्माला आलेला लोकोत्तर पुरूष' हे यशवंतरावांचे शरद पवारांनी केलेले वर्णन अत्यंत बोलके आहे. विशाल मुंबई प्रांताच्या वेळी यशवंतरावजींच्या कर्तृत्वाची खरी झलक दिसली असे सांगून शरद पवार म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळात त्यांचे व्यक्तिमत्त्व तेजाळून निघाले. संघर्षाचा हा काळ होता. यावेळी त्यांनी मानहानीही स्वीकारली. या काळास त्यांनी धैर्याने तोंड दिले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मराठी जनतेच्या इच्छेची पूर्ती यशवंतरावजींनी करून दाखविली. १मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती त्यांनी राष्ट्रीय प्रवाहात राहून अखेर करून दाखविली. पंडित नेहरू–इंदिरा गांधीना सांगून त्यांनी हे कार्य केले.

यशवंतरावांच्या कर्तृत्वाचा आढावा घेतांना शरदराव म्हणाले की, चिनी आक्रमणानंतर यशवंतरावजींनी संरक्षण मंत्रीपदाची धुरा हाती घेतली. हिंदुस्थानच्या संरक्षण व्यवस्थेची उभारणी करण्याचे पायाभूत काम त्यांनी केले. केंद्रीय गृहमंत्री म्हणून आपण उत्तम संसदपटू असल्याचे त्यांनी दाखवून दिले. परराष्ट्रमंत्रीपद यशवंतरावांना समाधान देणारे होते. कारण त्यांना फिरण्याची आवड होती. नवीन गोष्टी धुंडाळण्याची आवड होती.

सुसंस्कृत नेता

यशवंतरावजींचे व्यक्तिमत्त्व कर्तृत्व संपन्न होते, ते उत्तम प्रशासक होते आणि या प्रशासकाला मानवी दृष्टीकोन होता, असे मूल्यमापन करून शरदराव यांनी सांगितले की, राजकीय व्यक्तिमत्त्वाचा हा नेता सुसंस्कृत नेताही होता. त्यांना वाचनाची आवड होती. आधुनिक पुस्तके ते वाचत. त्यांनी उत्तम लिखाणही केले. उत्तम विचार, उत्तम मित्र व उत्तम पुस्तके यांचा ठेवा यशवंतरावजींनी जीवनात केला. माणुसकी कधीही हरविली जाणार नाही याची खबरदारी घेणारे, सांस्कृतिक उंचीचे ते उत्तम राजकारणी होते.

सतत महाराष्ट्राचा ध्यास

मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील हे यशवंतरावजींचे समकालीन, त्यांचे एक महत्त्वाचे सहकारी. 'महाराष्ट्रासाठी काहीतरी केले पाहिजे अशी सतत जाणीव ठेवणारे' यशवंतरावजी हे थोर नेते होते असे मुख्यमंत्री वसंतदादांनी सांगितले.


विरोधी पक्षीयांची कामे करीत

मृणाल गोरे या विरोधी पक्षाच्या आमदार. त्या यशवंतरावांबद्दल म्हणाल्या 'त्यांचे व्यक्तिमत्व अभ्यासू व सुसंस्कृत होते. सामान्य माणसाबद्दल त्यांना अतीव आपुलकी होती. विरोधी पक्षांशी ते सौजन्याने वागत, पण त्याचबरोबर त्यांची कामेही करीत.'

व्यक्तिमत्त्वातील मोठी कमजोरी

मृणाल गोरे यांनी यावेळी सांगितलेला एक किस्सा फार बोलका आहे. म्हणून तो येथे मुद्दाम देतो. केंद्रात जनता पक्षाचे राज्य आले होते. जनता पक्षाच्या खासदार असलेल्या मृणालताईनी एकदा विमानातून प्रवास करतांना शेजारीच बसलेल्या यशवंतरावांना विचारले, ' तुम्ही आणीबाणीला पाठिंबा का दिला ?' त्यावर यशवंतराव म्हणाले की, 'धावत्या गाडीतून उडी मारण्याचे धैर्य माझ्यात नव्हते म्हणून आणीबाणीला मी पाठिंबा दिला !' मला वाटते मृदु भाषी यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वातील ही एक मोठी कमजोरी होती. यशवंतरावांनी पंतप्रधानपदासाठी कधीही संघर्ष केला नाही. हिंमत दाखवून, संघर्षाने पंतप्रधानपदाची खुर्ची हिसकावून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. दिल्लीच्या उत्तर भारतीय राजकारणात यशवंतराव येथे कमी पडले ! नाहीतर केंद्र सरकारात पंधरा-सोळा वर्षे विविध महत्त्वाची खाती सांभाळणारे व पंतप्रधानकीसाठी लागणारे सर्वगुणसंपन्न असलेले यशवंतरावजी चव्हाण हे भारताचे कधीच पंतप्रधान झाले असते !

९] महाराष्ट्राची अस्मिता व वसंतदादांचा राजीनामा !



श्री. वसंतदादा पाटील

मार्च १९८५ मधील विधानसभेच्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेस पक्षाला केवळ १६–१७ आमदारांचे बहुमत मिळाले व विरोधात शरद पवारांच्या नेतृत्वाखाली "पुलोद"चे जबरदस्त आव्हान उभे राहिल्याने केवळ परिस्थितीमुळे वसंतदादा पाटील हे पक्षश्रेष्ठींच्या मनात नसतांनाही चौथ्यांदा मुख्यमंत्री झाले.

वेगळा मुख्यमंत्री

विशिष्ट परिस्थितीत आपण पुन्हा मुख्यमंत्री झालो याची दादांना चांगली जाणीव होती. तसेच आपल्या "स्ट्रॅटेजिक पोझिशन"चीही त्यांना कल्पना होती. त्यामुळे यावेळी मुख्यमत्री म्हणून ते वेगळचा पद्धतीने वागू लागले. गेली दोन वर्षे मुख्यमंत्री म्हणून वावरणारे वसंतदादा व निवडणुकीनंतर पुन्हा मुख्यमंत्री झालेले वसंतदादा यांच्यात खूपच फरक जाणवू लागला. आतापर्यंत पक्षश्रेष्ठींच्या कलाने चालणारे वसंतदादा मुख्यमंत्री म्हणून स्वतंत्रपणे वागू लागले. अर्थातच पहिली ठिणगी पडली ती मुंबईतून एक मराठी मंत्री राज्याच्या मंत्रिमंडळात नाही, या प्रश्नावरून ! मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी. परंतु या राजधानीतून

एकही मराठी मंत्री नाही हे महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात प्रथमच घडले. आतापर्यंत मुंबईतून किमान पन्नास टक्के मंत्री हे मराठी भाषिक असत. रजनी पटेल यांच्यासारख्या त्यावेळच्या मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सामर्थ्यशाली अध्यक्षाच्या कारकीर्दीतही हे तत्त्व पाळले गेले. परंतु त्यावेळी मुंबईतून एकाही मराठी आमदाराचा राज्याच्या मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला नाही. मुंबईतून एक दाक्षिणात्य, एक उत्तर भारतीय, एक मुस्लीम व एक ख्रिश्चन असे चार मंत्री घेण्यात आले. स्थानिक माणसाला डावलून अन्य लोकांना एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधीत्व देण्याचा प्रकार प्रथमच घडला. मराठी माणसाच्या दृष्टीने अत्यंत चीड आणणारी अशी ही गोष्ट होती.

मराठी माणसाला धक्काच बसला

दादांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यावर दिल्लीत पक्षश्रेष्ठींशी चर्चा करून दोन दिवसांनी मंत्रिमंडळाची यादी जाहीर केली, तेव्हा मुंबईतील तमाम मराठी माणसांना याचा धक्काच बसला. ज्या दिवशी वसंतदादांच्या नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला त्याच दिवशी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघातर्फे वसंतदादांचा नवीन मुख्यमंत्री म्हणून स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. नव्या मुख्यमंत्र्याचे प्रेसरूममध्ये स्वागत करण्याची संघाची जुनी प्रथा आहे. यावेळी झडलेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी मुंबईतून एकही मराठी मंत्री नाही याचे तीव्र पडसाद उमटले ! विशेषत: मराठी भाषिक पत्रकार या प्रश्नावर अधिक आक्रमक होते. दादांवर पत्रकारांनी प्रश्नांचा भडिमार केल्यावर दादा म्हणाले की, 'वस्तुत: एक मराठी भाषिक मंत्री आम्ही घेतला होता. पण चुकून-टायपिंग मिस्टेकने त्यांचे नांव यादीतून गळाले. त्यांचा लौकरच शपथविधी केला जाईल.'

डॉ. शेरेकर यांच्या नांवाची घोषणा

'त्यांचे नांव काय ?' असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता दादा म्हणाले, 'आपले डॉक्टर', त्यावर पत्रकार म्हणाले, 'डॉ. शेरेकर का ?' यावर दादा "होय" असे म्हणाले व त्यांना राज्यमंत्री म्हणून घेण्यात येत असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

दादांची मराठी भाषिक मंत्री म्हणून डॉ. शेरेकरांना मंत्रिमंडळात घेण्याची निवड सर्वस्वी योग्य अशी होती. मुंबईतील इंदिरा काँग्रेसचे जे ७-८ मराठी आमदार निवडून आले आहेत त्यात डॉ. शेरेकर हे सर्वात उजवे आहेत. मुंबई विद्यापीठाचे वैद्यकीय पदवीधर (एम्.बी.बी.एस्.) अभ्यासू, उत्तम वक्ता, विधानसभेवर दुसऱ्यांदा निवडून आलेला एक प्रभावी व तडफदार आमदार

तसेच पक्षाच्या संघटनेच्या पातळीवर प्रदेशचे सरचिटणीस म्हणून काम केलेली



डॉ. वा. रा. शेरेकर

एक अनुभवी व्यक्ती म्हणून दादांनी केलेली ही निवड सार्थ व योग्य अशीच होती.

डॉ. शेरेकर प्रकरण

परंतु डॉ. शेरेकर यांच्या मंत्रिमंडळातील समावेशाच्या प्रश्नावर दुर्दैवाने "राजकारण" खेळले गेले. दादांनी डॉ. शेरेकर यांचे नांव राज्यमंत्री म्हणून जाहीर तर केले. परंतु आज, उद्या होणारा त्यांचा शपथविधी सारखा लांबत गेला. दादांनी शेरेकरांचे नांव जाहीर केल्यावर त्यांच्या शपथविधीस परवानगी द्यावी म्हणून ते पक्षश्रेष्ठींशी सतत फोनवर संपर्क साधून होते. परंतु पक्षश्रेष्ठींकडून त्यांना स्पष्टपणे होकार किंवा नकार देण्यात आला नाही व एकूण "टंगळमंगळ" करण्यात आली, असे दादांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले. खरे म्हणजे कुणाला मंत्रिमंडळात घ्यायचे हा मुख्यमंत्र्यांचा अधिकार आहे आणि एखाद्या मंत्र्याचे नांव जाहीर केल्यावर त्याचा शपथविधी करणे हा सर्वस्वी मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारातील प्रश्न आहे. त्यासाठी पक्षश्रेष्ठींच्या परवानगीची गरजच नव्हती. दादांनी डॉ. शेरेकरांचे नांव जाहीर केल्यावर त्यांचा मंत्री म्हणून शपथविधी त्यांना उरकून घेता आला असता ! झालेली टायपिंग मिस्टेक अशा तऱ्हेने दुरुस्ती करता आली असती ! आणि त्याबद्दल पक्षश्रेष्ठींनी त्यांना काही जाब विचारला नसता. कारण हा संपूर्णपणे मुख्यमंत्र्यांच्या अधिकारातील प्रश्न होता.

परंतु दादांनी तसे केले नाही ही वस्तुस्थिती आहे. डॉ. शेरेकरांच्या प्रश्नावर दादा आणि पक्षश्रेष्ठी यांचे "शीतयुद्ध" सुरू राहिले. त्यात डॉ. शेरेकर यांच्यासारख्या योग्य, लायक नि सज्जन माणसाचा 'बकरा' झाला आणि त्यांना, त्यांच्या कुटुंबियांना जो भयंकर मनःस्ताप सहन करावा लागला हे सारे अत्यंत दुर्दैवी आहे. दादांनी मंत्री म्हणून डॉ. शेरेकरांचे नांव जाहीर केले नसते तर चालले असते. कारण त्यामुळे भेटेल ती व्यक्ती डॉ. शेरेकरांना 'शपथविधी केव्हा ?' हा एकच प्रश्न विचारीत असे, यामुळे डॉ. शेरेकरांना झालेला मनःस्ताप मला माहीत आहे. असो.

मराठी माणूस पेटत गेला

अशा तऱ्हेने दादा नि पक्षश्रेष्ठी यांच्यात पहिला खटका डॉ. शेरेकरांच्या शपथविधीवरून उडाला. मुंबईतून मराठी भाषिक मंत्री घेतला नाही यावरून मुंबईत वातावरण पेटत होते. डॉ. शेरेकरांचा शपथविधी जसा लांबला तसे हे वातावरण अधिक पेटत गेले. दादांनी मराठी मंत्री घेऊनही पक्षश्रेष्ठी त्यांच्या शपथविधीस परवानगी देत नाहीत असा मराठी माणसाचा समज झाला. त्यातच मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका मुख्यमंत्री वसंतदादांनी जाहीर केल्या. मराठी माणसाला मनातील राग काढण्याची संधी प्राप्त झाली. त्यातच विधान परिषदेत 'मुंबई वेगळी करण्याचा कट शिजत असल्याचा' आरोप शिवसेनेचे आमदार श्री. प्रमोद नवलकर यांनी केला व यामागील शक्ती कोण हे शोधण्याचे आवाहन मुंबईतील मराठी माणसाला केले. नवलकरांच्या या भाषणाला ठळक प्रसिद्धी मिळणे क्रमप्राप्त होते व झालेही तसेच ! श्री. नवलकर यांचे शरसंधान मुंबई विभागीय इंदिरा काँग्रेसचे अध्यक्ष श्री. मुरली देवरा यांच्यावर होते हे उघड आहे. मुंबईतील इंदिरा काँग्रेसचे खासदार, आमदार नि आता महापालिका निवडणुकीसाठी देवरांनी उभे केलेले उमेदवार यात प्रामुख्याने बिगरमराठी आहेत आणि मराठी माणसाला डावलले जात आहे हे नवलकरांनी आकडेवारीनिशी मांडले. मराठी माणसाला हे पटत होते, ही भाषणे वाचून मराठी माणूस पेटू लागला होता. त्यातच मुंबई इंदिरा काँग्रेसच्या यादीत (पालिका निवडणूक) गुन्हेगारीचा आरोप असलेले बरेच उमेदवार आहेत असे वृत्त एका इंग्रजी साप्ताहिकाने उमेदवारांच्या नांवांसह प्रसिद्ध केले. त्यामुळे मोठी खळबळ माजली आणि दादांना याबाबत विचारण्यात आले तेव्हा 'अशा गुन्हेगार उमेदवारांना लोकांनी पाडावे' असे आवाहन दादांनी केले. त्यामुळे जबरदस्त खळबळ माजली. मुंबई विभागीय इंदिरा काँग्रेसच्या प्रमुख लोकांचे व खास करून अध्यक्ष मुरली देवरांच्या

तोंडचे पाणी पळाले. पण मुख्यमंत्रीच हे म्हणाले असल्याने त्यांना "मिठाची गुळणी" तोंडात धरून ठेवणे भाग पडले. अर्थात् पक्षश्रेष्ठींकडे दिल्लीत जोरदार कानफुसकी सोडण्याचे काम त्यांनी केले !

अपमान करणारी भाषा

एवढे रामायण घडल्यावर मुरली देवरांनी आझाद मैदानावरील बी. आर्. सी. सी. च्या आपल्या कार्यालयात एक पत्रकार परिषद घेऊन आमच्या यादीत कुणी गुन्हेगार नसल्याचे सांगितले व हे वृत्त देणाऱ्या (साप्ताहिक "ब्लिटझ्") साप्ताहिकाच्या संपादकांना त्यांनी धारेवर धरले. सदर वृत्त खोडसाळ असून संबंधितांकडे आपण वस्तुस्थितीदर्शक खुलासा पाठवित आहोत असेही श्री. देवरा म्हणाले. 'हे बदनामीकारक वृत्त दिल्याबद्दल सदर साप्ताहिकाविरुद्ध खटला भरणार काय ?' असा प्रश्न मी या पत्रकार परिषदेत त्यांना विचारला असता, देवरा म्हणाले की, आम्ही कोर्टात धाव घेणार नाही, पण संपादकांकडे खुलासा पाठवित आहोत'. देवरांचे हे उत्तरच मोठे बोलके होते ! त्यानंतर 'पालिका निवडणुकीसाठी निवडलेल्या उमेदवारात मराठी लोकांना फारच कमी तिकिटे दिली अशी तक्रार आहे' असा प्रश्न आम्ही देवरांना विचारला. तेव्हा देवरा म्हणाले, 'चांगला प्रश्न विचारला. मुंबईत ३४ ते ४० टक्के मराठी लोक आहेत. आणि आम्ही ४४ टक्के म्हणजे मराठी लोकांच्या लोकसंख्येच्या मानाने अधिकच तिकिटे दिली आहेत !' देवरांची ही भाषा उद्दाम होती. या भाषेने आगीत तेल ओतले. स्थानिक माणसाचा अपमान करणारी असली भाषा मुंबईतील स्थानिक मराठी माणसानेच सहन केली. अशी भाषा स्थानिक माणसाबद्दल गुजरात, बंगाल, मद्रास, आंध्रमध्ये काढली असती तर त्याचे काय झाले असते ? तेथे असे उद्गार काढण्याची हिंमतच कुणी करणार नाही !

वसंतदादांचा बॉम्बगोळा

दरम्यान, एका चर्चेला उत्तर देतांना विधान परिषदेत मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील म्हणाले की, ' दिल्लीप्रमाणे मुंबई ही केंद्रशासित करून स्वतंत्र करण्याचे कुणाचे मनात असेल तर त्याचा आपण जागृत राहून प्रतिकार केला पाहिजे! ' मुख्यमंत्र्यांचे हे विधान म्हणजे बॉम्बगोळाच होता. सर्व वृत्तपत्रांनी ठळकपणे हे वृत्त दिले. काही वृत्तपत्रांनी ही हेडलाईन केली.

याच वेळी भाषणात दादा असेही म्हणाले की, ' छोट्या शेतकऱ्यांना ६ टक्के व्याजाने कर्ज देण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. यास केंद्रसरकारचा व रिझर्व्ह

बँकेचा विरोध असला तरी या धोरणाची राज्य सरकार " शेंडी तुटो की पारंबी तुटो " अंमलबजावणी करील ! दादांच्या या दोन्ही विधानांनी खळबळ माजणे साहजिकच होते. मुख्यमंत्री म्हणून वसंतदादा स्वतंत्रपणे वागू लागले होते. वसंतदादा आणि पक्षश्रेष्ठी यांच्यातील जाहीर संघर्षाची ही नांदी होती. दादांची वाटचाल संघर्षाकडे चालली होती.

मराठी माणूस संघटित झाला

जस जसे वातावरण पेटत गेले तशी मुंबईतील मराठी माणसावर अन्याय होत आहे याची बालंबाल खात्री मराठी मनाला पटली. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आणि मराठी माणसाचा आवाज उठविण्याची खात्री वाटलेल्या शिवसेनेला प्रचंड यश मिळाले. शिवसेनेचा भगवा झेंडा पालिकेवर फडकला मुंबईतील तमाम मराठी माणसाने संघटित होवून शिवसेनेला मतपेट्या भरभरून मते दिली. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळविणारी इंदिरा काँग्रेस कुठल्या कुठे फेकली गेली ! कारण स्थानिक मराठी माणूस इंदिरा काँग्रेसपासून खूप दूर गेला होता ! इंदिरा काँग्रेसच्या पराभवाचे खापर वसंतदादांवर फोडण्यात आले. अध्यक्ष देवरांनी या पराभवानंतर राजीनामा देण्याचे "नाटक" केले, पण दिल्लीत दादांविरुद्ध कागाळी करण्याची हस्ते-परहस्ते सोयही केली.

महिन्यातच मंत्रिमंडळ गेले असते

दरम्यान, मार्च महिन्यातच राज्य विधिमंडळाचे दोन आठवड्यांचे पहिले अधिवेशन सुरू असतानांच शेवटी शेवटी राज्यपालांनी विधान परिषदेवर नियुक्त करावयाच्या चार सदस्यांची नांवे पक्षश्रेष्ठींकडून आली. त्यात दादांचे कट्टर विरोधक नासिकराव तिरपुडे व विधानसभेला तिकीट नाकारण्यात आलेल्या नि मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत असलेल्या श्रीमती प्रतिभा पाटील यांचे नांव होते. या दोन नांवास दादांचा कसून विरोध होता. ही नांवे मागे न घेतल्यास आणि डॉ. शेरेकरांच्या शपथविधीच्या प्रश्नावर विधिमंडळाचे अधिवेशन संपताच राजीनामा देण्याची तयारी वसंतदादांनी केल्याचे कळले होते. काही वृत्तपत्रांनी तशा स्वरूपाच्या बातम्याही दिल्या होत्या. अखेर दादांचा विरोध मान्य झाला नि त्यावेळी तरी पक्षश्रेष्ठींनी ही नांवे मागे घेतली. नाहीतर एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळ गेले हे चित्र महाराष्ट्राला पहावयास मिळाले असते. (एप्रिल १९८५ चा पहिला आठवडा)

पक्षश्रेष्ठींची तात्पुरती माघार

दादांचा हा संघर्षाचा पवित्रा पक्षश्रेष्ठींना आवडला नाही. पक्षश्रेष्ठींनी तात्पुरती माघार घेतली तरी दादांना 'सगळेच तुमच्या मनाप्रमाणे चालणार नाही' हे दाखविण्यासाठी त्यांच्या आणखी एक कट्टर विरोधक श्रीमती प्रभा राव यांना महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसचे अध्यक्ष करावयाचे पक्षश्रेष्ठींनी ठरविले. दादांसमोर हा प्रस्ताव मांडण्यात आला, तेव्हा त्यासही दादांनी कडाडून विरोध केला व त्याऐवजी दोन नांवे सुचविली. ही दोन्ही नांवे विदर्भातील होती. दादांच्या विरोधामुळे प्रभा राव यांचे नांव यावेळी मागे पडले. श्री. टी. जी. देशमुख व श्री भगवंतराव गायकवाड या माजी मंत्र्यांची नांवे दादांनी सुचविली होती, असे कळले.

परप्रांतियांचे लोंढे

दरम्यान, दादा दिल्लीस गेले असता मुंबईचे बकाली स्वरूप घालविण्यासाठी आणि मुंबईच्या स्वास्थ्यासाठी मुंबईत परप्रांतियांचे येणारे लोंढे रोखले पाहिजेत, असे विधान एका पत्रकार परिषदेत त्यांनी केले. आणि याचे तीव्र पडसाद देशात उमटले. शिवसेनेची भूमिका दादांना मान्य आहे असा अर्थ लावला गेला. पालिका निवडणुकीतील शिवसेनेचा विजय व आता दादांनी घेतलेली ही भूमिका त्यामुळे दादा शिवसेनेला मदत करतात असा ग्रह दादांविरोधी दिल्लीतील लॉबीने पक्ष-श्रेष्ठींचा करून दिला. किंबहुना दादांच्या या वक्तव्याने त्यांचे काम सोपे झाले. दादांच्या या वक्तव्याचे पडसाद लोकसभेतही उमटले. दादांचे हे विधान घटना-विरोधी आहे अशी टीका झाली व पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांना 'मुंबईत जाण्यापासून कुणालाही रोखण्यात येणार नाही,' अशी ग्वाही लोकसभेत द्यावी लागली. तथापि, 'मुंबई वाचविण्यासाठी परप्रांतियांचे लोंढे रोखावे लागतील,' ही दादांची भूमिका कायम होती. दादांना आम्ही काही पत्रकार "वर्षा" बंगल्या-वर भेटलो असता आपले हे मत त्यांनी पुन्हा खंबीरपणे सांगितले आणि हे आम्ही प्रसिद्ध केले. पक्षश्रेष्ठींनी दादा यांच्यातील संघर्ष येथेही स्पष्ट झाला.

याचा अर्थ पुन्हा मुख्यमंत्री झाल्यापासून दादा सतत संघर्षाच्या पवित्र्यात होते. या ना त्या प्रश्नावर ते पक्षश्रेष्ठींशी सतत संघर्ष करीत होते. कधी त्याचे स्वरूप उघड होते, तर कधी हा संघर्ष पडद्यामागे चालत होता !

शेरेकरांच्या शपथविधीस परवानगी

दरम्यान, ज्या प्रश्नावरून संघर्षास सुरूवात झाली त्याची भरपूर किंमत

मोजल्यावर डॉ. शेरेकर यांना मराठी भाषिक मंत्री म्हणून मुंबईतून राज्य मंत्रिमंडळात घेण्यास पक्षश्रेष्ठींनी अखेर स्पष्टपणे परवानगी दिली. व लगेच त्यांचा मंत्री म्हणून शपथविधी करण्यास दादांना सांगितल्याची माहिती विश्वसनीयरीत्या मला मिळाली. मे महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यातील ही घटना आहे. अगदी विश्वसनीयरीत्या मला हे कळले. पण दादांनी हा शपथविधी केला नाही! यावर दादांचे म्हणणे कळले ते असे की, 'शेवटी शेवटी मला ही परवानगी मिळाली. मी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याचे ठरविल्यावर आठ दिवसांसाठी मंत्री म्हणून डॉ. शेरेकरांचा शपथविधी करण्यात काय अर्थ होता?' दादांचा हा युक्तिवाद मान्य केला तरी दादांनी डॉ. शेरेकरांचा शपथविधी- आठ दिवसांकरिता का असेना–करायला हवा होता. कारण पुढे शिवाजीराव पाटील–निलंगेकर यांच्या मंत्रिमंडळात दादांचेच सर्व मंत्री असल्याने डॉ. शेरेकरही त्या मंत्रिमंडळात असते. मंत्री म्हणून डॉ. शेरेकर यांचा 'क्लेम' राहिला असता! पण तसे न करण्यात दादांचे काय "राजकीय डावपेच" असतील ते त्यांनाच ठाऊक! पण दादांच्या या राजकारणामुळे डॉ. शेरेकरांचे मात्र नुकसान झाले ही वस्तुस्थिती आहे!

दादांनी राजीनामा ओढवून घेतला

पक्षश्रेष्ठी व दादा यांच्यात सतत संघर्ष चालू असतांना दादा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार अशा सतत बातम्याही ऐकू येत होत्या. मंत्रालय परिसरात ही एक नित्याचीच बाब होऊन बसली होती. 'दादा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार नाहीत' असे छातीठोकपणे सांगणारे पत्रकारही मंत्रालयात होते. दादांचा हा एक 'नाटका'चा भाग आहे, असे त्यांचे म्हणणे होते. परंतु दरम्यान, अशी एक मोठी घटना घडली की वसंतदादांनी मुद्दामहून राजीनाम्याची परिस्थिती ओढवून घेतली! आणि जाहीर केल्याप्रमाणे, बोलल्याप्रमाणे राजीनामा दिला!

पंतप्रधान श्री. राजीव गांधी हे रशियाच्या दौऱ्यावर असतांना मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी काढलेल्या उद्‌गारांनी मोठा गहजब झाला. मंत्रिमंडळाच्या साप्ताहिक बैठकीनंतर या बैठकीतील निर्णयांची माहिती घेण्यासाठी मंत्रालयातील पत्रकार वसंतदादांना भेटले. मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयांची माहिती दिल्यावर पत्रकारांनी दादांना पक्ष–संघटनेबद्दल प्रश्न विचारले. एका पत्रकाराने राज्यातील इंदिरा काँग्रेस संघटनेची स्थिती कशी वाईट आहे, हे यावेळी

सांगितले. त्यावर या संघटनेची पुनर्रचना करण्याची आवश्यकता दादांनी प्रतिपादन केली. बोलण्याच्या ओघात पक्षाध्यक्ष व पंतप्रधानपद एकाच व्यक्तीकडे असावे की नसावे याचाही विचार झाला पाहिजे, असे दादा म्हणाल्याचे यावेळी प्रत्यक्षात उपस्थित असलेल्या अनेक वार्ताहरांनी मला सांगितले. वसंतदादांच्या या एका वाक्याने मोठा वाद निर्माण झाला. पक्षश्रेष्ठींनी आतापर्यंत दादांचे सारे काही सहन केले. पण आता दादांनी सरळ पंतप्रधानांवरच हल्ला चढवून राजीव गांधींनाच वादात खेचले होते. दादांच्या या वक्तव्याने पक्षात प्रचंड वादळ निर्माण झाले. अनेक इंदिरा काँग्रेस नेत्यांना वाटले किंवा तसे त्यांनी भासवले की दादा तसे बोललेच नसतील! नेहमी प्रमाणे वृत्तपत्र–प्रतिनिधींना तोंडघशी पाडण्याचा प्रयत्न झाला. दादांच्या या वक्तव्यावर फारच कोलाहल माजला तेव्हा एक दिवसानंतर दादांचा सही नसलेला दोन पानांचा साइक्लोस्टाइल खुलासा वृत्तपत्रांना राज्य सरकारच्या प्रसिद्धी खात्याने पाठविला. त्यातील चार ओळींमध्ये वृत्तपत्र–प्रतिनिधींवर नाहक दुगाण्या झाडण्यात आल्या होत्या. पण 'दादा असे बोललेच नाहीत,' असे काही त्यात म्हटले नव्हते. फक्त 'पक्षाध्यक्ष व पंतप्रधान एकच व्यक्ती असावी की नसावी असे कार्यकर्ते म्हणतात' असे या खुलाशात होते. म्हणजे दादा नव्हे तर कार्यकर्ते असे म्हणतात असे सांगून दादांनी आपले म्हणणे कायम ठेवले होते. पत्रकार परिषदेला उपस्थित होते ते वार्ताहर सांगतात की, 'हा वादग्रस्त प्रश्न दादांना कुणी विचारलाच नव्हता. त्यांनीच हे आपणहून सांगितले !'

मंत्रिमंडळाची बैठक रद्द

यावेळी पंतप्रधान श्री. राजीव गांधी हे रशियात होते. दादांचे हे टीकास्त्र तेथे पोचविण्याची व्यवस्था करण्यात आली असे म्हणतात. पक्षश्रेष्ठींनी दादांच्या या वक्तव्याची फारच गंभीर दखल घेतली ! आणि अपेक्षेप्रमाणेच राजीव गांधी रशिया दौऱ्यावरून परत येताच तातडीने दादांना दिल्लीस बोलावून घेण्यात आले, त्याचवेळी मोठी राजकीय घटना राज्यात घडणार याची कल्पना मंत्रालयातील बऱ्याच पत्रकारांना आली होती. दादांना दिल्लीचे तातडीने बोलावणे आल्याने त्यांनी दुसऱ्या दिवशी असलेली राज्य मंत्रिमंडळाची बैठकही अचानकपणे रद्द केली. तेवढीच महत्त्वाची घटना असल्याशिवाय मंत्रिमंडळाची ठरलेली बैठक रद्द होत नाही. ही घटनाही बोलकी होती !

दादांचा दिल्लीत घोर अपमान

दादांना दिल्लीत बोलावून घेण्यात आले, परंतु पक्षाध्यक्ष राजीव गांधी

त्यांना भेटलेच नाही. ज्या गोष्टी दादांना खटकत असत त्या "दुय्यम लोकांनी" दादांशी दिल्लीत बोलणी केली. दादांचा "इगो" साहजिकच दुखावला ! आणि एवढेच नव्हे तर दादा दिल्लीत असतानाच त्यांना न विचारता मुद्दाम महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षपदी त्यांच्या कट्टर विरोधक श्रीमती प्रभा राव यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. मुंबई विभागीय इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षपदी मुरली देवरा हेच यापुढेही राहतील असेही याच वेळी घोषित केले गेले. (मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेसचा दारूण पराभव झाल्यावर देवरा यांनी अध्यक्षपदाचा "तोंडी" राजीनामा दिला होता) पंतप्रधान व पक्षाध्यक्ष राजीव गांधी दादांना भेटले नाहीच, उलट या दोन घोषणा करून पक्षश्रेष्ठींनी दादांचा सणसणीत अपमान केला होता. एका परीने "स्वाभिमानी दादांनी" आपणहून राजीनामा द्यावा, अशीच ही तजबीज करण्यात आली होती. आणि इतके करूनही दादा मुख्यमंत्रीपदी राहिलेच असते तर सत्तेसाठी लाचार झालेला दादा असे चित्र महाराष्ट्राला दिसले असते आणि नंतर या "लाचार दादा"ची गठडी पक्षश्रेष्ठींनी सहजगत्या लौकरच वळली असती !

आणि दादांनी दिल्ली सोडली

आणि या अपमानी परिस्थितीत दादांनी दिल्ली सोडली व स्वाभिमानाने मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय मनाशी पक्का केला. मुंबईत आल्यावर आपल्या विश्वासू सहकाऱ्यांजवळ त्यांनी आपला हा राजीनाम्याचा बेत बोलून दाखविला. दुसऱ्या दिवशी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतही त्यांनी निरोपाची भाषा केली. आता मात्र वातावरण गंभीर झाले. मंत्रालयातही 'आता दादा खरोखरच राजीनामा देणार की काय ?' असे वाटू लागले. १ जून (१९८५) रोजी पंतप्रधान महाराष्ट्राच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर येणार होते. त्यांना मुंबईत विमानतळावर निरोप दिल्यावर वसंतदादा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार असे मंत्रालयात सर्वत्र बोलले जात होते. दरम्यान, सातारा येथे बोलतांनाही दादांनी आपला राजीनाम्याचा निर्धार प्रमुख इंदिरा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांजवळ बोलून दाखविला. आणि हे वृत्त ठळकपणे प्रसिद्धही झाले. एवढी सर्व जय्यत तयारी झाल्यावरही काहीतरी मार्ग निघून दादा राजीनामा देणार नाहीत, असे अनेकांना वाटत होते. दादांचे जवळचे मित्र, मंत्रिमंडळातील काही सरकारी या पेचप्रसंगातून मार्ग काढण्याच्या तयारीला लागले. दरम्यान, केंद्रीय अर्थमंत्री व पंतप्रधानांचे विश्वासू श्री. व्ही. पी. सिंग, सरचिटणीस जी. के. मूपनार, पी. शिवशंकर या

केंद्रीय निरीक्षकांचे मुंबईत आगमन झाले आणि राजकीय चक्रे जोरात फिरू लागली. या निरीक्षकांना इंदिरा काँग्रेसचे अनेक आमदार भेटले. तसेच हे निरीक्षक दादांना जाऊन भेटले. 'दादांनी राजीनामा देऊ नये' असा या निरीक्षकांचा प्रयत्न होता. दरम्यानच्या काळात या तिघा निरीक्षकांना सीताराम केसरी हे आणखी एक निरीक्षक मुंबईत येऊन मिळाले. दादांचे मंत्रिमंडळातील अनेक सहकारी, काही जवळचे आमदार तसेच हे निरीक्षकही दादांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊ नये म्हणून त्यांचे सारखे मन वळवित होते, पण दादांचा निर्धार कायम होता !

राजीव-दादा भेट

१ जून (१९८५) रोजी पंतप्रधान राजीव गांधी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले. पुण्याहून त्यांचा दौरा सुरू झाला. पुणे ते मुंबई या दरम्यान दादा पंतप्रधानांबरोबर होते, पण त्यांचे बोलणे झाले नाही, असे म्हणतात. दुपारी राजभवनावर राजीव गांधी व दादा यांच्यात सुमारे १०-१२ मिनिटे बोलणी झाली व यावेळी दादांनी आपल्या 'अपमानाची मालिकाच' पंतप्रधानांना ऐकविल्याचे म्हणतात व या वृद्धवयात आपण हे सर्व काही सहन करू शकत नाही असे सांगून राजीनाम्याचा आपला निर्धार त्यांनी पंतप्रधानांना सांगितल्याचे अनेकांकडून ऐकावयास मिळाले. त्यावर दादांनी राजीनामा देऊ नये, असे पंतप्रधानांनी त्यांना सांगितल्याचे म्हणतात. पण दादांनी राजीनाम्याचा आपला निर्धार कायम असल्याचे राजीव गांधींना सांगितले, असे ऐकावयास मिळाले.

या दिवशी मुंबईत, मंत्रालयात, आमदार निवासात सर्वत्र एकच विषय होता- 'दादा राजीनामा देणार काय ?' मुंबईच्या सर्वच सांजदैनिकांनी अशाच आशयाचे मथळे त्या दिवशी दिले होते.

पंतप्रधानांची पत्रकारांशी प्रश्नोत्तरे

संध्याकाळी ५-३० च्या सुमारास पंतप्रधान रिझर्व्ह बँकेचा समारंभ आटोपून बाहेर पडले तेव्हा पत्रकारांनी त्यांना गाठले. 'महाराष्ट्रात कोणताही राजकीय पेचप्रसंग नाही, दादांना आपण पूर्वीही पाठिंबा दिला आहे व यापुढेही पाठिंबा देऊ आणि दादांनी आपल्याकडे मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिलेला नाही, याबाबत तुम्ही त्यांनाच विचारा' अशी उत्तरे पंतप्रधानांनी पत्रकारांच्या प्रश्नांना दिली. राजीव गांधींच्या या उत्तरांमुळे 'दादा राहणार की जाणार' अशी अवस्था निर्माण झाली. दरम्यान, राजीव गांधी राजधानीत परत जाण्यासाठी सांताक्रूझ विमानतळावर गेले आणि दादा त्यांना निरोप देऊन "वर्षा" बंगल्यावर परतले.

केंद्रबिंदू "वर्षा"वर

आता राजकीय हालचालींचा "केंद्रबिंदू" "वर्षा"वर होता. आम्ही सर्व पत्रकार तिकडे धावलो. सायंकाळी ६–३० च्या दरम्यान आम्ही मंत्रालयातून "वर्षा"-वर पोचलो. तेव्हा तेथील वातावरण गंभीर होते. अनेक मंत्र्यांच्या लाल दिव्याच्या गाड्या आवारात उभ्या होत्या. काही ओळखीचे मंत्री "वर्षा"वर भेटले. तेव्हा 'वातावरण निवळल्याचे' त्यांनी सांगितले. पेचप्रसंग टळला असा याचा अर्थ होता !

चौघे निरीक्षक "वर्षा"वर आले

दरम्यान, सायंकाळी पावणेसात, सातच्या सुमारास व्ही. पी. सिंग, शिवशंकर, मूपनार व केसरी हे चौघे केंद्रीय निरीक्षक "वर्षा"वर आले. आम्ही पत्रकारांनी त्यांना गराडाच घातला व एकूण परिस्थितीबाबत विचारले. तेव्हा व्ही. पी. सिंग व पी. शिवशंकर म्हणाले, 'थांबा, आम्ही तुम्हाला निश्चितपणे सांगू !' आणि हे निरीक्षक दादांशी चर्चा करण्याकरिता आत गेले. अर्धा तास, एक तास झाला तरी ही बोलणी चालू होती. दरम्यानच्या काळात राज्याचे बरेच मंत्री येत होते आणि बंगल्यात शिरत होते. मध्यंतरी एक राज्यमंत्री आतून बाहेर आले. बाहेर थांबलेल्या पत्रकारांना ते भेटले. 'परिस्थिती गंभीर असल्याचे' त्यांनी सांगितले व अत्यंत चिंताक्रांत चेहरा करून निघून गेले. (दादांच्या जवळचे हे राज्यमंत्री होते) 'दादा राजीनामा देणार' व 'परिस्थिती निवळली' अशा दोन्ही तऱ्हेच्या बातम्या आता "वर्षा" बंगल्यावर सतत ऐकू येत होत्या. दादांवर भवितव्य अवलंबून असलेले अनेक लोक बंगल्याच्या आवारात आणि बंगल्यात एकसारखे आत बाहेर करीत होते. त्यात मंत्री होते, आमदार होते, खासदार होते, काही प्रमुख इंदिरा काँग्रेसचे कार्यकर्तेही होते.

आणि निरीक्षक गेले

साधारणतः रात्री पावणे नऊ–नऊच्या सुमारास चौघे निरीक्षक बंगल्यातून बाहेर आले. दीड–दोन तासांच्या चर्चेनंतर काही तरी निश्चित ठरले असेल व मोठी बातमी मिळेल या अपेक्षेने पत्रकारांनी मोठ्या उत्सुकतेने त्यांना गाठले. तेव्हा सिंग-शिवशंकर म्हणाले, 'आम्ही तुम्हाला सांगण्याचे निश्चितपणे आश्वासन दिले होते. पण अजून सांगण्यासारखे काही नाही. आम्ही तासाभरात जाऊन परत येतो.' आणि हे चौघेजण एका मोठ्या आलिशान मोटारीत बसून निघून गेले.

प्रभा राव हा प्रतिष्ठेचा प्रश्न झाला

निरीक्षक जाताच "वर्षा" बंगल्याच्या दुसऱ्या भागात बसून असलेले अनेक मंत्री, राज्यमंत्री आणि काही आमदार लगबगीने दादांना भेटावयास गेले. दादांनी त्यांना बोलाविले असल्याचे सांगण्यात आले. त्यावेळचे एकूण खेळीमेळीचे वातावरण पाहता 'पेचप्रसंग टळला' असे पत्रकारांना वाटले. निरीक्षकांनी पुढे ठेवलेल्या पर्यायांवर दादा सहकाऱ्यांशी चर्चा करीत आहेत, अशीही बातमी कुणीतरी यावेळी सोडून दिली. आणि रात्री सव्वादहाच्या सुमारास 'दादा ऐकावयास तयार नाहीत, दादा राजीनामा देण्यासाठी राज्यपालांकडे निघाले', अशी बातमी धाडकन् येऊन ठेपली आणि आम्हा सर्व पत्रकारांची एकच धावपळ उडाली ! प्रभा राव यांच्या प्रदेशाध्यक्षपदाच्या नियुक्तीबाबत दादा काही केल्या ऐकावयास तयार नव्हते. ही नियुक्ती पक्षश्रेष्ठींनी रद्द केली तरच दादांचा राजीनामा टळला असता ! आणि हा प्रश्न पक्षश्रेष्ठींनीही प्रतिष्ठेचा केला होता. अपमान झालेले दादा या प्रश्नावर काही केल्या ऐकावयास तयार नव्हते. आणि रात्री साडेदहाच्या सुमारास मुख्यमंत्र्यांची गाडी पोर्चमध्ये लागली! याचा अर्थ दादा राज्यपालांकडे राजीनामा देण्यास निघाले होते !

निरीक्षक दहा मिनिटात बाहेर

इतक्यात, चौघे निरीक्षक दादांना पुन्हा भेटावयास येत असल्याचा निरोप आला. मुख्यमंत्र्यांची गाडी पोर्चमधून काढण्यात आली. आणि लगेच निरीक्षकांची आलिशान मोटारगाडी येऊन थडकली. पुन्हा सर्वांची उत्सुकता ताणली गेली ! यावेळी मात्र दहा मिनिटातच निरीक्षक दादांना भेटून बाहेर आले. पत्रकारांनी त्यांना विचारताच ते म्हणाले, 'दादा, तुम्हाला सर्व सविस्तरपणे सांगतील !' आणि निरीक्षक निघून गेले.

दादांचा राजीनामा

लगेच पाठोपाठ दादा पहिल्या मजल्यावरून खाली आले. पत्रकारांनी त्यांना गराडाच घातला. 'आपण राजीनामा देण्यासाठी राज्यपालांकडे जात आहोत' आणि 'परवा सोमवारी (३ जून १९८५) सकाळी विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाची बैठक बोलाविली आहे' एवढेच पत्रकारांना सांगून दादा मोटारीत जाऊन बसले. त्यांच्याबरोबर श्री. नरेंद्र तिडकेही गाडीत बसले. दादांना मोटारीपर्यंत सोडण्यासाठी अनेक मंत्री, आमदार गेले, त्यात मुंबई विभागीय इंदिरा काँग्रेसचे अध्यक्ष श्री. मुरली देवरा हेही होते !

यावेळी रात्रीचे ११ वाजले होते. तब्बल ५ तास "वर्षा"वर चाललेले विलक्षण नाट्य संपले होते. 'दादांनी राजीनामा दिल्याची' महत्त्वपूर्ण बातमी आपापल्या वृत्तापत्रांना देण्यासाठी पत्रकार धावले.....

दादा उठून दिसला

वसंतदादांनी स्वाभिमान, महाराष्ट्राची अस्मिता दाखवून दिली. चुका दादांकडूनही झाल्या असतील. पण सत्तेसाठी हपापलेल्यांच्या सध्याच्या वातावरणात सत्तात्यागणारा वयोवृद्ध स्वातंत्र्यसैनिक वसंतदादा वेगळाच उठून दिसला ! वसंतदादांशी लहान मोठे मतभेद असू शकतील. पण स्वाभिमानापोटी मुख्यमंत्रीपद सोडणारा वसंतदादा त्यापलिकडे जाऊन मोठा झाला. महाराष्ट्राच्या सीमाओलांडून देशपातळीवर गेला. शरद पवारांनी विधानसभेच्या निवडणुकांमध्ये महाराष्ट्राची अस्मिता, स्वाभिमानाची भाषा करून लाचारी झुगारून देण्याचे आवाहन मऱ्हाठी जनतेला केले होते. शरद पवारांनी महाराष्ट्राच्या अस्मितेची भाषा केली, प्रत्यक्ष कृती मात्र वसंतदादांनी करून दाखविली ! महाराष्ट्राने लाचारी कधी सहन केली नाही. 'मुख्यमंत्रीपदा'चा अपमान सहन न करता स्वाभिमानाने मुख्यमंत्रीपद त्यागणारा वसंतदादा भविष्यात महाराष्ट्राचा एन्. टी. आर्. (रामाराव) होईल काय ?

●●

१०] राजकारणातील गमती-जमती

राजकारणात मित्र व शत्रू कायमचे नसतात. सोयीप्रमाणे शत्रू मित्र बनतात व मित्राचे शत्रू होतात. त्यातून बऱ्याच गमती-जमती घडतात. यशवंतरावांच्या पाठिंब्यानेच श्री. वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले होते. आपल्या खास वऱ्हाडी ढंगाने वसंतरावांनी मुख्यमंत्रीपद गाजवले. थोडे थोडके नव्हे तर अकरा वर्षे ते या राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर श्री. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले. यशवंतरावांचा शंकररावांना मुळीच पाठिंबा नव्हता. पण इंदिराजींनी महाराष्ट्रात हा बदल घडवून आणला. त्यावेळी इंदिराजी या काँग्रेस पक्षात सर्वसत्ताधिश होत्या. यावेळी यशवंतराव स्वभावानुसार मूग गिळून बसले. महाराष्ट्रात दुसऱ्या चव्हाणांचे राज्य सुरू झाले होते. पण यशवंतराव व शंकररावात जमीन-अस्मानाचा फरक होता. दोघात फक्त "आडनांव" साम्य होते. शंकररावांना महाराष्ट्रातील सर्वोच्च सत्ता मिळूनही माणसे जोडता आली नाही की आपली पकड घट्ट करता आली नाही. शंकरराव सत्तेवर आले नि "आणीबाणी" सुरू झाली. या आणीबाणीच्या राजवटीमुळेच शंकररावांचे मुख्यमंत्रीपद दीड वर्षे टिकले. आणीबाणी उठून लोकसभेच्या निवडणुका झाल्या नि काँग्रेसचा दणदणीत पराभव झाला. केंद्रातील काँग्रेसची सत्ता गेली, इंदिरा गांधी पंतप्रधान राहिल्या नाहीत. पक्षावरील त्यांची पोलादी पकडही गेली. आतापर्यंत गप्प राहिलेल्या यशवंतरावांनी महाराष्ट्रात उठाव केला. लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसला जो मार मिळाला त्या पराभवाचे खापर शंकररावांवर फोडण्यात आले व अशा तऱ्हेने यशवंतरावांच्या मनाविरुद्ध इंदिराजींनी लादलेला मुख्यमंत्री यशवंतरावांनी संधी मिळताच उलथून टाकला.

दादांनी "राजसंन्यास" का सोडला ?

शंकररावांनी आपल्या मंत्रिमंडळातून काढून टाकल्यानंतर "राजसंन्यास" घेतलेले श्री. वसंतदादा पाटील हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यावेळी 'काँग्रेसचे घर पेटले असतांना आपण स्वस्थ बसू शकत नाही' असे समर्थन हा "राजसंन्यास" सोडतांना दादांनी जाहीरपणे केले होते. (पण खरी गंमत अशी आहे की दादांनी स्वत:हून हा राजसंन्यास सोडला नव्हता ! यशवंतरावांनी त्यांना राजसंन्याशाचे कपडे उतरवून मुख्यमंत्रीपदाची वस्त्रे परिधान करण्यास सांगितले होते) कै. वसंतराव नाईक यांनी ही माहिती दिली. इंदिराजींच्या वाईट काळात आमदार

डॉ. शेरेकरांच्या संपादकत्वाखालील साप्ताहिक "चॅलेंज" इंदिराजींच्या बाजूने एकाकी लढत होते. या "चॅलेंज"चे वसंतरावांना कौतुक होते. एकदा ते डॉ. शेरेकरांना भेटले असतांना त्यांनी अत्यंत आपुलकीने त्यांच्या पेडर रोडवरील "ग्रॅण्ड पराडी" येथील निवासस्थानी गप्पा मारण्यास बोलाविले. डॉ. शेरेकर यांच्यासोबत मीही वसंतरावांच्या घरी गेलो होतो. पहिल्या माळ्यावरील आपल्या बेडरूममध्ये पडल्या पडल्या वसंतरावांनी तासभर गप्पा मारल्या. त्यावेळी त्यांची तब्येत बरी नव्हती. त्यावेळी वसंतराव जे बोलले त्यावरून यशवंतरावांबद्दल त्यांचे मत फारसे चांगले नव्हते. मुख्यमंत्री यशवंतराव १९६२ मध्ये "हिमालयाच्या रक्षणा"साठी संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीस गेले, तेव्हा मुख्यमंत्रीपदासाठी त्यांनी आपले नांव सर्वत्र जगजाहीर करून आयत्यावेळी श्री. मारोतराव कन्नमवार यांचे नांव पुढे केले, ही सल वसंतरावांच्या मनात होती. तसेच शंकररावांनंतर पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईकांना व्हायचे होते ! इंदिरा गांधींचा नाईकांना पाठिंबा होता, पण यशवंतरावांनी वसंतदादांना राजसंन्यास सोडायला लावून मुख्यमंत्रीपदासाठी पाचारण केले, असे नाईकांच्या बोलण्यातून समजले. 'इदिराजींना आपली पूर्वीची चूक दुरुस्त करायची होती व तसा त्यांचा फोन आपणास आला होता, असे वसंतरावांनी सांगितले. वसंतरावांची पुन्हा मुख्यमंत्री होण्याची इच्छा होती, हे त्यांनी खासदारकीची शपथ लवकर घेतली नाही, यावरूनही स्पष्ट होते. वसंतराव १९७७ च्या लोकसभेच्या निवडणुकीत वाशिम मतदारसंघातून निवडून आले होते. त्यावेळी ते विधानसभेचे सदस्यही होते. कायद्याप्रमाणे लोकसभा व विधानसभेचे सदस्य एकाचवेळी राहता येत नाही. वसंतराव नाईकांनी वसंतदादांचे नांव मुख्यमंत्रीपदासाठी नक्की झाल्यावरच मुदत संपण्याच्या शेवटच्या दिवशी खासदारकीची शपथ घेऊन आमदारकीचा राजीनामा दिला, ही घटना अतिशय सूचक व बोलकी आहे !

त्यांनीच दादांचे सरकार पाडले

ज्या वसंतदादांना १९७७ मध्ये यशवंतरावांनी मुख्यमंत्रीपदी बसविले, त्याच यशवंतरावांनी १९७८ मध्ये वसंतदादांचे तिरपुडयांबरोबरचे संयुक्त मंत्रिमंडळ पाडून शरद पवारांचे राज्य महाराष्ट्रात आणले. शरद पवारांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्ष महाराष्ट्रात प्रथमच सत्तेवर आला. इंदिरा काँग्रेस पक्षाशी हातमिळवणी करून वसंतदादा पुन्हा (१९७८ मध्ये) मुख्यमंत्री झाल्याचे यशवंतरावांना आवडले नव्हते. महाराष्ट्रात स्वर्णसिंग काँग्रेसने जनता पक्षाबरोबर युती करून सत्तारूढ व्हावे असे यशवंतरावांना वाटत होते. यशवंतरावांच्या या कृतीचा (मंत्रिमंडळ

पाडण्याच्या) वसंतदादांना अतिशय राग आला. मंत्रिमंडळ पाडल्याने यशवंतराव व दादांचे संबंध कमालीचे ताणले गेले. इतके की, महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसच्या त्यावेळच्या अध्यक्षा श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांच्या मुलीचे पुण्यांला लग्न होते. या लग्नाला आधी दादा आले, त्यानंतर यशवंतराव आले. यशवंतराव येताच दादा त्यांच्याशी न बोलताच लग्नमंडप सोडून निघून गेले.....

यशवंतराव–वसंतदादा पुन्हा मैत्री

दरम्यान, भारतीय राजकारणात बरीच स्थित्यंतरे घडली. १९८० मध्ये केंद्रात व राज्यातही इंदिरा काँग्रेस सत्तेवर आली. यशवंतरावांनी पुन्हा इंदिराजींचे नेतृत्व मान्य केले. शरद पवारांना सोडून ते इंदिरा काँग्रेसमध्ये आले. आणि "कृष्णे"काठी दादा–यशवंतरावांची "पुन्हा मैत्री" झाली. दादांना तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होण्यास यशवंतरावांनी मदत केली. दादांनीही यशवंतराव गटाचे वाईचे आमदार प्रतापराव भोसले व आमदार कलप्पा आवाडे यांना आपल्या मंत्रिमंडळात घेतले. हेच प्रतापराव शरद पवारांबरोबर काँग्रेस पक्ष सोडून नंतर विरोधी पक्षाच्या पुरोगामी लोकशाही दलाच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री झाले होते. बाबासाहेब भोसल्यांना मुख्यमंत्रीपदावरून घालविण्याकरिता चालविण्यात आलेल्या सह्यांच्या मोहिमेत प्रतापरावांनी प्रामुख्याने भाग घेतला होता. आणि सगळ्यात मोठी गंमत म्हणजे, १९८० मध्ये यशवंतरावांच्या विरुद्ध शालिनीताई लोकसभेसाठी अटीतटीने लढल्या, त्याच ताईसाठी १९८३ मध्ये सांगली लोकसभा पोटनिवडणुकीच्यावेळी "साहेब" (यशवंतराव) प्रचारासाठी चार दिवस सांगली भागात मुक्काम ठोकून होते. दादा मुख्यमंत्री झाल्याने त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला, त्यामुळे ही पोटनिवडणूक झाली.

"हेडमास्तर"चे "मास्तर" झाले

शंकरराव चव्हाणांचे मुख्यमंत्रीपद गेल्यावर दादांबद्दलच्या रागाने ते विरोधी पक्षात जाऊन बसले. पुढे त्यांनी मुख्यमंत्री शरद पवारांच्या "पुलोद" मंत्रिमंडळात मंत्रीपद स्वीकारले. शरद पवार शंकररावांच्या मंत्रिमंडळात होते, तेव्हा ते शंकररावांना त्यांच्या कडक स्वभावामुळे "हेडमास्तर" म्हणत. आता हे "हेडमास्तर" "मास्तर" झाले होते.....

आणि "ते" मंत्री झाले. . .

मुख्यमंत्री श्री. बाबासाहेब भोसले यांना घालविण्यासाठी जे उघडउघड लढले ते नानाभाऊ एंबडवार, सुशीलकुमार शिंदे व प्रतापराव भोसले पुढे

वसंतदादा पाटलांच्या मंत्रिमंडळात मंत्री झाले. नानाभाऊंनी मुख्यमंत्री भोसल्यांविरुद्ध त्यांनी आमदारांना "षंढ" म्हटल्याबद्दल नागपूर अधिवेशनात हक्कभंगाचा ठराव आणला होता. या ठरावास सुशीलकुमारनी अनुमोदन दिले होते. स्वपक्षाच्या मुख्यमंत्र्याविरुद्ध त्याच पक्षाच्या आमदारांनी हक्कभंग आणण्याचा हा अभूतपूर्व प्रसंग होता.

ते सहा "वीर" परत घेतले

नागपूर अधिवेशनाच्या वेळी विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाच्या बैठकीत मुख्यमंत्र्याविरुद्ध एकच "धमाल" करणाऱ्या सहा आमदारांना मुख्यमंत्री श्री. बाबासाहेब भोसले यांनी पक्षातून निलंबित केले होते. भोसले मुख्यमंत्रीपदावरून गेल्यावर या सहा आमदारांविरुद्धची–भाऊराव पाटील, सतीश चतुर्वेदी, सूर्यकांता पाटील, राम पंडागळे, अशोक पाटील, प्रेमानंद आवळे–ही कारवाई मागे घेण्यात येऊन त्यांना पुन्हा पक्षात सन्मानाने घेण्यात आले.....

बॅरिस्टर ! बॅरिस्टर ! !

बॅ. भोसले व बॅ. अंतुले यांची जिगर दोस्ती होती. अंतुलेंनीच भोसल्यांना मुख्यमंत्री केले. पण पुढे ते अंतुलेंच्या विरुद्ध गेले. मग त्यांना घालविण्यासाठी अंतुलेंनी जिवाचे रान केले. अखेर भोसले गेले. आता पुन्हा भोसले–अंतुले मित्र आहेत. भोसले आपले राजकीय गुरू अंतुलेंना पुन्हा जाऊन मिळाले. ... ...

REFBK-0024848

पंतांचा पत्र

प्रफुल्ल शानबाग

मोहसौख्य
प्रकाशन



लेखकाचा परिचय

पत्रकार श्री. प्रफुल्ल रामकृष्ण सागळे यांचे "सत्ताचक्र" हे राजकीय पुस्तक आहे. मराठीत राजकीय स्वरुपाची पुस्तके अगदीच थोडी आहेत. म्हणून या पुस्तकाचे मोल अधिक आहे. श्री. सागळे यांचे हे पहिले पुस्तक असले तरी त्यांना राजकारणाची असलेली जबर आवड, त्यांचा राजकारणाचा अभ्यास व दांडगा अनुभव याचा प्रत्यय ठायी ठायी या पुस्तकात येतो. अगदी सामान्य वाचकाला कळेल अशा साध्या-सोप्या भाषेत लिहिण्याचे पथ्य श्री. सागळे हे नेहमी आपल्या रिपोर्टिंगमध्येही पाळत आले आहेत. त्याचा अनुभव या पुस्तकातही येतो. उगाच स्तुती वा पूर्वग्रहदूषित टीका करणे हा अतिरेक श्री. सागळे हे आपल्या रिपोर्टिंगमध्ये सदैव टाळत आले आहेत. त्यांची लिहिण्याची पद्धती नेहमीच सडेतोड, परंतु समतोल (बॅलन्स) राहिली आहे. या पुस्तकातही तेच दिसून येते.

श्री. सागळे हे पंधरा वर्षे पत्रकारिता या क्षेत्रात असून त्यांनी विविध विषयांवर स्फुट लिखाण केले आहे. तथापि, राजकारण हा त्यांचा हातखंडा विषय आहे. दै. "नवाकाळ"-मध्ये ते आठ वर्षे वार्ताहर होते. त्यानंतर दै. "लोकसत्ता"मध्ये गेली ६ वर्षे ते वार्ताहर आहेत. साप्ताहिक "चॅलेंज"चे ते कार्यकारी संपादक होते, तसेच साप्ताहिक "सुयश"चे संपादक म्हणून त्यांनी काम केले आहे. मुंबईतील विविध पत्रकार संघटनांशी ते संबंधित असून मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे ते सरचिटणीस आहेत. महाराष्ट्राच्या राष्ट्रीय एकात्मता समितीचे ते सदस्य होते. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ सल्लागार समितीचे ते सदस्य असून विशेष कार्यकारी दंडाधिकारी आहेत. मुंबई विद्यापीठाचे ते पदवीधर आहेत.